
३-१०१०
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. २२२




नगरी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
ग्रहालय/वाचनालय शाखा.
REFBK-0006374
विभाग उलिहास क्रमांक ५
पुस्तकाचें नांव कांग्रेस आणि महायुद्ध.
लेखक पां. वा. गाडगीळ.
सूचना—पुस्तक आठ दिवसांवर ठेवूं नका. पुस्तकाची खराबी करूं नका.

पा. क्र.

~~६९२८~~

३५४

प्रति. क्र. २८०७

अधिकार प्रकाशन १

# काँग्रेस आणि महायुद्ध

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

: लेखक :

पां. वा. गाडगीळ

REFBK-0006374

अधिकार प्रकाशन संस्था
७९ हिंदू कॉलनी, दादर.

: संचालक :

एम्. आर्. गांवकर,

वामन राधाकृष्ण,

: प्रकाशक :

वामन राधाकृष्ण मेस्त

७९ हिंदु कॉलनी

दादर, मुंबई १४.

( पुनर्मुद्रणाचे वगैरे सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन)

किंमत दोन रुपये

: मुद्रक :

बाळकृष्ण गोपाळ प्रभु कोचरेकर

श्रीकृष्ण मुद्रणालय, खेतवाडी,

९ वी गल्ली, मुंबई ४.

# प्र स्ता व ना

काँग्रेसच्या गेल्या ४।५ वर्षांतील युद्धविषयक धोरणाच्या इतिहासाचा आढावा घेऊन पुढील कार्याची दिशा कोणती असावी यासंबंधानें एक दृष्टिकोन मराठी वाचकापुढें ठेवणें हा या पुस्तकाचा हेतु आहे. गेल्या चार वर्षांच्या काँग्रेसच्या युद्धविषयक राजकारणाचा समग्र व सुसंगत इतिहास या पुस्तकांत दिलेला नाहीं. तसा इतिहास संक्षिप्त असा लिहायचा म्हटलें तरी या पुस्तकाच्या तिप्पट चौप्पट मोठा असा तो ग्रंथ होईल. आजच्या कागदाच्या महागाईच्या व दुर्मिळतेच्या काळांत माझ्यासारख्या लेखकास ती गोष्ट जवळ जवळ अशक्यच होय. शिवाय जो सिद्धांत वाचकासमोर मांडण्याचे दृष्टीनें हें पुस्तक मीं लिहिण्यास घेतलें त्यासाठीं समग्र इतिहासाची मला जरूरी वाटली नाहीं. तो सिद्धांत सांगण्यास अवश्य तेवढ्या घटना, भाषणें, लेख, मतें मीं दिलीं आहेत. अशा प्रकारें इतिहासाचें संक्षिप्त समालोचन व त्या आधारें काँग्रेसच्या मुख्य युद्धविषयक सिद्धाताचें विवेचन करून पुढील मार्गाची दिशा दाखविण्याचा प्रयत्न येथें केला आहे. तथापि या संक्षिप्त इतिहासांतही ज्या बिषयांची चर्चा असलीच पाहिजे अशी वाचकांची अपेक्षा असेल, पण जी चर्चा मीं यांत केलेली नाहीं त्यासंबंधानें या प्रस्तावनेंत प्रथम दोन शब्द सांगतों.

## तीन पक्ष महत्त्वाचे

कम्युनिस्ट पक्ष, मुस्लिम लीग व काँग्रेस या तीन पक्षांचींच युद्धविषयक धोरणें या ना त्या कारणानें इतिहासांत महत्त्व पावलीं. नेमस्त पक्ष व सप्रू परिषद यांचीं धोरणें हीं महत्त्वाचीं ठरलीं. पण अखिल जनतेच्या चळवळीचें निशाण या दृष्टीनें त्यांना महत्त्व आलें नाहीं. याहून बाकीचे पक्ष आहेत त्यांना तत्त्वनिष्ठा नाहीं, चळवळ नाहीं व त्यांचे मागें जनताही नाहीं. म्हणून चर्चा करण्यासारखीं धोरणें म्हणजे वरील तीन पक्षांचींच होत. पैकीं काँग्रेसपक्षाचें धोरण सर्व पुस्तकभर चर्चिलें आहेच. कम्युनिस्टांच्या धोरणाची चर्चा दोन ठिकाणीं केली आहे. ती अगदीं थोडक्यांत असलीं तरी काँग्रेसच्या धोरणाशीं कम्युनिस्ट धोरणाचा जो संबंध आला तो समजून घेण्यास तेवढी चर्चा पुरेशी आहे. उरलें मुस्लिम लीगचें धोरण, म्हणजे पाकिस्तानची मागणी. तिचा अगदीं त्रोटक उल्लेख करण्यापलीकडे सापपत्तिक विवेचन

-यथें केलें नाहीं. त्या विषयावर एक संबंध प्रकरण घालायचें ठरविलें. अखेरीस पानें फार वाढूं लागलीं म्हणून तें काढून ठेविलें. पण तें काढून ठेवल्यानें मुख्य सिद्धांतप्रतिपादनाची कांहींही हानि झालेली नाहीं. उलट तें प्रकरण घातलें असतें तर एकंदर विषयप्रतिपादनाच्या चौकटींत तें बसवितांना माझे व वाचकांचे हाल झाले असते. असें मानण्याचें जें विशिष्ट कारण आहे तेवढेंच येथें सांगतों.

## पाकिस्तानचर्चा कां नाहीं

जिनांच्या पाकिस्तानमागणीकडे ज्या एका दृष्टिकोनानें पाहिले पाहिजे तो दृष्टिकोन असा. हिंदी जनतेनें आज जगभर माजलेल्या फॅसिझम्‌विरोधी युद्धांत संयुक्त राष्ट्रांच्या बाजूनें सामील झालें पाहिजे व त्यासाठीं अखिल हिंदुस्तानचें प्रतिनिधिक असें राष्ट्रीय मंत्रिमंडळ मध्य सरकारांत स्थापन केलें पाहिजे हा मुख्य सिद्धांत या पुस्तकांत प्रतिपादिला असून कॉंग्रेसच्या युद्धविषयक धोरणाचाही हाच मुख्य सिद्धांत होय असें माझें मत आहे. जिनांची पाकिस्तानमागणी या सिद्धांतास सर्वथैव विघातक आहे.जिनांना लोकशाहीबद्दल प्रेम नाहीं, फॅसिझम्‌विरोधाबद्दल तळमळ नाहीं व म्हणून युद्ध यशस्वितेनें लढण्यासाठीं राष्ट्रीय सरकार स्थापण्याची उत्कंठा नाहीं. राष्ट्रीय सरकार स्थापन करून फॅसिझम्‌विरोधी युद्ध लढण्याचें ठरल्यास युद्धानंतर पाकिस्ताननिर्मितीस अपाय न होईल अशी हमी युद्धकार्यांतच जिनांना हवी आहे. फॅसीझम्‌विरोधी लढा हिंदी जनतेनें लढायचा तर तो इतका राष्ट्रीय एकजुटीनें व एकजीवपणें लढावा लागेल कीं युद्धाच्या भयंकर आगीमध्यें देशांत असलेले सर्व भेद व कलह वितळून जाऊन युद्धाचे शेवटीं हिंदुस्तानची फाळणी करण्याला सर्व देश—हिंदु, मुसलमान व इतर सर्व जमाती पूर्णपणें प्रतिकूल होतील हें जिनांना ठाऊक आहे. म्हणून अशा प्रकारें निकराचा व एकजुटीचा युद्धप्रयत्न होऊं न देता जिना हे हिंदु सैन्य मुसलमान सैन्य, हिंदु नोकरवर्ग मुसलमान नोकरवर्ग, हिंदु प्रांत मुसलमान प्रांत, अशी फाळणी करूनच राज्यकारभाराची सुरवात करतील. पाकिस्तान अशक्य न होईल अशा प्रकारें युद्धप्रयत्न करायचा तर तो असाच केला पाहिजे आणि असा अंतर्गत फुटीवर आधारलेला युद्धप्रयत्न यशस्वी होणें अशक्यच आहे. जिनांची पाकिस्तानमागणी व राष्ट्रीय सरकारचा निकराचा युद्धप्रयत्न यांमध्यें अशा प्रकारें संपूर्ण व बिनतोड विरोध आहे. शिवाय जिनांना ब्रिटनच्याच अमलाखालीं ब्रिटनच्या

हातून पाकिस्तान निर्माण करून घ्यायचें आहे. उलट कॉंग्रेसला आधीं अखंड व स्वतंत्र राष्ट्र या नात्यानें निकराचा युद्धप्रयत्न करणें हेंच निकडीचें वाटतें. म्हणून कॉंग्रेसच्या युद्धविषयक सिद्धांताच्या बजावणीचा विचार करतांना अखेरीस कॉंग्रेसला जिना व त्यांची पाकिस्तानची मागणी यांची चर्चाही थांबवून त्यांना दूर सारावें लागलें. तेंच या पुस्तकांतही मीं केलें आहे. अखेर जनतासंघटनेचें काम हातीं घेतलें असतां मुसलमानाकडून अथवा इतर जनतेकडून पाकिस्तानची अथवा दुसरी कसली मागणी येते, कोणते नवे प्रश्न उत्पन्न होतात तें अनुभवानें कळणार आहे. आज आपण जेथें आहों त्याच्यापुढें पाऊल टाकायचें तर पाकिस्तानमागणीचा विशेष विचार न करतांच पुढें चालावें लागणार आहे.

## ८ ऑगस्टचा सिद्धांत

हें पुस्तक गेल्या एप्रिल–मेमध्यें लिहिलें. पण त्यांत ८ ऑगस्ट १९४२ नंतर घडलेल्या घटनांचा इतिहास मुळींच दिलेला नाहीं. याचें कारण ८ ऑगस्टचा जो सिद्धांत त्यांत नंतरच्या इतिहासानें कोणतीही नवी भर घातली नाहीं अथवा त्यांतून कांहीं उणें केलें नाहीं. फक्त त्या सिद्धांताची तीव्रता वाढविली आहे. हिंदी जनतेच्या हातीं मध्यसत्ता येऊन येथें पूर्ण स्वदेशी व सर्व राष्ट्राचें प्रातिनिधिक सरकार स्थापन व्हावें आणि त्या सरकारनें फॅसिझम्‌विरोधी युद्धांत संयुक्तांच्या बाजूनें भाग घ्यावा हें ८ ऑगस्टच्या मागणीचें सार असून त्याबाबत गेल्या वर्षभरांत लोकमत अधिकच दृढ व एकजूट झालें आहे. कॉंग्रेसच्या राजकारणाला जें एक कांहींसें नवें वळण लागलें पाहिजे असें या पुस्तकांत मी सुचवितों तें ही ८ ऑगस्टची मागणी पदरांत पाडून घेण्याचें दृष्टीनेंच लागलें पाहिजे. मागील इतिहासाची चर्चा केली आहे ती पुढील राजकीय धोरण आंखतांना पूर्वीच्या चुक्या टाळाव्या म्हणून केली आहे. त्यासाठीं पुढाऱ्यांच्या चुक्या कांहींशा निष्ठुरपणें दाखविल्या आहेत. कॉंग्रेसच्या प्रमुख पुढाऱ्यांविरुद्ध ही जी टीका मीं केली तीमुळें बऱ्याच कॉंग्रेसभक्तांचा व माझ्या कांहीं जिवलग मित्रांचाही माझ्यावर रोष होईल. मी कॉंग्रेसविरोधी झालों असा गिला करण्यास कांहींना आवडती संधि मिळेल. यांतलीं कांहीं वाक्यें संदर्भांतून तोडून काढून

काँग्रेसला झोडण्यासाठीं काँग्रेसविरोधक त्यांचा दुरुपयोग करतील. हे सर्व धोके पुस्तक लिहितांना मीं लक्षांत घेतले व ते पत्करले. काँग्रेसचें राजकारण पुष्कळसें अचूक आहे, हिंदुस्तानांत तरी इतकें अचूक युद्धविषयक धोरण दुसऱ्या कोणत्याच पक्षाचें नाहीं, अखेर जनतेला युद्धांत गोवण्याचें काम काँग्रेसलाच करावें लागेल व मध्यसरकारांत राष्ट्रीय मंत्रिमंडळ स्थापून काँग्रेसनें तें काम केलें पाहिजे, हें लक्षांत घेऊन काँग्रेसचें राजकारण अधिक डोळस, अधिक निश्चित व अधिक शास्त्रशुद्ध व्हावें यासाठीं वरील धोके पत्करून कांहीं विचार कांहींसे कठोरपणें लिहिले आहेत.

## ब्रह्मी गव्हर्नराचें मत

८ ऑगस्टच्या ठरावाची जी विशिष्ट भूमिका तिचा उलगडा ब्रिटिश सरकारला व काँग्रेसविरोधकांना नीटसा झालेला नाहीं इतकेंच नव्हे तर काँग्रेसमधीलही कित्येकांना झालेला नाहीं. त्यासंबंधानें यथायोग्य समजूत असणें हें पुढील धोरण आंखण्याचे दृष्टीनें अत्यवश्य असल्यानें, पुस्तकांत त्याची तपशीलवार चर्चा आहे, तरीही येथें त्याची थोडीशी पुनरुक्ति करतों. नुकतेच ब्रह्मदेशाच्या गव्हर्नरनीं केलेल्या भाषणावरून काँग्रेसच्या या विशिष्ट भूमिकेवर कांहींसा वेगळा प्रकाश पाडणेंही शक्य झालें आहे. “ ब्रह्मदेशाच्या मंत्र्यांना युद्धसहकार्य करण्याची मनापासून इच्छा होती, पण तसें करणें त्यांना जाहीरपणें शक्य होईना ” असे उद्गार ब्रह्मदेशचे माजी गव्हर्नर सर रेजिनाल्ड डॉर्मन–स्मिथ यांनीं काढले. याचा अर्थ असा होतो कीं ब्रह्मदेशाची जनता अतीशय प्रखरपणें युद्धविरोधी असल्यानें युद्धानुकूल असणाऱ्या मंत्र्यांना आपली पताका घेऊन उजळ माथ्यानें समाजांत वावरता येत नसे. पण हिंदुस्तानांत तर परिस्थिति याच्या अगदींच विरुद्ध दिसते ! लोकमताचा ज्यांना कवडीइतकाही पाठिंबा नाहीं आणि लोकमताला जे कस्पटासमान तुच्छ लेखतात असे क्षुद्र, स्वार्थी व देशबुडवे लोक आपल्या स्वार्थासाठीं युद्धसहकार्याचा टेंभा उजळ माथ्यानें मिरवीत आहेत. मग ब्रह्मदेशांतल्यापेक्षा येथली जनता कमी देशाभिमानी आहे अथवा कमी युद्धविरोधी आहे असें समजायचें काय ? या प्रश्नाचें उत्तर समजून घेण्यासाठीं ब्रह्मी जनता व हिंदी जनता यांच्या मनोवृत्तींतील फरक समजून घेतला पाहिजे.

## ब्रह्मदेशांत फितुरी—

हिंदुस्तान व ब्रह्मदेश या दोन्ही देशावर ब्रिटनचें परराज्य असल्यानें दोन्ही

देशांतील जनता स्वाभाविपणेंच ब्रिटनविरोधी आहे. गेल्या महायुद्धाचे वेळीं ब्रह्मदेश जागृत नव्हता तो यावेळीं विशेष जागृत झाला होता. आणि अंकित राष्ट्राच्या पहिल्या जागृतीचें लक्षण म्हणजे राज्यकर्त्या परराष्ट्राचा द्वेष, तो तेथें अतीशय तीव्र प्रमाणांत माजला. हिंदुस्तानांत १९१४–१८च्या युद्धाचे वेळीं ब्रिटिशद्वेष हीच भावना जनतेंत वावरत होती. देश अफाट व शत्रुसत्तेपासून दूर असल्यानें त्यावेळीं येथें परक्यांच्या मदतीनें मोठेसें बंड झालें नाहीं. तरी पण स्वातंत्र्यप्राप्तीचे यत्न शत्रुराष्ट्रांच्या साह्यानें दहशतवाद्यांनीं केलेच. चालू युद्धाचे वेळीं ब्रह्मदेशांतील ब्रिटनद्वेषाला जपाननें ब्रह्मदेशाच्या सरहद्दीवर राहून व गुप्तसंचार करून फुलविलें. ब्रह्मी लोकांना स्वातंत्र्यासंबंधानें कोणताही शास्त्रीय विचार शिकविण्यांत आला नव्हता. ब्रिटनचा द्वेष ही एकच माथेफिरू भावना त्यांच्या अंतःकरणांत होती. वातावरण ब्रिटनद्वेषानें कुंद झालें असल्यानें युद्धानुकूल मंत्र्यांना त्यांत श्वासोच्छ्वास करणेंही अशक्य झालें. पण ब्रह्मी लोकानीं उघड बंड केलें नाहीं. जपानी सैन्यास ते फितुर झाले व जपानी सैन्य सरहद्दीवर चाल करून आलें तेव्हां ब्रिटिश सत्तेविरुद्ध त्यास सामील होवून ब्रिटिशाऐवजीं त्यांनीं जपानची गुलामगिरी पत्करली. नुसत्या माथेफिरू ब्रिटिशद्वेषाचा परिणाम अशाप्रकारें एक गुलामगिरी जाऊन दुसरी गुलामगिरी लादली जाण्यांत झाला.

## —आणि हिंदुस्थानांत बंड

हिंदुस्तानांत पारस्थिति अगदीं भिन्न होती व आहे. येथें नुसता माथेफिरू व अविवेचक ब्रिटिशद्वेष नाहींसा करून शास्त्रीय दृष्टिकोनानें सुचणारा परकीसत्ताविरोध व साम्राज्यशाहीविरोध लोकांचे मनांत रुजविण्याचे प्रयत्न गांधी, नेहरू इत्यादि कॉंग्रेसपुढाऱ्यांनीं गेल्या वीस वर्षांत जिवापाड केले. त्याला बरेंच यश येऊन, ब्रिटनद्वेष पूर्ण नष्ट झाला नाहीं तरी त्याची तीव्रता बरीच कमी झाली. ब्रिटिश सत्ता वाईट असली तरी जपानी सत्ताही वाईटच, कारण कोणतीही परसत्ता वाईट, ही दृष्टि हिंदी लोकांना गेल्या वीस वर्षांत आली आहे. पं. नेहरूंनीं याहीपेक्षां अधिक सखोल असा दृष्टिकोन दिला. सध्यांचे काळीं परराज्याचें स्वरूप साम्राज्यशाही हें असून ती एक जागतिक घटना आहें, तिचें तीव्र स्वरूप फॅसिझम् हें आहे, साम्राज्यशाही व फॅसिझम् या दोहोंचा जागतिक रणांगणावर नाश करून राष्ट्रीय स्वातंत्र्य व लोकशाही यांचा जागतिक दृष्टीनें

दृष्टीनें पुरस्कार केला तरच हिंदुस्तानला स्वातंत्र्य व लोकशाही प्राप्त होईल, एकेकटें राष्ट्र जगाच्या राजकारणापासून अलग राहिल्यास स्वतंत्र राहूं शकत नाहीं लोकशाहीखेरीज खरेंखुरें स्वातंत्र्य मिळत नाहीं आणि इतरत्र लोकशाही असल्याखेरीज आपल्या देशांत लोकशाही येणार नाहीं हा सूक्ष्म असूनही व्यापक दृष्टिकोन पं. नेहरूंनीं राष्ट्रास दिला; आणि विरोधी पक्षांबद्दल व व्यक्तींबद्दल निर्वैरत्व धारण करण्याचे धडे गेली वीस गांधींनीं साऱ्या देशाला अहर्निश दिले. यामुळेंच कॉंग्रेसविरोधक व जनताविरोधक येथें निर्भयपणें वावरूं शकतात. यामुळेंच परमतसहिष्णु व शास्त्रशुद्ध अशी विचारसरणी व मनोवृत्ति या देशांत नांदत असून ८ ऑगस्टच्या मागणीचा तो आत्माच आहे. त्यांत ब्रिटिशद्वेष नसून साम्राज्यशाहीविरोध असल्यामुळें मध्यसत्ता मिळताच ब्रिटनशीं सहकार्य करण्याचें आश्वासन देण्यांत आलें आहे, जगांतील फॅसीझम्‌नाशाची जबाबदारी पत्करण्यांत आली आहे, कॉंग्रेसला ठार करण्याचा प्रयत्न केलेल्या पक्षाशींही सहकार्य करण्याची मनोवृत्ति व्यक्त करण्यांत आली आहे. ८ ऑगस्टनंतर येथें बंड झालें त्यासंबंधानें कोणी कांहीं म्हणो. पण येथें फितुरी न होता बंड झालें व ब्रह्मदेशांत बंड न होता फितुरी झाली यावरून या दोन देशांच्या मनोभूमिकेंत जो फरक दिसून येतो तो विशेष महत्त्वाचा आहे. ब्रह्मदेश युद्धविरोधी होता याचा अर्थ तो ब्रिटनविरोधी होता. तो साम्राज्यविरोधी नव्हता, फॅसीझम्‌विरोधी नव्हता, परसत्ताविरोधी नव्हता. यामुळें ब्रह्मी लोक संधि येताच जपानला फितुर झाले व त्यांनीं ब्रिटिश सत्ता झुगारून देऊन जपानी सत्ता पत्करली. उलट हिंदी जनता ब्रिटनविरोधी असली तरी कॉंग्रेसच्या शिकवणीमुळें ती साम्राज्यविरोधी आहे, फॅसीझम्‌विरोधी आहे, परसत्ताविरोधी आहे, स्वातंत्र्यप्रेमी आहे, लोकशाही–प्रेमी आहे. ब्रिटिश सत्ता झुगारून देण्याच्या वेडांत जपानी सत्ता स्वीकारण्याची आपत्ति पत्करण्यापेक्षां येथील ब्रिटिश सत्तेचें रूपांतर युद्धाच्या गतिवेगाच्या साह्यानें राष्ट्रीय सत्तेंत करून जगांतील साम्राज्यसत्ता व फॅसीझम् नष्ट करणें व राष्ट्रीय स्वातंत्र्य आणि लोकशाही यांची स्थापन करणें ही गोष्ट लहान मोठ्या कॉंग्रेसपुढाऱ्यांना शक्य व इष्ट वाटतें. कॉंग्रेसवाद्यांच्या आजवरच्या कोणत्याही प्रयत्नाचें हेंच सार आहे.

## अनिवार नियति

८ ऑगस्टचा ठराव परत घेण्याची जी भाषा सर्वत्र ऐकूं येत आहे ती या दृष्टीनें निरर्थक आहे. युरोप व पासिफिक या दोन्ही रणक्षेत्रांतलीं युद्धें चुटकीसरशीं संपणार नाहींत. निदान हल्लींचीं युद्धें चटकन संपलीं तर पुढील युद्धाची तयारी ताबडतोब सुरू होईल. हिंदुस्तान कोणत्याही परसत्तेच्या अंकित असेपर्यंत तिसरी कोणती तरी सत्ता त्याला खायला टपलेली राहाणारच, त्यामुळें युद्ध अथवा युद्धपरिस्थिति ही कायम राहणार. हिंदुस्तान स्वतंत्र होण्यानेंच परचक्रनिवारणाचें सामर्थ्य त्यास देईल व स्वसामर्थ्यानें हिंदुस्तान परचक्रास टक्कर देईल तेव्हांच परचक्राची भीति कमी येईल. दाराशीं परचक्र कायमचें असल्यानें परचक्रनिवारणाची तयारी हीच महत्त्वाची ठरते व तीच स्वातंत्र्यप्राप्तीसही उपयोगी पडेल. आजचें राज्ययंत्र हें या दृष्टीनें योग्य असें नसल्यानें त्यापासून स्वतंत्रपणेंच ही तयारी करावी लागणार आहे. या दृष्टीनें स्वयंसेवक चळवळ करण्याची सूचना या पुस्तकांत केली आहे तिचा तरुण वाचकांनीं विचार करावा. राष्ट्रीय सरकार स्थापून फॅसीझम्‌विरोधी लढा करणें ही माझ्या मतें हिंदुस्तानची यावेळीं ऐतिहासिक नियति आहे. ८ ऑगस्टचा ठराव परत घेतल्यानें ती नाहींशी होत नाहीं. गॅलीलिओनें धर्मगुरूंच्या भीतीनें ' पृथ्वी स्थिर आहे, सूर्य फिरतो ' असें म्हटलें म्हणून कांहीं पृथ्वी स्थिर होवूं शकली नाहीं, तसेंच ८ ऑगस्टचा ठराव परत घेतल्यानें राष्ट्रीय मंत्रिमंडळ स्थापून फॅसीझम्‌विरोधी लढा करण्याची आवश्यकता टळत नाहीं. आज ना उद्यां कॉंग्रेस ही भूमिका घेतल्यावांचून राहणार नाहीं. कांहींसा धार्मिक श्रद्धेचा आळ पत्करून सुद्धा

**यदहंकारमाश्रित्य न योत्स्य इति मन्यसे ॥**
**मिथ्यैव व्यवसायस्ते प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति ॥ १ ॥**

हें गीतावचन उध्दृत करण्याचा मोह मला आवरत नाहीं.

## इतिहासक्रम

हें युद्ध जिकण्यासाठीं कांहीं मर्यादेपर्यंत समाजक्रांति करावी लागेल असें जें मत मीं पुस्तकाचे शेवटीं दिलें आहे त्यासंबंधानें माझा फारसा आग्रह नाहीं. येथून ' ब्रिटिश साम्राज्य सत्ता गेल्यावर येथें सोव्हिअट पद्धतीची समाजरचना निर्माण करावी लागेल ' असे सूचक व मार्मिक मत पं. नेहरूंनींही व्यक्त केलें आहे.

पण आज ब्रिटिश साम्राज्य सत्ता घालवूनउद्यां सकाळीं सोव्हिअट समाजघटना घर बांधण्याप्रमणें येथें उभी करता येईल असें नव्हे. एक समाजघटना ज्या क्रमांत जाते त्याच क्रमांत दुसरी येत असते. ही समाजक्रांति आज आंतरराष्ट्रीय युद्धाच्या दडपणानें येथें अपरिहार्य होणार असून पं. नेहरूंची भविष्यवाणी खरी होईल असा संभव दिसतो. इतिसाहाचा हा क्रम समजून घेऊन महाराष्ट्रीय तरुणांनीं आपल्या कर्तृत्वानें त्यांत सामील व्हावें असें मला वाटतें.

## आभार प्रदर्शन

हें पुस्तक लिहिण्यास अधिकार प्रकाशन संस्थेच्या चालकांनीं आग्रह केला. त्यांच्या आग्रहानेंच मीं हें लिहिलें. या पुस्तकांत लिहिलेले विचार मी वृत्तपत्रांतून गेलीं ४ वर्षें प्रतिपादीत आहें. ते विचार एकत्र पुन्हा मांडण्याची संधि प्रकाशकानीं मला दिली याबद्दल मीं त्यांचा आभारी आहें. पुस्तक छापण्याचे कामीं व प्रकाशनाचे कामीं आलेल्या अनेक अडचणी निवारून तें प्रकाशित करण्याचें धाडस त्यांनीं अंगावर घेतलें. त्यांना त्यांत यश यावें असें मी इच्छितों. श्री. एम्. आर. गांवकर यांनीं पुस्तकाचा बराच मजकूर लिहून घेण्याची मदत केली याबद्दल मी त्यांचा आभारी आहें. 'बॉंबे क्रानिकल'चे रिपोर्टर श्री. जी. एन्. आचार्य यांनीं आपल्या 'फ्रीडम् फर्स्ट' या पुस्तकाची हस्तलिखित प्रत वापरूं दिली याबद्दल मी त्यांचा आभारी आहें. शेवटीं श्रीकृष्ण मुद्रणालयाचे व्यवस्थापक व कंपॉझिटर्स यांनीं मीं त्यांना दिलेला पुष्कळसा त्रास बिनतक्रार सोसला व काम चांगल्या प्रकारें पार पाडलें याबद्दल त्यांचेही आभार मानून ही बरीच लांबलेली प्रस्तावना आवरती घेतों.

मुंबई ता. २५।७।४३ — पां. वा. गाडगीळ

परिशिष्ट

# विदेशीय लोकमत

काँग्रेसची ८ ऑगस्ट १९४२ ची मागणी आणि त्यानंतर हिंदुस्तानांत झालेलें बंड यासंबंधानें चीन, इंग्लंड व अमेरिका या देशांतील कांहीं विचारवंतांनीं व्यक्त केलेलीं मतें खालीं दिलेलीं आहेत.

**एडगर स्नो**—शक्य ती सर्व सत्ता आणि जबाबदारी हिंदी लोकांना आपण दिली पाहिजे. जेवढी सत्ता संयुक्त राष्ट्रांच्या संरक्षणासाठीं अवश्य आहे असें दाखवितां येईल तेवढीच सत्ता ठेवून घ्यावी. पौर्वात्य जगांत आपणांस यापुढें या एकाच उपायानें कांहीं अनुयायी राहतील. आजवर प्रचंड शक्तीनें आम्हीं या विभागांत अनुयायी मिळविले, पण आतां ती शक्ति आम्हांजवळ राहिलेली नाहीं....हिंदी लोकांशीं अजूनही समेट शक्य आहे. तसा समेट केल्यास हिंदी लोक आम्हांला चिनी लोकांइतके उपयुक्त होतील. हिंदुस्तानांतील बहुसंख्य जनता संयुक्तांच्या बाजूसच आहे. पण त्या जनतेचें सहकार्य मिळविण्यासाठीं अवश्य ती सर्व किंमत दिली पाहिजे. ती आतां एका फार्दिंगानेंही कमी करतां येणार नाहीं. जगांतील साम्राज्यवादाचा इतरत्र नायनाट करण्यासाठीं आम्ही लढत असल्याचें सांगतों. तेव्हां त्या साम्राज्यवादाचे हिंदुस्तानांतले सर्व हक्क आम्हींही सोडून देणें हीच ती किंमत होय.

**पर्ल बक**—ब्रिटन व अमेरिका आशियांतील सत्तेचा लोभ सोडणार नाहींत तर जगांतील गौरेतर लोक गोऱ्या लोकांचे शत्रु होतील व हें युद्ध संपतें न संपतें तोंच तिसरें महायुद्ध सुरू होईल.

**लिन युटांग**—वॉशिंग्टननें जसें स्वातंत्र्यासाठीं बंड केलें तसेंच गांधींनीं केलें, यांत अमेरिकनांना चमत्कारिक असें काय वाटतें ? गांधी आणि नेहरू वॉशिंग्टन आणि डी व्हॅलेरा यांच्याच सारखे हट्टी आहेत. हिंदुस्तानवरील अन्याय अमेरिका व आयर्लंड यांवर झाला तसलाच आहे. अमेरिकन लोक आतां स्वतंत्र आहेत. यामुळें जे स्वतंत्र नाहींत त्यांना 'स्वातंत्र्य' हा चिमुकला शब्द

ऐकतांच काय वाटते हें अमेरिकनांच्या लक्षांत येत नाहीं. हिंदुस्तानसंबंधानें अमेरिकन लोक चकित झाले आहेत त्याचें हें कारण होय.

**अमेरिकेंतील 'लाइफ' पत्राचे संपादक**—आम्ही अमेरिकन लोक लढतों तें कोणत्या हेतूनें लढतों या मुद्द्यावर आमच्या आमच्यांतच मतभेद असेल. पण एका गोष्टीबद्दल सर्व अमेरिकन जनतेची एकजूट आहे. ती म्हणजे आम्ही कांहीं ब्रिटिश साम्राज्य टिकविण्यासाठीं लढत नाहीं.

**वेंडेल वल्किी**—हिंदुस्तानच्या स्वातंत्र्याबद्दल आम्ही तटस्थ राहूं शकत नाहीं, हिंदुस्तान हा आमचा प्रश्न आहे, हिंदुस्तान जपाननें जिंकलें तर तें आमचें नुकसान आहे.

**प्रो. लास्की**—हिंदुस्तानच्या रक्षणासाठीं प्रचंड सैन्य उभारण्याचें काम हिंदी लोकांकडेच सोपवा. अगदीं प्रलयकाल आला होता त्यावेळीं चर्चिल यांनीं फ्रेंच सरकारला इंग्लंड आणि फ्रान्स यांचें संयुक्त सरकार बनविण्याची सूचना दिली. आमच्या इतिहासांत एवढा प्रचंड घटनात्मक पालट कधींही करण्यांत आला नव्हता. त्यांत धोका असतो. हिंदुस्तानला तावडतोब सत्तादान करण्यांतही धोका आहेच. पण युद्ध हें धोक्याचे प्रयोग करण्याचीच एक बाब नव्हे काय ?

**एडवर्ड थॉम्सन**—संरक्षणसत्ता देण्यांत आली असती तर गांधींच्या अविरोधास न जुमानता हिंदी लोकांनीं मध्यसत्ता घेतली असती.

# कॉंग्रेस आणि महायुद्ध

दा. क्र.

## उपोद्घात



गेल्या पंधरा वर्षांत फॅसिझम्‌विरोधी मतप्रसार आशिया खंडांत पं. नेहरूंच्या इतक्या तीव्रतेनें कोणींही केला नाहीं. गांधी, नेहरू आणि चँक कै शेक हे आशिया खंडाचे गेल्या वीस वर्षांतील सर्वश्रेष्ठ राष्ट्रपुरुष होत. यांतील प्रत्येकजण राष्ट्रीय स्वातंत्र्यवादी असला तरी प्रत्येकाच्या राष्ट्रवादाची भूमिका मुळची थोडथोडी भिन्न आहे. चँग कै शेक हा स्वातंत्र्यवादी खरा, पण तो फॅसिझमचा विरोधी व लोकशाही आणि समाजवाद यांचा पुरस्कर्ता असेलच अशी खात्री देतां येत नाहीं. कम्युनिस्टांचा पाडाव करून जपानशीं जमतें अथवा नमतें घेण्याचें राजकारण तो केव्हांतरी खेळत असावा असें त्याच्या चरित्रावरून वाटतें. गांधी हे स्वातंत्र्यवादी आहेतच. फॅसिझम्‌ व कोणत्याही प्रकारची हुकुमशाही त्यांना नको आहे. पण लोकशाहीची त्यांची कल्पना मागासलेली अथवा अस्पष्ट अथवा अव्यवहार्य आहे. शिवाय हिंदी राजकारणाचा विचार करतांना जगाच्या राजकारणांत हिंदी राजकारण गुंताफलें आहे, जगाच्या राजकीय आंदोलनांनीं हिंदी राजकारणास अपरिहार्यतेनें मर्यादा घातल्या आहेत याकडे त्यांचें लक्ष फारसें वेधलें जात नाहीं. आणि जपानसारखें जबरदस्त परचक्र आलें तरी अहिंसेनें आपण त्याचा प्रतिकार करूं असें बोलून व पुनः पुनः प्रचारून ते आपल्या विचारांची अव्यवहार्यता व दुर्बोधता अधिकच वाढवितात. फॅसिस्ट जर्मनीच्या आक्रमणापुढें प्रणिपात करून फ्रेंच राजकर्त्यांनीं फ्रेंच राष्ट्रवादाचा गळा कापला, तथापि गांधींनीं फ्रेंच पुढाऱ्यांचें अभिनंदन केलें. यामुळें सगळें जग चकित झालें.

## युद्धांतील आश्चर्य

पण पं. नेहरूंची भूमिका पूर्णपणें फॅसिझम्‌विरोधी, लोकशाहीप्रधान, समाजवादी व आंतरराष्ट्रीय आहे. जगांत फॅसिझम्‌विरोधी राजकारण बळावल्यानेंच हिंदुस्तानचें स्वातंत्र्य व लोकशाही साध्य होणार असें ते गेलीं आठदहा वर्षें प्रतिपादीत असून काँग्रेसच्या राजकारणांत आंतरराष्ट्रीय दृष्टिकोन मुख्यतः त्यानींच आणला. त्यापूर्वी केवळ ब्रिटनविरोधी भावना हाच हिंदी राजकीय दृष्टिकोन होता. गेल्या महायुद्धाचे वेळीं हिंदुस्तानांत जर्मनीबद्दल—जर्मनी ब्रिटनशीं लढत असल्यानें—सहानुभूतिच होती. नंतर व्हर्साय तह जर्मनीवर लादला गेल्यानें जर्मनीबद्दल हिंदुस्तानची सहानुभूति वाढली. हिटलर ब्रिटनविरुद्ध युद्धाची तयारी करूं लागला याचें हिंदी जनतेस कौतुकच वाटलें. हीच प्रवृत्ति अशीच वाढत राहिली असती तर जर्मनी केवळ ब्रिटनविरोधी आहे एवढ्यामुळें काँग्रेसही प्रथमपासून जर्मनीस अनुकूल राहिली असती. पण ब्रिटिश साम्राज्यसत्तेचा धिक्कार करीत असतांही फॅसिस्ट जर्मनीचा आपण धिक्कार केलाच पाहिजे हा शास्त्रीय दृष्टिकोन पं. नेहरूंनीं काँग्रेसला शिकविला आणि काँग्रेसवादी तरुण कट्टर फॅसिझम्‌विरोधी बनविले सारांश, काँग्रेस ही जशी राष्ट्रांत सर्वांत मोठी राजकीय संस्था आहे, ती जशी सर्वांत अधिक सामर्थ्यवान आहे, तशी ती कट्टर फॅसिझम्‌विरोधीही आहे. हिंदुसभा व मुस्लिम लीग या फॅसिझम्‌विरोधी असल्याची मुळींच खात्री नाहीं. फॅसिझम्‌विरोधाचे निर्माते व त्याचे आजचे आधारस्तंभ हिंदुस्तानांत पं. नेहरू हेच आहेत. पण आश्चर्य हें कीं फॅसिझम्‌विरोधी लढा आपण लढतों म्हणणाऱ्या ब्रिटिशांनीं फॅसिझम्‌विरोधी लढ्याच्या निकराच्या प्रसंगीं पं. नेहरूंचें साहाय्य न घेतां त्यांना व त्यांच्या हजारों सवंगड्यांना तुरुंगांत डांवून टाकलें आहे.

सुभाषचंद्र बोस ज्याप्रमाणें शत्रूला सामील आहेत (असें म्हणतात) तसे पं. नेहरू शत्रूला सामील आहेत असे खुद्द सरकारही म्हणत नाहीं. सरकारचा सारा रोष गांधींचेवर असून नेहरू गांधींच्या तंत्रानें वागतात अशी सरकारची तक्रार आहे. गांधीही जपानला सामील आहेत असें सरकार उघडपणें बोलूं शकत नाहीं. त्यांना तसा कांहींही पुरावा मिळालेला नाहीं. ८ ऑगस्ट १९४२

नंतर माजलेल्या दंगलीची जबाबदारी कॉंग्रेसवरच आहे हें सिद्ध करण्यासाठीं सरकारनें जें एक पुस्तक प्रसिद्ध केलें आहे त्यांत "आम्ही अहिंसेनें शत्रूचा प्रतिकार करूं" "जपानशीं तह करूं" "जाळपोळीचे धोरण आम्हांला नको" अशी गांधींचीं कांहीं तुटक वाक्यें सरकारनें दिलीं असून सरकार अडचणींत आहे अशा परिस्थितींत लोकांना गांधींनीं चळवळीस चिथावलें, अत्याचार होतील हें त्यांना माहीत होतें व तसे ते झालेही, यामुळें दंगलीची जबाबदारी कॉंग्रेसवर आहे, असें म्हणून गांधीनेहरूप्रभृतींना तुरुंगांत ठेवण्याचा अट्टाहास सरकारनें चालविला आहे. वास्तवीक कॉंग्रेसची भूमिका होती ती अशी:—"फॅसिझम्‌विरोधी लढा लढून हिंदुस्थानचा बचाव करणें हें कॉंग्रेसचें कर्तव्यच आहे. पण त्यासाठीं लोकांना युद्धोत्सुक व युद्धसन्मुख करायचें असेल तर त्यांना आपण स्वतंत्र राष्ट्र या नात्यानें स्वातंत्र्यासाठीं लढतों अशी जाणीव पाहिजे, तरच लोक प्राणार्पणासाठीं उत्साहानें पुढें येतील. ब्रिटिशाबद्दलचा द्वेष व अविश्वास लोकांत इतका तीव्र आहे कीं त्यामुळें ब्रिटिश साम्राज्यासाठीं उत्साहानें लढण्यास कोणी पुढें येत नाहीं." म्हणून लोकमताच्या विश्वासाचें राष्ट्रीय सरकार कॉंग्रेसनें मागितलें. "परचक्राशीं लढणें हें तर आमचं कर्तव्य आहेच, अर्थात् आजच्या आज स्वातंत्र्य मिळवून शत्रूशीं लढता यावें" म्हणूनच कॉंग्रेसच्या अनुयायानीं दंगल माजविली. त्यामुळें युद्धयंत्र कोलमडून पडेल म्हणून ब्रिटिश सरकारनें सगळी चळवळ निर्दयपणें दडपून टाकिली. पण त्यामुळें लोकांत ब्रिटनद्वेष अधिकच वाढला आहे.

## पुस्तकाचा हेतु

ब्रिटिश सरकार व हिंदी लोक या दोघांचीही यामुळें हानि झाली आहे. सरकारचें हिंदुस्तानांतील युद्धयंत्र ढिलें झालें हें तर खरेंच. पण त्यामुळें कॉंग्रेस अधिक बलवान झाली असें नाहीं. वरीचशी चळवळ 'भुईखालीं' गेली असून ती आंतल्याआंत घुसमटून मरूं लागली आहे. हिंदुसभा व मुस्लिम लीग हे पक्ष आपसांत न भांडता परस्परसहकार्यानें व सरकारला मदत करून फॅसिस्ट राष्ट्रांचा नाश करण्याऐवजीं कॉंग्रेसचाच नाश करूं चाहात आहेत. हळूं हळूं कॉंग्रेससंघटना आंतल्या आंत पिचत आहे. तुरुंगांतील वर्गवाऱ्यामुळें कांहीं लोक त्यांतल्यात्यांत सुखांत असून बाहेर चालू असलेल्या दंगलीच्या नांवानें 'हिंसा' 'हिंसा' म्हणून हाय हाय करीत आहेत. तरुण वर्ग पराभवामुळें मनगटें

चावीत असून पुढाऱ्यांवरही कांहींसा चिडला आहे. युद्ध संपेपर्यंत आतां कांहींच करणें शक्य नाहीं असें वाटून जनता व कांहीं कार्यकर्ते निराश झाले आहेत. खरोखरच अशा परिस्थितींत फॅसिस्ट राष्ट्रांचा चटकन् पराभव होऊन युद्ध संपलें तर युद्धोत्तर काळच्या बदलेल्या परिस्थितींत योग्य तसें नवें राजकारण काँग्रेस करूं शकेल. पण अजून युद्ध संपलें नाहीं. लवकर संपण्याचा संभव आज तरी मुळींच दिसत नाहीं. तें जसजसें लांबत जाईल तसतसें तें जिंकणें संयुक्त राष्ट्रांना अधिकाधिक अवघड होत जाईल. आणि काँग्रेसच्या मदतीवांचून तें अखेर जिंकणें अशक्यही होईल. फार काय, अखेरीस काँग्रेसनें राज्यसत्ता काबीज करून परचक्राविरुद्ध लढा देणें राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या दृष्टीनें आवश्यक व अपरिहार्य ठरेल असें मला वाटतें. म्हणून काँग्रेसच्या राजकारणाचें सिंहावलोकन करून याची गुणदोषचिकित्सा करणें व पुढील राजकारणाची दिशा समजून घेणें यावेळीं अवश्य झालें आहे. या पुस्तकाचा हाच मुख्य विषय होय. युद्धाची परिस्थिति कशी आहे तिचा विचार करून त्या धोरणानें काँग्रेसनें पुढें पाऊल कसें टाकावें यांचाही विचार येथें करावयाचा आहे.

—o—

## काँग्रेसची युद्धविषयक भूमिका ::: [ २ ]

काँग्रेसची मूळ युद्धविषक भूमिका १९३८ च्या हरिपुरा काँग्रेसच्या ठरावापासून १४ सप्टेंबर १९३९ च्या वर्किंग कमिटीच्या ठरावापर्यंत जे अनेक ठराव काँग्रेस संघटनेमार्फत झाले त्यात तयार झाली. ती नंतर क्रिप्स-योजनेवरील ठरावापर्यंत थोडथोडी विकसत गेली. पुढें ८ ऑगस्टच्या ऑ. इं. कॉं. कमिटीच्या ठरावांत तीच कायम ठेवण्यांत आलेली असून ८ ऑगस्ट नंतर केवढेंही मोठें बंड झालेलें असो अथवा इतर कोणी काँग्रेसभूमिकेचें आविष्करण किंवा स्पष्टीकरण कसेंही केलेलें असो, ८ ऑगस्टचा ठराव हीच काँग्रेसची अधिकृतभूमिका आहे. यापुढें जें कोणतें धोरण काँग्रेस पुढाऱ्यांना अवलंबावें लागेल त्याला ८ ऑगस्टचा ठराव हाच प्रमुख आधार घेणें अवश्य आहे. येथेंच

हें स्पष्ट करून ठेवतों कीं राष्ट्रीय मंत्रिमंडळाची मागणी व ती मान्य न झाल्यास सत्याग्रहाचा अवलंब असें ८ ऑगस्टच्या ठरावाचे दोन भाग आहेत. राष्ट्रीय मंत्रिमंडळाची मागणी हा भाग माझ्या मतें जास्त महत्त्वाचा असून त्याचेंच विशेष विवेचन येथें करावयाचें आहे. काँग्रेसच्या धोरणास आधारभूत असें जे काँग्रेसचे ठराव व ठळक पुढाऱ्यांचीं भाषणें, लेख वगैरे त्याचे उतारे थोडे विस्तारानें देऊन हें विवेचन करूं.

## हरिपुरा

हिटलरशाहीची कृष्णछाया युरोपवर पसरणार व त्यासंबंधांत ब्रिटन युद्धांत गोवलें जाणार अशी भीति वाटूं लागली असतां १९३८च्या आरंभीं सुभाषबाबूंच्या अध्यक्षतेखालीं गुजराथेंत हरिपुरा येथें काँग्रेसचें अधिवेशन झालें. त्यांत काँग्रेसचें युद्धविषयक धोरण पुढील ठरावानें जाहीर झालें

" जगद्व्यापी आणि सर्वविध्वंसक अशा महायुद्धाच्या संकटाची छाया जगावर पडूं लागली असल्यानें परराष्ट्रसंबंध व युद्ध यांसंबंधानें हिंदी जनतेचें धोरण काय हें काँग्रेस पुनः एकदां सांगूं इच्छिते.

हिंदुस्थानची-शेजारी राष्ट्रें व जगांतील इतर राष्ट्रें या सर्वांशीं हिंदी लोक शांततेनें व स्नेहानें नांदूं इच्छितात. म्हणून परराष्ट्रसंबंधांत कलहाचीं जीं कारणें असतील तीं त्यांना दूर करावयाचीं आहेत. राष्ट्र या नात्यानें स्वतांचें स्वातंत्र्य आणि लोकशाही यासाठीं हिंदी लोक झगडत असल्यानें इतरांच्या स्वातंत्र्यासही त्यांना मान द्यावासा वाटतो आणि आपलें सामर्थ्य आंतरराष्ट्रीय सहकार्य व स्नेहभाव यांच्या आधारावर त्यांना वाढवावयाचें आहे. हें आंतरराष्ट्रीय सहकार्य घडून येण्यास सर्व जगाची आंतरराष्ट्रीय संघटना बनविणें इष्ट असून अशा संघटनेंत स्वतंत्र हिंदुस्थान आनंदानें सामील होईल व निशस्त्रीकरण आणि सामुदायिक सुरक्षितता यांचा पुरस्कार करील. पण जोंवर एका राष्ट्राची सत्ता दुसऱ्या राष्ट्रावर असेल, साम्राज्यशाहीचें वर्चस्व जोंवर कायम राहील आणि अशा प्रकारें आंतरराष्ट्रीय कलहाचें मूळ शाबूत राहील तोंवर आंतराष्ट्रीय सहकार्य निर्माण होणारच नाहीं, म्हणून टिकाऊ पायावर आंतरराष्ट्रीय शांततेची उभारणी करण्यासाठीं साम्राज्यशाही व एका राष्ट्राकडून दुसऱ्या राष्ट्राची होणारी पिळणूक यांचा नाश झाला पाहिजे.

हिंदुस्थान साम्राज्यशाहीच्या युद्धांत भागीदार होणार नाहीं आणि ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या हितासाठीं आपली मनुष्यशक्ति व धनसाधनें यांचा व्यय होऊं देणार नाहीं. तसेंच जनतेच्या स्पष्ट संमतीवांचून हिंदुस्तान कोणत्याही युद्धांत सामीलही होणार नाहीं. म्हणून हिंदुस्थानांत जी युद्धतयारी चालू आहे, मोठ्या प्रमाणावर जे युद्धाचे प्रयोग सुरू आहेत, वैमानिक हल्ल्यापासून संरक्षणाच्या तजविजी ज्या केल्या जात आहेत व ज्यामुळें युद्ध जवळ येत असल्याचें सूचक असें वातावरण पसरविलें जात आहे, त्या सर्वांबद्दल काँग्रेस नापसंती व्यक्त करते. इतकें स्पष्ट केल्यानंतरही जर हिंदुस्थानला युद्धांत गोंवण्याचा प्रयत्न करण्यांत आला तर त्याचा प्रतिकार करण्यांत येईल.

## त्रिपुरी

१९३९ च्या मार्चमध्यें त्रिपुरीस सुभाषबाबूंच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनांत काँग्रेसचें युद्धविषयक धोरण जाहीर करणारा ठराव झाला. त्यांतील महत्त्वाचा भाग असाः—

" काँग्रेस ही साम्राज्यशाही व फॅसिझम् या दोघांनाही विरोध करीत असून, जगांत शांतता नांदण्यासाठीं व प्रगति होण्यासाठीं या दोहोंचाही शेवट झाला पाहिजे अशी काँग्रेसची खात्री आहे. काँग्रेसच्या मतें हिंदुस्थाननें स्वतंत्र राष्ट्र या नात्यानें आपलें आपण परराष्ट्रीय धोरण चालवावें आणि आपला स्वातंत्र्य व शांतता यांचा मार्ग अवलंबून फॅसिझम् व साम्राज्यशाही या दोहोंपासूनही अलिप्त राहावें हें अतीशय इष्ट आहे. "

## कलकत्ता

यानंतर बाबू राजेंद्रप्रसाद यांच्या अध्यक्षतेखालीं कलकत्त्यास १ मे १९३९ रोजीं ऑ. इं. कॉ. कमिटीची बैठक भरली, तिनें जो युद्धविषयक ठराव केला तो असाः—

" आंतरराष्ट्रीय महायुद्धाचा धोका निश्चित दिसत असल्यानें काँग्रेसनें राष्ट्राची युद्धविषयक भूमिका जी जाहीर केली आहे तिची आठवण काँग्रेस हिंदी जनतेला व इतरांनाही देत आहे. या धोरणाला काँग्रेस कांटेतोलपणें चिकटून राहील. हिंदी जनतेच्या संमतीविना हिंदुस्थानवर युद्ध लादण्याचा अथवा हिंदुस्थानचीं धनसाधनें वापरण्याचा प्रयत्न झाल्यास त्यास

विरोध केला जाईल. एडनला सरकारनें थोडेसें हिंदी सैन्य पाठविलें आहे. तें ब्रिटिश साम्राज्याच्या हितासाठींच वापरलें जाणार असल्यानें ऑ. इं. कॉ. कमिटी त्यासंबंधानें आपली नापसंती व्यक्त करते.

विशेषतः, युद्धसंकट उद्भवल्यास देशाची सर्व सत्ता मध्यसरकारच्या हातीं केंद्रित करण्यासाठीं हिंदुस्थान राज्यघटना कायदा सरकार दुरुस्त करीत आहे, त्याबद्दल कॉंग्रेस पूर्ण नापसंती व्यक्त करते. कारण येथलें मध्यसरकार ब्रिटिश साम्राज्यशाहीचें मुनीम म्हणूनच येथें काम करीत आहे. कॉंग्रेसला हिंदुस्तान राज्यघटना कायद्याशीं कांहींही कर्तव्य नसून तो नष्ट व्हावा म्हणूनच कॉंग्रेसनें प्रयत्न केले आहेत. तथापि युद्ध सुरू झाल्यास प्रांतिक स्वायत्ततेच्या मुळावर घाव घालून त्या स्वायत्ततेचा फजितवाडा होईल तर कॉंग्रेस तो सहन करणार नाहीं. कारण त्यामुळें युद्धकालीन हुकुमशाही येथें निर्माण होईल आणि प्रांतिक सरकारें हीं साम्राज्यशाहीचीं गुलाम होतील. म्हणून घटना कायद्याची अशा प्रकारची दुरुस्ती करण्याचा प्रयत्न झाल्यास कॉंग्रेसला अवलंबिता येईल त्या उपायांनीं कॉंग्रेस त्यास विरोध करीलच. यासंबंधानें ऑ. इं. कॉं. कमिटी व वर्किंग कमिटी जें धोरण ठरवील त्याप्रमाणें वागण्यास प्रांतिक मंत्रिमंडळांनीं तयार असावें अशी सूचना प्रांतिक मंत्रिमंडळांना देण्यांत येत आहे.''

## मध्यकायदेमंडळावर बहिष्कार

ऑगस्ट १९३९ मध्यें कॉंग्रेस वर्किंग कमिटीनें पुढील ठराव मंजूर करून मध्यकायदेमंडळाच्या पुढील अधिवेशनांत कॉंग्रेस सभासदांनीं हजर राहूं नये असा आदेश दिला.

''कॉंग्रेसनें, युद्ध सुरू झाल्यास आपलें धोरण काय राहील, हें स्पष्टपणें मांडलेलें असून हिंदुस्थानावर कोणतेंहीं युद्ध लादण्यास आपला विरोध दर्शविला आहे. कॉंग्रेसच्या या धोरणास वर्किंग-कमिटी बांधलेली असून हिंदुस्तानचीं धनसाधनें साम्राज्यशाहीसाठीं वापरलीं जाऊं नयेत म्हणून हें धोरण कॉंग्रेस वर्किंग कमिटी अमलांत आणीलच. ब्रिटिश सरकारचें आजवरचें धोरण आणि अलीकडील जागतिक घडामोडी यावरून हें स्पष्ट होत आहे कीं, स्वातंत्र्य आणि लोकशाही यांचा हें सरकार पुरस्कार करीत नसून या तत्त्वांचा तें

केव्हांही विश्वासघात करील. अशा सरकारशीं हिंदुस्थान सहकार्य करूं शकत नाहीं. आणि जें लोकशाहीपूर्ण स्वातंत्र्य आम्हांस देण्यांत येत नाहीं व ज्याचा केव्हांही विश्वासघात होण्याचा संभव आहे त्या लोकशाहीपूर्ण स्वातंत्र्यासाठीं ‘ तुमची धनसाधनें द्या ’ असेंही त्यास कोणी म्हणूं शकणार नाहीं. १ मे १९४३ रोजीं कलकत्त्यास भरलेल्या ऑ. इं. कॉं. कमिटीनें आपलें युद्धविषयक धोरण पुन्हां जाहीर करून परदेशीं हिंदी सैन्य पाठविण्याच्या धोरणास नापसंती दाखविली. हें स्पष्ट मतप्रदर्शन केलें असतांही जाहीर लोकमतास न जुमानतां इजिप्त व सिंगापूर इकडे ब्रिटिश सरकारनें सैन्य पाठविलें व अजून पाठवीत आहे. युद्धपरिस्थितीचा प्रश्न बाजूस राहो, पण कायदेमंडळाच्या संमतीवांचून परदेशीं हिंदी सैन्यें पाठविलीं जाऊं नयेत असें कायदेमंडळांनीं जाहीर केलें होतें. तें न ऐकतां ब्रिटिश सरकारनें काँग्रेस व असेंब्ली यांच्या घोषणा धुडकावून लावल्या आणि हिंदुस्थान युद्धांत अपरिहार्यतेनें गुंतलें जाईल अशी पावलें टाकलीं आहेत. मध्य असेंब्लीचें आयुष्यही सरकारनें आणखी एक वर्षभर वाढविलें आहे. काँग्रेस वर्किंग कमिटी सरकारचे हे निर्णय मान्य करूं शकत नाहीं व त्याशीं आपला संबंध ठेवूं शकत नाहीं. इतकेंच नव्हे तर काँग्रेसच्या धोरणाचा अंमल करण्यासाठीं अवश्य तीं पावलेंही टाकूं इच्छितें. या दिशेनें पहिलें पाऊल म्हणून मध्यअसेंब्लीच्या पुढील अधिवेशनास असेंब्लीच्या काँग्रेस पक्षीय सभासदांनीं हजर राहूं नये असा आदेश काँग्रेसच्या सदर सभासदांना देण्यांत येत आहे.

तसेंच प्रांतिक मंत्रिमंडळांना काँग्रेस वर्किंग कमिटी पुन: आठवण देते कीं, त्यांनीं ब्रिटिश सरकारच्या युद्धतयारीला सहाय्य करूं नये आणि काँग्रेसचें धोरण सतत डोळ्यापुढें ठेवून त्याला चिकटून राहावें. या धोरणामुळें मंत्रिपदांचे राजीनामे देण्याची पाळी आली, अथवा काँग्रेसमंत्र्यांना काढून टाकण्यांत आलें तर त्याची तयारी काँग्रेसमंत्र्यांनीं ठेविली पाहिजे. युद्धसंकटामुळें हवेंतून अथवा इतर मार्गानें हिंदुस्थानच्या कोणत्याही भागास धोका आल्यास संरक्षणाचे उपाय वापरावे लागतील. प्रांतिक मंत्र्यांच्या नियंत्रणाखालीं या बाबी असतील तर काँग्रेस त्यांना उत्तेजन देईल. पण अशा संरक्षणसाधनांच्या पांघरुणाखालीं मध्य सरकारच्या नियंत्रणानें युद्धतयारी चालेल तर ती मात्र काँग्रेस वर्किंग कमिटीला मान्य होणार नाहीं.”

# नेहरूंचें मार्गदर्शन

ता. १ सप्टेंबर १९३९ रोजीं जर्मनीनें पोलंडवर स्वारी केली. ता. ३ सप्टेंबर रोजीं इंग्लंडनें जर्मनीशीं युद्ध पुकारलें. तेव्हां कॉंग्रेसचें युद्धविषयक धोरण अमलांत आणण्याची वेळ आली. पं. नेहरू हेच कॉंग्रेसच्या युद्धविषयक धोरणाचे मूळ प्रणेते. ते तेव्हां चीनमध्यें होते. तेथून ते युद्ध सुरू झाल्याचें ऐकून तांतडीनें परत आले. ते युद्धासंबंधानें काय बोलतात इकडे साऱ्या राष्ट्राचें लक्ष लागून राहिलें होतें. कॉंग्रेस वर्किंग कमिटीची बैठक ताबडतोब बोलविण्यांत आली होती. पण तीपूर्वी पं. नेहरू कांहींतरी बोलणार व त्यांनीं बोलावें असें सर्वांनाच वाटत होतें. त्याप्रमाणें ता. ८ सप्टेंबर रोजीं पं. नेहरूंनीं पुढीलप्रमाणें मुलाखतीद्वारां आपलें धोरण जाहीर केलें. पं. नेहरू म्हणतात, "आम्हीं पुनः पुनः सांगितलें आहे कीं आम्ही सौदा करूं इच्छीत नाहीं. ब्रिटनच्या अडचणींचा गैरफायदा घ्यावा या दृष्टीनें या प्रश्नाकडे आम्ही पहात नाहीं. हें युद्ध जगाचें सारें रूप पालटून टाकणार आहे. जुनी समाजव्यवस्था मेली. तिचें पुनरुज्जीवन होवूं शकणार नाहीं. जर आपण नवी समाजघटना करण्यास उद्युक्त झालों तर ती गोष्ट आपण हेतुपरस्सर करूं या. त्या घटनेची आपण स्पष्टपणें आंखणी करूं व आजपासूनच त्या अनुरोधानें आपलें वर्तन ठेवूं.

एका बाजूस स्वातंत्र्य आणि लोकशाही व दुसऱ्या बाजूस फॅसिझम् आणि आक्रमण असा लढा असेल तेथें आमची सहानुभूति स्वातंत्र्य आणि लोकशाही यांच्या बाजूनेंच असणार हें निःसंशय खरें आहे. फॅसिझम् व साम्राज्यवादी यांचा पुरस्कार करणाऱ्या चढाईखोर राष्ट्रांना विजय मिळावा ही कल्पना आम्हीं सहन करणार नाहीं. पण स्वातंत्र्य आणि लोकशाही या शब्दांची नुसती जपमाळ घेतल्यानें तो झगडा स्वातंत्र्याचा आहे असें सिद्ध होत नाहीं. गेल्या महायुद्धानें हें सिद्ध केलें आहें. आणि गेल्या वर्ष दोन वर्षांतील घडामोडींनीं शांतता व स्वातंत्र्य यांच्या नांवाखालीं लोकशाहीचा विश्वासघात कसा होवूं शकतो हें दाखविलें आहे. हें युद्ध लोकशाही व राष्ट्रीय स्वातंत्र्य यांसाठीं आहे कीं नाहीं हें ठरविण्याची खरी कसोटी या तत्त्वांची मोठ्यानें घोषणा करणें ही नव्हे. इंग्लंड जर स्वयंनिर्णयतत्त्वाचें पुरस्कर्तें असेल तर त्याचा पुरावा हिंदुस्थानांत आम्हांला मिळाला पाहिजे. येथें

येणारी संयुक्त राज्यघटना ही, खरोखर लोकशाही व स्वातंत्र्य यांचा पुरस्कार इंग्लंड करीत नाहीं, याचाच पुरावा आहे.

नव्या समाजव्यवस्थेच्या निर्मितीसाठीं हिंदुस्ताननें आपली धनसाधनें खर्ची घालून त्या कामीं आपला वाटा पूर्णपणें उचलावा अशी माझी इच्छा आहे. या प्रश्नाकडे माझ्या देशबांधवांनीं संकुचित राष्ट्रीय दृष्टीनें पाहूं नये, तर व्यापक आंतर-राष्ट्रीय दृष्टीनें पहावें व जगाच्या कल्याणांतच आमचें कल्याण गुंतलेलें असल्यामुळें जगाचें कल्याण वाढविण्याचा प्रयत्न करावा. क्षुद्र स्पर्धा आणि भांडणें विसरून प्रसंगाला उचित अशी उच्च भूमिका घेणें आणि हिंदुस्तानचें स्वातंत्र्य व जगाची पुनर्घटना यांच्याच विचार करणें यासाठीं अवश्य तें सामर्थ्य व शहाणपण आमच्या अंगीं येईल अशी मी आशा करतों."

## १४ सप्टेंबरचा जाहीरनामा

८ सप्टेंबर पासून १५ सप्टेंबरपर्यंत काँ. वर्किंग कमिटीची बैठक भरली. तिनें मंजूर केलेला जाहीनामा ता. १४ रोजीं प्रसिद्ध करण्यांत आला. तो मुख्यतः पं. नेहरूंनींच लिहिला असून त्यांची जी मुलाखत वर दिली तिचाच तो विस्तार आहे. काँग्रेसच्या युद्धविषयक भूमिकेची संपूर्ण व शास्त्रशुद्ध मांडणी या ठरावांत केली आहे. काँग्रेसच्या भूमिकेंत मागाहून जे कांहीं फरक झाले ते यांतील मूल तत्त्वांना धरूनच आहेत. म्हणून हा जाहीरनामा बराच मोठा असून सुद्धां येथें समग्र देतों वर्किंग कमिटी म्हणते, " युरोपमध्यें महायुद्ध सुरू झाल्यामुळें जें मोठें संकट जगावर आलें आहे त्याचा विचार काँग्रेस वर्किंग कमिटीनें जिव्हाळ्यानें केला. युद्ध सुरू झाल्यास हिंदुस्ताननें आपल्या डोळ्यांपुढें कोणतीं तत्त्वें ठेवावीं हें काँग्रेसनें पुनः पुनः सांगितलें आहे. एक महिन्यापूर्वीच वर्किंग कमिटीनें त्या तत्त्वांचा पुनरुच्चार केला. आणि हिंदी लोकमतास ब्रिटिश सरकार लाथाडीत आहे म्हणून आपली नाखुषीही व्यक्त केली. ब्रिटिश सरकारच्या धोरणापासून आम्ही अलिप्त आहों हें दाखविण्यासाठीं पहिलें कृत्य म्हणून काँग्रेसनें मध्यअसेंब्लीं-तील काँग्रेससभासदांस त्यांनीं पुढील अधिवेशनास हजर राहूं नये असा आदेश दिला. त्यानंतर ब्रिटिश सरकारनें हिंदुस्तान हें युद्धयमान राष्ट्र म्हणून जाहीर केले, वटहुकुम काढले, हिंदुस्तान घटना कायदा दुरुस्त केला, आणि हिंदी लोकांच्या जीवनाशीं संबंध पोचविणाऱ्या इतर अनेक गोष्टी केल्या. त्यामुळें

प्रांतिक सरकारच्या अधिकारास व हालचालीस वेढा पडला असून त्यांची कैची झाली आहे. हिंदी लोकांची संमति सरकारनें या बाबतींत घेतली नाहीं. अशा बाबतींत हिंदी लोकांनीं आपल्या इच्छा व्यक्त केल्या होत्या त्यांची सरकारनें जाणून बुजून उपेक्षा केली आहे. ही परिस्थिति अतिशय गंभीर आहे असें वर्किंग कमिटीला वाटतें.

फॅसिझम् व नाझीझम् यांची ध्येयनिष्ठा आणि व्यवहार यांचा काँग्रेसनें नेहमींच धिक्कार केला आहे. फॅसिस्ट व नाझी हे युद्धाचा व अत्याचाराचा गौरव करतात, मानवी भावना दडपून टाकतात. वर्किंग कमिटीला हें नापसंत आहे. फॅसिस्टांनीं परराष्ट्रावर पुनः पुनः आक्रमण केलें असून सुधारलेल्या राहणीचीं सर्वमान्य तत्त्वें व प्रमाणें झुगारून दिलीं आहेत. त्यांचा काँग्रेस वर्किंग कमिटीनें धिक्कार केला आहे. हिंदी लोक ज्या साम्राज्यशाहीविरुद्ध कित्येक वर्षें लढत आहेत त्या साम्राज्यशाहीचीं तत्त्वेंच अधिक तीव्र होवून फॅसिझम् व नाझीझम् यांमध्यें समाविष्ट झालीं असल्याचें काँग्रेस वर्किंग कमिटीला दिसून येत आहे. म्हणून नाझी जर्मनीनें पोलंडवर जो अलीकडे हल्ला केला त्याचा निषेध करणें व नाझी जर्मनीस प्रतिकार करणाऱ्यांना सहानुभूति दाखविणें हें काँग्रेस वर्किंग कमिटीचें कर्तव्यच आहे.

काँग्रेसनें असें धोरण आंखून दिलें आहे कीं युद्ध अथवा शांतता यासंबंधानें हिंदी लोकांनींच निर्णय ठरविला पाहिजे. बाहेरच्या कोणत्याही सत्तेनें यासंबंधाचा निर्णय आमच्यावर लादतां कामा नये. तसेंच साम्राज्यशाही हेतूसाठीं हिंदुस्थानचीं धनसाधनें वापरलीं जातां कामा नयेत. हिंदुस्तानावर परक्यांनीं कोणताही निर्णय लादला अथवा हिंदी जनतेनें नामंजूर केलेल्या कार्यासाठीं येथील धनसाधनें वापरण्याचा प्रयत्न झाला तर त्याचा हिंदी लोकांनीं प्रतिकार करणें अवश्य ठरेल. फॅसिझम्विरोधाच्या कार्यांत जर सहकार्य हवें असेल तर तें जुलुमानें मिळणार नाहीं. बाहेरच्या सत्तेनें दिलेले हुकुम हिंदी लोकांनीं मानावे या गोष्टीस काँग्रेस वर्किंग कमिटीची संमति मिळणार नाहीं. सहकार्य हे दोन समान पक्षांत, उभयतांच्या संमतीनें आणि उभयतांनाहि थोर अशा वाटणाऱ्या कार्यासाठींच व्हावें लागतें. हिंदी लोकांनीं अलीकडे आपल स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं व लोकशाहीप्रधान राज्य स्थापण्यासाठीं मोठ्या संकटांना तोंड दिलें असून

पुष्कळ स्वार्थत्यागही केला आहे. अर्थात् स्वातंत्र्य व लोकशाही यांच्या पक्षास हिंदी लोकांची सहानुभूति आहेच. पण ज्या स्वातंत्र्यासाठीं हें युद्ध सुरू झालें असें सांगण्यांत येतें तेंच लोकशाहीप्रधान स्वातंत्र्य हिंदी लोकांना दिलें जात नाहीं. आणि असलेलें थोडेसें मर्यादित स्वातंत्र्यही आम्हांपासून काढून घेतलें जातें, म्हणून अशा युद्धांत हिंदुस्थान भाग घेऊं शकत नाहीं.

इंग्लंड व फ्रान्स यांच्या सरकारांनीं आपण लोकशाही व राष्ट्रीय स्वातंत्र्य यासाठीं लढतों आहों आणि परराष्ट्रावरील आक्रमणांचा आपण शेवट करणार आहों हें जाहीर केलें असल्याचें काँग्रेस वर्किंग कमिटीस ठाऊक आहे. पण अलीकडील इतिहासांत अशीं उदाहरणें घडलीं आहेत कीं बोललेले शब्द, पुकारलेलीं ध्येयें आणि त्यामागचे खरे हेतु व उद्दिष्टें यांचा परस्पराशीं मुळींच मेळ असल्याचें दिसून येत नाहीं. १९१४–१८ च्या महायुद्धांत युद्धाचीं ध्येयें म्हणून लोकशाहीचा सांभाळ, स्वयंनिर्णय, लहान राष्ट्रांचें स्वातंत्र्य इत्यादींची जाहिरात करण्यांत आली होती. तरी पण या घोषणा करणाऱ्या सरकारांनींच साम्राज्यशाही हेतूसाठीं गुप्त तह केले आणि ऑटोमन साम्राज्याचे तुकडे पाडण्याचा डाव रचला. आपणाला नवीन मुलूख नकोत असें म्हणूनही जेत्या राष्ट्रांनीं आपलीं वासाहतिक साम्राज्यें वाढविलींच. हल्लींचें युद्ध हें व्हर्साय तह आणि त्याचे कर्ते यांच्या नामोष्कीच्या अपयशाचेंच द्योतक आहे. त्यांनीं वचनभंग करून पराभूत राष्ट्रांवर साम्राज्यशाही तह लादला. त्या तहांतून एकच आशातंतू निर्माण झाला होता, तो म्हणजे राष्ट्रसंघ होय. पण त्याची प्रथमपासूनच मुस्कटदाबी केली गेली व ज्या राष्ट्रांनीं राष्ट्रसंघाला जन्म दिला त्यांनींच त्याचा नाश केला.

पुढील इतिहासावरून पुनःपुनः दिसून आलें तें हें कीं प्रथम एकादी निष्ठा जाहीर करण्यांत यावी आणि मागाहून तिचा निर्लज्जपणें त्याग करण्यांत यावा. ब्रिटिश सरकारनें मांच्यूरिआंतील जपानच्या आक्रमणाकडे दुर्लक्ष केलें. अबिसिनियांतील इटलीच्या आक्रमणाला मागाहून संमति दिली. झेकोस्लोव्हाकिया व स्पेन येथें लोकशाही संकटांत आली असतां तिचा जाणूनबुजून विश्वासघात करण्यांत आला. आणि ज्या राष्ट्रांनीं सामुदायिक सुरक्षिततेवर आपली निष्ठा व्यक्त केली होती, त्यांनींच तिचा गळा कापला. लोकशाही सकटांत असून तिचें रक्षण केलें पाहिजे असें म्हटलें जातें तें वर्किंग कमिटीस

मान्य आहे. वर्किंग कमिटीला वाटते कीं, पाश्चिमात्य जनता याच ध्येयानें प्रेरित झाली असून त्यासाठीं स्वार्थत्याग करण्यासही तयार आहे. पण पुनः पुनः घडतें तें हें कीं, जनतेचीं ध्येयें व तिच्या भावना आणि त्यागी वीरांचीं ध्येयें व त्यांच्या भावना यांची उपेक्षा होते, त्यांचा विश्वासघात केला जातो. जर या महायुद्धानें आजचें जग—म्हणजे साम्राज्यवाद्यांचें मुलुख, भांडवली हितसंबंध आणि सवलती—यांचेंच रक्षण व्हावयाचें असेल तर हिंदी लोकांना याच्याशीं कांहींही कर्तव्य नाहीं. पण जर युद्धाचा हेतु लोकशाही व तिच्या आधारावर स्थापन करावयाची जगाची नवी रचना हाच असेल तर मात्र हिंदुस्थानला त्याबद्दल खोल जिव्हाळा आहे. वर्किंग कमिटीचें असें मत आहे कीं, हिंदी लोकशाही आणि ब्रिटिश लोकशाही अथवा जागतिक लोकशाही यांच्या हितसंबंधांत मुळींच विरोध नाहीं. पण हिंदुस्थानांत अथवा इतरत्र नांदावयाची लोकशाही आणि फॅसिझम् अथवा साम्राज्यशाही या दोहोंत अंगभूत विरोध असून तो नाहींसा होणार नाहीं. इंग्लंड जर लोकशाहीचें अस्तित्व वाढविण्यासाठीं लढत असेल तर आपल्या मुलुखांतील साम्राज्यशाहीला इंग्लंडनें मूठमाती दिलीच पाहिजे. हिंदुस्थानांत लोकशाही स्थापण्यांत आली पाहिजे. आपली घटना परिषद भरवून आपली राज्यघटना ठरविण्याचा स्वयंनिर्णयाचा हक्क आम्हांस मिळाला पाहिजे. आमचें दैव आमच्या हातांनीं आम्हांस घडवितां आलें पाहिजे. बाहेरच्यांचा हस्तक्षेप होतां उपयोगी नाहीं. स्वतंत्र व लोकशाहीप्रधान असें हिंदुस्थान इतर स्वतंत्र राष्ट्रांशीं परस्परांच्या संरक्षणासाठीं सहकार्य करून आक्रमणास विरोध करील, तसेंच आर्थिक सहकार्यहि करील. लोकशाही आणि राष्ट्रीय स्वातंत्र्य यांच्या आधारावर जगाची पुनर्घटना करण्यासाठीं व अखिल मानव जातीच्या प्रगतीचे कामीं जगांतलीं धनसाधनें उपयोगांत आणण्यासाठीं हिंदुस्थान मेहनत करण्यास तयार आहे.

युरोपवर जें गंडांतर आलें आहे तें कांहीं केवळ युरोपवर आलेलें नव्हे. तें सर्व मानव जातीवर आलेलें आहे. आजवरचीं युद्धें व गंडांतरें समाजघटनेस धक्का न लावतां जशीं आलीं आणि गेलीं त्याप्रमाणें आजची जगाची घटना बऱ्हंशीं आहे अशीच ठेवून हें गंडांतर जाणार नाहीं. जगाची प्रगति होवो अथवा पिच्छेहाट होवो. त्यामुळें राजकीय, सामाजिक व आर्थिक दृष्ट्या जगाची घडी पूर्ण बदलणार

आहे. गेल्या महायुद्धानंतरच्या काळांत जे हितविरोध व कलह भयानक प्रमाणांत भडकत गेले त्यांचा अपरिहार्य परिणाम असें हें गंडांतर आहे. हे हितविरोध आणि कलह शमवून जगाचा नवा समतोल निर्माण केल्याविना हें गंडांतर टळणार नाहीं. हा नवा समतोल जर निर्माण करावयाचा असेल तर त्यासाठीं एका राष्ट्राचें दुसऱ्या राष्ट्रावरील वर्चस्व व एका राष्ट्राची दुसऱ्या राष्ट्राकडून होणारी पिळणूक यांचा शेवट झाला पाहिजे. आणि सर्वांच्या कल्याणासाठीं अधिक न्याय्य अशा भूमिकेवर आर्थिक हितसंबंधाची पुनर्घटना झाली पाहिजे. हिंदुस्थान हा सर्व प्रश्नांचें केन्द्र आहे. कारण तें आधुनिक साम्राज्यशाहीचें ठळक उदाहरण आहे. जगाच्या जिव्हाळ्याच्या या प्रश्नाची उपेक्षा करून जगाची कोणतीही पुनर्घटना यशस्वी होणार नाहीं. हिंदुस्तानचीं धनसाधनें प्रचंड असून जगाच्या पुनर्घटनेच्या कोणत्याही योजनेंत हिंदुस्थानला कर्तृत्वाचा फार मोठा वाटा उचलावा लागेल. पण हिंदुस्तान स्वतंत्र होवून त्याच्या सर्व शक्ति अशा थोर सत्कार्यासाठीं मुक्त झाल्या पाहिजेत. स्वतंत्र राष्ट्र या नात्यानेंच हिंदुस्तान हें कार्य करूं शकेल. आज जगांतील स्वातंत्र्य हें अविभाज्य आहे. जगाच्या कोणत्याही भागांत यापुढें साम्राज्यसत्ता टिकविण्याचा प्रयत्न होईल तर पुन्हां अनर्थ कोसळणें अपरिहार्य आहे.

हिंदुस्थानांतील अनेक संस्थानिकांनीं युरोपांतील लोकशाहीच्या रक्षणासाठीं आपलीं धनसाधनें देऊन प्रत्यक्ष सेवा करण्याची तयारी दाखविली आहे हें काँग्रेस वर्किंग कमिटीनें नमूद केलें आहे. बाहेरच्या जगांत जर लोकशाही-प्रेमाचा पुकारा करणें त्यांना अवश्य वाटलें असेल तर आपल्या मुलुखांत जेथें ते आपली अनियंत्रित सुलतानी गाजवीत आहेत तेथें, त्यांनीं लोकशाहीचा उपक्रम प्रथम करावा. मागें अनेक वेळां सिद्ध झालें आहे कीं या संस्थानिकांपेक्षां ब्रिटिश सरकारच या अनियंत्रित सुलतानीला जबाबदार आहे. ज्या लोकशाहीसाठीं व नव्या जगासाठीं आपण झगडतों असें ब्रिटन म्हणतें त्याचा इनकार या अनियंत्रित सुलतानीमुळें स्पष्टपणें होत आहे.

युरोप, आफ्रिका व आशिया येथें घडलेल्या घटनांवर वर्किंग कमिटीनें नजर टाकली आणि विशेषतः हिंदुस्थानांत सध्यां घडत असलेले व आजवर घडत आलेले प्रकार पाहिले म्हणजे तर त्यांना लोकशाही व स्वयंनिर्णय यांची प्रगति

करण्याचा प्रयत्न मुळींच दिसून येत नाहीं. ब्रिटिश सरकार ज्या प्रगतिपर घोषणा करीत आहे त्यास साजेल असें वर्तन आज तें करीत असल्याचा अथवा पुढें करील याचा पुरावा कांहींही मिळत नाहीं. फॅसिझम्, साम्राज्यशाही आणि त्याबरोबरच भूतकाळांत व वर्तमानकाळांत घडून आलेलें आक्रमण या सर्वांचा नाश करणें हीच लोकशाहीची खरी सफलता होय. केवळ याच भूमिकेवर नवी समाजघटना उभारतां येईल. या नव्या समाजघटनेसाठीं झगडा करण्यास कमिटी उत्सुक असून त्या कामीं सर्व प्रकारची मदत देण्याची वर्किंग कमिटीची इच्छा आहे. पण जें युद्ध साम्राज्यवादी पद्धतीनें चाललें आहे आणि ज्यामुळें हिंदुस्तानांतील व इतर ठिकाणचा साम्राज्यवाद मजबूत होणार आहे अशा युद्धांत काँग्रेस वर्किंग कमिटी सामील होवूं शकत नाहीं.

तथापि प्रसंग कठीण आहे, गेल्या थोडया दिवसांत अनेक घटना भराभर घडून येत आहेत, मनोवेगापेक्षां इतिहासाचा वेग वाढला आहे. म्हणून आजच अखेरचा निर्णय ठरवावा अशी काँग्रेस वर्किंग कमिटीची इच्छा नाहीं. युद्ध कशासाठीं लढलें जात आहे त्या हेतूंचा पूर्ण खुलासा, व युद्धाचीं ध्येयें आणि हिंदुस्थानचें सध्यांचें व भावी कालांतलें स्थान यांचें स्पष्टीकरण होऊं देण्यास वर्किंग कमिटी वेळ देऊं इच्छिते. पण हा निर्णय कालावधीवर टाकण्यांत येणार नाहीं. ज्या धोरणांत हिंदुस्थान भागीदार नाहीं व जें हिंदुस्थानला पसंत नाहीं त्यांत हिंदुस्थान रोजच्या रोज अधिकाधिक गोवलें जात आहे. म्हणून काँग्रेस वर्किंग कमिटी ब्रिटिश सरकारला असें विचारते कीं लोकशाही, साम्राज्यशाही आणि जगाच्या डोळ्यापुढें ठेवण्यांत आलेली नवी समाजघटना यासंबंधानें तुमचीं युद्धध्येयें काय आहेत तीं तुम्ही सांगा. विशेषतः, हीं ध्येयें हिंदुस्थानला कशीं लागूं करणार आणि आजच्य परिस्थितींत त्यांचा अंमल कसा करणार हें निःसंदिग्धपणें सांगा. या तुमच्या ध्येयांत, साम्राज्यसत्ता नष्ट करून जनतेच्या इच्छेप्रमाणें ज्याचें धोरण चालतें अशा स्वतंत्र हिंदुस्थानचा समावेश होईल कीं नाहीं ? साम्राज्यशाही आणि फॅसिझम् यांचा शेवट करण्याला ब्रिटिश सरकार वचनबद्ध आहे अशी घोषणा भविष्यकाळासंबंधानें केल्यास सर्वच देशाच्या जनतेकडून तिचें स्वागत होईल. पण त्याहीपेक्षां अधिक आवश्यक गोष्ट अशी आहे कीं ही घोषणा जास्तींत जास्त शक्य इतक्या प्रमाणांत आजच अमलांत आणली गेली पाहिजे. कारण तसें झालें तर

आहे. गेल्या महायुद्धानंतरच्या काळांत जे हितविरोध व कलह भयानक प्रमाणांत भडकत गेले त्यांचा अपरिहार्य परिणाम असें हें गंडांतर आहे. हे हितविरोध आणि कलह शमवून जगाचा नवा समतोल निर्माण केल्याविना हें गंडांतर टळणार नाहीं. हा नवा समतोल जर निर्माण करावयाचा असेल तर त्यासाठीं एका राष्ट्राचें दुसऱ्या राष्ट्रावरील वर्चस्व व एका राष्ट्राची दुसऱ्या राष्ट्राकडून होणारी पिळणूक यांचा शेवट झाला पाहिजे. आणि सर्वांच्या कल्याणासाठीं अधिक न्याय्य अशा भूमिकेवर आर्थिक हितसंबंधाची पुनर्घटना झाली पाहिजे. हिंदुस्थान हा सर्व प्रश्नांचें केन्द्र आहे. कारण तें आधुनिक साम्राज्यशाहीचें ठळक उदाहरण आहे. जगाच्या जिव्हाळ्याच्या या प्रश्नाची उपेक्षा करून जगाची कोणतीही पुनर्घटना यशस्वी होणार नाहीं. हिंदुस्तानचीं धनसाधनें प्रचंड असून जगाच्या पुनर्घटनेच्या कोणत्याही योजनेंत हिंदुस्थानला कर्तृत्वाचा फार मोठा वाटा उचलावा लागेल. पण हिंदुस्तान स्वतंत्र होवून त्याच्या सर्व शक्ति अशा थोर सत्कार्यासाठीं मुक्त झाल्या पाहिजेत. स्वतंत्र राष्ट्र या नात्यानेंच हिंदुस्तान हें कार्य करूं शकेल. आज जगांतील स्वातंत्र्य हें अविभाज्य आहे. जगाच्या कोणत्याही भागांत यापुढें साम्राज्यसत्ता टिकविण्याचा प्रयत्न होईल तर पुन्हां अनर्थ कोसळणें अपरिहार्य आहे.

हिंदुस्थानांतील अनेक संस्थानिकांनीं युरोपांतील लोकशाहीच्या रक्षणासाठीं आपलीं धनसाधनें देऊन प्रत्यक्ष सेवा करण्याची तयारी दाखविली आहे हें काँग्रेस वर्किंग कमिटीनें नमूद केलें आहे. बाहेरच्या जगांत जर लोकशाही-प्रेमाचा पुकारा करणें त्यांना अवश्य वाटलें असेल तर आपल्या मुलुखांत जेथें ते आपली अनियंत्रित सुलतानी गाजवीत आहेत तेथें, त्यांनीं लोकशाहीचा उपक्रम प्रथम करावा. मागें अनेक वेळां सिद्ध झालें आहे कीं या संस्थानिकांपेक्षां ब्रिटिश सरकारच या अनियंत्रित सुलतानीला जबाबदार आहे. ज्या लोकशाहीसाठीं व नव्या जगासाठीं आपण झगडतों असें ब्रिटन म्हणतें त्याचा इनकार या अनियंत्रित सुलतानीमुळें स्पष्टपणें होत आहे.

युरोप, आफ्रिका व आशिया येथें घडलेल्या घटनांवर वर्किंग कमिटीनें नजर टाकली आणि विशेषतः हिंदुस्थानांत सध्यां घडत असलेले व आजवर घडत आलेले प्रकार पाहिले म्हणजे तर त्यांना लोकशाही व स्वयंनिर्णय यांची प्रगति

करण्याचा प्रयत्न मुळींच दिसून येत नाहीं. ब्रिटिश सरकार ज्या प्रगतिपर घोषणा करीत आहे त्यास साजेल असें वर्तन आज तें करीत असल्याचा अथवा पुढें करील याचा पुरावा कांहींही मिळत नाहीं. फॅसिझम्, साम्राज्यशाही आणि त्याबरोबरच भूतकाळांत व वर्तमानकाळांत घडून आलेलें आक्रमण या सर्वांचा नाश करणें हीच लोकशाहीची खरी सफलता होय. केवळ याच भूमिकेवर नवी समाजघटना उभारतां येईल. या नव्या समाजघटनेसाठीं झगडा करण्यास कमिटी उत्सुक असून त्या कामीं सर्व प्रकारची मदत देण्याची वर्किंग कमिटीची इच्छा आहे. पण जें युद्ध साम्राज्यवादी पद्धतीनें चाललें आहे आणि ज्यामुळें हिंदुस्तानांतील व इतर ठिकाणचा साम्राज्यवाद मजबूत होणार आहे अशा युद्धांत काँग्रेस वर्किंग कमिटी सामील होवूं शकत नाहीं.

तथापि प्रसंग कठीण आहे, गेल्या थोडया दिवसांत अनेक घटना भराभर घडून येत आहेत, मनोवेगापेक्षां इतिहासाचा वेग वाढला आहे. म्हणून आजच अखेरचा निर्णय ठरवावा अशी काँग्रेस वर्किंग कमिटीची इच्छा नाहीं. युद्ध कशासाठीं लढलें जात आहे त्या हेतूंचा पूर्ण खुलासा, व युद्धाचीं ध्येयें आणि हिंदुस्थानचें सध्यांचें व भावी कालांतलें स्थान यांचें स्पष्टीकरण होऊं देण्यास वर्किंग कमिटी वेळ देऊं इच्छिते. पण हा निर्णय कालावधीवर टाकण्यांत येणार नाहीं. ज्या धोरणांत हिंदुस्थान भागीदार नाहीं व जें हिंदुस्थानला पसंत नाहीं त्यांत हिंदुस्थान रोजच्या रोज अधिकाधिक गोवलें जात आहे. म्हणून काँग्रेस वर्किंग कमिटी ब्रिटिश सरकारला असें विचारते कीं लोकशाही, साम्राज्यशाही आणि जगाच्या डोळ्यापुढें ठेवण्यांत आलेली नवी समाजघटना यासंबंधानें तुमचीं युद्धध्येयें काय आहेत तीं तुम्ही सांगा. विशेषतः, हीं ध्येयें हिंदुस्थानला कशीं लागूं करणार आणि आजच्या परिस्थितींत त्यांचा अंमल कसा करणार हें निःसंदिग्धपणें सांगा. या तुमच्या ध्येयांत, साम्राज्यसत्ता नष्ट करून जनतेच्या इच्छेप्रमाणें ज्याचें धोरण चालतें अशा स्वतंत्र हिंदुस्थानचा समावेश होईल कीं नाहीं? साम्राज्यशाही आणि फॅसिझम् यांचा शेवट करण्याला ब्रिटिश सरकार वचनबद्ध आहे अशी घोषणा भविष्यकाळासंबंधानें केल्यास सर्वच देशाच्या जनतेकडून तिचें स्वागत होईल. पण त्याहीपेक्षां अधिक आवश्यक गोष्ट अशी आहे कीं ही घोषणा जास्तींत जास्त शक्य इतक्या प्रमाणांत आजच अमलांत आणली गेली पाहिजे. कारण तसें झालें तर

ही घोषणा पुढें अमलांत येणार याबद्दल लोकांना खात्री पटेल. कोणत्याहि गोष्टीची कसोटी आज ती घोषणा अमलांत कशी येणार यांत आहे. कारण आज जें अमलांत येईल त्यानें आजच्या कृतीस वळण मिळेल आणि उद्यांच्या भवितव्याचाही आकार ठरला जाईल.

युरोपांत महायुद्ध सुरू झालेंच आहे. पुढें काय होणार याची कल्पना करणेंही भयानक वाटतें. पण अलीकडील कांहीं वर्षें अबिसिनिया, स्पेन व चीन येथें युद्ध हें कितीतरी माणसांचे बळी घेतच आहे. असंख्य निरपराधी पुरुष, स्त्रिया व मुलें यांचा, उघड्या शहरावर हवेंतून बाँब टाकून, वध करण्यांत आला आहे. या भयंकर काळांत निर्दयपणें कत्तली, छळ व उपमर्द हे प्रकार लागोपाठ सर्वत्र होत आहेत. भयानकपणा वाढतच आहे आणि अत्याचार व त्याची दहशत यांची छाया जगावर पसरत आहे. ती वेळींच अडवून नष्ट केली नाहीं तर भूतकाळांतून ज्या मूल्यवान् गोष्टींचा वारसा आम्हांस मिळाला आहे त्यांचा विध्वंस होऊन जाईल. हा भयानकपणा युरोपमध्यें थांबविला पाहिजे तसाच तो चीनमध्यें थांबविला पाहिजे. ही गोष्ट घडवून आणण्यासाठीं काँग्रेस वर्किंग कमिटी सहकार्य करण्यास तयार आहे. पण हें भयंकर युद्धही जर साम्राज्यवादी भावनेनेंच लढलें जाईल आणि युद्ध व मानवी अधःपात यांना कारण होणारी जी साम्राज्यवादी संघटना ती टिकविण्यासाठीं जर तें लढलें जाईल तर खरोखर तो फार मोठा अनर्थच ठरणार आहे.

काँग्रेस वर्किंग कमिटी असें जाहीर करूं इच्छिते कीं हिंदी लोकांचें जर्मन जनता अथवा जपानी जनता यांच्याशीं कांहींही भांडण नाहीं. पण स्वातंत्र्य नाकारणाऱ्या आणि अत्याचार व आक्रमण यांवर आधारलेल्या संघटनेशीं आमचें भांडण आहे. एका राष्ट्रानें दुसऱ्यास जिंकावें अथवा दुसऱ्यावर आपल्या इच्छेस येईल तसा तह लादावा हें भवितव्य हिंदी लोकांना नको आहे. तर सर्व देशांतील लोकशाहीस विजय मिळावा आणि अत्याचार व साम्राज्य-वादी आक्रमण यांपासून जग मुक्त व्हावें हें त्यांना पाहिजे आहे.

काँग्रेस वर्किंग कमिटी हिंदी जनतेला विनंति करते कीं, त्यांनीं अंतर्गत कलह व वाद मिटवावे. महान् संकटाच्या या गंभीर प्रसंगीं एकजूट झालेलें राष्ट्र या उच्च भूमिकेनें आपण उभें राहिलें पाहिजे. हिंदुस्थाननें शांतपणें आपला

निर्धार अंतकरणांत धारण करावा आणि जगाच्या मोठ्या स्वातंत्र्यांतच आपलें स्वातंत्र्य प्राप्त करून घेण्याचा दृढ निश्चय ठेवावा."

काँग्रेसच्या युद्धविषयक भूमिकेचें जें मूळ स्वरूप आहे या तें वरील उताऱ्यांवरून पूर्णपणें विशद होईल. ही भूमिका अतीशय उदात्त आहे. या भूमिकेत पुढें युद्धकालांत आणखी कांहीं मुद्यांची भर पडली. ती महत्त्वाचीही होती. पण या नवीन मुद्यांनीं मूळची भूमिका बदलली नाहीं. म्हणून पुढील घडामोडींचा विचार करण्यापूर्वी या मूळ भूमिकेचें स्पष्टीकरण पुढील प्रकरणांत करूनं घेऊं.

—o—

# काँग्रेसच्या भूमिकेची उपपत्ति ::: [ २ ]

"काँग्रेसनें युद्धसहकार्याची भूमिका कधींच घेतली नव्हती, कोणत्याही परिस्थितींत युद्धसहकार्य करण्यास काँग्रेसनें केव्हांही संमति दिली नव्हती" अशी टीका विशेषतः अलीकडील वर्ष दीड वर्षांत काँग्रेसवर करण्यांत येत असते. काँग्रेस कार्यकर्त्यांत व कांहीं पुढाऱ्यांतहीं कांहींसा असाच अर्धवट सुप्त समज आहे. काँग्रेसचें धोरण युद्धविरोधाचें आहे अशी भाषा कांहींशा मोघमपणें अथवा भोंगळपणें या लोकांकडून वापरली जाते. वस्तुस्थिति अशी आहे कीं काँग्रेसचें धोरण "युद्धविरोधाचें" नसून "साम्राज्यशाही युद्धविरोधाचें" होतें. ही गोष्ट वरील सर्व उताऱ्यांवरून स्पष्ट होण्याजोगी आहे. हा खरा मुद्दा लक्षांत येण्यासाठीं काँग्रेसच्या मूळ युद्धविषयक भूमिकेचें स्पष्टीकरण येथें करावयाचें आहे.

## लोकांच्या भावनेस अनुरूप धोरण

काँग्रेसच्या युद्धविषयक धोरणाचें मूळ निर्माते, मागें म्हटल्याप्रमाणें, पं. नेहरू हेच होत. फॅसिझमविरोध, लोकशाही, राष्ट्रीय स्वातंत्र्य व समाजवाद या आधुनिक पुरोगामी तत्त्वांचा प्रसार त्यांनींच सर्वांत जास्त प्रमाणांत केला. हिंदुस्तानांत ब्रिटिशांविषयीं जी एक तेढीची भावना टिळकांच्या काळापासून वाढत आली

होती ती गांधींच्या अमदानींत कधींही कमी होऊं शकली नाहीं. इंग्रजांचे विषयीं गांधीजी नेहमीं प्रेम व्यक्त करीत, पण जनतेनें त्या भावनेचा स्वीकार कधींच केला नाहीं. त्यांची अहिंसा आणि निर्वैरत्व या विषयींची जी शिकवण त्या शिकवणीचा जनतेनें फक्त व्यावहारिक उपयोग केला होता. परकी राज्यकर्ते अडचणींत सांपडले कीं त्याचा गैरफायदा घेऊनही आपलें स्वातंत्र्य संपादन करावयाचें ही सरसकट सर्वच इतिहासाची अनुभविक शिकवण असून एकंदर स्वातंत्र्येच्छु जनतेची सर्व जगांत ही स्वयंस्फूर्त भावनाही असते. आयर्लंडच्या इतिहासानें हिंदुस्तानचें स्वातंत्र्यलढ्याचे बाबतीत बरेंच मार्गदर्शन केलें असून 'इंग्लंडच्या अडचणी ती आयर्लंडची संधि' ही आयर्लंडांत कायमची म्हण पडली होती. तिचा पडसाद गेल्या युद्धावेळीं येथें उठलाच होता. गेल्या महायुद्धाचे वेळीं हिंदी जनतेला फारसें कांहीं करतां आलें नाहीं तरी दहशतवाद्यांनीं जें कांहीं स्वातंत्र्यलढ्याचे प्रयत्न त्यावेळीं केले ते याच भावनेनें केले होते. त्या युद्धाची संधि वाया गेल्यानंतर पुन्हा नव्या युद्धाच्या काळीं ब्रिटिशांच्या अडचणींचा फायदा घेऊन उठावणी करावयाची ही गेल्या वीस वर्षांच्या काळांत काँग्रेस-कार्यकर्त्यांची व इतर स्वातंत्र्यावाद्यांची भावना होती.

गांधींनीं ही भावना वाढविली नाहीं, उलट ती मागें खेचण्याचा निर्धारानें प्रयत्न केला. पण त्यांना फार थोडें यश मिळालें. चालू युद्धाच्या आरंभापासून मूख्यतः टिळकानुयायी म्हणविणाऱ्या हिंदु सभावाल्यांनीं गांधींच्या नेतृत्वावर जो मुख्य आरोप घेतला तो हा कीं "गांधी हे इंग्रजांना अनुकूल आहेत, इंग्रजांच्या अडचणींचा फायदा घेऊन स्वातंत्र्य प्राप्त करून घ्यावयास पाहिजे, पण ही गोष्ट गांधींच्या नेतृत्वाखालीं कधींच होणार नाहीं. त्यासाठीं हिंदुसभावीरांचेंच नेतृत्व अवश्य आहे." (आज हे सर्व आक्षेपक सरकारच्या बाजूला जाऊन काँग्रेसच्या अनुयायांचें बंड ठेंचून काढण्यांत गर्क झाले आहेत. ब्रिटिशांच्या अडचणींचे वेळीं त्यांनाच मदत करून त्यांची राज्यसत्ता येथें मजबूत करण्यास त्यांना साहाय्य करीत आहेत, तें असो.) युद्धाच्या सुरवातीस गांधीजी व्हाइसरॉयच्या निमंत्रणा-वरून त्यांच्या भेटीस गेले त्या वेळीं त्यांच्या भोंवतीं लोकांनीं गलगा करून 'सर-कारशीं समेट करूं नका' असा त्यांना इशारा दिला. युद्धाच्या आरंभीची पहिली दोन वर्षेपर्यंत 'माझी इंग्रजांना सहानुभूति आहे, मी त्यांनाच विजय चिंतितों'

असें गांधीजी नेहमीं म्हणत असत. लोकांना तें मुळींच पटलें नाहीं. मलाया, सिंगापूर व ब्रह्मदेश यांचा पाडाव होत असतां लोक मनांतल्या मनांत आनंदित होत आहेत हें गांधींना दिसत होतें. त्यांना तें कधींच आवडलें नाहीं. स्वतः पं. नेहरू हे ब्रिटिशविरोधी असे कधींही नव्हते. "मी ब्रिटिशविरोधी कसा असेन? ब्रिटिश याचा अर्थ ब्रिटिश जनता असा जर असेल तर मीं ब्रिटिश विरोधी असणें अशक्य आहे." असे ते म्हणतात "व्यक्तिशः इंग्रजांपासून मीं कितीतरी गोष्टी घेतल्या. त्यांची भाषा व त्यांचें वाङ्मय यावर माझें प्रेम आहे. इंग्रजांत माझे अनेक मित्र आहेत. पण मी साम्राज्यवाद आणि साम्राज्यसत्ता यांचा शत्रु आहे. कारण माझ्यामतें जगाच्या प्रगतीला त्यांमुळे विघ्न येतें."

पण हिंदुस्थानांत ब्रिटिशांविषयीं जी तीव्र स्वरूपाची तेढ आहे तीच जनतेला युद्धसन्मुख करण्यास कशी अडचण आणते हें सांगतांना पं. नेहरू म्हणतात "जनतेंतल्या सर्व वर्गांत ब्रिटिशांच्या येथील राज्यसत्तेविषयीं जो दृढ व व्यापक द्वेष आहे तो ठसठशीतपणें दिसतो. जुन्या व चालू इतिहासाचा तो अपरिहार्य परिणाम असून गेल्या दोन वर्षांतील ब्रिटिश मुत्सद्यांच्या धोरणानें व उद्गारांनीं हा द्वेषभाव दृढ झाला आहे. कांहीं व्यक्तींना व्यापक तात्त्विक दृष्टिकोण असतो, पण तो अखेर जनतेच्या दृष्टीपुढें दुय्यम ठरतो. ब्रिटिश सत्ते-बद्दलचा विद्वेष हाच लोकांच्या मनाला विशिष्ट वळण लावीत असतो." काँग्रेसच्या युद्धविषयक भूमिकेचा विचार करतांना जनतेच्या हाडींमाशीं खिळलेली ही ब्रिटिशविरोधी भावना लक्षांत घेऊनच काँग्रेसला आपलें धोरण आखावें लागलें हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

युद्धाच्या सुरवातीस व्हाइसरॉयची मुलाखत घेतल्यावर गांधींनीं 'मी बिनशर्त सहकार्यवादी आहें' असे उद्गार काढले तेव्हां सर्व देशभर चोंहोकडून त्यांचा धिक्कार झाला. यावरून अशा परिस्थितींत जनतेला केवळ बिनशर्त सहकार्यवादाचा संदेश देऊन त्याला व्यापक पाठिंबा मिळवणें गांधींनाहीं शक्य झालें नसतें ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. सप्रूप्रभृति नेमस्त विचारांच्या पुढाऱ्यांनीं बिनशर्त सहकार्यवादाचा युद्धाचे सुरवातीस पुरस्कार केला पण अखेर जनतेला ही भूमिका मानवत नाहीं हें लक्षांत येऊन मध्यसत्तेची मागणी हल्लीं देशांतील सर्वच पक्ष करीत आहेत. काँग्रेसनें लोकांची ही भावना आरंभापासूनच

लक्षांत घेतली हा तिचा विशेष गुण होय. स्वातंत्र्याच्या हमीवांचून जनता इंग्रजांच्या बाजूनें लढणें शक्य नव्हतें. " जगांत स्वातंत्र्य व लोकशाही स्थापना करण्याचा तुमचा हेतु आहे ही तुमची वाणी अखेर तुम्ही खरी करणार याचे जनतेला आज जें आश्वासन हवें आहे तें आजच्या आज प्रत्यक्षपणें किती सत्ता तुम्ही देतां त्या स्वरूपांत हवें आहे, " असें काँग्रेसनें अनेकवार म्हटलें त्याचा हेतु हा होता. अशी मध्यसत्ता मिळाल्यास युद्धसहकार्य करण्याचें–फॅसिझम्‌विरोधाच्या जागतिक कार्यांत मनोभावानें भाग घेण्याचें काँग्रेसनें जाहिरपणें कबूल केलें होतें.

## युद्धकाळांतच मध्यसत्ता कां मागितली

प्रांतिक स्वायत्तता युद्धापूर्वी सुमारें दोन वर्षें अमलांत आली होती. युद्धकालांत पूर्ण राष्ट्रीय स्वातंत्र्य काँग्रेसनें मागितलें नव्हतें, तथापि बरीचशी मध्यसत्ता ताबड-तोब मागितली होती हें खरें आहे. ऑस्ट्रेलिया ब्रिटिश साम्राज्यांत असूनही जितका स्वायत्त आहे आणि संयुक्त राष्ट्रांच्या युद्धयंत्राचा अवयव होऊन पण आपल्या निवडीच्या सेनापतीचे नियंत्रणाखालीं संयुक्त राष्ट्रांशीं जसें युद्धसहकार्य करीत आहे, तितकी स्वायत्तता काँग्रेसनें मागितली होती व तसें युद्धसहकार्य करण्याचें आश्वासनही दिलें होतें. ही मध्यसत्तेची मागणी युद्धकालांतच करण्यांत आली हाच ब्रिटिशांना अडचणींत गांठून स्वातंत्र्य मिळवण्याचा मवाली मार्ग होय असें आक्षे-पकांचें म्हणणें आहे. पण काँग्रेसनें युद्धकालांतच जास्तींत जास्त मध्यसत्तेचा हट्ट कां धरला हें जरा खोल जाऊन समजून घेतलें पाहिजे.

युद्ध सुरू होताच हिंदुस्थान सरकारचा घटना कायदा दुरुस्त करण्यांत येऊन प्रांतिक सरकारच्या स्वायत्ततेच्या नाड्या युद्धविषयक धोरणाचे बाबतींत पूर्णपणें आखडण्यांत आल्या. युद्ध म्हटलें कीं साधारणत: राज्यकारभाराचीं सर्व खातीं, जनतेची सर्व कर्तृत्वशक्ति आणि देशाची सर्व साधनसंपत्ति यांचा उपयोग एका युद्धाच्याच दृष्टीनें करावा लागतो. देश केवढाही लहान अथवा मोठा असो त्याचा राज्यकारभार, लोकांचें जीवन आणि राष्ट्रांतील साधनांचा वापर हीं सर्व एकमुखी व एकतंत्री होतात. फॅसिस्ट राष्ट्रांत हें एकतंत्रीपण अतिशय दृढतेनें होत असल्यामुळें फॅसिझमशीं झुंज घेणाऱ्या राष्ट्रांनाही तसेंच दृढतेनें हें सर्व एकमुखी करावें लागतें आणि म्हणून हिंदुस्थानच्या मध्यसरकारनें घटनाकायदा दुरुस्त करून प्रांतिक स्वायत्ततेचा बहुतेक अंश काढून घेतला यांत खरोखर गैर अथवा अस्वाभाविक कांहीं झालें

नाहीं. पण मध्यसत्ता ही सर्वस्वी परकी, अप्रातिनिधिक आणि बेजबाबदार असल्यानें युद्धाच्या निमित्तानें प्रांतिक स्वायत्ततेवर जें आक्रमण आलें त्यामुळें, प्रांतांत अंशतः मिळालेलें तोकडें स्वातंत्र्यही नष्ट झालें. बेजबाबदार, अप्रातिनिधिक व परकी अशा राज्यकर्त्यांची अनियंत्रित सत्ता पुन्हां सगळ्या देशावर आली. ही वस्तुस्थिति भयानक वाटण्यासारखीच होती. युद्धकालांतील या मध्यसत्तेचें स्वरूप मामुली काळांतील मध्यसत्तेच्या स्वरूपाहून फारच अधिक भेसूर होतें. चाळीस कोटी लोकांचें जीवित आणि वित्त वाटेल तसें वापरावें एवढी अफाट सत्ता पेनाच्या एका फटकाऱ्यानें वटहुकूम काढून राज्यकर्त्यांनीं घेतली होती. या राज्यकर्त्यांना फॅसिस्टांशीं जें झगडावयाचें होतें तें आपलें साम्राज्य टिकविण्यासाठीं झगडावयाचें होतें इतकेंच नव्हे तर मध्यसत्ता जास्तींत जास्त मजबूत करून परकी राष्ट्रांचें आक्रमण व अंतर्गत बंडाळी याजपासून कायमची सुरक्षितता आपल्या येथील साम्राज्यसत्तेस मिळावी यासाठीं हे परकी राजकर्ते युद्धाच्या निमित्तानें त्यांना मिळालेल्या अनियंत्रित व अमर्याद सत्तेचा दुरुपयोग करतील अशी जगाच्या इतिहासाचें सूक्ष्म अवलोकन केलेल्या पं. नेहरूप्रभृतींना भीति वाटत होती.

अशा या ब्रिटिशसत्तेचें स्वरूप युद्धकालींच फॅसिस्ट होईल, आणि ब्रिटिशांना युद्धांत विजय मिळाल्यास जनतेला कायमची कैचींत धरून येथें ब्रिटिशांचीच फॅसिस्ट सत्ता युद्धोत्तर कालांत स्थापन केली जाईल हा धोका काँग्रेस–पुढाऱ्यांना दिसत होता. चालू युद्ध फॅसिझम्‌विरोधासाठीं लढलें जात आहे असें कोणी कितीही म्हणो, मध्यसत्ता युद्धकालांत अप्रातिनिधिक, बेजबाबदार व परकी राहिल्यास तिच्या हातीं असणाऱ्या अनियंत्रित अधिकारामुळें हिंदुस्थानच्या कपाळीं ब्रिटिश फॅसिझम् येणें अपरिहार्य दिसत होतें. म्हणून हिंदुस्थानच्या दृष्टीनें हें युद्ध फॅसिझमविरोधी युद्ध ठरत नव्हतें. हें युद्ध फॅसिझम्‌-विरोधी आहे हें सिद्ध करण्याची आमची कसोटी युद्धकालांतच मध्यसत्तेचा लाभ जास्तींतजास्त प्रमाणांत आम्हांस होणें ही आहे असें जें काँग्रेसचें म्हणणें होतें त्याचा अर्थ वरील विवेचनानें लक्षांत येईल. युद्धकालांत मध्यसत्ता एकदां हातीं आली म्हणजे तिचा उपयोग संपूर्ण स्वातंत्र्य प्राप्त करून घेण्याकडे व तें कोणाविरुद्धही लढवून टिकविता येईल इतकें मजबूत करण्याच्या दृष्टीनें केला जाईल हें स्वाभाविक होतेंच. सारांश युद्धकाळांत सरकारच्या अडचणींचा फायदा घेऊन मध्यसत्ता

मिळविणें हा काँग्रेसचा हेतु नव्हता. युद्धाच्या निमित्तानें प्रांतिक स्वायत्तता नष्ट झाली, मध्यसरकारच्या हातीं सर्व सत्ता आली, अर्थात तेथें हिंदी लोकांनीं जाऊन जास्तींत जास्त सत्तेचें अंशभागीं होणें व स्वातंत्र्याच्या मार्गावर पडलेलें पण युद्धामुळें आकस्मिकपणें मागें खेचलें गेलेलें देशाचें पाऊल पुनः पुढें जाऊं देणें हा मध्यसत्तेचा अंश मागण्यांत काँग्रेसचा मुख्य हेतु होता.

## मागील इतिहासावर नजरफेक

युद्धानंतर हिंदुस्थानला काय देण्यांत येईल यासंबंधानें प्रथम स्पष्ट आश्वासनें कांहींही देण्यांत आलीं नाहींत व मागाहून जीं देण्यांत आलीं तीं फसगतीचीं ठरलीं याचा विचार पुढें करण्यांत येईलच. पण युद्धाचे आरंभीं जो मुख्य मुद्दा युद्धहेतूसंबंधानें होता तो संयुक्तराष्ट्रें आपलीं वचनें कितपत पाळतील याबद्दलचा संशय हा होता. इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका हीं राष्ट्रें साम्राज्यवादी आहेत. तीं प्रत्येकीं केवळ स्वार्थी दृष्टीनें जगाच्या प्रश्नाकडे पाहतात. इंग्लंड व फ्रान्स युद्धांत पडलीं पण त्यांच्या रक्षणासाठीं अमेरिकेनें कांहीं तावडतोब युद्धांत उडी घेतली नाहीं, किंवा जगांतील अंकित राष्ट्रांच्या स्वातंत्र्यासंबंधानें व लोकशाहीच्या शाश्वतीसंबंधानें आपण काहीं करारमदार करूं व मग आम्ही तुमच्या मदतीस फॅसिझमविरोधासाठीं येतों असेंही इंग्लंड-फ्रान्सना अमेरिकेनें कळविलें नाहीं. इंग्लंड व फ्रान्स यांच्या बावतींत इतिहासाचा अनुभव असा आहे कीं त्यांचा फॅसिझमविरोध हें एक ढोंग होतें. फॅसिझम हें साम्राज्यवादाचेंच दृढ स्वरूप आहे ही गोष्ट सर्व शास्त्रज्ञांनीं आतां मान्य केली आहे. इंग्लंड-फ्रान्सचा फॅसिझमविरोध जर प्रामाणिक असेल तर त्यांनीं स्वतः साम्राज्यलोभ टाकल्याचा पुरावा देण्याची आवश्यकता होती. पण ही गोष्ट गेल्या वीस वर्षांत कधींही घडून आली नाहीं. उलट लोकशाही आणि राष्ट्रीय स्वातंत्र्य या तत्त्वांचा पुनःपुनः विश्वासघात करण्यांत आला. यामुळेंच यावेळीं देण्यांत येणारीं मोघम आश्वासनें कितपत अमलांत आणलीं जातील यावद्दल जगभर संशय व्यक्त करण्यांत येत आहे. हा मुद्दा समजून घेण्यासाठीं गेल्या महायुद्धावेळेपासून चालू युद्ध सुरू होइपर्यंतच्या राजकारणांतील कांहीं विशिष्ट घटनांकडे ओझरती नजर टाकणें उपयुक्त होईल.

गेले महायुद्ध चालू असतां युद्धें कायमचीं थांबवावीं कशीं यासंबंधानें तत्त्वज्ञ व मुत्सद्दी यांनीं जाहीर चर्चा केल्या. १९१७च्या फेब्रुआरींत रशियांत राज्यक्रान्ति

होऊन झारचा पाडाव झाला व ऑक्टोबरमध्यें बोल्शेव्हिकपक्ष सत्ताधारी झाला. त्यामुळें एकाच वेळीं दोन महायुद्धें जगांत चालू आहेत ही गोष्ट तत्त्वज्ञांच्या लक्षांत आल्यावांचून राहिली नाहीं. एका बाजूस जर्मनी व दुसऱ्या बाजूस इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका असें जें युद्ध होतें तें दोन साम्राज्यवाद्यांच्या दरम्यानचें युद्ध होतें. तें उघड दिसत होतें. पण दुसरें युद्ध असें स्पष्ट नव्हतें. साम्राज्यवाद विरूद्ध समाजवाद असें हें युद्ध होतें. साम्राज्यवादाच्या पक्षास ब्रिटन, जर्मनी अमेरिका वगैरे सर्व साम्राज्यवादी राष्ट्रें होतीं आणि विरुद्ध पक्षास फक्त बोल्शेव्हिक रशिया होता. रशियन क्रान्ति झाली त्यावेळीं इंग्लंड, अमेरिका व जर्मनी यांचें युद्ध संपलें नव्हतें, पण युरोपीय जनतेवर बोल्शेव्हिक क्रान्तीचा परिणाम होऊन युरोपांत बोल्शेव्हिजम् माजेल अशी भीति अँग्लो–अमेरिकनांना वाटत होती. रशियन बोल्शेव्हिकांनीं जनतास्वातंत्र्याची जी नवी ललकारी दिली तिकडे युरोपीय जनतेचें लक्ष वेधले जाण्याचा धोका अमेरिकेचे अध्यक्ष रूझवेल्ट यांना दिसला. म्हणून अमेरिकेचे अध्यक्ष विल्सन यांनीं युरोपीय जनतेला व इतर जगांतील जनतेला राष्ट्रीय स्वातंत्र्य व लोकशाही यांचीं आश्वासनें देणारीं प्रसिद्ध १४ तत्त्वें जाहीर केलीं. विजयी राष्ट्रांनीं आपलीं साम्राज्यें वाढवावयाचीं नाहींत हें प्रमुख तत्त्व यांत समाविष्ट होतें. पण इंग्लंड व फ्रान्स यांनीं हें तत्त्व मुळींच पाळलें नाहीं. तुर्कस्तानच्या व जर्मनीच्या साम्राज्याचे तुकडे करून ब्रिटिशांनीं व फ्रेंचांनीं आर्थिक व लष्करी दृष्ट्या महत्त्वाचे मुलुख आपल्या ताब्यांत घेतले. जपानलाही पॅसिफीकमधील जर्मन बेटें घेऊं दिलीं. यामुळें ज्या साम्राज्यलोभापायीं १९१४–१८ चें महायुद्ध झालें त्या साम्राज्यलोभाचा विषवृक्ष कायमच राहिला व पुढील महायुद्धाच्या तयारीची सुरवात १९१४–१८ च्या महायुद्धाच्या अंतापासूनच झाली. साम्राज्यवाद्यांची आपसांतील तेढ जशी त्यावेळेपासून वाढतच राहिली तशीच सर्व साम्राज्यवाद्यांची बोल्शेव्हिझम्‌विरुद्ध उत्पन्न झालेली तेढही वाढतच गेली. इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स व जपान यांनीं रशियांतील प्रतिक्रान्तिकारक वर्गांना आपलीं सैन्यें पुरवून बोल्शेव्हिकांचा पाडाव करण्यासाठीं जंगजंग पछाडले. पण त्यांत त्यांस यश आलें नाहीं. पुढील कांहीं वर्षें बोल्शेव्हिकांचा आंतरराष्ट्रीय क्रान्तिवाद व साम्राज्यवाद्यांचा साम्राज्यवाद यांमधील वैर भडकत राहिलें व त्यांचे दरम्यान लवकरच महायुद्ध

होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. तेव्हां बोल्शेव्हिक रशियाचा पुढारी स्टॅलिन यानें आंतरराष्ट्रीय क्रांतीच्या बोल्शेव्हिक तत्त्वांस थोडी मुरड घालून रशियाची अंतर्गत पुनर्घटना व भावी युद्धासाठीं बचावाची तयारी यांत सर्व सामर्थ्य खर्च करण्याचें धोरण आंखलें. तथापि बोल्शेव्हिकांना चिरडणें व साम्राज्यवादाची स्पर्धा चालू ठेवणें हे हेतु साम्राज्यवाद्यांनीं सोडले नाहींत. फ्रान्सबद्दलच्या मत्सरानें ब्रिटननें जर्मनीस चिथावलें व शेफारूं दिलें. इंग्लंडच्या उत्तेजनानेंच जर्मनींत लोकशाहीचा पाडाव होऊन फॅसिझम् बळावला. 'मी बोल्शेव्हिकाशीं लढणार आहें' अशा प्रतिज्ञा जर्मन नाझींचा पुढारी हिटलर हा करीत होता. त्या कार्यासाठीं त्यास इंग्लंडनें परोपरीनें साहाय्य केलें. नाझींना पाठिंबा देण्यांत इंग्लंडचे तीन हेतु होते.( १ ) फ्रान्स आणि जर्मनी हीं राष्ट्रें युरोपांत समबल व प्रतिस्पर्धी राहून युरोप दुर्बल रहावा हा पहिला हेतु. ब्रिटिश साम्राज्य सुरक्षित रहाण्यासाठीं ही गोष्ट आवश्यक होती. (२) खुद्द जर्मनींत बोल्शेव्हिझम् म्हणजे समाजवादी क्रान्ति माजूं नये व बोल्शेव्हिझम्‌ची आग युरोपांत आणि बाहेरच्या जगांत भडकूं नये यासाठीं जर्मनींत हुकूमशाही निर्माण करणें अवश्य वाटून इंग्लंडनें जर्मन नाझींना पाठिंबा दिला. (३) तिसरा हेतु बोल्शेव्हिक रशियाचा नाश हा होता. जगांतील साम्राज्यवादाचा बोल्शेव्हिझम् हाच मोठा शत्रु होता. त्याचा मुळांतच म्हणजे रशियांत पाडाव केल्यास जगत्क्रांतीचें संकट टळेल व रशियाचा ८७ लक्ष चोरस मैल मुलुख जगांतील साम्राज्यवाद्यांना वाटून घेण्याला भरपूर होईल हें आमिष हिटलरनें दाखविलें होतें. साम्राज्यवादी राष्ट्रांना तें गोड वाटलें.

ब्रिटिश, अमेरिकन व फ्रेंच मुत्सद्यांच्या जिभेस त्यामुळें पाणी सुटलें होतें. म्हणून समाजवादी रशियाला उध्वस्त करून समाजवादी क्रान्तीचे इतर सर्व ठिकाणचे संभव नष्ट करणें एवढ्याच धोरणानें मुख्यतः गेल्या १५ वर्षांत अँग्लो-अमेरिकन व फ्रेंच मुत्सद्यांनीं आपलीं धोरणें चालविलीं. अर्थात त्यांची आपसांतील स्पर्धाही चालू होतीच. उदाहरणार्थ जपानसंबंधानें ब्रिटिशांचें धोरण कसें होतें पहा. मँच्युरिआवर जपाननें १९३१ सालीं स्वारी केली त्यावेळेपासून जपानच्या भक्ष्यस्थानीं चीन पडूं द्यावा कीं नाहीं याचा निर्णय घेणें इंग्लंडला अवश्य झालें. इंग्लंड व अमेरिका या दोघांत जपानला दुसऱ्यानें मारावें व आपली कांतडी बचावून आपणास त्याचा फक्त फायदा मिळावा अशी स्पर्धा

होती. या दृष्टीनें प्रत्येकजण अंगचोरपणा करीतच होता. पण दुसरा व विशेष महत्त्वाचा मुद्दा होता तो असा कीं जपानला चीन गिळंकृत करतां येऊं नये म्हणून चीनच्या स्वातंत्र्यलढ्यास मदत करण्याचें इंग्लंड–अमेरिकेनें जर ठरविलें तर त्यांत या साम्राज्यवादी राष्ट्रांना अनेक तोटे दिसत होते. जपानविरुद्ध लढ्यांत चीन एकदां यशस्वी झाल्यास त्याचें बळ इतकें वाढेल कीं अखेरीस ५० कोटी लोकसंख्येचें तें प्रचंड राष्ट्र सर्व जगांत अतिशय बलाढ्य होईल व इंग्लंड अमेरिकेला साम्राज्यवाढीस क्षेत्रच उरणार नाहीं. शिवाय जपानचा चीनवरील लढाईत पराभव झाल्यास जपानांत बोल्शेव्हिझम् माजून त्याची आग सगळ्या आशियाखंडांत पसरेल व आपलें साम्राज्य धुळीस मिळेल अशी भीति इंग्लंडला वाटली. "ब्रिटननें जसें साम्राज्य वाढविलें तसेंच साम्राज्य वाढविणें हा जपानचाही हक्क आहे, त्याला ब्रिटिशांनीं विरोध करणें गैर होईल" अशा अर्थाचा मतप्रचार हल्लींचे भारतमंत्री एल्. एस्. अमेरी हे त्या वेळीं करीत असत. सर जॉन सायमन हे परराष्ट्रमंत्री असतां त्यांनीं जपानच्या आक्रमणाची गय करण्याचें धोरण जाणूनबूजून अवलंबिलें होतें.

१९३८ सालीं जपानची स्वारी खास चीनवर अतिशय जोरानें चालू असतां इंग्लंड व अमेरिका या दोन्ही राष्ट्रांकडून जपानला सर्व प्रकारच्या शस्त्रास्त्र-साहित्याचा भरपूर पुरवठा होत होता. या चिनी–जपानी युद्धाकडे पहाण्याची इंग्लंडची दृष्टि कोणती होती हें ता. ४ जानेवारी १९३८ या दिवशीच्या 'इव्हनिंग स्टँडर्ड' पत्रांत त्या पत्राच्या अर्थविषयक लेखकानें लिहिलेल्या पत्रावरून कळतें. तो म्हणतो, " लंडन आणि टोकियो यांमध्यें हल्लीं जी तेढ माजली आहे तिचें कांहींही होवो. एकदां चीन जिंकल्यानंतर चीनमध्यें आपला औद्योगिक उत्कर्ष घडवून आणण्याकरितां जपानला लंडनकडेच पहावें लागेल." जपानला इंग्लंड-कडून कर्ज घ्यावें लागेल आणि आपलें भांडवल जपानी साम्राज्यवाद्यांना देऊन आपले नफे वाढवितां येतील हें भवितव्य, चीनचा विजय आणि जपानचा पराभव व क्रान्ति यापेक्षां, इंग्लंडला अधिक चांगलें वाटत होतें हें यावरून उघड होतें. जपाननें चीन जिंकल्यावर तेथें भांडवल गुंतवण्यास वाव मिळेल अशी आशा ३ नोव्हेंबर १९३८ या दिवशीं त्या वेळचे ब्रिटिश पंतप्रधान चेंबर्लेन यांनींही पार्लमेंटांतील आपल्या भाषणांत स्पष्टपणें व्यक्त केली होती.

मुसोलिनीच्या अबिसिनीयावरील स्वारीसंबंधानें ब्रिटननें हेंच धोरण स्वीकारलें होतें. इटलीनें अबिसिनीया जिंकण्यांत ब्रि. साम्राज्याला धोका होता म्हणून ब्रिटन इटालीच्या अबिसिनीयावरील स्वारीस विरोध करीत होतेंच. पण त्याबरोबरच मुसोलिनीला अबिसिनीयांतून मागें खेंचून त्याचा पराभव केल्यास इटालींत क्रांति होऊन बोल्शेव्हिझम् माजेल हीच भीति इंग्लंडला ग्रासून राहिली होती. म्हणून इंग्लंडनें इटालीला अबिसिनीया जिंकूं दिला व अखेर इटालीच्या अबिसिनीयावरील साम्राज्यास संमतिही दिली. स्पेनमध्यें लोकशाहीप्रधान असें सरकार व फॅसिस्ट बंडवाले यांच्यामधील यादवी चालू असतां इंग्लंड व फ्रान्स यांनीं जर्मनी, इटली वगैरे राष्ट्रांच्या मदतीनें तटस्थतासमिति नेमली होती. स्पेनमधील यादवींत परराष्ट्रांनीं हस्तक्षेप करूं नये हें घडवून आणणें हा या तटस्थतासमितीचा हेतु होता. तटस्थतासमितीच्या निर्णयास झुगारून देऊन हिटलर व मुसुलिनी स्पेन मधील फॅसिस्ट बंडवाल्यांना उघडपणें मदत करीत होते. पण इंग्लंड व फ्रान्स यांनीं स्पेनमधील लोकशाही सरकारला कधींही मदत न करतां अत्यन्त बेफिकीरपणें मरूं दिलें. तेथेंही स्पेनमधील लोकशाही सरकारचा विजय झाल्यास ती लोकशाहीची आग युरोपभर पसरून युरोपांत 'बोल्शेव्हिझम्' माजेल हीच भीति इंग्लंडला ग्रासून राहिली होती.

लोकशाही आणि राष्ट्रीय स्वातंत्र्य यांच्या विश्वासघाताचे हें धोरण झेकोस्लोव्हाकियाच्या प्रकरणीं अगदीं कळसास पोंचलें व नागडें उघडें झालें. झेकोस्लोव्हाकियांतील सुडेटन मुलुखाची मागणी जर्मनीनें केली. ही मागणी मान्य न करतां युद्ध करण्याची तयारी झेकोस्लोव्हाकियानें दाखविली. जर्मनीनें झेकोस्लोव्हाकियावर केव्हांही हल्ला केल्यास फ्रान्सनें झेक राष्ट्राच्या मदतीस धावून जावें अशा अर्थाचा करार फ्रान्स व झेकोस्लोव्हाकिया यांचे दरम्यान झालेला होता. झेकोस्लोव्हाकियावर जर्मनीनें हल्ला केला आणि फ्रान्स जर झेक राष्ट्राच्या मदतीस धावून आलें तर बोल्शेव्हिक रशियानेंही झेक राष्ट्राच्या मदतीस जावें असा करार झेक राष्ट्र व रशिया यांच्यामध्यें झालेला होता. अर्थात सुडेटन मुलुख जर्मनीला देण्याचें झेकांनीं नाकारल्यास एका बाजूस जर्मनी व दुसऱ्या बाजूस फ्रान्स, झेकोस्लोव्हाकिया आणि रशिया असें युद्ध १९३८ सालींच माजलें असतें. मग इंग्लंडलाही त्या युद्धांत फ्रान्सच्या बाजूनेंच पडावें लागलें असतें. पण इंग्लंडनें हा प्रसंग टाळला. झेक राष्ट्रावर जर्मन स्वारी झाल्यास फ्रान्सकडून झेकांना मदत मिळ-

णार नाहीं असे फ्रेंचांनीं झेकांना सांगावें अशी चिथावणी ब्रिटननें फ्रान्सला दिली. ब्रिटिश मुत्सद्दी रन्सिमन यास झेकोस्कोव्हाकियांत पाठवून जर्मनीस शरण जाण्यासाठीं झेक मुत्सद्यांचें मन वळविण्याचा चेंबर्लेननें शिकस्तीचा प्रयत्न केला. शेवटीं ‘ जर्मनीची झेकोस्लोव्हाकियावर स्वारी झाल्यास झेकांच्या मदतीसाठीं बोल्शेव्हिक सैन्य झेकोस्लोव्हाकियांत येईल तर ही गोष्ट आम्हांस संमत नाहीं ’ असें झेक जमिनदारांनीं झेक सरकारला कळविलें. या सर्व घडामोडींचा स्वाभाविक परिणाम झेक राष्ट्रानें जर्मनीला शरण जाणें हाच होता. पण चेंबर्लेननें झेक राष्ट्राला आपले आपण शरण जाण्याची संधीही दिली नाहीं. १९३८च्या सप्टेंबरअखेर म्युनिच येथें इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी आणि इटाली या चार राष्ट्रांच्या प्रतिनिधींनीं झेकोस्लोव्हाकियाचा सुडेटन मुलूख जर्मनीला देऊन टाकण्यांत यावा असा करार केला आणि त्यास, खाटकापुढें मान केलेल्या बकऱ्याप्रमाणें, झेकोस्लोव्हाकियन सरकारला सक्तीची संमति द्यावी लागली. चेंबर्लेनचा यांत दुहेरी हेतु होता. (१) बोल्शेव्हिक सैन्यें युरोपांत यावीं, त्यांनीं जर्मनीचा पराभव करावा आणि युरोपांत बोल्शेव्हिझम माजावा हा धोका तर त्यानें टाळलाच; शिवाय,(२) झेकोस्लोव्हाकियाचे सर्व भवितव्य जर्मनीच्या हवालीं करून जर्मनीस युरोपच्या नकाशावरील रशियाच्या दिशेकडे चेंबर्लेननें पुढें ढकललें. त्यामुळें चेंबर्लेनच्या दृष्टीनें जर्मनी व रशिया यांचा सामना नजिकच्या काळांत होण्याचा संभव अधिक वाढला. झेकोस्लोव्हाकियाचा विश्वासघात हा लोकशाही आणि राष्ट्रीय स्वातंत्र्य यांच्या विश्वासघाताचा कळसाध्यायच होता. चेंबर्लेनच्या धोरणाची त्यावेळीं सर्वत्र छीः थूः होऊन अमेरिकेनें चेंबर्लेनच्या धोरणास पाठिंबा देण्याचें नाकारलें.

ही उदाहरणपरंपरा लक्षांत घेता ब्रिटिश राज्यकर्ते आपलें साम्राज्य टिकविण्यासाठीं लोकशाहीचा विश्वासघात करतील अशी काँग्रेसनें व्यक्त केलेली शंका निराधार होती असें मुळींच म्हणतां येत नाहीं. अखेरीस ब्रिटननें युद्ध पुकारलें तेंही ब्रिटनच्या साम्राज्याला हिटलर दगा देईल या भीतीनेंच ब्रिटननें पुकारलें. तें पुकारण्यापूर्वी सोव्हियट रशियाची मदत जर्मनीविरुद्ध घेण्याच्या बाबतींत ब्रिटननें केलेली खळखळ व टाळाटाळ सुप्रसिद्ध आहे. ‘ फॅसिझम् विरुद्ध सोशालिझम् ’ असा वाद आला असतां ब्रिटन फॅसिझम्‌ची बाजू सोडण्यास सुखासुखी तयार होणार नाहीं हेंच तेव्हांही दिसून आलें.

## साम्राज्यवादांत फॅसीझम् अपरिहार्य

काँग्रेसच्या युद्धविषयक भूमिकेचे एक प्रमुख मर्म पं. नेहरूंनीं ता. ८ सप्टेंबर रोजीं दिलेल्या मुलाखतींत सांगितलें असून १४ सप्टेंबरच्या काँग्रेसच्या जाहिरनाम्यांत तें अंतर्भूत आहेच. फॅसिझम् ही साम्राज्यवादाचीच निकरावस्था आहे आणि जगांतील युद्धें थांबविण्यासाठीं फॅसिझम्बरोबरच साम्राज्यशाहीचाही नाश करून लोकशाही आणि राष्ट्रीय स्वातंत्र्य या तत्त्वांचे भूमिकेवर जगाची पुनर्घटना करणें हें या युद्धानंतर अत्यवश होणार आहे हा नेहरूंचा या युद्धासंबंधाचा महत्त्वाचा सिद्धांत त्यांच्या मुलाखतींत व काँग्रेसच्या जाहिरनाम्यांत आहे. काँग्रेसचें सर्व धोरण या सिद्धांताचे कसोटीवरच तपासून पाहिलें पाहिजे. फॅसिझम् ही कोंडींत सापडलेल्या साम्राज्यवादानें आत्मरक्षणासाठीं स्वीकारलेली निकराची भूमिका आहे. जर्मनी, फ्रान्स, अमेरिका आणि इंग्लंड ही साम्राज्यवादी राष्ट्रेंच होत. पण इंग्लंड, अमेरिका वगैरे राष्ट्रें जगावर आधींच हात पाय पसरून वसलीं आणि मागाहून औद्योगिक उत्कर्ष व साम्राज्यवाद यांचा स्वीकार केलेली जपान, जर्मनी वगैरे भांडवलदार राष्ट्रें साम्राज्यवादासाठीं मुलुख शोधण्यास पुढें आलीं. इंग्लंड, अमेरिका वगैरे राष्ट्रांनीं जगांतील महत्त्वाचा भाग व वहातुकीचे मार्ग आधींच अडवून टाकलेले त्यांना आढळून आलें. तेंव्हां इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स इत्यादि राष्ट्रांशीं सामना दिल्यावांचून आपला साम्राज्यवाद यशस्वी होणार नाहीं, हें पाहून जर्मनी व जपान या राष्ट्रांनीं आर्थिक उत्पादनाचा खर्च कमी करून आपला माल स्वस्तांत स्वस्त विकतां यावा यासाठीं भांडवलदारांतली चढाओढ सक्तीनें थांबविली, पगारवाढ व रहाणीची सुधारणा यासाठीं कामगारसंघटना होतात, त्यांस बंदी केली आणि आपापल्या राष्ट्रांचें युद्धसामर्थ्य प्रचंड वाढविलें. ही संघटणा म्हणजेच फॅसिझम्. साम्राज्यवादी राष्ट्रें जगांत अनेक निर्माण झालीं आणि जग त्यांना अपुरें पडूं लागलें म्हणून आहे हें जग इतरांना मागें रेटून आपल्या मांडीखालीं घालण्यासाठीं प्रत्येक साम्राज्यवादी राष्ट्राला ही फॅसिस्ट संघटना यापुढें स्वीकारावी लागणारच आहे. चालू युद्धानंतर जगांत साम्राज्यशाही ज्याला टिकवावयाची असेल अशा कोणीही राष्ट्रानें त्याला विजय मिळाल्यास आपल्या राष्ट्रांत व अंकित राष्ट्रांत शेतकरी–कामकरी संघटणा दडपून टाकून व भांडवलदारांची एकजूट करून सर्वसामान्य जनतेला

गुलामाप्रमाणें धनोत्पादनाच्या व युद्धाच्या कामीं सक्तपणें राबवावें लागणें अपरिहार्य आहे. म्हणून, जर्मन फॅसिझमपेक्षां आज ब्रिटिश साम्राज्यांत अधिक व्यक्तिस्वातंत्र्य, सवलती व सुबत्ता दिसत असली तरी चालू युद्धकालांतच क्रमाक्रमानें यांचा लोप होऊन ब्रिटनचा विजय झाल्यास स्वतः ब्रिटन पूर्ण फॅसिस्ट बनेल हें कोणाही शास्त्रशुद्ध विचारवंतास पटलें पाहिजे. काँग्रेसनें ' साम्राज्यवाद सोडा आणि त्याचें निश्चित द्योतक म्हणून आज मध्यसत्तेंत कोणती भागीदारी देतां तें सांगा ' अशी जी मागणी केली ती याप्रमाणें ब्रिटिशांच्या विजयानें खुद्द ब्रिटिश राष्ट्र व ब्रिटिश साम्राज्यच फॅसिस्ट होऊं नये या इच्छेनें केली होती हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

## येथील युद्धयंत्राची दुर्बलता

हल्लींच्या युद्धयंत्राशीं बिनशर्त सहकार्य करून खरोखर यशस्वी असें युद्धकार्य करता येणें बरेंच कठिण आहे ही गोष्ट काँग्रेसच्या टीकाकारांनीं मान्य न केली तरी निदान समजून घेण्याचा प्रयत्न तरी केला पाहिजे. हिंदुस्थानचें राज्ययंत्र व समाजयंत्र ब्रिटिश अमदानींत जें घडविण्यांत आलें आहे तें जर्मनी व जपान यांनीं हल्लीं घडविलेल्या युद्धयंत्राशीं स्वतःच्या बळानें टक्कर देण्यास पुरेसें समर्थ नाहीं ही गोष्ट युद्धाच्या आरंभापासून हिंदुस्थानांतील कांहीं प्रमुख पुढाऱ्यांच्या लक्षांत आली होती. याचें कारण उघड होतें. गेल्या कांहीं वर्षांत जर्मनी आणि जपान या देशांतील राज्यकर्त्यांनीं आपल्या प्रजेच्या ठिकाणीं दुर्दम स्वदेशाभिमान उत्पन्न केला. आर्थिक संघटना इतकी कार्यक्षम केली कीं जपान व जर्मनी या देशांतील माल इंग्लंड व अमेरिका यांच्या मालाहून अधिक सुबक व स्वस्त ठरून जगाचा बाजार काबीज करूं लागला. राज्यकारभार व धनोत्पादन यांचा खर्च जर्मनी व जपान या देशामध्यें अगदीं कमींतकमी ठेवण्यांत आला. देशांतलें सर्व भांडवल देशांतच ठेवून परदेशांतीलही भांडवल आणण्यांत आलें. शस्त्रास्त्रकारखान्यांची खूप वाढ करण्यांत येऊन एकंदर जनतेला युद्धकलेचें या राष्ट्रांनीं फार उत्कृष्ट शिक्षण दिलें. वरीलपैकीं प्रत्येक बाबतींत हिंदुस्थान मागसलेलें होतें. ब्रिटिशांच्या येथील राज्ययंत्राबद्दल येथें कोणालाही अभिमान नसून विद्वेष आहे. धनोत्पादनाची पद्धति अतिशय

मागसलेली असून ब्रिटिशांना येथें सुरक्षित बाजार मिळावा म्हणून येथील उद्योगधंद्यांची गळचेपी करण्यांत आली आहे. शस्त्रास्त्रकारखाने तर जवळजवळ नाहींतच. जनता निःशस्त्र व दुर्बल असून सैन्य सारें भाडोत्री आहे. आधुनिक शस्त्रास्त्रांची वाढ निदान युद्धाचे आरंभीं तरी येथें फारशी नव्हती. आठ कोटी हिंदी जनता अत्यंत मागसलेली असून अनियंत्रित अशा नादान संस्थानिकांच्या अमलांत आहे. पांच कोटी अस्पृश्यसमाज व एकंदरीनें दरिद्री असा कोट्यवधि हिंदुमुसलमान शेतकरी समाज हे सर्व युद्धाच्या अथवा धनोत्पादनविषयक कर्तबगारीच्या दृष्टीनें अत्यंत निरुपयोगी आहेत. गेल्या महायुद्धामध्यें जपान पुरेसें प्रबळ झालें नव्हतें आणि जर्मनीचा पाडाव करण्यास इंग्लंडला अमेरिकेची मदत वेळेवर आली म्हणून हिंदुस्थानची दुर्बलता जव्हाट्यावर आली नाहीं. पण यावेळीं परिस्थिति वेगळी आहे.

चालू युद्धाचें स्वरूप गेल्या युद्धाहून हिंदुस्थानच्या दृष्टीनें आरंभापासूनच वेगळें होतें. जपाननें १९३९ सालीं हिंदुस्थानशीं युद्ध सुरू केलें नाहीं खरें. पण कोणत्या क्षणीं जपान पूर्व आशियांतील ब्रिटिश साम्राज्यावर हल्ला करील याचा नेम नव्हता. १९१४–१८ चें महायुद्ध जर्मन कैसरनें हिंदुस्थानसाठीं सुरू केलें. पण हिंदुस्थानपासून तो अतिशय दूर असल्यामुळें हिंदुस्थानपर्यंत त्याचे हात अखेर कधींच पोंचले नाहींत. यावेळीं हिटलरची तयारी विशेष जारी होती. त्याचाही डोळा हिंदुस्तानवर होताच. पण त्याहीपेक्षां जपानचें भय हिंदुस्थानला विशेष प्रखर होतें. या दोन प्रचंड शक्तींचा दोहो बाजूंनीं हल्ला होईल असा संभव युद्धाचे आरंभापासून दिसत होता. युरोपीय राष्ट्रें व इंग्लंड यांची आधींच थोडी असलेली शक्ति हिंदुस्तानच्या रक्षणास फारशी उपयोगी पडणार नाहीं असें प्रथमपासूनच दिसत होतें. म्हणून चालू महायुद्धात हिंदुस्थान हेंच रणांगणाचें केंद्र होईल आणि त्या दृष्टीनें पाहातां हिंदुस्थानचें हल्लींचें राज्ययंत्र व समाजयंत्र निरुपयोगी इतकेंच नव्हे तर लढतांना लोढण्यासारखें अडथळा करणारें होईल ही गोष्ट युद्धाच्या आरंभींच विचारवंतांनीं ध्यानांत आणली पाहिजे होती. साम्राज्यशाही पिळणूक करण्यासाठीं ४० कोटि जनता ज्या राज्यकर्त्यांनीं दुर्बल, नादान व मागसलेली ठेवली ते राज्यकर्ते आणि त्यांचें युद्धयंत्र हें फॅसिझम्‌विरोधी युद्धांत टिकणें अवघड दिसत होतें. युद्ध ही भांडवलदारांना नफ्याची आणि अधिकाऱ्यांना

लांचलुचपतीची व बड्या पगाराची संधि आहे हा अनुभव प्रत्यक्षपणें गेलीं तीन वर्षें येत आहे. चाळीस कोटी जनता युद्धाबद्दल अनुत्साही आहे, तिच्यांत उत्साह भरतां आल्यावांचून फॅसिझम्‌विरोधासाठीं संघटणा करणें अशक्यच होतें. हल्लींच्या राज्ययंत्राशीं सहकार्य करून लठ्ठ पगार, लांचलुचपत व भांडवलशाहीनफा याचीच भर होणार होती. त्यानें जनतेला हुरूप येणारा नव्हता व राज्ययंत्र अधिक कार्यक्षम होण्याची मुळींच आशा नव्हती. म्हणून हल्लींच्या राज्ययंत्राशीं सहकार्य न करतां जनतेला हें युद्ध आपलें आहे व तें आपण लढलें पाहिजे असें वाटूं लागण्याइतकी भावनाक्रान्ति करण्यासाठीं कॉंग्रेसनें मध्य सत्तेचा अंश मागितला.

## ही अडवणूक नव्हे

ही मागणी अडवणुकीची होती, हें म्हणणें अगदीं चुकीचें आहे. इंग्लंडांतील मजूर पुढारी बेव्हिन व ॲटली यांनीं मंत्रिमंडळांत शिरून चेंबर्लेनशीं सहकार्य करण्याचें नाकारलें. पण त्यांचें तें करणें अडवणुकीचें होतें असें कोणींही म्हटलें नाहीं. ‘चेंबर्लेन हा हिटलरविरोधी लढा लढणार नाहीं अशी आमची खात्री असल्यामुळें आम्ही त्याच्या मंत्रिमंडळांत जाऊं शकत नाहीं’ असें बेव्हिन व ॲटली यांनीं चेंबर्लेनला तोंडावर सांगितलें. पुढें १० मे १९४० या दिवशी जर्मनीनें हॉलंडवर स्वारी केली तेव्हां चेंबर्लेन घाबरला. ॲटली व बेव्हिन आपल्या मंत्रीमंडळांत येत नाहींत असें पाहून, पार्लमेंटांत त्याला घसघशीत बहुमत असताही त्यानें पंतप्रधानकीचा राजीनामा दिला. त्याचा एकवेळचा कट्टर प्रतिस्पर्धी चर्चिल याच्या हातीं पंतप्रधानकीची सूत्रें दिलीं व ॲटली आणि बेव्हिन यांचा मंत्रिमंडळांत येण्याचा रस्ता त्यानें मोकळा केला. हिंदुस्थानांत ही गोष्ट घडूं शकली नाहीं. अप्रातिनिधिक व बेजबाबदार अशी परकी सत्ता फॅसिझम्‌विरोधी लढ्यास जनतेला उत्साहित करूं शकणार नाहीं म्हणून या सत्तेशीं आम्ही सहकार्य करणार नाहीं असें कॉंग्रेसचें म्हणणें होतें. पण चेंबर्लेननें आपल्यामागें पार्लमेंटांत बहुमत असतांही शहाणपणाचा अवलंब करून पंतप्रधानकी सोडली व युद्धकार्यास मजूरपक्षाचें सहकार्य मिळविलें, त्याप्रमाणें येथल्या सरकारनें केलें नाहीं. हिंदुस्थानांतील लाचार व खुशामती मुत्सद्यांना हाताशीं धरून कॉंग्रेससारख्या सर्व राष्ट्राच्या अंगीं सामर्थ्य उत्पन्न करू शकणाऱ्या एकचएक अशा

संस्थेची मागणी सरकारनें झिडकारली. ज्या परिस्थितींत कॉंग्रेसनें युद्धसहकार्य करण्याचें कबूल केलें होतें ती परिस्थिति परिणामकारक युद्धसहकार्य होण्यास कमींतकमी आवश्य होती. पण सरकारनें ती मागणी लाथाडली.

ज्या विशिष्ट परिस्थितींतच युद्धसहकार्य परिणामकारक होणें शक्य होईल अशी परिस्थिति कॉंग्रेसनें मागितली. पण साम्राज्य बुडेल या भीतीनें सरकारनें ती दिली नाहीं. कॉंग्रेसनें प्रामाणिकपणें सहकार्याचा पुढें केलेला हात सरकारनें लाथाडला. युद्धाच्या आरंभीची ही परिस्थिति होती. त्यानंतरच्या काळांत कॉंग्रेसनें आपली भूमिका सरकारला पटविण्याचे कोणकोणते प्रयत्न केले. सरकारनें कॉंग्रेसच्या मागणीची वेळोवेळीं कशी वासलात लाविली, कोणते घाणेरडे डांवपेच केले आणि अखेर सर्व प्रकरण अतिशय अनिष्ट अशा प्रकारें निकरावर कसें आलें याचा विचार आतां यथाक्रम करूं.

## वाटाघाटी, घासाघीस ... ... ... [ ४ ]

१४ सप्टेंबरच्या कॉंग्रेस वर्किंग कमिटीच्या ठरावांत सरकारशीं समेटाच्या वाटाघाटी करण्याचा मार्ग खुला ठेवला होता. फॅसिझम्विरोधी झगड्यांत हिंदी जनतेला सामील करण्याची आपली तयारी कॉंग्रेस वर्किंग कमिटीनें अगदीं निःसंदिग्धपणें दाखविली होती. पण हें युद्ध फॅसिझमच्या नाशासाठीं आणि राष्ट्रीय स्वातंत्र्य व लोकशाही यांच्या प्रस्थापनेसाठीं आहे हें लोकांना पटेल अशा प्रकारें हिंदुस्थानांतील मध्यसत्तेचा महत्त्वाचा अंश जनतेला देवून ब्रिटननें आपल्या प्रामाणिकपणाबद्दल खात्री पटवावी अशी मागणी केली होती. ब्रिटिश साम्राज्यशाही हीच जगांतील फार मोठी साम्राज्यशाही असून हिंदुस्थानचें स्वातंत्र्य तत्त्वतः मान्य करणें आणि प्रत्यक्ष व्यवहारांत ताबडतोब त्याची बजावणी करणें-ही ब्रिटनच्या युद्धहेतूंची कसोटी आहे असें सांगण्यांत आलें होतें. हिंदुस्थानची राज्यघटना ही जनतेलाच

ठरवूं देण्यांत यावी अशी मागणी करण्यांत आली होती. असहकाराचा निर्णय ठरविण्यांत आला नव्हता, तर ब्रिटन खरोखरच स्वातंत्र्य आणि लोकशाही यासाठीं लढत आहे अशी खात्री झाल्यास युद्धामध्यें ब्रिटनच्या बाजूनें लढण्याची तयारी काँग्रेसनें दाखविली होती या सर्व गोष्टी येथें प्रामुख्यानें नमूद करून ठेवल्या पाहिजेत. गांधीजी व काँग्रेस वर्किंग कमिटी यांचा युद्धसहकार्यांचे बाबतींत प्रथम पासूनच मतभेद होता. युद्ध सुरूं होतांच गांधींची व्हाइसरॉयनीं मुलाखत घेतली त्या-संबंधानें गांधींनीं काढलेल्या पत्रकांत त्यांनीं आपली भूमिका स्पष्ट केली होती. इंग्लंड व फ्रान्स यांच्याबद्दल गांधीजींना सहानुभूति वाटत होती. पण अहिंसा तत्त्वाचा अंमल आंतरराष्ट्रीय युद्धांतही करावा असें त्यांचें मत होतें. ही अहिंसा यावेळीं अत्यंत निर्बल ठरत आहे हेंही त्यांना दिसलें. पण "या प्रयत्नांत मी अखेर अपयशी ठरलों तरी श्रद्धा टिकवून धरून अहिंसेसाठीं मीं झगडलें पाहिजे" असें ते ५ सप्टेंबर रोजीच्या पत्रकांत लिहितात.

## गांधींचें हिटलरला पत्र

याच पत्रकांत ता. २३ जुलै रोजीं हिटलरला त्यांनीं पाठविलेलें पत्रही गांधींनीं प्रसिद्ध केलें आहे. त्या पत्रांत गांधीजी हिटलरला लिहितात—

"मानवजातीच्या कल्याणाच्या दृष्टीनें मीं तुम्हांला व्यक्तिशः पत्र लिहावें असें माझे मित्र मला बरेच दिवसापासून सांगत आहेत. असा प्रयत्न मीं करणें हा उद्धटपणा दिसेल असें वाटून मी पत्र लिहिण्याचें नाकारीत होतों. पण माझ्या पत्राचा परिणाम काय होईल यासंबंधीं तर्कवितर्क न करतां कांहींही परिणाम होवो मीं तुम्हांला विनंति करून पहावी असा संदेश मला कोणीकडून तरी तीव्रतेनें येतो आहे. अखिल मानवजात परत जंगली अवस्थेप्रत ज्यामुळें जाईल असें युद्ध मानव-जातीवर येऊं घातलें आहे. तें टाळण्याची शक्ति या जगांत जर कोणा एका माणसांत असेल तर ते तुम्ही आहां ही गोष्ट स्पष्ट आहे. तुम्ही जें ध्येय साध्य करण्यासाठीं उद्युक्त झालां आहां तें कितीही उच्च असो, या भयानक युद्धाचा धोका पत्करण्याइतकी प्रचंड किंमत त्यासाठीं दिलीच पाहिजे काय ? सशस्त्र युद्धाची पद्धति जाणूनबुजून ज्यानें धिक्कारिली आहे व ज्याला त्याकामीं बरेंच यश आलें आहे अशा माझ्या विनंतीकडे आपण लक्ष द्याल काय ? निदान

हें पत्र आपणास लिहिण्यांत मीं चूक केली असेल तर आपण मला क्षमा कराल अशी मी अपेक्षा करतों."

## गांधीजी व कॉ. व. कमिटी यांमधील मतभेद

हिटलरला आपण केलेली ही विनंति जर्मन जनतेससुद्धा अखिल मानवजातीच्या कल्याणाच्या दृष्टीनें आपण केली होती असें गांधींनीं लिहिलें आहे. कॉँग्रेसची मागणी सरकारनें मान्य केल्यास हिंदुस्थाननें इंग्लंडच्या बाजूनें फॅसिझम्‌विरोधी शस्त्रयुद्धांत भाग घ्यावा असें कॉँग्रेसवर्किंग कमिटीचे अगदीं पहिल्यापासून स्पष्ट मत होतें आणि गांधीजींना ती गोष्ट मान्य नव्हती. हा मतभेद युद्धाच्या सुरवातीपासून स्पष्टपणें जगासमोर आलेला आहे. सरकारकडे कोणतीही मागणी न करतां सरकारला बिनशर्त साहाय्य द्यावें, पण तें केवळ अहिंसेच्या भूमिकेवरून व नैतिक स्वरूपाचें द्यावें असें गांधीजी म्हणत होते. उलट स्वातंत्र्य आणि लोकशाही यांच्या संस्थापनेसाठीं हें युद्ध आहे अशी ब्रिटननें कृतीनें खातरजमा केल्यास फॅसिझम्‌विरोधी सशस्त्र युद्धांत सशस्त्रपणें भाग घेण्याची कॉँग्रेस वर्किंग कमिटीची इच्छा होती. कॉँग्रेस वर्किंग कमिटीच्या ठरावा-संबंधानें लिहितांना गांधीजी लिहितात,

"ब्रिटनला जो कांहीं पाठिंबा द्यावयाचा तो बिनशर्त द्यावा असें म्हणणारा मी एकटाच होतों हें सांगण्यास मला वाईट वाटतें. हा पाठिंबा फक्त अहिंसेच्या भूमिकेवरूनच देणें शक्य होतें. पण वर्किंग कमिटीवर फार प्रचंड जबाबदारी होती. शुद्ध अहिंसेची भूमिका तिला घेणें शक्य झालें नाहीं. विरोधी पक्ष अडचणींत असतां त्या परिस्थितीचा फायदा घेऊं नये असें वाटण्याइतकी अहिंसात्मक भावनेची शक्ति राष्ट्रांत नाहीं असें वर्किंग कमिटीला वाटलें. पण आपली मागणी करतांना ब्रिटिशाबद्दल कमिटीनें अतिशय ममत्व व आस्था दाखविली आहे. वर्किंग कमिटीचा जाहिरनामा पं. नेहरूंनीं लिहिला आहे. नेहरू हे कलावंत आहेत. कोणत्याही स्वरूपाच्या साम्राज्यशाहीचे ते कट्टर विरोधक असले तरी ते ब्रिटिशांचे मित्र आहेत. खरोखर, रहाणी आणि विचारसरणी या दृष्टीनें नेहरू हे हिंदी आहेत त्यापेक्षा अधिक ब्रिटिश आहेत. जगांत कोठेंही अन्याय झालेला दिसला तरी त्यांना चीड येते. या दृष्टीनें पाहातां ते अखिल मानवजातीवर प्रेम करणारे

आहेत हें लक्षात घ्यावें लागतें. ते कळकळीचे राष्ट्रवादी असले तरी त्यांच्या राष्ट्रवादाला सुंदर अशा जागतिक प्रेमामुळें सौंदर्य आलें आहे. म्हणून काँग्रेसचा जाहिरनामा केवळ हिंदी लोकासाठींच काढलेला नाहीं; केवळ ब्रिटिश लोकांनाच उद्देशून काढलेला नाहीं हिंदुस्थानप्रमाणेंच पिळल्या जाणाऱ्या इतर राष्ट्रांना व जगांतील बाकीच्याही सर्व राष्ट्रांना उद्देशून हा जाहिरनामा काढण्यांत आलेला आहे. केवळ आपल्या स्वातंत्र्यासाठींच नव्हे तर सर्व जगांतील पिळल्या गेलेल्या जनतेच्या स्वातंत्र्यासाठींही विचार करण्यास वर्किंग कमिटीमार्फत हिंदी जनतेला नेहरूंनीं भाग पाडलें आहे."

हिंदी जनता केवळ आपल्या स्वातंत्र्याचाच विचार करते आणि ब्रिटिशांच्या अडचणींचा गैरफायदा घेण्याची प्रवृत्ति जनतेंत आहे ही गोष्ट गांधींनीं येथें प्रांजळपणें सांगितली असून आंतरराष्ट्रीय दृष्टिकोण स्वीकारण्यास नेहरू व काँग्रेस वर्किंग कमिटी यांनीं हिंदी जनतेस भाग पाडलें ही गोष्ट गांधींनीं येथें स्पष्ट केली आहे. त्यांना स्वतःला सशस्त्र युद्धाची कल्पना संमत नव्हती तरी सशस्त्र युद्धांत भाग घेण्याच्या काँग्रेस वर्किंग कमिटीच्या घोषणेस गांधींनीं स्पष्ट संमति दिली आणि अखिल राष्ट्रानें या घोषणेस पाठिंबा द्यावा, ब्रिटिशांनीं काँग्रेसची मागणी मान्य करावी अशी विनंति त्यांनीं केली आहे. तथापि अखेर काँग्रेस जें सहकार्य करील त्यांत शस्त्रधारणाची भूमिका काँग्रेस घेणार नाहीं हा आपला आशावाद व हटवाद गांधींनीं कायम ठेवला होताच.

## काँग्रेसची मागणी ही राष्ट्राची मागणी

वर्किंग कमिटीच्या या जाहिरनाम्यासंबंधानें ब्रिटिश पार्लमेंटांत त्यावेळचे लॉर्ड झेटलंड यांनीं काँग्रेसची मागणी संदिग्ध आहे असें मत व्यक्त केलें. हॉऊस ऑफ लॉर्ड्समध्यें भाषण करतांना लॉर्ड झेटलंड यांनीं 'काँग्रेस मंत्रिमंडळांनीं प्रांतिक कारभारांत यश मिळविल्याबद्दल' त्यांचा गौरव केला. काँग्रेसनें युद्धसहकार्यासाठीं जी परिस्थिति आवश्यक आहे असें म्हटलें ती मागण्यांत काँग्रेसनें योग्य वेळ निवडली नाहीं आणि या युद्धाच्या वेळी काँग्रेसनें आपली प्रांतिक मंत्रिमंडळें रद्द केलीं तर तो अनर्थ होईल असेंही मत झेटलंड यांनीं व्यक्त केलें. १४ सप्टेंबरचा जाहिरनामा काढल्यानंतर नेहरू, आझाद व पटेल यांची एक युद्धउपसमिति काँग्रेसनें नेमिली. तिनें यापुढें काँग्रेसचें युद्धविषयक धोरण वेळोवेळीं तपासावें असें ठरविण्यांत आलें. अखेर सरकारशीं असहकार करण्याचें ठरल्यास कॉं. मंत्रिमंडळें

रद्द करण्यांत येतील असाही इशारा ब्रिटिश मंत्रिमंडळाला व कॉंग्रेस मंत्रिमंडळांना देऊन ठेवण्यांत आला होता. त्यास उद्देशून झेटलंड यांचे वरील उद्‌गार होते. झेटलंड यांच्या भाषणांत ‘ हिंदुस्थानांत अनेक परस्परविरोधी पंथ आहेत ’ असा उल्लेख असून कॉंग्रेस हा त्यांतला एक पक्ष आहे असें सुचविण्यांत आलें होतें. झेटलंड यांच्या युक्तिवादास उत्तर देतांना गांधींनीं कॉंग्रेसची मागणी ही राष्ट्राची मागणी आहे असें सरकारला बजावलें. गांधीजी लिहितात—

“ कोणाचाही उपमर्द करूं न इच्छितां कॉंग्रेससंबंधानें मी असें सांगतों कीं ती सर्व हितसंबंधांचा समावेश करणारी संस्था आहे. गेलीं ५० वर्षें हिंदुस्थानांतील अखिल जनतेची प्रतिनिधि तीच ठरली आहे. तिला कोणीही प्रतिस्पर्धी उत्पन्न झालेला नाहीं. मुसलमान किंवा संस्थानी जनता यांच्याशीं विरोधी असे कोणतेही हितसंबंध कॉंग्रेसमध्यें नाहींत. अशा या कॉंग्रेसनें ब्रिटिशांनीं आपली युद्धविषयक भूमिका स्पष्ट करावी अशी मागणी केली आहे. सर्वांच्या स्वातंत्र्यासाठीं जर ब्रिटन लढतें आहे तर हिंदुस्थानचें स्वातंत्र्यही त्यांमध्यें अंतर्भूत आहे असें ब्रिटिश मुत्सद्यांनीं जाहीर केलें पाहिजे. आमच्या स्वातंत्र्यांत कोणत्या गोष्टी अंतर्भूत व्हावयाच्या हें हिंदी लोकांनींच ठरविलें पाहिजे. ब्रिटन जीवन-मरणाच्या झगड्यांत गुंतलें असतां ब्रिटिशांनीं युद्धहेतु जाहीर करावे अशी कॉंग्रेसनें मागणी केली याबद्दल लॉर्ड झेटलंड तक्रार करतात. पण तें गैर आहे. कॉंग्रेसनें अशी मागणी करण्यांत चमत्कारिक अथवा आपल्या स्वाभिमानास न साजेसें कांहींही केलेलें नाहीं. स्वतंत्र हिंदुस्थानची मदत हीच ब्रिटनला उपयुक्त ठरेल. शिवाय युद्धाच्या शेवटीं ब्रिटनइतकेंच राष्ट्रीय स्वातंत्र्य हिंदुस्तानला मिळेल असें जनतेला आपण सांगूं शकतों काय, हें कळून घेण्याचा कॉंग्रेसला हक्क आहे. ब्रिटिशांचा एक मित्र या नात्यानें मी त्यानां विनंति करतों कीं त्यांनीं आपली जुनी साम्राज्य-वादी भाषा सोडून द्यावी आणि साम्राज्याच्या गुलामगिरींत जीं राष्ट्रें आज अडकविण्यांत आलीं आहेत. त्यांच्यासाठीं इतिहासाचे एक नवें प्रकरण सुरूं करावें.”

[ २८ सप्टेंबर १९३९ ]

झेटलंड यांच्या भाषणास पं. नेहरूंनीं उत्तर देऊन कॉंग्रेसची भूमिका पुढीलप्रमाणें विशेष स्पष्ट केली. नेहरू म्हणतात, “ कॉंग्रेस वर्किंग कामिटी व पुढारी यांनीं एक गोष्ट पूर्णपणें स्पष्ट केली आहे कीं आम्ही इंग्लंडच्या अडचणीचा फायदा

घेऊन सौदा करूं इच्छीत नाहीं. पण जगाच्या व हिंदुस्थानच्या दृष्टीनें युद्धहेतु स्पष्ट होणें आवश्य आहे. इंग्लंडचे हेतु चांगले आहेत, इंग्लंड प्रामाणिक आहे, अशी लोकांची खात्री झाली पाहिजे, ही मागणी योग्य होती. असें असतां भलत्याच वेळीं ही मागणी करण्यांत आली अशी लॉर्ड झेटलंड तक्रार करतात याचें आश्चर्य वाटतें. प्रश्न केवळ हिंदुस्थानचा नाहीं, जगाचा आहे. मानवी जगाच्या भवितव्याबद्दल ज्यांना आशा वाटते, जगांतील युद्धांचीं कारणें आणि मानवजातीची होणारी पिळणूक पूर्णपणें नष्ट करण्याचा ज्यांनीं निर्धार केला आहे अशांचा हा प्रश्न आहे. म्हणून केवळ हिंदुस्थानच्याच वतीनें नव्हे तर जगांतील असंख्य जनतेच्या दृष्टीनें कॉंग्रेसनें आपली मागणी केली. निराश झालेल्या जगांतील मानवांच्या अंतःकरणांत आशेचा थोडा प्रकाश उत्पन्न करण्यासाठीं ही मागणी करण्यांत आली आहे. मुख्यतः हिंदुस्थानसंबंधीं आम्हांला काळजी वाटणें अपरिहार्यच आहे. म्हणून हिंदुस्थानला तुमचे युद्धहेतु तुम्ही कसे लावून दाखविणार याचा खुलासा आम्हीं मागितला. पण युरोप, चीन वगैरे राष्ट्रांनाही आपले युद्धहेतु तुम्ही कसे लागू करणार हें आम्हांला समजलें पाहिजे. आम्ही फॅसिझम् आणि त्याचें सर्व कर्तृत्व यांचा पूर्ण निषेध केलेला आहे."

कॉंग्रेसची मागणी संदिग्ध आहे या झेटलंड यांच्या आरोपाचा नेहरूंनीं स्पष्ट इन्कार केला. ब्रिटिश सरकारचा दृष्टिकोणच संकुचित आहे, वीस वर्षांपूर्वीची भाषा झेटलंड बोलत आहेत, जगाचें रूप गेल्या वीस वर्षांत पूर्ण बदललें असून भूतकाळ ठार मेला आहे. नव्या विचारांचा लोंढा कोणीही थांबवूं शकणार नाहीं. "आपण शहाणे असूं तर या लोंढ्यावर आपण नियंत्रण ठेवूं शकूं व शक्य तर त्याला योग्य दिशेने नेऊं शकूं, एवढेंच आपणास करतां येईल" असा इशारा पं. नेहरूंनीं दिला.

युद्ध सुरू होतांच निरनिराळ्या बावन्न पुढाऱ्यांच्या भेटी व्हॉइसरॉयनीं घेतल्या होत्या. त्यांतच मागें उल्लेखिल्याप्रमाणें त्यांनीं गांधींची प्रथम भेट घेतली. पुढें ऑक्टोबरच्या ३ तारखेस कॉंग्रेसचे त्यावेळचे अध्यक्ष राजेन्द्रप्रसाद व पं. नेहरू यांचीही व्हॉइसरॉयनी भेट घेतली. ४ ऑक्टोबर रोजीं सरदार पटेल हे व्हाइसरॉयना भेटले. ऑक्टोबर ९ व १० तारखेस ऑल इंडिया

काँ. कमिटिची बैठक वर्ध्यास भरून हिंदुस्थानच्या संमतीविना हिंदुस्थानला युद्धांत गोवण्यांत आलें, याबद्दल सरकारचा निषेध करण्यांत आला व काँ. वर्किंग कमिटीच्या जाहिरनाम्यास पाठिंबा देण्यांत आला. ११ ऑक्टोबर रोजीं अखिल भारतीय संस्थानी प्रजापरिषदेच्या स्थायी समितीची बैठक झाली त्या बैठकींत युद्धकाळांत जबाबदार राज्यपद्धति मिळेल तरच संस्थानी जनता युद्धांत सहकार्य करील असें जाहीर करण्यांत आलें.

## मतामतांचा गलबला

यावेळेपर्यंत निरनिराळ्या पक्षांनीं आपल्या युद्धविषयक भूमिका जाहीर केल्या होत्या. लोकमताच्या पाठिंब्याच्या दृष्टीनें काँग्रेसखेरीज मुस्लिम लीग व हिंदुसभा यांचींच मतें विशेष महत्त्वाची. पण यावेळीं मतप्रदर्शनाचे जणूं कांहीं वादळच माजलें. शब्दशः शेंकडों मतपंथ व पक्ष या ना त्या प्रकारें प्रांतोप्रांतीं व गावोगावीं आपापलीं युद्धविषयक धोरणें जाहीर करीत होते. अखिल राष्ट्रीय स्वरूपाच्या संस्थांपासून लहान लहान जातीय संस्थांपर्यंत सर्वांनीं आपली युद्ध-विषयक धोरणें जाहीर केलीं. हिंदुस्थान देश एकजुटीचा देश नसून अनेक व परस्परोविरोधी हितसंबधांचा गळाठा आहे ही ब्रिटिशांनीं अनेकवार जगाला सांगित-लेली गोष्ट त्यांना या वेळीं जास्तींत जास्त मोठ्यानें सांगता आली.

पण तें कसेंही असलें तरी काँग्रेसची भूमिका ही जास्तींत जास्त निर्दोष आहे असें म्हणण्याला सबळ कारणें होतीं. यासंबंधानें दोन मतांचे नमुने मांडले असतां पुरे होतील. एक मत हिंदुस्थानांतील लिबरल उर्फ नेमस्त पक्षाचें आणि दुसरें मत इंग्लंडांतील लिबरल पक्षाचें मुखपत्र जें ‘ मँचेस्टर गार्डियन ’ दैनिक त्याचें. हिंदुस्थानांतील लिबरल अथवा नेमस्त यांचे मागें लोकमताचें पाठबळ नाहीं खरें. पण तें निर्भेळ राष्ट्रवादी व लोकशाहीवादी आहेत. काँग्रेसच्या जुन्या पिढीचे तेच पुढारी होते. या दृष्टीनें त्यांच्या मतास हिंदुस्थानांत व जगांत विशेष मान दिला जातो. ता. १० सप्टेंबर १९४० रोजींच्या आपल्या ठरावांत लिबरल पक्षानें ब्रिटिशांच्या या अडचणीच्या काळीं सौद्याची भाषा वापरूं नये असें म्हणून त्यानंतर पुढीलप्रमाणें मागणी केली होती. “ ब्रिटिशांना या प्रसंगीं करावयाची मदत बिनशर्त व उत्साहाची असावी असें लिबरल पक्षाच्या वर्किंग कमिटीस वाटते. तथापि ही कमिटी ब्रिटिश सरकार व

हिंदुस्थान सरकार यांना विनंति करते कीं हिंदी जनता व सरकार यांच्यामध्यें स्नेहभाव राहील आणि लोकांचें पूर्ण सहकार्य युद्धकार्यांत सरकारला मिळेल अशा प्रकारें जनतेची मनोभूमिका निर्माण करण्यासाठीं सरकारनें लोकांच्या राजकीय मागणीचें समाधान करावें. विशेषतः हल्लींचें मध्यसरकार बदलून त्या जागीं लोकमताला जबाबदार असें मध्यसरकार स्थापन करावें. तसेंच हल्लींचें लष्करी धोरण बदलून कार्यक्षम असें हिंदी संरक्षणसैन्य निर्माण करावें. म्हणजे हिंदुस्थान परिणामकारक रीतीनें परचक्रापासून आपलें रक्षण करूं शकेल." काँग्रेसच्या १४ सप्टेंबरच्या ठरावांत स्पष्टपणें न केलेलीं जबाबदार मध्यसरकारची मागणी ही लिबरलांच्या या ठरावांत करण्यांत आलेली असून हिंदी सैन्य हें जें हल्लीं ब्रिटिश संरक्षण-खात्याचा एक भाग आहे त्यांतून काढून तें पृथक सैन्य करावें असें लिबरलांनीं म्हटलें आहे.

९ सप्टेंबरचा 'मँचेस्टर गार्डियन' म्हणतो "ब्रिटन ज्या युरोपीय युद्धांत सांपडलें आहे त्या युरोपीयन युद्धासंबंधानें हिंदुस्थानची जी भूमिका आहे ती इंग्लंडच्या भूमिकेपेक्षां स्वाभाविकच अधिक गुंतागुंतीची आहे. अनेक हिंदी लोकांनीं आणि बहुतेक सर्व संस्थानिकांनीं ब्रिटनला सर्व प्रकारची मदत स्वखुषीनें, उत्साहानें व उदारपणें देण्याचें कबूल केलें आहे. ब्रिटिश हिंदुस्थानांतील अनेक भागांतून मुख्यतः पंजाबांतून बिनशर्त सहकार्याची तयारी दाखविण्यांत आली आहे. सर्व पक्षांच्या पुढाऱ्यांनीं आपली वैयक्तिक मतें जाहीर केलीं आहेत. पण हिंदुस्थानचा व ब्रिटनचा जो संबंध आहे त्या संबंधामुळेंच हिंदुस्थान या युद्धांत गोंवलें गेलें असून जे या संबंधास विरोधी आहेत ते ब्रिटिशांना बरेचसें हृदय-संशोधन झाल्यावांचून मदत करूं शकतील असें वाटत नाहीं. काँग्रेसनें साम्राज्यशाही युद्धासंबंधानें आजवर ज्या घोषणा केल्या त्या बराच बोभाटा केल्यावांचून काँग्रेस गिळून टाकील असें मानता येणार नाहीं. आमच्याबद्दल अमेरिकेप्रमाणें हिंदुस्थानची सहानुभूति दृढ व खोल आहे. पण हिंदुस्थानच्या तक्रारी कायम आहेत. काँग्रेसचे आमच्या विरुद्ध कांहीं आक्षेप आहेत म्हणूनच केवळ नव्हे तर आमच्या कल्याणासाठींही हिंदुस्थानला आम्हीं पूर्ण समतेनें वागविलें पाहिजे. ब्रिटन आणि फ्रान्स यांचा पराभव झाला असता हिंदुस्थानचें अतिशय नुकसान होईल ही गोष्ट हिंदुस्थानांत सर्वत्र मान्य करण्यांत आली आहे. पण

आतां इंग्लंडच्या विजयापासून हिंदुस्थानचा फायदा होईल हेंही आपण हिंदी लोकांना पटविलें पाहिजे."

सप्रू व आंबेडकर यांनीं बिनशर्त सहकार्याचें धोरण जाहीर केलें. मुस्लीम लीगचे पुढारी बॅ. जिना यांनीं ता. ४ सप्टेंबर रोजीं व्हाइसरॉयची मुलाखत घेतल्यानंतर ता. ७ रोजीं जें पत्रक प्रसिद्ध केलें त्यांत पोलंड, फ्रान्स, ब्रिटन, यांबद्दल मामुली सहानुभूति व्यक्त करण्यांत आली होती. पण, जीना म्हणतात, "ब्रिटनला जर युद्ध यशस्वितेनें लढायचें असेल तर हिंदुस्थानांतील मुसलमानांना त्यांची अधिकृत संघटना जी मुस्लीम लीग तिच्या मार्फत सरकारनें विश्वासांत घेऊन युद्ध सुरूं झाल्यानंतर व्हॉइसरॉयनीं केलेल्या आपल्या भाषणांत जीं तत्त्वें जाहीर केलीं तीं हिंदी मुसलमानास लागू होतील अशा प्रकारें हिंदुस्थान सरकारनें आपलें धोरण आंखावें. मुसलमानांना न्याय आणि सौजन्य हवें आहे." हिंदुसभेनें, 'सगळेच स्वार्थी असतात, तसेंच आपणही स्वार्थी असावें, सैन्यांत लष्करभरती करावी' वगैरे आशयाचा बिनशर्त सहकार्याचा ठराव मंजूर केला.

## काँग्रेसच्या धोरणास विरोध सुरू

३ सप्टेंबर रोजीं युद्ध सुरूं झाल्यावर त्याच दिवशी रात्रीं व्हॉईसरॉयनीं आकाशवाणींतून भाषण करून हिंदुस्थान युद्धांत सामील झाल्याचें जाहीर केलें. त्यापूर्वी ता. १ सप्टेंबर रोजींच ब्रि. पार्लमेंटांत हिंदुस्थानचा राज्यघटना कायदा दुरुस्त करण्यांत येऊन प्रांतिक सरकारवर व्हॉइसरॉयना जवळ जवळ सर्वाधिकार चालविण्याची मुभा देण्यांत आली. त्याप्रमाणें व्हॉइसरॉयनीं भारत संरक्षण कायद्याचा वटहुकूम आणि त्याखालचे नियमही जाहीर केले. पुढें हा वटहुकुम मध्य कायदेमंडळांत मंजूर झाला. ता. ११ रोजीं व्हॉइसरॉयनीं बादशहांचा हिंदुस्थानास आलेला संदेश मध्यकायदेमंडळाच्या संयुक्त अधिवेशनापुढें वाचून दाखविला. आणि फेडरेशनच्या योजनेसंबंधीचे सर्व प्रयत्न थांबविल्याचें जाहीर केलें. ता. १८ सप्टेंबर रोजीं मुस्लिम लीग वर्किंग कमिटीचें अधिवेशन दिल्लीस भरून जो ठराव मंजूर झाला तेथपासून काँग्रेसच्या युद्धविषयक धोरणाशीं देशांतील इतर पक्षांचा व सरकारचा झगडा सुरू झाला. काँग्रेस वर्किंग कमिटीनें १४ सप्टेंबरचा जो जाहिरनामा काढला तो मुस्लिम लीगलाही संमत असा काढावा यासाठीं आधीं प्रयत्न करण्यांत आला होता. काँग्रेसचे

अध्यक्ष राजेंद्र प्रसाद यांनीं, 'जिनांनीं कॉंग्रेस वर्किंग कमिटीच्या अधिवेशनांत होणाऱ्या चर्चेचे वेळीं हजर असावें' म्हणून त्यांना तारेनें विनंति केली. उलट जिनांनीं "मी येऊं शकत नाहीं, तुम्हींच वाटल्यास दिल्लीस या" असें त्यास कळविलें. "फक्त राजेंद्रबाबू व जीना या दोघांच्याच भेटीचा कांहीं उपयोग नसून सर्व कॉंग्रेस वर्किंग कमिटीच्या चर्चेचे वेळीं जिनांनीं हजर असावें आणि या आणीबाणीच्या परिस्थितीसंबंधानें कॉंग्रेसनें जो निर्णय घ्यायचा त्या निर्णयास योग्य स्वरूप आणण्याचें कामीं जीनांनीं मदत करणें जरूर आहे" असें जीनांना कळविण्यांत आलें. पण जीना आले नाहींत. नंतर ता. १८ सप्टेंबर रोजीं मुस्लिम लीग वर्किंग कमिटीचा ठराव जो मंजूर झाला त्यावरून जीना व मुस्लिम लीग यांचे ठिकाणीं कॉंग्रेसबद्दल अतिशय खोल अढी आहे असें स्पष्ट झालें. "कॉंग्रेस-मंत्र्यांच्या अमदानींत ७ प्रांतांत कॉंग्रेसमंत्र्यांनीं मुसलमानावर जुलूम केला आणि गव्हर्नरांनीं अल्पसंख्यांचें रक्षण करण्याची आपली जबाबदारी मुळींच पाळली नाहीं" असा आरोप लीगकडून करण्यांत आला. फेडरेशनची योजना रहित केल्याबद्दल सरकारचे आभार मानून भावी राज्यघटनेसंबंधानें मुस्लीम लीग वर्किंग कमिटी आपल्या ठरावांत म्हणते, "मुस्लीम लीग वर्किंग कमिटी हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार करतेच; तथापि कमिटी ब्रि. सरकारला आग्रहपूर्वक सांगते कीं हिंदुस्थानच्या राज्यघटनात्मक प्रगतीसंबंधानें मुस्लीम लीगच्या संमतीवांचून व पसंतीवांचून कोणतेंही पाऊल टाकण्यांत येऊं नये. आणि अशा संमतीवांचून व पसंतीवांचून ब्रि. सरकार व पार्लमेंट यांनीं कोणताही राज्यघटना कायद्याचा मसुदा तयार करूं नये अथवा मान्य करू नये." ब्रिटिशाशीं युद्धसहकार्य करण्यासंबंधानें आपलें धोरण काय तें सांगतांना लीग कमिटी म्हणते, "ब्रि. सरकारला जगावर कोसळलेल्या आजच्या संकटकाळीं जर मुसल-मानांचें परिणामकारक व सन्मान्य सहकार्य हवें असेल आणि हें युद्ध खरोखर जिंकायचें असेल तर ब्रि. सरकारनें मुसलमानांत निर्धास्तपणा व समाधान यांची भावना निर्माण केली पाहिजे. आणि मुसलमानांच्या तर्फे बोलूं शकणारी एकटीच संघटना अशी जी मुस्लिम लीग तिला सरकारनें विश्वासांत घेतलें पाहिजे."

मुस्लिम लीगनें कॉंग्रेसला विरोध सुरू केला त्यांत कांहीं विशेष नव्हतें. पण ता. २ ऑक्टोबर रोजीं व्ही. एन. चंदावरकर, विनायकराव सावरकर

न. चिं. केळकर, बी. आर. आंबेडकर, कावसजी जहांगिर व चिमणलाल सेटलवाड या विविध मतांच्या व पक्षांच्या पुढाऱ्यांनीं एक पत्रक काढून काँग्रेसवर जो कडाडून हल्ला चढविला त्यानें मात्र सर्व हिंदुस्थान चकित झालें. या पत्रकांवर केळकरांनीं सही केली याबद्दल केळकरांच्या अनेक चाहात्यांनीं व अनुयायांनीं आश्चर्य व खेद व्यक्त केला. व्हाइसरॉयला उद्देशून हें पत्रक काढलें होतें. काँग्रेस व मुस्लीम लीग यांचे पुढारी अनुक्रमें गांधी व जीना यांची व्हॉइसरॉयनीं भेट घेतली तेव्हां त्यांच्याशीं व्हॉइसरॉयसाहेब कांहींतरी समेट करतील आणि त्यामुळें देशावर महान् अनर्थ कोसळेल अशी भीति या पत्रकांत या सह्या करणाऱ्यांनीं व्यक्त केली आणि काँग्रेस ही राष्ट्राची प्रतिनिधी नव्हे हें परोपरीनें व्हॉइसरॉयना पटविण्याचा प्रयत्न केला. काँग्रेस ही मुसलमानांची प्रतिनिधी नव्हे अशी तक्रार मुस्लीम लीग करतेच आहे आणि हिंदुमहासभा, अस्पृश्य, डेमोक्रॅटिक स्वराज्य-पक्ष, नेमस्तपक्ष, जमिनदार, मजूर, वगैरे सर्व काँग्रेसबाहेर असून ते काँग्रेसला मानीत नाहींत असें यांनीं व्हॉइसरॉयना या पत्रकांत कळविलें होतें. काँग्रेस राष्ट्राची प्रतिनिधि नाहीं हें सिद्ध करण्याकरितां यांनीं आकड्यांचा हिशेबही मांडून दाखविला. मुंबई इलाख्यांत काँग्रेस–उमेदवारांना प्रांतिक निवडणुकींत १४८३१८९ मतें पडलीं आणि बिगर काँग्रेस उमेदवारांना १०५३५०० मतें पडलीं; यांत काँग्रेसविरुद्ध पडलेली विशिष्ट संघांतील मतें मिळविल्यास काँग्रेसला बिगरकाँग्रेस मतदाराहून कमी मतें पडलीं, यावरून काँग्रेसच्या मागें देशांतील बहुमत नाहीं असें ' सिद्ध ' करण्यांत आलें होतें. यांत आपण एकट्या काँग्रेसशीं बिगरकाँग्रेस म्हणविल्या जाणाऱ्या अनेक पक्षांची तुलना करतों आहोंत आणि त्यांतील प्रत्येकापेक्षां काँग्रेसच्या मागें फारच फार मोठें बहुमत आहे हीं गोष्ट या सह्या करणारांनीं लपविली तरी ती कोणासही सहज दिसत होती. " १४ सप्टेंबरच्या काँग्रेस वर्किंग कमिटीच्या पत्रकांतील घोषणा ही गांधी, नेहरू व पटेल यांची नव्हे, कारण त्यांनीं बिनशर्त युद्धसहकार्यास मान्यता दिली आहे. काँग्रेसच्या जाहीरनाम्यांतील धोरण हें सुभासबाबूंच्या फॉर्वर्ड ब्लॉकचे धोरण आहे " असेंही धाडसी विधान करण्यास ह्या सह्या करणाऱ्या सप्तकानें कमी केले नाहीं. काँग्रेस मंत्रिमंडळानें आपल्या दोन वर्षांच्या कारकिर्दींत लोकशाहीचा नाश केला, फॅसिस्ट व नाझी पक्षाप्रमाणें इतर पक्षांना ठेचून काढ-ण्याचा प्रयत्न केला, अशा शब्दांत जीनांच्या सुरात सूर मिसळून या

सप्तकानें काँग्रेस मंत्रिमंडळाची निंदा केली होती व काँग्रेस आणि मुस्लिम लीग यांचीं मतें म्हणजेच अखिल देशाचीं मतें असें मानूं नका असा व्हॉइसरॉयना सल्ला दिला होता. ता. १६ ऑक्टोबर रोजींच्या 'हरिजन'मध्यें गांधीजींनीं काँग्रेसविरोधकांचें सांत्वन करण्याचा प्रयत्न केला. काँग्रेसची मागणी ही सर्व राष्ट्रासाठीं करण्यांत आलेली मागणी आहे, ती अल्पमतासाठीं अथवा बहुमतासाठीं करण्यांत आलेली नाहीं, सर्वांनीं काँग्रेसच्या स्वातंत्र्याच्या मागणीस पाठिंबा द्यावा, अशी विनंति गांधींनीं केली. विरोधकांवर या विनंतीचा कांहींहि परिणाम झाला नाहीं हें सांगणें नकोच.

## भाकरीच्या मागणीला दगडानें उत्तर

युद्ध सुरू झाल्यापासून सुमारें दीड महिनापर्यंत व्हॉइसरॉयनीं अनेक प्रमुख पुढाऱ्यांच्या भेटी घेतल्या. सर्व हिंदुस्थानभर मतामतांचा गलबला खूप माजला. त्या सर्वांचा आशय लक्षांत घेऊन ता. १८ ऑक्टोबर रोजीं ब्रिटनच्या हिंदुस्थानविषयक धोरणासंबंधानें महत्त्वाचा जाहिरनामा व्हॉइसरॉयनीं प्रसिद्ध केला. त्यांत सुरवातीलाच हिंदुस्थानांत निरनिराळीं मतें, निरनिराळे दृष्टिकोण, निरनिराळे प्रश्न व त्यांचीं निरनिराळीं उत्तरें आहेत असें सांगून सर्व मतें व मतभेद हे प्रामाणिक आहेत असेंही शिफारसपत्र सर्वांना दिलें होतें. प्रांतिक मंत्र्यांनीं दोन अडीच वर्षेंपर्यंत जी कामगिरी केली तिची व्हॉइसरॉयनीं प्रशंसा केली. हिंदुस्थानचें अंतिम ध्येय वासाहतिक स्वराज्य आहे असें १९२९ सालीं दिलेलें अभिवचन पुनश्च त्याच मोघम शब्दांत दिलें व आतां फेडरेशन तहकूब झालें असल्यानें युद्धानंतर निरनिराळ्या जमातींचे प्रतिनिधि, पक्ष, हितसंबंध, व संस्थानिक यांचें सहकार्य घेऊन १९३५ च्या घटणा कायद्यांत सुधारणा करूं असें सांगितलें होतें. हिंदुस्थानसंबंधानें ब्रिटनचे युद्धहेतु काय आहेत हें इतक्यांतच सांगता येणार नाहीं, युद्ध कसें संपतें, दरम्यान कोणकोणत्या गोष्टी घडतात यावर हिंदुस्थानचें युद्धोत्तर भवितव्य अवलंबून राहील असें सांगून 'तूर्त युद्धकाळांत ब्रिटिश हिंदुस्थानांतील प्रमुख पक्षांचे प्रतिनिधी आणि संस्थानिकांचे प्रतिनिधी यांचें एक युद्धसल्लागार मंडळ आम्ही नेमणार आहों' एवढीच युद्धकालीन योजना लांबलचक शब्दावडंबरांनीं भरलेल्या घोषणेंत जाहीर केली गेली. यावर टीका करतांना गांधींनीं 'फूट पाडून राज्य करण्याची ही जुनीच पद्धति आहे' व 'युद्ध संपल्यानंतर पुनश्च

गोलमेज भरणार असें दिसतें, पण ती पूर्वीच्या गोलमेजप्रमाणेंच फसेल' असें स्पष्टपणें त्यांनीं सांगितलें. "काँग्रेसनें भाकर मागितली, सरकारनें तिला दगड दिला" असा अतिसंक्षिप्त अभिप्राय गांधींनीं या जाहिरनाम्यावर दिला.

२२ व २३ ऑक्टोबर रोजीं काँग्रेस वर्किंग कमिटीची बैठक भरून व्हॉइसरॉयच्या घोषणेवर ठराव झाला. "हिंदुस्थानांत मतभेद असल्याचा जो उल्लेख व्हॉइसरॉयनीं केला तो ब्रिटनचे खरे हेतु लपवण्यासाठीं केला" असें वर्किंग कमिटीनें म्हटलें असून सरकारनें काँग्रेसची मागणी मान्य केली नाहीं, तेव्हां युद्ध–असहकार अपरिहार्य आहे म्हणून प्रांतिक काँग्रेस मंत्र्यांनीं राजीनामे द्यावे असा आदेश वर्किंग कमिटीनें प्रांतिक काँग्रेस मंत्रिमंडळांना सांगितला. युद्धाच्या सुरवातीपूर्वीं कायदेमंडळाला न कळवितां एडन व सिंगापूर इकडे हिंदी सैन्य पाठविण्यांत आलें म्हणून सरकारचा निषेध करण्यासाठीं काँग्रेसनें मध्यकायदेमंडळांतील काँग्रेस सभासदांना सदर कायदेमंडळाच्या पुढील अधिवेशनास हजर राहूं नये असा आदेश दिला होता. यावेळीं आठ प्रांतांतील मंत्रिमंडळें एकदम मोडण्याचें ठरवून काँग्रेसनें असहकाराचें बरेंच मोठें पाऊल टाकलें. इंग्लंडांत व हिंदुस्थानांत काँग्रेसच्या या निर्णयामुळें सर्वांना अतिशय आश्चर्य वाटलें व खूप खळबळ उडाली. सत्तेला चटावलेली काँग्रेस अधिकार सोडणार नाहीं अशी भाकितें ज्योतिषापासून मुत्सद्यापर्यंत सर्वांनीं केलीं होतीं. तीं सगळीं खोटीं ठरलीं. आणि काँग्रेसनें आदेश दिल्यापासून एक महिन्याच्या आंत आठही प्रांतांतील काँग्रेसमंत्रिमंडळांनीं राजीनामे दिल्यानें गव्हर्नराच्या हुकुमशाहीस सुरवात झाली. ता. १ नोव्हेंबर रोजीं व्हॉइसरॉयनीं काँग्रेसचे अध्यक्ष राजेन्द्रप्रसाद, मुस्लीम लीगचे अध्यक्ष जीना व गांधीजी यांची संयुक्त मुलाखत घेतली आणि त्यांना 'प्रांतिक मंत्रिमंडळें बनविण्यासंबंधानें तुम्हीं आपसांत कांहीं समेट कराल तर व्हॉइसरॉयच्या कार्यकारी मंडळांत तुमचे प्रतिनिधि घेण्यास मी तयार आहें, त्यासाठीं मी कार्यकारी मंडळ वाढवूं इच्छितों' असें कळविलें. पण काँग्रेसची मुख्य मागणी मान्य झाल्यावांचून इतर तपशीलाच्या वाटाघाटी करण्यास आपण तयार नाहीं असें राजेन्द्रप्रसाद यांनीं जीना व व्हॉइसरॉय या दोघांनाही सांगितले. यामुळें ही संयुक्त मुलाखत विफल झाली. या सर्व मुलाखतींचा खुलासा करणारा पत्रव्यवहार व एक स्वतंत्र पत्रक व्हॉइसरॉयनीं प्रसिद्ध केलें.

त्यासंबंधानें गांधीजी व नेहरूं यांनीं व्यक्त केलेल्या विस्तृत विचारांतील दोन लहान उतारे येथें देतों.

## ऐक्याचे मार्गांतील विघ्न–ब्रिटिश सत्ता

गांधीजी म्हणतात, "हिंदुस्थानाला हप्त्याहप्त्यानें नव्हे तर एकदम स्वतंत्र करण्यांत येईल अशी घोषणा एकदां करण्यांत आली तर मग संक्रमणकालांतील उपाययोजना सोपी ठरेल. अल्पसंख्यांच्या हक्कांचें रक्षण त्यामुळें सहज होईल. हल्लींचा करवतीचा खेळ त्यामुळें एकदांचा थांबेल. अल्पसंख्यांना संरक्षण मागण्याचा हक्क आहे. त्यांनींही तें संरक्षण हप्त्याहप्त्यानें न मागतां पूर्ण आणि एकदम मांगितलें पाहिजे. अल्पसंख्यांच्या संरक्षणाची योजना काढण्याची जबाबदारी, अल्पसंख्य व बहुसंख्य अशा येथल्या पक्षांवरच टाकली पाहिजे. ती जबाबदारी आपणच उचलावी असें ब्रिटन मानील तोंवर हिंदुस्थानला गुलाम ठेवावें हें ब्रिटिशांना आवश्य वाटेल. आणि स्वातंत्र्यासाठीं उतावीळ झालेले देशभक्त सरकारशीं लढतच राहतील. मी त्यांना मार्गदर्शक म्हणून राहूं शकलों तर ते अहिंसेनें लढतील आणि मी अपयशी ठरून नाश पावलों तर ते हिंसेनें लढतील. माझी अशी आशा होती व अजून आहे कीं युद्ध हा जो ईश्वराचा शाप तो ब्रिटन आपल्या कृतीनें ईश्वराचा वर बनवील. त्यासाठीं चालूं युद्धाचा शेवट न्याय्य असा ठरविणें आणि तो जवळ आणणें ही गोष्ट आवश्य असून त्यासाठीं हिंदुस्तान या प्राचीन राष्ट्रास ब्रिटननें आपल्या गुलामगिरींतून मुक्त करणें अवश्य आहे हें इंग्लंडनें ओळखलें पाहिजे."

पं. नेहरू म्हणतात–"जीना व मुस्लीम लीग हिंदुस्थानचें स्वातंत्र्य जाहीर होण्याला विरोधी आहेत असें व्हॉइसरॉयना वाटतें काय? तसें असेल तर ती त्यांची चूक आहे. ध्येयाचे बाबतींत जीना व मी या दोघांचेमध्यें पुष्कळ साम्य आहे. राजकीय प्रश्नाकडे आम्ही ज्या दृष्टीनें पाहातों त्यांशीं जिना पूर्णपणें सहमत नाहींत. जिना व मी एकमेकाशीं बोललों. त्यामुळें पुष्कळ गैरसमज दूर झाले आणि आम्ही एकमेकांस अधिक जवळ आलों. राजकीय व जातिविषयक मतभेद दूर होऊं शकतील. युद्धहेतूंची निःसंदिग्ध घोषणा व हिंदुस्थानला स्वातंत्र्याचें आश्वासन याच्या आड येथील मतभेद येत नसून ब्रि. सरकारच त्याच्या

आड येत आहे. अशी समाधानकारक घोषणा होईपर्यंत दुसरे मुद्दे उत्पन्न होतच नाहींत आणि तोंवर आम्ही ब्रिटिशांच्या धोरणांत सामील होणार नाहीं." जीनांनींही "मला पं. नेहरू अतिशय आवडतात" असे उद्गार त्या उभयतांच्या झालेल्या त्या भेटीसंबंधानें काढले होते. पण त्यानंतर जीनांची तार एकसारखी चढत गेली. कॉँग्रेस अथवा नेहरू यांसंबंधानें त्यांनीं पुनः कधींही स्नेहाचा शब्द उच्चारला नाहीं. जीना स्वातंत्र्यविरोधी नाहींत असा जो पं. नेहरूंचा भ्रम होता तोही जीनांनीं लवकरच दूर केला.

## लढ्याची मागणी व गांधींचे आक्षेप

कॉँग्रेस व सरकार यांच्या दरम्यान समेट होत नाहीं ही गोष्ट ऑक्टोबर १९३९ च्या अखेरीस स्पष्ट होवूं लागली होती. कॉँग्रेसमध्यें व एकंदर देशांत, ब्रिटिशांनीं कॉँग्रेसची मागणी मान्य न केल्यास सरकारशीं लढा करावा लागेल व करणें इष्ट आहे अशी विचारसरणी बळावूं लागली होती. . लोकांत उसळणाऱ्या लढ्याच्या इर्षेचें काय करावें हा गांधींच्या पुढें प्रश्न होता. यासंबंधानें त्यांचें मत त्यांनीं नोव्हेंबरच्या आरंभीं व्यक्त केलें. "ते म्हणतात, मीं हुकुम दिला कीं आजवर कधींही न झाली एवढी चळवळ होईल आणि ती अहिंसात्मक होईल. असें आश्वासन अनेक लोक मला देतात. पण या त्यांच्या सांगण्याहून अधिक बळकट पुरावा मजजवळ नाहीं...अहिंसा पाळली जाण्याबद्दल संशय ही लढ्याच्या मार्गांतील पहिली अडचण होय. दुसरी अडचण अशी आहे कीं कॉँग्रेसला मुस्लीम लीग ही शत्रु म्हणून लेखतें. म्हणून सविनय कायदेभंगाच्या अहिंसात्मक मार्गानें यशस्वी क्रांति होईल हें संध्यां जवळ जवळ अशक्य आहे. त्यामुळे हिंदु-मुसलमानांत दंगे होतील." यासाठीं सध्यां कायदेभंग करूं नये, तसेंच "ब्रिटन युद्धांत गुंतलें असल्यामुळें आपण त्यांना अडचणींत पाडणेंही योग्य नाहीं, त्यामुळें देशांत अराजक माजेल, तें मला नको आहे, त्यांतून स्वातंत्र्य कधींही निर्माण होणार नाहीं." असें सांगून लढ्याची तयारी करण्यासाठीं चरखा, जातीय ऐक्य, अस्पृश्यतानिवारण वगैरे त्यांचा नेहमींचा कार्यक्रम गांधींनीं कॉँग्रेस कार्यकर्त्यांपुढें मांडला. नोव्हेंबरमध्यें व्हॉइसरॉयची घोषणा झाली व पार्लमेंटांत वादविवाद झाला. त्यांत हिंदुस्थानांतील जातीय तेढीवर भर देण्यांत येऊन कॉँग्रेसची मागणी मान्य करण्यांत येणार नाहीं असें सरकारतर्फे सांगण्यांत

आलें. तेव्हां जातीय समेटाच्या मुद्यासंबंधानें गांधींना कांहीं तरी ठाम भूमिका घ्यावी लागली. जीना व त्यांची मुस्लिम लीग हेच काय ते मुसलमानांचे प्रतिनिधी आहेत असें मानण्याला गांधीजी कधींच तयार नव्हते. मुस्लीम लीगच्या व जीनांच्या एकंदर धोरणावरून त्यांना एक गोष्ट कळून चुकली होती कीं कॉंग्रेसनें मुसलमानांना कितीही जादा हक्क व सवलती देण्याचें कबूल केलें तरी ब्रिटनकडून ते ते हक्क व सवलती जीना मागून घेणार आणि कॉंग्रेसकडे येऊन आणखी जादा कांहीं तरी मागणार. "मी मुसलमानांना उदार अंतःकरणानें कांहींही देईन. पण लांच म्हणून कांहींही देणार नाहीं." असें गांधींनीं पूर्वींच जाहीरपणें म्हटलें होतें. मुसलमानांना जें हवें तें त्यांनीं सगळें एकदांच मागून घ्यावें आणि त्या बाबतींत त्यांनीं ब्रिटिशांच्या मदतीवर विसंबूं नये ही गांधींची मुख्य शर्त होती. पण कॉंग्रेसनें मुस्लिम लीगला मुसलमानांची एकटी एक प्रतिनिधि म्हणून मान्यता दिल्याशिवाय जिना कॉंग्रेसशीं बोलण्यालाही तयार नव्हते.

## घटनासमितीचा पुरस्कार

शेवटीं या अगतिकतेंतून मार्ग काढण्यासाठीं पं. नेहरूंनीं पूर्वीं अनेकवार घोषिलेल्या घटनासमितीचा पुरस्कार गांधींनीं केला. "घटना-समितीला मी विरुद्ध होतों. पण आतां अनुकूल झालों" अशी त्यांनीं कबुली दिली. घटनासमितींत मुसलमानांनीं स्वतंत्र मतदारसंघ घ्यावे हेंहि गांधींनीं कबूल केलें. 'ज्या ब्रिटननें गोलमेज परिषद भरविली तिनें अल्प-संख्यांच्या संरक्षणाची योग्य तजवीज करून घटनासमिति बोलवावयास काय हरकत आहे ?' असा जाब त्यांनीं सरकारला विचारला आणि यापुढें लढा जर करा-यचा असला तर तो (स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं करायचा नसून) घटनापरिषदेसाठीं करावा लागेल, असें गांधींनीं सुचविलें. पण अजून तशी वेळ आली नाहीं हेंही स्पष्ट सांगितलें. नोव्हेंबरच्या तिसऱ्या आठवड्यांत अलाहाबादला कॉंग्रेस वर्किंग कमिटीची बैठक होऊन कॉंग्रेसच्या एकंदर भूमिकेचा खुलासा करणारे ठराव मंजूर झाले. डिसेंबरमध्यें भारतमंत्री लॉर्ड झेटलंड यांनीं घटनासमितीच्या कॉंग्रेसच्या मागणीसही विरोध केला. अल्पसंख्यांचा त्या मागणीस विरोध आहे हीच सबब भारतमंत्र्यांनीं मांडली होती. तिला पं. नेहरूंनीं त्यावेळीं जें उत्तर दिलें तें नेहरूंची व कॉंग्रेसची या विषयावरील भूमिका पूर्णपणें स्पष्ट करणारें आहे.

लोकशाहीच्या दृष्टीनें जातीय प्रश्न सोडवावयाचा तर तो घटनासमितीनें सोडविणें हीच गोष्ट योग्य आहे, असें सांगून पं. नेहरू म्हणतात.,

"मुसलमान हे खरोखर अल्पसंख्य नव्हेतच हें भारतमंत्र्यांचें म्हणणें मलाही मान्यच आहे. कारण हिंदुस्थानांत त्यांची संख्या पुष्कळ मोठी आहे, इतकेंच नव्हे तर देशांतील अनेक मोठमोठ्या विभागांत मुसलमान हे बहुसंख्यही आहेत. सामान्यतः एवढ्या मोठ्या जमातीला वेगळ्या संरक्षणाची जरूरच नाहीं. पंजाब, बंगाल, सिंध, सरहद्द, बलुचिस्तान येथें मुसलमान हे अल्पसंख्य नसून बिगर-मुसलमान हेच अल्पसंख्य आहेत. एकंदर हिंदुस्तानकडे पाहिलें असतां उलट-सुलट बाजूंनीं ताजवा समतोल राहतो आणि एका धर्मपंथानें अथवा वांशिक गटानें दुसऱ्याचा छळ करणें अशक्य होतें...घटनासमितीला ब्रिटन कां विरोध करतें हें मला माहित आहे. कारण घटना समितीनें ब्रिटिश साम्राज्याची खात्रीनें इतिश्री होईल. हिंदी राष्ट्रवाद व ब्रिटिश साम्राज्यवाद यांमध्यें समान भूमिका असूंच शकत नाहीं. आमच्या या निर्णयांत ब्रिटननें हस्तक्षेप करूं नये; हें जर ब्रिटनला पसंत नसेल तर ब्रिटनशीं आमचा या बाबतींत प्रामाणिक मतभेद आहे. भविष्यकाळ कोणाची आकांक्षा सिद्ध करून दाखवितो हें कळून येईलच. पण हिंदुस्तानच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारी एखादी व्यक्ति अथवा गट जर खरोखरी लोकशाहीचा पुरस्कार करीत असेल तर घटनासमितीच्या मागणीस तो कां विरोध करील हें मला समजत नाहीं. आपल्याच मतदारांची त्यांना भीति वाटते काय? घटनासमितीस त्यांचा विरोध असेल तर त्याचा अर्थ एवढाच होतो कीं त्यांना ब्रिटिश सत्ता हवी आहे, हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यांत ब्रिटननें हस्तक्षेप करावा हेंच त्यांना हवें आहे. आम्हांला परक्यांचा हस्तक्षेप नको आहे. त्यांच्या हस्तक्षेपावांचून लोकशाहीप्रधान अशी राज्यघटना स्थापित करण्यास घटना-समितीहून अन्य मार्ग नाहीं. हिंदुस्तानांत एक ब्रिटिश राज्यसत्ता तरी राहावी अथवा कमी अधिक प्रमाणांत सोव्हिएट पद्धति तरी यावी याहून अन्य मार्ग मला दिसत नाहीं. हिंदी लोक काय ठरवितील हें मला माहित नाहीं. पण घटना-समितीमार्फत त्यांना विचारून त्यांच्या निर्णयांत येईल तो धोका पत्करण्यास मी तयार आहें. कांहीं झालें तरी मूठभर माणसांच्या गटांनीं लोकांच्या डोक्यावर बसून त्यांच्यासाठीं आपणच निर्णय ठरविण्याचें दिवस आतां संपले आहेत."

याच सुमारास गांधीजींनीं एका मुलाखतींत "घटनासमितीमार्फत जनतेनें पूर्ण स्वातंत्र्य न मागतां ब्रिटिशांच्या अमलाखालीं कमीअधिक प्रमाणांत स्वायत्तता मागितली तरीहि त्या लोकमताला मी मान तुकवीन" अशा अर्थाचें मत व्यक्त केलें होतें. हिंदी लोक व ब्रिटिशसरकार यांनीं आपसांत समेट करून ही अशी समेटाची योजना घटनासमितीपुढें ठेवावी असें मत त्यांनीं मांडलें. तसेंच सगळ्या मुसलमानांनीं जीना हे आपले प्रतिनिधी आहेत असें जर मान्य केलें तर जीनांना त्यांचा पुढारी मानून त्यांच्याशीं बोलणें करण्यास तयार आहोंत असेंहि गांधीजींनीं सांगितलें. "रुझवेल्ट ज्याप्रमाणें १२ कोटी अमेरिकनाकडून प्रतिनिधी म्हणून निवडला जातो व मग तो तसा मानला जातो तशीच मान्यता जिनांना मिळेल" असा आपला आशय असल्याचें गांधींनीं सांगितलें.

१० जानेवारी १९४० रोजीं मुंबईच्या ओरिएंट क्लबांत व्हॉइसरॉय लॉर्ड लिनलिथगो यांनीं भाषण करून नेहमींची जातीय मतभेदाची सबब पुन्हा गाइली. त्यानंतर ता. ५ फेब्रुवारी रोजीं गांधीजी व व्हॉइसरॉय यांची मुलाखत झाली. समेट होऊं शकणार नाहीं हें सर्वांनाच माहीत होतें व तसेंच घडलें. या मुलाखतींत व्हॉइसरॉयशीं गांधीजींचा जो मतभेद झाला त्यासंबंधीं त्यांनीं तपशील-वार विवेचन केलें आहे. घटनासमिति, युद्धकाळीं देशसंरक्षण, संस्थानिक, युरोपियांचे हितसंबंध वगैरे सर्व प्रश्न या मुलाखतींत चर्चिले गेले आणि त्या सर्व मुद्यावर दोघांचा मतभेद झाला. गांधीजींनीं या मतभेदासंबंधीं केलेला खुलासा मूलग्राही असल्यानें तो समग्र येथें देतों.

## अल्पसंख्यांचा प्रश्न

गांधीजी म्हणतात, "कॉंग्रेसची मागणी आणि व्हॉइसरॉय यांची देणगी यांत मूलभूत फरक हा आहे कीं हिंदुस्थानचें भवितव्य काय व्हायचें हें ब्रिटननें ठरवावें असें व्हॉइसरॉयांच्या देणगींत अंतर्भूत आहे. कॉंग्रेसची भूमिका नेमकी याविरुद्ध आहे. बाहेरच्यांचा हस्तक्षेप न होतां आपलें भवितव्य हिंदी लोकांनीं स्वतःच ठरवावें ही खऱ्या स्वातंत्र्याची कसोटी आहे. हा मूलभूत फरक नाहींसा करून हिंदुस्तानला आपली घटना व आपला दर्जा ठरविण्याचा हक्क देण्याची वेळ आली आहे हें इंग्लंड मान्य करीपर्यंत इंग्लंड व हिंदुस्थान यांच्या दरम्यान शांततेचा व सन्मान्य समेट होईल असें मला वाटत नाहीं. जर इंग्लंडनें आमच्या

मागणीस मान्यता दिली तर देशाचें संरक्षण, अल्पसंख्यांचा प्रश्न युरोपीयांचे हितसंबंध संस्थानिकांचे हितसंबंध वगैरे सर्व प्रश्न सुटले जातील. मी हीच गोष्ट अधिक स्पष्ट करतों. अल्पसंख्यांच्या हक्कांना संरक्षण देणें ही गोष्ट ब्रिटिश सरकार व काँग्रेस या उभयतांनाही हवी आहेच. पण शिवाय हिंदी लोकांची कोणतीही प्रातिनिधिक समिति न्याय्य अर्थानें अल्पसंख्य म्हणून गणल्या जाणाऱ्या जमातींचें पूर्ण समाधान केल्यावांचून स्थिर स्वरूपाची राज्यघटना तयार करूं शकणारच नाहीं. 'न्याय्य अर्थानें अल्पसंख्य म्हणून गणल्या जाणाऱ्या' (लेजिटिमेट मायनॉरिटीज) हे शब्द मी हेतुपूर्वक वापरतों आहें. कारण उकिरड्यावरील छत्र्याप्रमाणें अल्पसंख्य म्हणविणारे नवे नवे गट भराभर पुढें येत आहेत. याचा परिणाम असा दिसतो कीं, बहुसंख्य म्हणून कोणी उरणारच नाहीं. 'पूर्ण समाधान' याचा अर्थही मी इतकाच करतों कीं ज्या मागणीच्या समाधानानें एकंदर राष्ट्राच्या प्रगतीला अडथळा होणार नाहीं इतकें जास्तींत जास्त समाधान. म्हणून जर अखेरीस निरनिराळ्या गटांत समेट होऊं शकला नाहीं तर मानवी बुद्धीला जास्तींत जास्त निःपक्षपाती असें जें न्यायासन कल्पिता येईल त्या न्यायासनापुढें मी मतभेद मांडण्यास तयार आहें. या न्यायासनाचा निर्णय म्हणजेच अल्पसंख्यांचें जास्तींत जास्त समाधान असें मानलें जावें व तो निर्णय सर्वांना बंधनकारक व्हावा.

## राष्ट्रसंरक्षण

संरक्षणासंबंधानें बोलायचें तर स्वतंत्र हिंदुस्थानानें संरक्षणाची तयारी आपली आपण करणें ही काळजी घेण्याची पहिली बाब मानली पाहिजे. हिंदुस्थानला त्यासाठीं पुष्कळ तयारी करावी लागेल आणि ब्रिटननें जर साहाय्य केलें तर या तयारीसाठीं तें साहाय्य घ्यावेंही लागेल. ब्रिटिशांच्या साम्राज्यवादी धोरणामुळें हिंदुस्थान निशस्त्र करण्यांत आलेलें असून ब्रिटिश बागनेट आणि ब्रिटिशांनींच निर्माण केलेलें हिंदी सैन्य यावांचून त्याला आत्मरक्षण करतां येणें अशक्य आहे. हिंदुस्थान व ब्रिटन या दोघांनाही ही अवस्था लज्जास्पद होय. मला त्याच्याशीं व्यक्तिशः कांहींही कर्तव्य नाहीं. माझ्या मताप्रमाणें हिंदुस्थानला मी नेऊं शकेन तर चोर-दरवडेखोरापासून जनतेचें रक्षण करण्यासाठीं मी पोलीस ठेवीन, म्हणजे पुरे. राष्ट्राच्या संरक्षणाचे बाबतींत निःशस्त्र व शांतताप्रधान हिंदुस्थानला जगाच्या सौजन्य-

बुद्धीवर अवलंबून राहावें लागेल. पण माझी ही कल्पना केवळ एक मधुर स्वप्नच आहे हें मी कबूल करतों.

शा. क्र. ६२२४

## युरोपीय व संस्थानिक

युरोपीयन हितसंबंधाबद्दल माझें असें म्हणणें आहे कीं, युरोपीयन या शब्दावर जोर देणें बंद झालें पाहिजे. याचा अर्थ युरोपीयांचे अथवा इतर कोणाचे हितसंबंध स्वतंत्र हिंदुस्थानकडून खालसा होतील असें नव्हे. हल्लीं जे न्याय्य हितसंबंध असतील व देशाच्या हिताला अपायकारक नसतील त्यांना सयुक्तिक अशी नुकसान-भरपाई देण्याची तजवीज होईल व ती व्हावी. आज जी युरोपीयांना लाडिकपणाची वागवणूक मिळते आहे ती मात्र मिळणार नाहीं. मी युरोपीयांना बडे जमिनदार अथवा भांडवलदार असें मानीन व त्यांच्यासारखेंच वर्तन युरोपीयाशीं ठेवीन.

संस्थानिकांना राष्ट्रीय घटनासमितींत सामील होण्याला मोकळीक आहे. पण त्यांनीं व्यक्ति म्हणून हजर न राहतां आपल्या जनतेचे योग्य प्रकारें निवडलेले प्रतिनिधि म्हणून हजर राहावें. संस्थानिक या नात्यानें ते आज बादशहाचे मांड-लिक आहेत. याहून अन्य दर्जा आज त्यांना नाहीं. बादशहापेक्षां श्रेष्ठतर ते खासच नाहींत. हिंदुस्थानवर आज बादशहाला जी सत्ता आहे ती जर बादशहानें सोडली तर संस्थानिकांनींही ती सोडली पाहिजे आणि बादशहाचा वारस होणारी अशी जी हिंदी जनता तिच्याकडेच संस्थानिकांनीं आपल्या दर्जाच्या संर-क्षणासाठीं पाहिलें पाहिजे. मी काँग्रेसतर्फे अथवा दुसऱ्या कोणत्या तरी एका पक्षातर्फे हा फाजील हक्क सांगतों आहें असें मानण्यांत येऊं नये, तर लक्षावधि मुक्या प्रजेतर्फे मी हें बोलतों आहें हें लक्षांत घेतले जावें अशी मी आशा करतों. जनतेतर्फे कांहींही मागितलें तरी ती मागणी फाजील होत नाहीं. मी एक क्षुल्लक माणूस आहें. पण या लक्षावधि मूक जनतेवर माझें वजन आहे असें मानलें जातें. आणि माझ्या शरीरांतील नस नी नस त्यांच्या शरीरांतल्याप्रमाणें आहे याची मलाही जाणीव आहे. त्यांच्यावांचून मी कोणीच नव्हे. मला त्यांच्यावांचून जगण्याचीही इच्छा नाहीं. ब्रिटनशीं अहिंसात्मक लढा करण्याचीही गरज न पडतां समेट व्हावा अशी माझी इच्छा आहे. माझ्या शब्दकोशांत हिंसात्मक लढा हा शब्द नाहींच.

काल व्हाइसरॉयपुढें मीं हें मत मला जितक्या सौजन्याच्या व स्नेहाच्या भाषेंत मांडता आलें तितकें मांडलें. परस्परांच्या प्रामाणिकपणाबद्दल विश्वास बाळगणाऱ्या मित्रांप्रमाणें आम्हीं चर्चा केली. आमची परस्परांची भूमिका परस्परांना समजली. आणि ब्रिटिश सरकारची म्हणून जी भूमिका त्यांनीं मांडली आणि काँग्रेसचा प्रतिनिधि म्हणून नव्हे पण लक्षावधि मूक जनतेचा स्वयंनियुक्त प्रतिनिधि म्हणून मीं जी काँग्रेसची भूमिका मांडली त्या दोहोंत अजून फार तफावत आहे हें उभयतांनींही मान्य केलें. मित्र या नात्यानेंच आम्हीं बैठक संपविली. वाटाघाटी फसल्या म्हणून मी निराश झालों नाहीं. या अपयशाचा उपयोग मी व व्हाइसरॉय दोघेही यशाच्या पायरीसारखा करूं. पण हें यश जर लवकरच येणार नसेल तर मात्र हिंदुस्तान, ब्रिटन व सारें जग यांना देव साहाय्य करो. चालू युद्ध शस्त्र-सामर्थ्यांच्या टकरीनें संपूं नये तर प्रत्येक पक्षांत नैतिक बळ किती आहे त्यावरून संपलें पाहिजे. जर ब्रिटन हिंदुस्तानचा नैतिक हक्क मानणार नसेल तर इंग्लंडचें नैतिक दिवाळें वाजलें असाच त्याचा अर्थ होणार नाहीं काय?" ( ६-२-४० )

## रामगड काँग्रेस व नंतर ::: ::: [ ५ ]

मार्च १९४० मध्यें विहार प्रांतांत रामगड येथें मौ. अबुलकलाम आझाद यांच्या अध्यक्षतेखालीं राष्ट्रीय सभेचें अधिवेशन भरलें. त्यांत नवीन असें कांहींच झालें नाहीं. काँग्रेसच्या साम्राज्यशाही युद्धविरोधी धोरणास अनुसरून काँग्रेसनें प्रांतिक मंत्रिपदाचा त्याग पूर्वींच केला होता. आतां सविनय कायदेभंग अपरिहार्य असून राष्ट्राची तयारी झाली असें दिसतांच तो पुकारण्यांत येईल अशा अर्थाचा एक ठराव तेथें करण्यांत आला. गांधींनीं ऑ. इ. काँ. कमिटींत एक व खुल्या अधिवेशनांत एक अशीं दोन भाषणें केलीं. "यापुढें व्हावयाचा सत्याग्रह लढा घटना-परिषदेसाठीं व्हावयाचा आहे" असें त्यांनीं सांगितलें. "चरखा, अहिंसा, जातीय समेट, अस्पृश्यतानिवारण वगैरे विधायक कार्यक्रम हाच सामर्थ्यसंघटनेचा कार्य

क्रम आहे, त्या दृष्टीनें काँग्रेसची तयारी झालेली नाहीं, ती झाली पाहिजे. चरखा व अहिंसा हाच माझा मार्ग, तुमचे मार्ग वेगळे असतील तर असोत, मी सेनापति व्हायचें तर माझें आदेश सर्वांनीं पाळले पाहिजेत," इत्यादि मुद्दे त्यांनीं मांडलें.

## कम्युनिस्टांनीं काँग्रेस गाजविली

रामगड काँग्रेस गाजली ती काँग्रेसच्या या ठरावामुळें अथवा काँग्रेस पुढाऱ्यांच्या भाषणामुळें नव्हे, तर कम्युनिस्टांच्या विरोधामुळें गाजली. ऑगस्ट १९३९च्या शेवटच्या आठवड्यांत रशियानें जर्मनीशीं तह करून तटस्थतेचें धोरण स्वीकारलें. तेव्हांपासून, वर्षोगणती कम्युनिस्टांनीं चालविलेला फॅसिझमविरोधी प्रचार एकदम थांबला. 'जर्मनी बचावासाठीं लढत असून अँग्लो-फ्रेंच राज्यकर्ते हेच साम्राज्यलोभानें लढत आहेत' असें रशियन सरकारचें मत मोलॅटोव्हनें ऑक्टोबर अखेर जाहीर केलें. आणि 'चालू युद्ध साम्राज्यशाही युद्ध असून काँग्रेसनें स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं ताबडतोब प्रचंड चढाई करावीं' असें कम्युनिस्ट प्रतिपादूं लागले. आश्चर्य हें कीं रामगड काँग्रेसमध्यें गांधींच्या अहिंसावादाला त्यांनीं मुळींच विरोध केला नाहीं. उलट सर्व हिंदुस्थानभर, संस्थानांत, खालसा मुलुखांत, शेतकऱ्यांत, कामकऱ्यांत सर्वत्र सत्याग्रह लढ्याचें रणशिंग फुंकलें जावें असा आग्रह त्यांनीं धरला. मार्क्स, लेनिन व स्टालिन यांचे अनुयायी गांधींच्या एकांतिक अहिंसेच्या शपथा घेऊन सत्याग्रहांत सामील होण्यास तयार झाले! इतका हा ढोंगीपणा जगाच्या इतिहासांत इतर क्वचितच दिसून आला असेल. कॉम्रेड रॉय यांनीं युद्धाच्या सुरुवातीपासून 'हें युद्ध साम्राज्यशाही युद्ध नव्हे, ब्रिटनला हिंदी जनतेनें बिनशर्त सहकार्य केलें पाहिजे' असें धोरण प्रतिपादण्यास सुरवात केलीं होती. त्यांनींही आपली भूमिका ऑ. इं. काँ. कमिटींत मांडली. आणि कम्युनिस्टांनीं दुसऱ्या टोकाची आपली भूमिका मांडली. गांधींनीं दोन्ही प्रतिपादनांचा अव्हेर करून 'सत्याग्रहास राष्ट्र तयार नाहीं, खादी व अहिंसा यांची जपमाळ घेऊन सत्याग्रहाची तयारी करा' असा संदेश दिला. रॉय व कम्युनिस्ट यांचें धोरण कोणासही पसंत पडलें नाहीं. तथापि काँग्रेसचें धोरणही अनिश्चित व वाहावटीस लागलेलें आहे असें अनेक काँग्रेसकार्यकर्त्यांना वाटलें. तींच तींच पत्रकें, त्याच त्याच घोषणा याला लोक कंटाळले होते. राजकीय वादांत नवा मुद्दा व नवा कार्यक्रमच निघेना.

अशा परिस्थितींत रामगड कॉंग्रेसच्या पाठोपाठ लाहोरमध्यें मुस्लिमलीगचें अधिवेशन भरून त्यानें वादाला एक नवें हाडूक दिलें. त्यानें ही नवीन कार्यक्रम कांहींच दिला नाहीं. पण वादाच्या दृष्टीनें हें हाडूक इतकें उपयोगी पडलें आहे कीं गेल्या तीन वर्षांत सर्व पक्षांनीं आपापल्या दाढा हें हाड चावून चावून निखळून घेतल्या आणि त्यामुळें उपयुक्त राजकारण कांहीं झालें नसलें तरी राजकारण नीरस व निःक्षोभही कधींच वाटलें नाहीं ! अनुकूल व प्रतिकूल अशा दोन्ही पक्षांना दारूनें धुंदी चढून माज यावा तसा माज या वादाबाबत आला होता. अजूनही तो कायम आहे.

## वादाचें नवें हाडूक—पाकिस्तान

हें हाडूक म्हणजे लाहोरच्या मुस्लिमलीग अधिवेशनांतला पाकिस्तानचा ठराव हें होय. या ठरावाचा मुख्य भाग पुढीलप्रमाणें आहे. " ऑल इंडिया मुस्लिम लीगच्या या अधिवेशनाचें विचारपूर्वक बनलेलें मत असें आहे कीं पुढें दिलेल्या मूल तत्त्वावर आधारलेली नसेल अशी कोणतीही राज्यघटनात्मक योजना येथें अमलांत आणताच येणार नाहीं अथवा मुस्लिम लीगला मान्य होणार नाहीं. हें मूलतत्त्व असें:—वायव्य सरहद्द, हिंदुस्तानचा पूर्व भाग वगैरे अशा ठिकाणीं मुसलमान जेथें संख्येनें अधिक आहेत तेथें सरहद्दींचा जरूर तो फेरबदल करून भौगोलिक दृष्ट्या एकच असे मुलूख आंखावे; ते असे कीं त्यांचें प्रत्येकीं स्वतंत्र राज्य होईल आणि त्या राज्याचे घटक हे स्वायत्त व पूर्ण सत्ताधारी होतील." अशा या राज्यांत अल्पसंख्यांचे हक्क संरक्षिले जाण्याची हमी घेण्यांत यावयाची असून मुस्लिम लीगच्या कार्यकारी मंडळाला या तत्त्वाप्रमाणें योजना आंखण्याचा आदेश देण्यांत आला होता. गेल्या तीन वर्षांत या पाकिस्तानवर जिनांनीं हिंदुस्तानभर कोंबडीं झुंझविलीं. पण आतां तीन वर्षांनंतरही पाकिस्तानचा नकाशा नाहीं अथवा योजनाही जिनांनीं तयार केलेली नाहीं.

जातीय वादासंबंधानें गांधी व नेहरू यांनीं घटनापरिषदेची भूमिका घेतली, यामुळें जिनांना फार पेंच पडला. कारण 'मी मुसलमानांचा पुढारी आहें, असें नुसतें बोलून आतां भागणार नव्हतें. गांधींनीं विभक्त मतदार संघही देऊं केले होते. तेव्हां मुसलमानांचे प्रतिनिधि आपण आहों हें सिद्ध करण्याची जिनावर पाळी होती. घटनासमितीच्या व्यासपीठावर हिंदूंना अथवा कॉंग्रेस व गांधी यांना नुसत्या शिव्या देऊन भागणारें नव्हतें. हिंदी राज्यघटनेचा प्रश्न तेथें येणार होता. त्यांतली

मुख्य वाब म्हणजे ब्रिटिशांचें राज्य येथें राहावें कीं नाहीं ही: होती. वयांत आलेल्या सर्वांना घटनासमितीसाठीं मताधिकार असावा ही मागणी गांधी–नेहरूंनीं केलीं होती. यास मुसलमान जनतेचा विरोध असण्याचें कांहींच कारण नव्हतें. सामान्य हिंदू जनतेप्रमाणें सामान्य मुसलमान जनताही पूर्ण स्वातंत्र्यवादीच आहे. घटनासमितीला जिना विरोध करतील तर मुसलमान जनताच जीनांवर रुष्ट होईल ही जीनांना भीति होती. पण 'हो' म्हणावें तर ब्रिटिश सत्तेवर जिवंत राहिलेले लीगमधील अमीर आणि नबाब यांचा आश्रय नाहींसा होऊन जीनांना अगदींच 'भाई' होण्याची पाळी येणार होती. या नबाव–अमीरांचा संबंध तोडण्यास, व त्यांच्या आणि म्हणून ब्रिटिशांच्या आश्रयानें स्वस्तांत पडलेलें पुढारीपण सोडण्यास जीना तयार नाहींत. या अडचणींतून वाट काढण्यासाठीं जिनांनीं पाकिस्तानच्या मागणीस पाठिंबा दिला. त्यापूर्वी निदान ८।१० वर्षें ही योजना अनेक मुसलमान पुढाऱ्यांनीं मांडली होती.पण जिनांनीं ती कधींच स्वी कारली नाहीं. पण आतां काँग्रेसच्या घटनासमितीच्या मागणीस अपशकून करण्यासाठीं ही मागणी त्यांनीं पत्करली आणि साम्राज्यवादी पत्रकारांनीं काँग्रेसच्या स्वातंत्र्याच्या चळवळीस हाणून पाडण्यासाठीं जिनांच्या या मालाची मोफत जाहिरात केली. जिनांना खरोखरच पाकिस्तान हवें आहे कीं नाहीं कोण जाणे. पण पाकिस्तानची आंखणी ब्रिटिशांच्या नेतृत्वाखालींच व्हावी असें जिनांनीं अगदीं अलीकडे अमेरिकन वार्ताहराला सांगितलें आहे. यावरून पाकिस्तानपूर्वी त्यांना स्वातंत्र्य नको आहे एवढें स्पष्ट होतें.

लाहोर मुस्लिम लीग अधिवेशनानंतर दिल्लीस अल्लाबक्षांच्या अध्यक्षतेखालीं आझाद मुसलमान परिषद झाली. तिनें पाकिस्तानला विरोध करून राष्ट्रीय स्वातंत्र्य व घटनासमिति यांस पाठिंबा दिला. त्यानंतर या आझाद मुस्लिमांच्या परिषदा भरत आहेत. पण जनतेंत शिरून जनतेचें नेतृत्व घेणारा कर्तबगार राष्ट्रवादी मुसलमान पुढारी कोणीच पुढें येताना दिसत नाहीं. आतां अल्लाबक्षांच्या खुनामुळें हा एकटाच कर्तबगार राष्ट्रवादी पुढारीही नाहींसा झाला आहे. मुसलमान जनता मागसलेली व अज्ञ असून जिनांच्या नेतृत्वाची जाहिरात साम्राज्यशाहीच्या बगलबच्च्याकडून व अमीरउमरावाकडून भरपूर होत आहे. तूर्त तरी मुस्लिम लीगचा काँग्रेसला होणारा विरोध दूर करण्यास कांहीं इलाज दिसत नाहीं.

एप्रिल १९४० पासून महायुद्धाची परिस्थिति विघडत चालली. ता. ९ एप्रिल रोजीं जर्मनीनें डेन्मार्क व नॉर्वे यांवर स्वारी केली व महिना अखेर तीं दोन्ही राष्ट्रें पाडाव केलीं. मेच्या १० तारखेस जर्मनीनें हॉलंडवर स्वारी केली. १६ मे रोजीं हॉलंडचा पाडाव झाला. २८ मेला बेल्जमचा राजा लिओपोल्ड यानें शस्त्र खालीं ठेवलें व तो जर्मनीच्या स्वाधीन झाला. इटालीनें ११ जून रोजीं इंग्लंड व फ्रान्स यांच्याशीं युद्ध पुकारलें व १७ मार्च रोजीं फ्रेंचांनीं जर्मनांना शरणचिठी देऊन ता. २२ जून रोजीं युद्धतहकुबी मिळविली. या घालमेलींत ब्रिटिशांचे ३।४ लक्ष सैन्य युरोपच्या भूमीवर जर्मनीच्या तावडींत सापडलें होतें. त्यांचें सर्व रणसाहित्य जर्मनांच्या हातीं पडलें. पण ब्रिटिश आरमार व विमानदल यांनीं शौर्याची शिकस्त करून डंकर्क बंदरांतून आपलें बहुतेक सर्व सैन्य सोडवून आणलें.

## कालहरण व फसवणूक

दोस्त राष्ट्रांच्या या पिछेहाटीचा हिंदी जनतेवर जो परिणाम होत होता तो ब्रिटिशांना अनुकूल होत नव्हता. काँग्रेसची मागणी सरकार मान्य करीत नाहीं म्हणून काँग्रेसकार्यकर्ते दांत करकरीत होते. जनता ब्रिटिशांच्या पराभवाकडे कौतुकानें पहात होती. गांधी लढ्याचा आदेश देणार देणार अशा जाहीराती लागत होत्या. " माझी अहिंसा व खादी ही अट पूर्ण करा, तुमची तयारी झाली अशी खात्री दाखवा म्हणजे लढ्याचा आदेश देईन " असें म्हणून गांधी कालहरण करीत होते. ता. १५ ते १९ एप्रिल पर्यंत काँग्रेस वर्किंग कमिटीची बैठक भरली व तिच्या ठरावांत हाच आदेश देण्यांत आला. " माझ्या आयुष्यांतला हा अखेरचा लढा आहे " असें गांधी म्हणत आणि आणखी एक लढा गांधींच्या नेतृत्वाखालीं आपणास करायला मिळणार आहे असें आश्वासन काँग्रेसमधील गांधीवादी व भौतिकवादी कार्यकर्तेही देत. पण हा लढा कसा असणार व खादी आणि अहिंसा यांचा लढ्याच्या स्वरूपाशीं कार्यकारण संबंध कसा राहणार याची चिकित्सा कोणींही कधीं केली नाहीं. प्रथम स्वतांला व मग दुसऱ्याला फसविण्याची जणूं कांहीं चढाओढ लागली होती. ता. १० मे रोजीं हॉलंडवर जर्मनीची स्वारी झाल्यामुळें ब्रिटिश पंतप्रधान चेंबर्लेन यानें राजीनामा दिला व चर्चिल पंतप्रधान झाले. एल्. एस्. अमेरी हे भारतमंत्री झाले. चर्चिल हे हिंदी स्वातंत्र्याचे कट्टे शत्रु असल्यानें

त्यांच्या अमदानींत हिंदी स्वातंत्र्याचा प्रश्न सुटणें अशक्य आहे हें हिंदुस्तानांतल्या लोकांना माहीत होतें. यामुळें निराशेचें वातावरण अधिकच वळावलें.

## कॉं. वर्किंग कमिटींतील मतभेद

कॉंग्रेस पुढाऱ्यांचें युरोपांत चालू असलेल्या घटनांकडे लक्ष होतेंच. ता. १७ तें २१ जूनपर्यंत वर्ध्यास वर्किंग कमिटीची बैठक भरून तिनें चालू परिस्थितीचा आढावा घेतला. युरोपांतल्या घटनांनीं वर्किंग कमिटीच्या डोळ्यांत झणझणींत अंजन घातलेंसें दिसलें. अहिंसा आणि देशापुढील प्रसंग यांचें गोत्र जमत नाहीं ही गोष्ट वर्किंग कमिटींतील नेहरू, आझाद, राजाजी, वल्लभभाई वगैरेंना पटली. हिंदुस्ताननें अहिंसा तत्त्वाचा पुकारा करून देशाचें सैन्य बरखास्त करण्याची मागणी जाहीर करावी असा सल्ला गांधींनीं दिला. तेव्हां वर्किंग कमिटीनें गांधींचें हें म्हणणें साफ नाकारलें. " अहिंसेस आमची मान्यता असली तरी गांधींच्या मर्यादेपर्यंत आम्ही जाऊं शकत नाहीं " असें वर्किंग कमिटीनें ठरावरूपानें गांधींना स्पष्ट कळविलें. तसेंच " राष्ट्रसेवेसाठीं शांततेनें काम करणारीं स्वयंसेवक-दळें स्थापन करावी, त्यांची भरती व शिक्षण हा कार्यक्रम कॉंग्रेसनें हातीं घ्यावा " असाही आदेश ठरावांत स्पष्टपणें देण्यांत आला. पण पुढील दोन वर्षांत खास काँग्रेसमार्फत या संबंधानें कांहींही कार्य झालें नाहीं. प्रांतोप्रांतीं जें थोडें स्वयंसेवकसंघटनेचें काम झालें तें अशा संघटनेबद्दल निष्ठा असलेल्या लोकांनीं स्वतंत्रपणें केलें. त्यांना वरिष्ठ काँग्रेस-अधिकाऱ्यांचा विरोधच झाला. या स्वयंसेवक-संघटनांतून हिंसा व सोशालिझम् यांची आग भडकेल अशी भीति त्यांना वाटत होती. काँग्रेसमधील अंतर्विरोध २१ जूनच्या कॉं. वर्किंग कमिटीच्या ठरावानें जो व्यक्त झाला तो बराच मूलग्राही होता. आणि ' गांधी विरुद्ध सर्व कॉंग्रेस वर्किंग कमिटी ' असा तो विरोध नसून गांधींच्या मताचा एक गट खुद्द कॉं. वर्किंग कमिटींत होता. गांधी गट व आझाद-नेहरू गट अशीं या दोन गटांस नांवें देता येतील. १९४०च्या जूनजुलैमध्यें वल्लभभाई पटेल व राजगोपाळाचारी हे आझाद-नेहरू गटांत आले. पुढें १९४२ सालीं पटेल हे गांधी गटांत परत गेले व राजाजी कॉंग्रेस सोडूनच गेले. असो.

## गांधींनीं विचारलेले प्रश्न

१९४०च्या जूनमध्यें फ्रान्सचा पाडाव झाला त्यावेळीं गांधींच्या मनाची विशेष

खळबळ उडाली. त्यांनीं पूर्वी इंग्लंड–फ्रान्सचा विजय चिंतिला होता. जर्मनींचा व इंग्लंड–फ्रान्सचा कोणाचाही पाणउतारा न होता हें युद्ध संपावें असेंही त्यांनीं म्हटलें होतें. पण चालू युद्धाला हिटलर जबाबदार आहे एवढी गोष्ट त्यांनीं कबूल केली होती. फ्रान्सचा पाडाव होताच त्यांच्या अहिंसा तत्त्वाला एकदम उसळी आली. फ्रेंच राज्यकर्त्यांनीं जनतेचा विश्वासघात करून तिला नाझी सत्तेच्या हवालीं केलें होतें, पण याची कांहींही चौकशी अथवा पर्वा न करतां गांधींनीं फ्रेंच राज्यकर्त्यांचें अभिनंदन केलें व खुद्द इंग्लिश लोकांनींही शस्त्रें खालीं ठेवावीं हें सांगण्यास त्यांनीं कमी केलें नाहीं. २३ जूनच्या वर्किंग कमिटीनें गांधीजींशीं जो मतभेद दर्शविला त्यास उत्तर देण्यासाठीं १ जुलै १९४० रोजीं गांधींनीं 'कांहीं मूलभूत प्रश्न' या मथळ्याचा एक लेख लिहिला .त्यांची...व्हाइसरॉयांची नुकतीच भेट झाली होती. तिचा उल्लेख करून त्यांनीं कांहीं स्पष्ट प्रश्न विचारले. "तुम्हांला स्वातंत्र्य हवें कीं वसाहतीचें स्वराज्य हवें ?" हा पहिला प्रश्न होता. "काँग्रेसनें स्वातंत्र्यच मागितलें आहे, हें जर खरें तर २३ जूनचा काँग्रेस वर्किंग कमिटीचा ठराव त्याच्याशीं विसंगत ठरतो. अहिंसा सोडायची ना ? मग तुम्ही सरकारच्या रिक्रूटभरतींत गेले पाहिजे. खाजगी सैन्य उभारून कोणीही देशरक्षण करणें सरकार शक्य होवूं देणार नाहीं." स्वयंसेवकसंघटनेस गांधींचा विरोध होता हें यावरून स्पष्ट होतें. "अहिंसा सोडली तर स्वातंत्र्य सोडलेंच पाहिजे. अहिंसा सोडली तर प्रांतांत मंत्रिमंडळें—हल्लींच्या राज्यघटनेंतच–पत्करिलीं पाहिजेत." "ब्रिटिशांचा विजय व्हावा कीं होवूं नये ? ब्रिटिशांचा पराभव झाला तर ती गोष्ट एक प्रकारें भव्य व उदात्त होईल. कारण इंग्लंडसारख्या परिस्थितींतलें कोणतेंही राष्ट्र विजयी होवूं शकणार नाहीं असा त्याचा अर्थ होईल, उलट इंग्लंड जर विजयी होणार असेल तर तें उत्तरोत्तर फॅसिस्ट पद्धति स्वीकारूनच विजयी होईल" असेंही गांधींनीं लिहिलें. *

---

* गांधी व नेहरू यांचा मतभेद या बाबतींत कोठें असावा तें येथेंच बोलून ठेवणें बरें. दोघांनाही स्वातंत्र्य हवें होतें. त्यासाठीं लढा करण्याची दोघांनाही इच्छा होती. पण स्वातंत्र्यप्राय घटना जर युद्धकाळींच मिळाली तर ब्रिटनच्या बाजूनें युद्धांत सामील होऊन फॅसीझम्‌विरोधी युद्ध खेळावें व जागतिक क्रांतीच्या कार्यांत भाग घ्यावा ही नेहरूंची विचारसरणी आरंभापासून होती. अधिक नेमकें बोलायचें तर १९४०

जुलै ता. ३–७, १९४० पर्यंत दिल्लीस जी कॉंग्रेस वर्किंग कमिटीची बैठक भरली व जिनें प्रसिद्ध राष्ट्रीय मंत्रिमंडळाच्या मागणीचा ठराव मंजूर केला तिची ही पार्श्वभूमि होती. बदललेल्या आंतरराष्ट्रीय परिस्थितींत पेचप्रसंग सोडविणें अत्यवश्य आहे असें सांगून "ब्रिटननें हिंदुस्तानच्या स्वातंत्र्याची निसंदिग्ध घोषणा करावी व तिच्या बजावणीचें पहिलें पाऊल म्हणून येथें मध्य सरकारांत राष्ट्रीय मंत्रिमंडळ स्थापन करावें, तें मध्यकायदेमंडळांतील लोकनियुक्त सभासदांच्या विश्वासांतलें असावें, या मध्य मंत्रिमंडळास प्रांतिक मंत्रिमंडळांचें साहाय्य मिळावें" वगैरे या मागणीचें स्वरूप होतें. ही मागणी मान्य झाल्यास हिंदुस्तानच्या बचावाच्या कार्यांत कॉंग्रेस सर्व शक्तीनें भाग घेईल असेंही आश्वासन देण्यांत आलें होतें. दिल्लीस कॉंग्रेस वर्किंग कमिटीच्या बैठकीस गांधींजी हजर होते. त्यांनीं या योजनेस विरोध केला व कोणत्याही परिस्थितींत कॉंग्रेसनें युद्धांत सशस्त्र सहकार्य करूं नये असें आपलें मत दिलें. 'तुम्ही आंधळे झाला आहांत' असें धिक्कारानें बोलून राजगोपाळाचारी यांनीं गांधींचा विरोध मोडून काढला. नंतर ता. २७ व २८ जुलै रोजीं पुण्यास ऑ. इं. कॉं. कमिटीची बैठक भरून दिल्लीचा ठराव मंजूर झाला. तिला राजाजी, वल्लभभाई वगैरेनीं पाठिंबा दिला. कम्युनिस्ट, सोशॅलिस्ट वगैरेनीं विरोध केला. नेहरू यावेळीं तटस्थ राहिले हें आश्चर्य होतें !

गांधीजी पुण्यास गेले नाहींत. पण त्यांनीं कॉंग्रेसची मागणी मान्य न झाल्यास जो सत्याग्रह करावा लागेल त्याचें नेतृत्व सोडलें नव्हतें असें दिसतें. गांधींच्या युद्धविषयक धोरणाचें एक चमत्कारिक स्वरूप सर्व चालू

---

च्या जूनजुलैंत नेहरूंना अशा प्रकारच्या युद्धसहकार्याबद्दल विशेषसा उत्साह नव्हता. त्यावेळीं राजगोपाळाचारी व वल्लभभाई पटेल हेच या प्रकारच्या युद्धसहकार्यास अनुकूल होते. नेहरूंना युद्धाचे आरंभीं उत्साह होता. तो १९४० मध्यें कांहींसा मावळला. पुढें १९४२ मध्यें त्यांनीं पुन्हां ही भूमिका अतीशय उत्साहानें घेतली. त्यावेळीं पटेल हे गांधींच्या गटांत गेले. राष्ट्रीय सरकार स्थापून कॉंग्रेसनें युद्धांत भाग घ्यावा हें गांधींना कधींच मान्य नव्हतें. नेहरूंना या बाबतींत त्यांनीं नेहमीं विरोध केला. जून १९४२ पासून त्यांनीं हा विरोध थांबविला व कॉंग्रेसच्या राष्ट्रीय मंत्रिमंडळाच्या मागणीस उचलून धरलें.

युद्धकालांत असें असल्यांचें दिसून आलें आहे कीं काँग्रेसनें मध्यसत्ता घेऊन युद्धांत भाग घ्यावा या मागणीस त्यांचा नेहमीं विरोध आहे. उलट कॉंग्रेसनें आपलें हें मागणें बदललें नाहीं. पण मग राष्ट्रीय मंत्रिमंडळाच्या मागणीसाठीं काँग्रेसला सत्याग्रह करण्याची पाळी आली तर त्याचें नेतृत्व घेण्यास गांधींची नेहमीं तयारी आहे. प्रस्तुत मुद्दा असा कीं राष्ट्रीय मंत्रिमंडळाची मागणी ऑ. इं. काँ. कमिटींत करण्यांत येणार असें पाहून पुण्यास येण्याचें गांधींनीं नाकारलें. तथापि भावी सत्यग्रहाचे व म्हणून काँग्रेसचे नेते या नात्यानें त्यांनीं सत्याग्रहासंबंधानें जुलैअखेर सर्व भूमिका खुलासेवार मांडली. "मी काँग्रेसपासून दूर राहिलों तरी जनतेचा फार मोठा भाग मजकडे मार्गदर्शनासाठीं पाहतों आणि सत्याग्रहाचा आत्मा अखिल हिंदुस्तानांत जास्तींत जास्त प्रमाणांत मीच आहें अशी लोकांची श्रद्धा आहे" असें त्यांनीं तेव्हां लिहिलें. चरखा, खादी, वगैरे गोष्टींचा पुनरुच्चार त्यांनीं केलाच आहे. पण इंग्लंडवरील संकट दूर होईपर्यंत शक्य तों सत्याग्रह करूं नये. असेंही त्यांनीं या लेखांत जाहीर केलें. त्यावेळीं ब्रिटनवर जर्मन स्वारी होण्याचा संभव दिसत असून वैमानिक हल्लेही जोरांत सुरू होते. त्यास उद्देशून गांधींचें हें लिहिणें असावें पण कदाचित युद्ध संपेपर्यंत सत्याग्रह करूं नये अशीही त्यांची भूमिका तेव्हां असावी.

## ८ ऑगस्ट १९४०ची घोषणा

८ ऑगस्ट १९४० रोजीं व्हॉइसरॉयनीं एक नवी घोषणा केली. तींत (१) हिंदुस्तानच्या राष्ट्रीय जीवनांतील बलवान गटांना जी राज्यघटना मान्य होणार नाहीं अशा राज्यघटनेकडे हल्लींची आपली जबाबदारी ब्रिटिशसरकार सोपविणार नाहीं, तसेंच विरोधकावर अशी राज्यघटना सक्तीनें लादण्यालाही ब्रिटिश सरकार साहाय्य करणार नाहीं आणि (२) युद्ध संपताच हिंदुस्थानांतील प्रमुख घटकांचें प्रतिनिधि बोलावून नव्या घटनेच्या तयारीसाठीं त्यांची समिति बनविली जाईल, अशीं दोन आश्वासनें व्हाइसरॉयांनीं दिलीं. जिनांनीं काँग्रेसच्या राष्ट्रीय मंत्रिमंडळाच्या मागणीला विरोध केलाच होता. व्हाइसरॉयनीं ती फेटाळून लावली. व्हाइसरॉयच्या घोषणेनें जीना व मुस्लिम लीग यांचें समाधान झालें. आपल्या संमतीशिवाय नवी राज्यघटना निर्माण होणार नाहीं एवढेंच व्हाइसरॉयांचें आश्वासन त्यांना पुरेसें वाटलें.

व्हाइसरॉयांच्या या घोषणेची प्रत काँग्रेसचे अध्यक्ष मौलाना आझाद यांना आगाऊ पाठविण्यांत येऊन त्यांना व्हाइसरॉयनीं भेटीस बोलाविलें होतें. त्यानंतर दोघांत थोडा पत्रव्यवहार झाला. पण राष्ट्रीय मंत्रिमंडळाच्या पुण्याच्या मागणीचा अंश-सुद्धा व्हाइसरॉयांच्या घोषणेंत नसल्यानें मौ. आझाद यांनीं व्हाइसरॉयांची भेट घेण्याचें नाकारलें. सप्टेंबर ता. १३ व १४ रोजीं मुंबईस काँग्रेस वर्किंग कमिटीची बैठक भरली व तिनें व्हाइसरॉयघोषणेचा निषेध करून गांधींच्या नेतृत्वाखालीं सत्याग्रह करण्याचा निर्धार जाहीर केला. राष्ट्रीय मंत्रिमंडळाच्या मागणीचा ठराव रद्द झाला. त्या ठरावामुळें काँग्रेसमधून अहिंसेचें उच्चाटन झालें असा गैरसमज कोणाचा झाला असल्यास तो दूर करण्यासाठीं अहिंसा हीच काँग्रेसची निष्ठा होय असें जाहीर करण्यांत आलें. सत्याग्रह करायचाच, तरी पण ब्रिटिशांना त्यांच्या युद्ध-काळांत अडचणींत घालायचें नाहीं असेंही ठरावांत म्हटलें असून ब्रिटिशांनीं दाखविलेलें शौर्य व त्यांची सहनशक्ति यांची या ठरावांत प्रशंसा करण्यांत आली होती. सत्याग्रह करायचा तो फक्त काँग्रेससंघटनेचें स्वातंत्र्य सांभाळलें जावें इतकाच सौम्य प्रकारचा करण्यांत येईल असें बंधन ठरावांत घालण्यांत आलें होतें. मुंबईस १६ सप्टेंबर १९४० रोजीं ऑ. इं. काँ. कमिटीची बैठक भरून हा सौम्य सत्याग्रहाचा ठराव तिनें मंजूर केला.

# राजकारणाची कुचंबना ::: ::: [ ६ ]

## वैयक्तिक सत्याग्रह

मुंबईची ही ऑ. इं. काँ. कमिटीची बैठक संपल्यानंतर गांधींनीं थोड्या दिवसांनीं वैयक्तिक सत्याग्रहाचा कार्यक्रम जाहीर केला. पहिले सत्याग्रही म्हणून गांधींच्या आश्रमांतील एक तपस्वी श्री. विनोबा भावे यांची गांधींनीं निवड केली. ‘ युद्ध-विरोधी भाषणस्वातंत्र्यासाठीं सत्याग्रह ’ एवढेंच या सत्याग्रहाचें स्वरूप होतें.

कायदा मोडून भाषण करणें एवढाच कार्यक्रम होता. विनोबांनीं पहिलें सत्याग्रहाचें भाषण केलें त्यांत दोन मुद्दे होते. एक गांधींचा व दुसरा काँग्रेसचा. (१) युद्ध हें अहिंसेच्या दृष्टीनें गैर आहे, सशस्त्र प्रतिकार करूंच नये, तसेंच (२) काँग्रेसची राष्ट्रीय स्वातंत्र्याची मागणी सरकारनें मान्य केली नाहीं, अशी दोनही कारणें या वैयक्तिक सत्याग्रहाच्या समर्थनार्थ विनोबांनीं दिलीं. विनोबा जागोजाग भाषणें करीत करीत पायीं प्रवास करीत होते. कांहीं भाषणें झाल्यावर त्यांना अटक झाली. दुसरे सत्याग्रही म्हणून नेहरूंची निवड गांधी करणार होते. पण गोरखपूर येथें नेहरूंनीं केलेल्या एका भाषणाबद्दल त्यांना अटक करण्यांत येऊन त्यांचेवर खटला भरण्यांत आला व त्यांत नेहरूंना चार वर्षांची शिक्षा ठोठावण्यांत आली. त्यानंतर काँग्रेस वर्किंग कमिटीची बैठक भरली असतां काँग्रेसच्या मागणीसाठीं गांधींनीं उपोषण करावें काय, याची चर्चा झाली व सध्यां उपोषण करूं नये असें ठरविण्यांत आलें. तसेंच मध्यअसेंब्लींत नवें करवाढीचें बिल येणार होतें तें फेटाळून लावण्यासाठीं मध्यअसेंब्लींतच्या सभासदांनीं असेंब्लींत हजर राहावें असा ठराव करण्यांत आला. यामुळें करवाढबिल असेंब्लींत बहुमतानें नामंजूर झालें. पण सरकारनें तें हुकमी अधिकारानें मंजूर केलेंच.

नोव्हेंबरमध्यें ब्रिटनचे दुर्दैवी मुत्सद्दी चेंबर्लेन मृत्यु पावले व रूझवेल्ट हे तिसऱ्यांदा अमेरिकेचे अध्यक्ष म्हणून निवडून आले. गांधींच्या वैयक्तिक सत्याग्रहाचा घाणा धीरें धीरें फिरत होता. ही भावी स्वातंत्र्यलढ्याची पूर्वतयारी होती कीं लढ्यासाठीं उतावीळ झालेल्या जनतेचा असंतोष तुंबूं नये म्हणून त्यास वाट काढून देण्यांत येत होती हें सांगणें कठीण होतें. यापासून अखेर राष्ट्रीय मंत्रिमंडळ कसें स्थापन होणार हेंही कोणी सांगूं शकत नव्हता. हा वैयक्तिक सत्याग्रह पांच वर्षे चालेल असेंही सांगण्यांत येई. देशांतील बहुतेक कायदे मंडळांतले काँग्रेस सभासद या वैयक्तिक सत्याग्रहासाठीं निवडण्याचें गांधींनीं ठरविलें. त्यांच्या प्रांतिक काँग्रेसतर्फे याद्या होत. त्या गांधींच्याकडे मंजुरीस जात. प्रत्येकाच्या अहिंसानिष्ठेची व सूतकतृत्वाची चौकशी होई. बाहेर जहालपणाचा प्रसार करणारे जे कार्यकर्ते असत त्यांचा तो प्रचार थांबविण्याकरितां प्रांतिक काँग्रेसमार्फत वैयक्तिक सत्याग्रहासाठीं त्यांची निवड करण्यांत येई. पण त्यांची अहिंसानिष्ठा पुरेशी नाहीं म्हणून गांधी त्या सत्याग्रहीचा स्वीकार करीत नसत. यामुळें प्रांतिक काँग्रेस

अधिकाऱ्यांचा पुष्कळदां हिरमोड व फजिती होई. कॉंग्रेस कमिट्यांच्या निवडणुका अजीबात बंदच झाल्या व सत्याग्रहनिष्ठा ज्यांची दृढ असेल त्यांनींच कॉंग्रेस कमिट्यांवर राहावें असा आदेश गांधींनीं दिला. यामुळें अनेकांची सत्याग्रहनिष्ठा अकस्मात उतूं आली व त्यांना कॉंग्रेस कमिट्या मिळाल्या. एकांतिक व समाजवादी मतांच्या कार्यकर्त्यांपासून या कॉंग्रेस कमिट्या सोवळ्या व सुरक्षित कशा राखाव्या एवढीच काळजी आतां गांधीवाद्यांना उरलेली होती.

हळूंहळूं १९४१ साल उजाडलें व हिंदी राजकारणांत फारशी प्रगति न होता मावळलें. महायुद्धाचे दृष्टीनेंही १९४१ साल फार वाईट गेलें. ग्रीस, क्रीट यांचा जर्मनीनें पाडाव केला आणि सगळीं बाल्कन राष्ट्रें जर्मनीच्या वर्चस्वाखालीं गेलीं. १९४१च्या जूनमध्यें जर्मनीनें रशियावर चढाई सुरू केली आणि डिसेंबरमध्यें जपाननें अमेरिका व ब्रिटन यांजशीं युद्ध सुरू केलें. यामुळें युद्धाचा व हिंदी राजकारणाचा रंग बराच पालटला. पण एकंदरीनें १९४१ साल कुचंबणुकींतच गेले. जिनांची प्रतिगामी वृत्ति अधिकच ताठर होत गेली. हिंदुसभेनें १९४० च्या डिसेंबरमध्यें मदुरा येथें ठराव करून 'महायुद्धानंतर ताबडतोब वसाहातीचें स्वराज्य-देण्याचें आश्वासन मार्च १९४१चे अखेरपर्यंत न मिळाल्यास सत्याग्रह करण्याची' धमकी दिली. पण सरकारनें मुळींच आश्वासन दिलें नाहीं. आणि हिंदुसभेनें सत्याग्रह केला नाहीं. उलट "लवकरच प्रांतिक निवडणुकी होण्याचा संभव दिसला तेंव्हां कांहींतरी 'निवडणूकधूम' ( इलेक्शनस्टंट् ) हवी म्हणून हा सत्याग्रह ठराव केला" असा 'प्रांजळ' खुलासा डॉ. मुंजे यांनीं केला. गांधी व नेहरू यांच्या नेतृत्वाखालीं मात्र कॉंग्रेसला इतकी लाजिरवाणी भूमिका कधींच घ्यावी लागली नाहीं. कॉंग्रेसचा युद्धविषयक सिद्धांत अत्यंत शास्त्रशुद्ध व इतिहासपरिपूत होता. गांधींची अहिंसेची भूमिका अव्यवहार्य होती व कॉंग्रेस पुढाऱ्यांच्या धरसोडी वृत्तीमुळें संघटना व बलवर्धन झालें नाहीं. तथापि कॉंग्रेसची भूमिका अतिशय श्रेष्ठ दर्जाची होती. हिंदुसभेइतकी नैतिक त्रेधा कॉंग्रेसनें कधींच करून घेतली नाहीं.

## आणखी दोन घटना

हिंदी राजकारणाच्या दृष्टीनें १९४१ सालांतल्या आणखी दोन मोठ्या घटना म्हणजे ( १ ) सप्रू–परिषद व ( २ ) मध्यसरकारच्या कार्यकारी मंडळाची वाढ या होत.

मार्चच्या १५ तारखेस मुंबईस सप्रू परिषद भरली. तिलाच अपक्ष परिषद असेंही म्हणतात. कोणत्याही राजकीय पक्षाच्या पुढाऱ्यास या परिषदेस बोलविण्यांत आलें नव्हतें. व्यक्तिशः प्रतिष्ठित मुत्सद्दी हजर होते. सप्रू अध्यक्ष असून सप्रू व जगदीश प्रसाद हे निमंत्रक होते. (१) मध्य सरकारचें सगळें कार्यकारी मंडळ स्वदेशी सभासदांचें असावें, (२) तें संयुक्त जबाबदारीचें असावें आणि (३) तें बादशहाला म्हणजे व्हाइसरॉयला जबाबदार असावें अशी मागणी या परिषदेनें केली. जिनांनीं या परिषदेच्या मागणीला कसून विरोध केला. पार्लमेंटांत भारतमंत्र्यांनींही ती धुडकावून लावली. पार्लमेंटांतील वादविवाद व ब्रिटिश मुत्सद्यांच्या कांहीं घोषणा यावरून, 'येथें जातीय ऐक्य झालें तरीही जमाबंदी व राजकीय हीं खातीं हिंदी लोकांना मिळणार नाहींत' असें सरकारचें धोरण असल्याबद्दल सप्रूंची खात्री पटली. तसेंच काँग्रेस व लीग यांची तडजोड न होण्यास जिनांचा हटवादच कारण आहे अशीही सप्रूंची खात्री झाली. मद्रासेस भरलेल्या मुस्लिम लीग परिषदेंत जिना फारच पुढें गेले. "युगोस्लाव्हिया जिंकल्यावर जर्मनीनें क्रोॲशिआला जसें 'स्वातंत्र्य' दिलें तसें आम्हांला ब्रिटननें पाकिस्तान द्यावें, तुम्ही पाकिस्तान देत नसला तर दुसऱ्या कोणाकडून घेतलें असतां चालेल काय?" असा स्पष्ट सवाल जिनांनीं केला. पण जिनांची ही दमबाजी शौर्याची नव्हती, तर भेकडपणाची होती. ब्रिटिश सरकारनें तिला भीक घातली नाहीं इतकेंच नव्हे तर जिनांनीं असें कांहीं भाषण केलें याची दखलही घेतली नाहीं.

जुलै १९४१ मध्यें व्हाइसरॉयनीं आपल्या कार्यकारी मंडळाची वाढ केली. त्यावेळीं त्यांनीं जिनांकडे लीगचे प्रतिनिधि मागितले. पण 'एकंदर सभासद किती नेमणार, कोण कोणास नेमणार व कोणास काय कामें देणार तें आधीं सांगा मग प्रतिनिधि देण्याची बात' असें उत्तर जिनांनीं व्हाइसरॉयना कळविलें तसेंच काँग्रेस कार्यकारी मंडळांत आल्यास मुस्लिम लीगला ५० टक्के सभासद द्यावे, सगळें मुसलमान लीगचेच असावे आणि काँग्रेस न आल्यास लीगला बहुमत मिळावें अशी मागणीही जिनांनीं व्हाइसरॉयकडे केली. युद्धाचे आरंभीं व्हाइसरॉयनीं कार्यकारीमंडळाची वाढ करण्याचे ठरविलें त्यावेळीं जिनांनीं त्यांना हेंच उत्तर दिलें होतें. त्याचीच पुनरुक्ति त्यांनीं यावेळींही केली. पण व्हाइसरॉयनीं तिकडे लक्षच दिलें नाहीं. लीगमधील सभासद सर सुलतान अहमद यांस व्हाइसरॉयनीं

कार्यकारी मंडळांत घेतलें. तेव्हां जिनांनीं त्यांना शिस्तभंगादाखल लीगमधून हाकून लावलें व व्हाइसरॉयवर खूप मनगटें चावलीं. पण लढ्याचा दम जिनांच्या अंगीं नसून ते ब्रिटिशांच्या संरक्षणावर विसंबून आहेत ही त्यांची कळ व्हाइसरॉयना माहित होती. आणि व्हाइसरॉय आपली कळ दाबून आपणांस नाचवितात हें जिनांनाही माहीत आहे. त्यामुळें ते रुसण्याफुगण्यांतही संयम दाखवितात.

## अटलांटिक जाहीरनामा

जून १९४१ मध्यें रशियाशीं जर्मनीनें युद्ध सुरू केलें त्यामुळें ब्रटिशांना जरा हायसें वाटलें. पण उलट डिसेंबरमध्यें जपाननें इंग्लंड व अमेरिका यांच्याशीं युद्ध पुकारून पूर्वी कोणत्याही युद्धांत झालें नसेल एवढें प्रचंड नुकसान इंग्लंड व अमेरिका यांचें केलें. या दोहोंच्या दरम्यान म्हणजे ता. १४ ऑगस्ट १९४१ रोजीं रूझवेल्ट व चर्चिल यांनीं अटलांटिक महासागरांत ‘ प्रिन्स ऑफ् वेल्स ’ या जहाजावर एकत्र येवून सुप्रसिद्ध ‘ अटलांटिक जाहीरनामा ’ जगासमोर मांडला. ‘ तुमचे युद्धाचे हेतु काय तें सांगा ’ अशी मागणी युद्धाचे आरंभापासून सगळ्या जगाकडून करण्यांत येत होती. तिला हें उत्तर होतें. सर्व राष्ट्रांना स्वयंनिर्णयाचें तत्त्व लागू करण्यात येईल असें या जाहीरनाम्यांत म्हटलें होतें. हा जाहिरनामा हिंदुस्तानलाही लागू करण्यांत येईल असें ब्रिटिश मजूर पक्षीय मंत्री मेजर ॲटली यांनीं तात्काळ अभिवचन दिलें. पण अटलांटिक सफरीहून चर्चिल परत आल्यावर त्यांनीं ब्रिटिश साम्राज्याला हा जाहीरनामा लागू करण्यांत येणार नाहीं, हिंदुस्थान-साठीं ८ ऑगस्ट १९४०ची घोषणाच पुरेशी आहे असा पुकारा केला. तेव्हां हिंदुस्थानांत निराशेची प्रचंड लाट उसळली. ब्रिटिशविरोधी भावना अधिकच तीव्र झाली. ज्या ‘ प्रिन्स आफ् वेल्स ’ जहाजावर हा ‘ अटलांटिक जाहीरनामा ’ तयार करण्यांत आला तें जहाज पुढें जपाननें ब्रिटनशीं युद्ध सुरू केल्यापासून चारच दिवसांत सिंगापूरजवळ बुडविलें, तेव्हां हिंदी लोकांत कोणती भावना पसरली असेल याची कल्पनाच केलेली बरी !

## नेहरूंचें हृदयसंशोधन

१९४१ चे उत्तरार्धांत वैयक्तिक सत्याग्रह गांधींनीं चालू ठेवला होता, तरी लोकांचा त्याबाबतचा उत्साह पूर्ण मावळला. यांतून मोठ्या सत्याग्रहाची उत्पत्ति

होणारच नाहीं, स्वतां गांधी ती होवूं देणारच नाहींत, अशी सर्वांची खात्री झाली. 'मला सरकार फार काळ तुरुंगांत ठेवूं शकणार नाहीं' असें गांधींनीं मागें एकदां लिहिलें होतें व वैयक्तिक सत्याग्रहाचें नेतृत्व गांधींनीं जाहीरपणें चालविलें असतां सरकारनें नेहरूंना तुरुंगांत टाकलें तरी गांधींना टाकलें नाहीं. चर्चिल पंतप्रधान असतांही ते गांधींना अडकवीत नाहींत याचें लोकांना आश्चर्य वाटलें. यामुळें गांधींच्या खादी व अहिंसा यांवर फारसा विश्वास नसणाऱ्यांनाही गांधींचें नेतृत्व कांहींसें अमोघ वाटल्यावांचून राहिलें नाहीं. वैयक्तिक सत्याग्रह निरुपद्रवी आहे यास्तव काँग्रेसबंद्यांना सोडून द्यावें अशी मागणी चोहोकडून करण्यांत येत होती. गृहमंत्री मॅक्स्वेल पुनः पुनः या मागणीस नकार देत होता. पण अकस्मात डिसेंबरच्या आरंभीं सरकारचा नूर फिरला व ता. ४ डिसेंबर रोजीं पं. नेहरू, आझाद, वर्किंग कमिटीचे इतर सभासद यांना सोडण्यांत आलें व निव्वळ 'लाक्षणिक सत्याग्रह' केलेले जे कार्यकर्ते त्यांनाही सरकारनें हळूहळू सोडून दिलें. नेहरूंच्या सुटकेनंतर अवघ्या तीनच दिवसांत जपाननें इंग्लंड–अमेरिकेशीं युद्ध सुरू केलें, ही घटना लक्षात घेता इंग्लंडला जपानच्या धोरणाची कांहीं तरी अटकळ येवूनच हिंदी सरकारला काँग्रेसबंदी सोडण्यास ब्रिटिश सरकारनें भाग पाडलें असावें असें वाटतें. त्याचा इष्ट तो परिणाम झाल्यावांचून राहिला नाहीं. पं. नेहरूंच्या मनावर बदललेल्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा विशेष परिणाम झाला. स्टालिनच्या राजकारणाशीं नेहरू पूर्णपणें समरस कधींच झाले नाहींत, तथापि सोव्हिअट समाजरचनेबद्दल त्यांना प्रेम होतें म्हणून जर्मन स्वारीमुळें रशिया संकटांत आला आहे ही गोष्ट त्यांच्या मनाचा दाह करूं लागली. जपाननें अँग्लो–अमेरिकन राष्ट्रांवर युद्ध पुकारल्यामुळें चीनला यापुढें या राष्ट्रांची मदत मिळेल अशीही आशा त्यांना वाटली. जपानच्या हल्ल्यामुळें हिंदुस्थानला प्रत्यक्ष धोका आला हेंही त्यांच्या लक्षांत आलें. आणि काँग्रेसनें पूर्ण असहकाराचें धोरण सोडून राष्ट्ररक्षणाची जबाबदारी घेण्याच्या उद्योगास लागावें असे विचार त्यांच्या मनांत येवूं लागले.

जानेवारी १९४२ च्या आरंभीं बार्डोलीस कॉंग्रेस वर्किंग कमिटीची बैठक भरली. मागें नेहरूंच्या अटकेनंतर ताबडतोब जी वर्किंग कमिटीची बैठक भरली तीनंतर वर्किंग कमिटीचे सभासद, ऑ. इं. कॉं. कमिटीचे सभासद, कायदे मंडळांतील कॉंग्रेस पक्षीय सभासद व इतर अनेक कार्यकर्ते मिळून सुमारें २५ हजार कार्यकर्ते तुरुंगांत गेले होते. दरम्यान १४ महिने कॉं. वर्किंग कमिटीची बैठक भरलीच नाहीं. बार्डोलीस १९४२ च्या जानेवारीचे आरंभीं ही बैठक भरून १४ महिन्यांचा आढावा घेण्यांत आला.

## सुकाणूं फिरलें

'चीन व रशिया संकटांत असतां त्यांच्या दोस्तांच्या म्हणजे ब्रिटनच्या विरुद्ध सत्याग्रह चालू ठेवणें मला पटत नाहीं' असें म्हणून नेहरूंनीं वैयक्तिक सत्याग्रह चालू ठेवण्यास विरोध केला. त्याप्रमाणें तो गांधींनीं थांबविण्याचें मान्य केलें. तसेंच राष्ट्ररक्षणासाठीं सशस्त्र होऊन आम्ही लढणार असें नेहरू व आझाद यांनीं स्पष्ट सांगितलें. आणि गांधींना नेतेपदावरून, त्यांच्याच विनंतीप्रमाणें, दूर करण्यांत आलें. पण राष्ट्रीय मंत्रिमंडळाची मागणी मात्र पुन्हा मांडण्यांत आली नाहीं. पूर्ण स्वतंत्र राष्ट्र या नात्यानेंच आम्ही राष्ट्रसंरक्षणाचे कामीं भाग घेऊं शकतों असें मत कॉं. वर्किंग कमिटीनें आपल्या ठरावांत नमूद केलें. कॉं वर्किंगकमिटीच्या ठरावांतील महत्त्वाचा भाग स्वयंसेवकसंघटना काढण्यासंबंधींचा होता. पण दोन वर्षांपूर्वी केलेला ठराव जसा कागदावर राहिला तसाच या वेळचा ठरावही कागदावरच राहिला. यांतील मर्म असें होतें कीं, गांधींना नेतृपदावरून दूर करण्यांत आलें तरी कॉंग्रेसचे सर्व पदाधिकारी सत्य–अहिंसा–खादीवालेच होते. त्यांना सशस्त्र प्रतिकाराची अथवा निःशस्त्र प्रतिकाराची कोणतीच संघटना करायची नव्हती. अर्धवट गांधीवादी असलेले जे इतर कार्यकर्ते होते ते संघटित नव्हते, आपसांत भांडत होते. कॉंग्रेसमधला एक लहानसा गट स्वयंसेवकसंघटना करीत होता. पण त्यावर पूर्ण गांधीवादी व निमगांधीवादी यांची पाळत होती. 'गांधींनीं वीस वर्षें पोसलेलें व आतां फळाला येऊं लागलेलें अहिंसा तत्त्व हे स्वयंसेवक-

संघटनावाले नासून टाकतील' म्हणून गांधीगट हा अस्वस्थ होता व कॉंग्रेससंघटना पकडून पाहरा करीत बसला होता. यामुळें जोमदार संघटना झाली नाहीं, बार्डोली ठरावाचा संदेश–जो कांहीं असेल तो–शेतकरी-कामकऱ्यापर्यंत पोचला नाहीं. कॉं. वर्किंग कमिटीची बैठक झाल्यावर ऑ. इ. कॉं. कमिटीची बैठक वर्ध्यास भरली. तिनें बार्डोलीचा ठराव मंजूर केला; आणि 'आमचे महात्माजी दूर गेल्यावर आतां नेहरूप्रभृति काय पराक्रम करतात पाहूं' असें म्हणून कॉंग्रेस संघटना मांडीखालीं असलेले गांधीवादी कार्यकर्ते मिस्किलपणें राजकारणाकडे पाहात स्वस्थ राहिले. गांधी कॉंग्रेसपासून दूर झाले असतां आपण अधिकारपदावर राहणें हें कपट आहे, हा अप्रामाणिकपणा आहे ही गोष्ट कांहीं यांना सत्यअहिंसेच्या धुंदींत सुचली नाहीं. आणि नेहरूंनींही ऑ. इं. कॉं. कमिटी आटोपल्यावर स्वयंसेवकसंघटनेसंबंधानें फारसें कांहीं केलें नाहीं. मुंबईस पी. व्ही. बी. स्थापन झाली. पण त्या संघटनेच्या चालकांना ही संघटना कशासाठीं करायची हेंच ठाऊक नव्हतें हें त्यांच्या भव्य लवाजम्यावरून दिसून येत होतें.

## चँग कै शेकचा संदेश

तथापि गांधींना बाजूस सारून परचक्रास सशस्त्र प्रतिकार करण्याची तयारी कॉंग्रेसनें ठरावांत दाखविली एवढ्यामुळेंही १९४२ सालची सुरवात चांगली झाली असें सर्वांस वाटलें. सर्व जगभर पं. नेहरूंच्या या नव्या धोरणाची वाहवा झाली व १९४२ हें वर्ष हिंदुस्तानच्या इतिहासांत गाजणार अशी सर्वांची खात्री झाली. आणि खरोखर अनपेक्षित प्रकारें कांहीं होईना तें तसें गाजलेंही. सिंगापूरचा पाडाव, हिंदुस्तानास चँगकैशेकची भेट, क्रिप्सयोजनेचा खेळखंडोबा, नंतर तापूं लागलेलें वातावरण, ८ ऑगस्टचा कॉंग्रेसचा ठराव आणि नंतरचें अभूतपूर्व 'बंड' या सर्वांनीं हें १९४२ साल खरोखरच गाजलें. असो. फेब्रुवारींत चँगकैशेक व त्यांच्या पत्नी यांनीं हिंदुस्थानास व्हाइसरॉयचे पाहुणे म्हणून भेट दिली. दिल्लीस व कलकत्त्यास ते अनेक पुढाऱ्यांना भेटले. गांधी, नेहरू, आझाद, जिना या सर्वांच्या त्यांनीं भेटी घेतल्या. कॉंग्रेसच्या मागणीबद्दल त्यांनीं उघडउघड सहानुभूति दाखविली आणि हिंदुस्थान सोडून जातांना हिंदी स्वातंत्र्याची मागणी मान्य करण्याबद्दल ब्रिटिश सरकारला त्यांनीं खडखडीत संदेश दिला. आपल्या संदेशाच्या शेवटीं चँग कै शेक म्हणतात, "शेवटीं मीं अतिशय कळकळीनें अशी आशा व्यक्त करतों कीं आमचे

मित्र जे ब्रिटिश सरकार त्यांनीं हिंदी लोकांकडून कोणतीही मागणी येण्याची वाट न पाहतां हिंदी लोकांना खरी सत्ता देऊन टाकावी. त्यामुळें हिंदी लोकांना भौतिक व आत्मिक शक्ति विकसित करतां येतील. आणि युद्धसहकार्य म्हणजे केवळ फॅसिस्टविरोधी युद्धांत भाग घेणेंच नव्हे तर आपल्या स्वातंत्र्यलढ्यांत एका नव्या मनूचा उदय घडवून आणणें होय अशीही हिंदी लोकांची खात्री पटेल. मला भोवतालीं जी परिस्थिति दिसते तीवरून माझें मत असें झालें आहे कीं, हें धोरण अतिशय शहाणपणाचें ठरणार असून ब्रिटिश साम्राज्याचा त्यांत गौरवच होईल." या संदेशांतील मर्म महत्त्वाचें होतें. हिंदी लोकांकडून एकजुटीची मागणी येत नाहीं ही सबब ब्रिटननें न सांगता युद्धासाठीं व युद्धकाळींच हिंदी लोकांना सता द्यावी अशी चँगची ही मागणी होती. सिंगापूरचा पाडाव ता. १५ फेब्रुवारीस झाला त्यावेळीं चँग कै शेक हिंदुस्तानांतच होता. त्यानंतर ६ च दिवसांनीं चँगनें हा संदेश दिला. पांच वर्षेपर्यंत जपानशीं एकाकीपणें लढणारा वीर म्हणून चँगचें आंतरराष्ट्रीय वजन फार मोठें होतें. आणि जपाननें अँग्लो-अमेरिकन राष्ट्रांविरुद्ध युद्ध सुरू करण्यापूर्वी या राष्ट्रांनीं चँगच्या इषाऱ्यास न जुमानता जपानलाच अनेक प्रकारें साहाय्य केलें असून सिंगापूरचा पाडाव हें त्याच मूर्खपणाचें प्रायश्चित्त होतें. तेव्हां या वेळच्या चँग कै शेकच्या इषाऱ्याचें महत्त्व ब्रिटिश मुत्सद्यांना विषेश वाटलें असल्यास नवल नाहीं. लंडन टाइम्सनें ता. २८ फेब्रुवारीच्या अंकांत 'हिंदुस्तान व चीन' या मथळ्याचा लेख लिहून चँगच्या हिंदुस्तानभेटीचा उल्लेख केला, अटलांटिक घोषणा निरुपयोगी आहे असें स्पष्ट मत दिलें, आणि हिंदुस्तान व आशिया याबाबतचे आपलें जुनें धोरण सोडून युद्धानंतर हिंदुस्तानला समान भागीदारीचा दर्जा दिला पाहिजे असें लिहिलें.

## क्रिप्स आले

या सर्व समुद्रमंथनांतून सुप्रसिद्ध क्रिप्सयोजना बाहेर आली. ७ मार्च रोजीं रंगूनचा पाडाव झाल्यानंतर चार दिवसांनीं म्हणजे ता. ११ मार्च १९४२ रोजीं ब्रिटिश पंतप्रधान चर्चिल यांनीं पार्लमेंटांत भाषण करून सर स्टॅफर्ड क्रिप्स यांना एका नव्या योजनेस हिंदी लोकांची संमति मिळविण्यासाठीं पाठविण्यांत येईल असें जाहीर केलें. ही योजना कोणती तें चर्चिल यांनीं सांगण्याचें नाकारलें. पण ती ८ ऑगस्ट १९४० च्या घोषणेच्या भूमिकेवरच आधारलेली असेल अशी खूण त्यांनीं सांगि-

तली. यामुळें हिंदी लोकांस तीसंबंधानें उत्साह वाटण्याचें कांहींच कारण दिसेना. पण सर स्टॅफर्ड क्रिप्स हे हिंदुस्तानचे कैवारी, सोशॅलिस्ट व पं. नेहरूंचे मित्र असून स्वतां ब्रिटिश मंत्रिमंडळांत होते. त्यांना ती योजना मान्य होती अर्थात ती पुरोगामी असण्याचा संभव विशेष होता. चर्चिल प्रतिगामी खरे, पण धाडशी व दूरदृष्टीचे असून परिस्थिति विलक्षण बदलली होती. तेव्हां त्यांनाही पुरोगामी योजना मान्य झाली असेल अशी अटकळ अनेकांनीं मनांतल्या मनांत बांधली होती. क्रिप्स हे हिंदुस्तानास येण्यास विलंब लावतील अशी प्रथम भीति वाटली, पण तीही खरी ठरली नाहीं. ता. २२ मार्च रोजीं क्रिप्स यांनीं दिल्ली गाठली. आल्याबरोबर वार्ताहरांच्या जाहीर बैठकी व प्रमुख पुढाऱ्यांच्या खाजगी मुलाखती यांचा सपाटा त्यांनीं चालविला. ते अगदीं उजाडल्यापासून रोज रात्रीं १० वाजता व्हाइसरॉयला भेटेपर्यंत अव्याहत मुलाखती, भेटी, चर्चा यांत गुंतलेले असत. अनेक पुढाऱ्यांना योजना दाखविण्यांत आली. पण उत्साह कोणींच दाखविला नाहीं. अखेरीस २९ मार्च रोजीं सर स्टॅफर्ड क्रिप्स यांनीं आपली योजना वार्ताहर-परिषदेंत जाहीर केली, तेव्हां भ्रमाचा भोपळा फुटला. या योजनेंत युद्धानंतर पूर्ण स्वातंत्र्य सगळ्या देशालाच नव्हे तर प्रांतांनाही देण्यांत येऊन कलिंगडाप्रमाणें हिंदुस्तानच्या फोडी करून टाकण्याचें ठरविलें होतें. उलट वर्तमानकाळासाठीं कोणताही फरक होणार नव्हता.

## क्रिप्स-योजनेचा गोषवारा

सारांशरूपानें ही योजना पुढीलप्रमाणें सांगता येईल. युद्धोत्तर योजना व युद्धकालीन योजना असे हिचे दोन भाग होते. चालू युद्धानंतर हिंदुस्तानला ब्रिटिश राष्ट्रसंघांत ब्रिटन व इतर स्वायत्त वसाहती यांच्या बरोबरीचा दर्जा देण्यांत येईल. तो दर्जा निर्माण होण्याची पद्धति अशी:—रणांगणावरील लढाई थावतांच ब्रिटिश हिंदुस्तानांतील प्रांतांच्या खालच्या सभागृहांची म्हणजे लेजिस्लेटिव्ह असेंब्लींची निवडणूक होईल. या निवडून आलेल्या सभासदांचा एकच एक मत-दारसंघ कल्पिला जाईल. या सर्व सभासदांची संख्या हिंदुस्तानांतील लोकसंख्येशीं ज्या प्रमाणांत असेल तेंच प्रमाण संस्थानिकांचे प्रतिनिधि आणि संस्थानांची लोकसंख्या यांच्यामध्यें राहावें इतके संस्थानिकांचे प्रतिनिधि या मतदारसंघांत

सामील करून घ्यावें. नंतर या मतदारसंघानें प्रांतवार व संस्थानवार आपापल्या प्रतिनिधि संख्येच्या दशांश ( आणि अर्थात् सर्वांनी मिळून आपल्या एकूण संख्येच्या दशांश ) माणसें निवडावीं. हें नवें प्रतिनिधिमंडळ म्हणजे भावि हिंदुस्तानची घटनासमिति. या घटनासमितीनें अखिल हिंदुस्तानची घटना बनवावी. मग तिला ब्रिटन मान्यता देईल आणि त्या घटनासमितीशीं बरोबरीच्या नात्यानें तह करील. तहांत अल्पसंख्याकांच्या रक्षणाची तरतूद करण्यांत येईल. पण ब्रिटिश राष्ट्रसंघांतील घटकांशीं कोणीं कोणतें नातें ठेवावें हें तहांत सांगितलें जाणार नाहीं. ज्या प्रांतांना या घटनासमितीच्या योजनेंत सामील व्हावयाचें नसेल त्यांना अलग राहता येईल. त्यांच्याशीं मग बरोबरीच्या नात्यानें ब्रिटन वेगळे तह करील. संस्थानिकांच्या तहनाम्यांत फरक करण्यांत येतील. संस्थानांनाही घटनासमितीनें केलेल्या योजनेंत सामील न होण्याची मोकळीक राहील. ही झाली युद्धोत्तर योजना. युद्धकाळांत मात्र घटनात्मक बदल कोणतेही करण्यांत येणार नाहींत. संरक्षणसत्ता ब्रिटिश सरकारच्याच हातीं राहील. कार्यकारी मंडळांत हिंदी पुढारी घेण्यांत येतील. युद्धकार्यातील अनेक जुजबी खातीं हिंदी मंत्र्यांना देण्यांत येतील असा खुलासा पुढें क्रिप्स यांनीं केला.

## योजनेचे गुणदोष

क्रिप्स यांची ही योजना सगळीच्या सगळी येथें, दगडावर काच आपटून फुटावी त्याप्रमाणें, लोकमतावर आपटून फुटली. कोणत्याही पक्षानें ती मान्य केली नाहीं. यामुळें ही योजना आम्ही रद्द समजत आहों असें क्रिप्सनींही सांगितलें.पण त्यानंतर या योजनेंतील तात्त्विक भूमिका अजून कायम असून युद्धानंतर ती आम्ही मान्य करायला तयार आहों असें ब्रिटिश मंत्रिमंडळानें अनेकवार सांगितलें आहे. या योजनेच्या युद्धोत्तर भागांत गुणही आहेत व दोषही आहेत. युद्ध कसें संपणार व त्याच्या शेवटीं कशी परिस्थिति असणार आहे हें कोणासच माहीत नाहीं. तथापि कांहीं विशिष्ट परिस्थितींत लोकशाहीच्या, शांततेच्या व मतप्रसाराच्या पद्धतीनें येथील राजकीय पुनर्घटनेचा प्रश्न मिटायचा असेल तर क्रिप्सयोजनेंतील युद्धोत्तर भाग स्वीकारावा लागेल असें वाटतें. क्रिप्सयोजना कॉंग्रेसनें फेटाळली ती युद्धोत्तर विभागामुळें नव्हे, तर युद्धकालीन विभागामुळें. कॉंग्रेसचा १४ सप्टेंबरचा जाहीरनामा पाहिला तर असें दिसून येईल कीं स्वातंत्र्य आणि लोकशाही यांचें युद्धोत्तर कालासंबंधाचें

नुसतें आश्वासन कॉंग्रेसनें मागितलें नाहीं तर तें आश्वासन प्रामाणिक असेल यासंबंधानें खात्री पटण्याइतकी ज्यास्तींत जास्त मध्यसत्ता आम्हांला युद्धकालीं द्या अशी मागणी कॉंग्रेसनें केली होती. खुद्द सप्रूसारख्या नेमस्तानेंही पूर्ण स्वदेशी कार्यकारी मंडळ व त्याची संयुक्त जबाबदारी हीं तत्त्वें मागितलीं. याचा अर्थ याहून कांहींही कमी घेऊन राष्ट्राचें समाधान होणें शक्य नाहीं असा होता. पण क्रिप्सनीं संयुक्त जबाबदारीचें तत्त्व मान्य करण्याचें नाकारलें. त्यांनीं पूर्ण स्वदेशी कार्यकारी मंडळ करण्यासंबंधानें अर्धवट आभास निर्माण केला तरी त्याबद्दलही खात्री नव्हती. *

अशा या मध्यसत्तेंत कोणीही शिरलें तरी युद्धकार्यावर त्याला नियंत्रण ठेवणें शक्य नव्हतें. युद्ध आमचें आहे आपण आपल्या स्वातंत्र्यासाठीं लढतों आहों असें सांगून जनतेला रणोत्साही करणें शक्य नव्हतें. युद्धानंतर जें स्वातंत्र्य मिळणार होतें त्यांत हिंदुस्थानच्या चिरफळ्या होण्याचा धाक असून शरीरांत साखळलेल्या रक्तानें जागोजाग गळवें व्हावीं त्याप्रमाणें अनियंत्रित सत्तेचीं व ब्रिटिशांचीं गुलाम असलेलीं संस्थानें 'स्वतंत्र' प्रांतांच्या किंवा 'स्वतंत्र' राष्ट्राच्या शरीरभर विखुरलेलीं राहणारच होतीं. त्यामुळें सगळ्या हिंदुस्तानभर ब्रिटिश सैन्याचे कळप जागोजाग स्वतंत्र हिंदुस्तानच्या छातीवर बंदूक रोखून राहणार होते. हें स्वातंत्र्य नव्हे तर त्याची थट्टा होती. पण ही युद्धोतर काळची योजना

---

* पुढें १९४२च्या जुलैमध्यें कार्यकारी मंडळाची दुसरी वाढ करतांना राजकीय व जमाबंदी हीं खातीं युरोपीय सभासदांकडे ठेवण्यांत आलीं. शिवाय वाहतूकखातें हिंदी सभासदाकडे देतांना त्याचा युद्धवाहतूक हा विभाग वेगळा काढून तो सर एडवर्ड बेंथॉल या बंगालच्या युरोपीयन व्यापारी प्रतिनिधींकडे देण्यांत आला. हे तीन युरोपीय समासद तीन महत्त्वाच्या खात्यावर कां ठेवलें याचें समर्थन करतांना "युद्धकाळीं जेवढी कार्यक्षमता हिंदुस्थान सरकारला हवी आहे तेवढी हल्लींच्या कार्यकारी मंडळामुळें मिळते आहे" असें उत्तर भारतमंत्री अमेरी यांनीं ता. २२ ऑक्टोबर रोजीं पार्लमेंटांत दिलें. यावरून कार्यक्षमतेच्या सबबीखालीं पूर्ण स्वदेशी कार्यकारी मंडळ नेमायचेंच नाहीं असें सरकारचें निश्चित धोरण नेहमींच होतें व क्रिप्सयोजनेंतही पूर्ण स्वदेशी कार्यकारी मंडळ निर्माण व्हावयाचें नव्हतें असें दिसून येतें.

अतिशय घातक असूनही क्रिप्स–वाटाघाटी ज्या फसल्या त्या त्यामुळें फसल्या नाहींत. युद्धानंतर कोणती योजना मिळणार हा मुद्दा महत्त्वाचा नव्हताच. युद्धास एवढें अक्राळविक्राळ स्वरूप आलें होतें कीं युद्ध संपेल कसें व युद्धोतर काळ येणार कसा हें कोणीच सांगूं शकत नव्हता. ब्रिटिशांचें सामर्थ्य टिकलें तरच त्यांच्या आश्वासनाला कांहीं किंमत होती. गांधींनीं ' बुडत्या बँकेवरील पुढल्या तारखेचा चेक ' असें वर्णन क्रिप्सयोजनेचें केलें तें अत्यंत क्रूर असूनही वस्तुस्थितीस धरून होतें. प्रत्यक्ष ब्रिटिश सोशॅलिस्ट एच्. एन्. ब्रेल्सफर्ड यांनींही हाच अभिप्राय दिला. ब्रेल्सफर्ड लिहितात, " ही युद्धोत्तर योजना स्वीकारा असें सांगतांना आम्ही हिंदुस्तानला जुगार खेळा असें सांगत होतों. हा जुगार केवळ आमच्या प्रामाणिकपणावर विसंबून खेळा असें आम्ही सांगत नव्हतों. तर हिंदुस्तानला दिलेलीं वचनें पूर्ण करण्याच्या आमच्या भावी सामर्थ्यावर हा जुगार खेळा असें आम्ही सांगत होतों. हिंदुस्तानच्या किनाऱ्यावरील आमचें आरमारी व वैमानिक प्रभुत्व नष्ट होईपर्यंत आम्ही थांबलों. आतां हिंदी लोक आम्हांला सहजच विचारतील, ' कांहो, ब्रम्हदेशाचें रक्षण तुम्हीं जसें केलें त्याहून अधिक चांगल्या प्रकारें बंगालचें रक्षण तुम्ही करणार आहां काय ?' "

## कॉंग्रेसचा अभिप्राय

क्रिप्सयोजना खरोखर कोणत्या मुद्यावर कॉंग्रेसनें फेटाळली याचा खुलासा व समर्थन या उताऱ्यांत ब्रेल्सफर्डनीं फार चांगल्या प्रकारें केलें आहे. कॉंग्रेस वर्किंग कमिटीनें या क्रिप्सयोजनेसंबंधानें जो ठराव केला त्यांत युद्धोत्तर योजनेची चर्चा करून ती टाकाऊ ठरविली आहेच. पण मुख्य महत्त्व युद्धकालीन योजनेला देऊन, ती वाईट असल्यामुळें योजना फेटाळून लावीत असल्याचें स्पष्ट केलें आहे. युद्धकालीन योजनेसंबंधानें आपल्या ठरावांत वर्किंग कमिटी म्हणते, " हिंदुस्तानच्या भवितव्यासंबंधानें कोणतीही योजना पुढें आली असतां तिजकडे लक्ष पुरवून तिची तपासणी केली पाहिजेच. पण आजच्या गंभीर संकटकाळीं वर्तमानकालीन योजनेला खरें महत्त्व आहे. किंबहुना भावी योजनेला जें महत्त्व असेल तेंही वर्तमान कालावर तिचा काय परिणाम होईल या दृष्टीनेंच कमीअधिक ठरेल. या प्रश्नाला कॉं. व. कमिटीनें जास्तींत जास्त महत्त्व देणें अपरिहार्यच होतें. कॉं. व. कमिटीकडून जे मार्गदर्शनाची अपेक्षा करतात त्यांना कमिटीनें काय सल्ला द्यावा हें वर्तमानकालीन योजना कशी

असेल त्यावर अवलंबून आहे. वर्तमान कालाच्या दृष्टीनें पाहतां ब्रिटिश सरकारच्या सूचना अस्पष्ट व सर्वस्वी अपूर्ण आहेत. हल्लींच्या राज्यघटनेंत महत्त्वाचे असे फरक कोणतेही करण्यांत आले नाहींत असें दिसून येईल. हिंदुस्तानचें संरक्षण ब्रिटनच्या हातींच राहणार असें स्पष्ट करण्यांत आलें आहे. कोणत्याही काळांत राष्ट्रसंरक्षण ही बाब फार महत्त्वाची असते. युद्धकाळांत तर ती अतीशयच महत्त्वाची आणि राष्ट्राचें जीवन व राज्यकारभार यांना व्यापून टाकणारी असते. यावेळीं हिंदी लोकांच्या जबाबदारीच्या क्षेत्रांतून संरक्षणखातें दूर राखणें म्हणजे जबाबदारीच्या सत्तेची थट्टा करून ती निरर्थक करण्यासारखेंच आहे. युद्ध चालू असेपर्यंत हिंदुस्तान कोणत्याही प्रकारें स्वतंत्र होणार नाहीं असें यामुळें स्पष्टपणें सांगितलें जात आहे. ' आम्ही स्वतंत्र आहों आणि हें स्वातंत्र्य टिकविणें व रक्षिणें या कामीं आम्हांला पूर्ण मुभा आहे ' अशी जाणीव उत्पन्न होणें हें हिंदी लोकांनीं जबाबदारी स्वीकारण्याला अत्यवश्य आहे. हवें आहे तें हें कीं लोकांना युद्धसहकार्याच्या हाकेस 'ओ' देतांना उत्साह वाटला पाहिजे. लोकांवर पूर्ण विश्वास टाकून संरक्षणसत्ता त्यांच्या हातीं दिल्याशिवाय लोकांना असा उत्साह वाटणें शक्य नाहीं. असें केलें तरच या अगदीं अखेरच्या गंभीर प्रसंगीं हिंदी लोकांत चेतना उत्पन्न करून प्रसंगाला अवश्य इतका जास्तींतजास्त यत्न त्यांना करायला लावता येईल. हल्लींचें हिंदुस्तान सरकार आणि त्याचे प्रांतिक गुमास्ते यांचे ठिकाणीं लायकी कमी आहे. हिंदुस्तानच्या संरक्षणाची जबाबदारी त्यांना स्वीकारता येणें शक्य नाहीं. हिंदी जनताच आपल्या प्रतिनिधींमार्फत ही जबाबदारी अधिक पात्रतेनें पार पाडील. मात्र त्यासाठीं आजच स्वातंत्र्य मिळालें पाहिजे आणि सर्व जबाबदारी हिंदी लोकांवर टाकली गेली पाहिजे. म्हणून ब्रिटिश युद्धमंत्रिमंडळानें सुचविलेली योजना स्वीकारण्यास काँग्रेस वर्किंग कमिटी असमर्थ आहे." हा ठराव २ एप्रिल रोजींच तयार झाला होता. पण संरक्षण खात्याच्या मुद्दयावर कांहीं तडजोड निघते कीं काय हें पाहण्यासाठीं सर स्टॅफर्ड क्रिप्स यांनीं तो इतक्यांत प्रसिद्ध करूं नये असें सुचविलें. पुढें संरक्षणखात्यावरील सत्तेसंबंधीं वाद आला. ज. वेवेल हे सरसेनापति. त्यांच्या सल्ल्यावांचून निर्णय लागेना म्हणून मौ. आझाद त्यांना भेटले. पण संरक्षणखात्याच्या वाऱ्यासही कार्यकारी सभासदांना उभे राहूं देण्याचें वेवेल यांनीं नाकारलें. नागरिकसैन्य तरी

अमर्याद वाढविता येईल काय असें नेहरूंनीं विचारलें. पण तें ज. वेवेलवर अवलंबून आहे असा क्रिप्सनीं खुलासा केला. वास्तविक प्रत्यक्ष युद्धकार्य ब्रिटिश युद्धखात्यामार्फत चाललेंच असतें. त्यांत लोकप्रतिनिधींनीं हात घातला नसता. ऑस्ट्रेलियाचा पंतप्रधान व युद्धमंत्री कर्टिन ज्याप्रमाणें कायद्यानें ज. मॅकार्थर याचा वरिष्ठ असला तरी कर्टिन मॅकार्थरच्या संमतीनें वागतो तसें येथें होवूं शकलें असतें. पण वेवेल यांनीं युद्धखात्याजवळ कार्यकारी मंडळास येवूं देण्याचेंच नाकारलें.

## विजयासाठीं स्वातंत्र्य द्या

काँग्रेसनें हा आग्रह कां धरला, याचें उत्तर त्यावेळीं 'नॅशनल हेरल्ड' या नेहरूंच्या धोरणाचा पुरस्कार करणाऱ्या पत्रांत दिल्लीच्या खास बातमीदारानें दिलें होतें. लोकप्रतिनिधींच्या हातीं सत्ता आली तरी अनेक पराभव खावे लागतील, लोकांचा धीर टिकवावा लागेल, त्यावेळीं 'युद्धनियंत्रण आमच्या हातीं नाहीं, आम्ही काय करणार, फक्त तुम्ही मरायला चला' असें पुढाऱ्यांनीं म्हटलें तर लोक सैन्यांत येणार नाहींत; युद्ध आपलेंच आहे आपणच चुक्या करूं, दुरुस्त्याही करूं व अखेर विजयी होऊं असें जनतेला प्रामाणिकपणें सांगतां आलें पाहिजे तरच पराभवानें धीर खचूं न देता जनता कंबर बांधून लढेल व कालांतरानें चीन व रशिया यांचेप्रमाणें पुन्हा पुन्हा पुढें सरून शत्रूस जेरीस आणील, संरक्षणसत्ता हवी ती यासाठीं, असा युक्तिवाद त्या लेखांत आला होता. १४ सप्टेंबर १९३९ च्या काँग्रेसच्या जाहीरनाम्यांतील भूमिकेहून ही भूमिका थोडीशी नवी (अथवा अधिक स्पष्ट) होती हें येथें लक्षांत येतें. इंग्लंडनें आपण स्वातंत्र्य व लोकशाही यासाठीं लढतों असें सिद्ध करावें म्हणजे आमच्या तत्त्वाशीं सुसंगत अशा प्रकारें आम्ही या युद्धांत सामील होऊं शकतों असें त्या जाहीरनाम्मांत म्हटलें होतें. पण आतां इंग्लंडनें आपला प्रामाणिकपणा सिद्ध करण्याचा प्रश्न उत्पन्न करण्यांत आला नाहीं. 'हिंदुस्तानच्या सरहद्दीवर युद्ध आलें असतां लढलें हें पाहिजेच. पण हल्लींचें सरकार अप्रातिनिधिक व परकी असल्यानें त्याच्या युद्ध प्रयत्नावर जनतेचा विश्वास बसत नाहीं. म्हणून संरक्षणसत्ता द्या,' अशी मागणी यावेळीं करण्यांत आली होती. हा शाब्दिक बदल महत्त्वाचा होता. 'लोकशाहीच्या युद्धांतच आम्ही लढूं शकतों म्हणून लोकशाही द्या' असें म्हणण्याऐवजीं 'युद्ध जिंकण्यासाठीं आतां लोकशाहीच हवी आहे म्हणून लोकशाही द्या' अशी मागणी

आतां करण्यांत आली होती. 'आमचें ध्येय स्वातंत्र्य आहे तें द्या म्हणजे लढतों' याऐवजी 'विजयासाठींच स्वातंत्र्य द्या' अशी मागणी करण्यांत आली होती. क्रिप्सनीं नेहरूंना कळविलें कीं येथील सैन्य ब्रिटिश नियंत्रणाखालचें सैन्य आहे, त्याच्या आसपासही कार्यकारी मंडळास येऊं देण्यांत देणार नाहीं. त्यावर "तुम्ही 'कॅबिनेट' हा शब्द अनेक वेळां उच्चारला होता, त्याचा अर्थ ब्रिटिशासारखें सर्व-सत्ताधारी मंत्रिमंडळ असा होतो, पण संरक्षणसत्तेच्या बाबतींत हा तुमचा शब्द खोटा पडतो" असें आझाद व नेहरू यांनीं म्हटलें. तेव्हां खरें खुरें कॅबिनेट करायचें तर आतांच घटनाकायदा बदलावा लागेल असें क्रिप्स म्हणाले. त्यावर 'तशी जरूरीच असली तर बदला,' असें आझाद-नेहरूंनीं सुचविलें; तें क्रिप्स यांनीं नाकारलें व वाटाघाटी मोडल्या. आझाद व क्रिप्स यांच्या पत्रव्यवहारांत या सर्व गोष्टी आल्या आहेत. क्रिप्स यांनीं कॉंग्रेसला 'कॅबिनेट' देऊं केलें होतें, पण पुढें नोकरशाहीच्या हट्टामुळें क्रिप्सनीं आपली देणगी परत घेतली असें एका अमेरिकन पत्रपंडितानें आझादक्रिप्स–पत्रव्यवहाराच्या आधारानें म्हटलें आहे. क्रिप्स यांनीं या विधानाचा कधींच इनकार केला नाहीं.

## अंतर्गत खळबळ

क्रिप्सवाटाघाटी फिसकटल्यानंतर परिस्थिति एकसारखी चिघळत गेली. यानंतर कॉंग्रेस वर्किंग कमिटींत दोन भांडणें उद्भवलीं. एक म्हणजे 'राष्ट्रीय मंत्रिमंडळाची मागणी आणि सशस्त्र प्रतिकार हा मुद्दा सोडावाच' असें वर्किंग कमिटींतील एक गट म्हणत होता, तें मत दुसऱ्या गटास पटलें नाहीं. दुसरें म्हणजे जिनांना पाकिस्तान देण्यासाठीं प्रांतिक स्वयंनिर्णयाचा हक्क द्यावा असें राजगोपाळाचारी म्हणाले, पण तें इतरांना पटलें नाहीं. दिल्लीस वर्किंग कमिटीनें क्रिप्सयोजनेविरुद्ध ठराव केला तेव्हांच 'कॉंग्रेसला अखंड हिंदुस्थान अभिप्रेत असलें तरी कोणत्याहि प्रांताला त्याच्या इच्छेविरुद्ध हिंदुस्थानांत सक्तीनें ठेवण्यांत येणार नाहीं' अशा अर्थाचा ठराव करण्यांत आला होता. पुढें एप्रिलअखेर व मेचे आरंभीं अलाहाबादेस ऑ. इं. कॉं. कमिटीची बैठक भरली असतां अखंड भारतास पाठिंबा देणारा ठराव मंजूर झाला. तथापि दिल्लीचा ठरावही मंजूर झाला. दिल्लीचा ठरावही मंजूर झाल्यानें प्रांतिक स्वयंनिर्णयाचें तत्त्व कॉंग्रेसनें मान्य केलें ही गोष्ट कायम राहते असें मत मौ. आझाद यांनीं दिलें व

काँग्रेसचे पांच व मुस्लिम लीगचे पांच प्रतिनिधि एकत्र येऊन वाटाघाटी करण्यास काँग्रेस तयार आहे असें जाहीर केलें. पण जिनांनीं त्याची दखलही घेतली नाहीं व राजाजी काँग्रेसबाहेर गेले.

## ब्रिटिशांनीं सत्ता सोडावी

यानंतर मे, जून व जुलैमध्यें निराशेचें वातावरण भडकत गेलें. या काळांत तीन नव्या-म्हणजे नव्या अशा वाटणाऱ्या-घोषणा गांधींनीं केल्या. ब्रिटिशांनीं हिंदुस्थान सोडावें ही त्यांची पहिली घोषणा. ब्रिटन व अमेरिका यांचीं सैन्येंही त्यांनीं येथून काढून न्यावीं म्हणजे मग आम्ही अहिंसेनें राष्ट्ररक्षण करूं असें त्यांनीं म्हटलें, ही दुसरी घोषणा. तीसंबंधानें नेहरूंशीं गांधींचा बराच वादविवाद झाला. अहिंसेनें राष्ट्ररक्षण होवूं शकणार नाहीं हें गांधींनीं मान्य केलें आणि हिंदुस्तानचें स्वातंत्र्य ब्रिटननें मान्य केल्यास अँग्लो-अमेरिकन सैन्यें येथें राहूं देण्यास त्यांनीं तयारी दाखविली. त्यांची तिसरी घोषणा (अथवा पहिल्या घोषणेचें विशेष स्वरूप), म्हणजे हिंदुमुसलमान ऐक्य न झालें तरी ब्रिटिशांनीं येथली सत्ता सोडावी ही होय. यामुळें जिना चकित झाले व चिडले. पण गांधींनीं तिकडे लक्ष दिलें नाहीं व हिंदु-मुसलमान समेट न झाला तरी स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं अहिंसात्मक लढा करण्याचा निर्धार जाहीर केला. 'बेबंदशाही व अत्याचार झाले तरी पुरवले, पण हल्लींची गुलामगिरीची परिस्थिति तावडतोब संपली पाहिजे.' अशी तीव्र भावना गांधींनीं व्यक्त केली. जुलैच्या दुसऱ्या आठवड्यांत वर्ध्यास वर्किंग कमिटीचा ठराव मंजूर झाला. "ब्रिटिशांनीं येथील सत्ता सोडावी म्हणजे हिंदुस्तान संयुक्त राष्ट्रांच्या बाजूनें युद्धांत सामील होईल व येथें सर्वपक्षीय असें तात्पुरतें सरकार स्थापन करून सशस्त्र व निशस्त्र अशा दोन्ही प्रकारें परचक्राशीं लढेल" अशी घोषणा या ठरावांत होती. सरकारनें ही मागणी मान्य केली नाहीं तर सत्याग्रह करावा व त्याचे नेतृत्व गांधींनीं घ्यावें असेंही या ठरावांत म्हटलें होतें. पुढें या ठरावांत 'युद्धोत्तर-काळीं संयुक्त राष्ट्रांचें फेडरेशन व्हावें' असा नवा मुद्दा घालण्यांत येऊन मुंबईस ८ ऑगस्ट रोजीं रात्रीं ऑ. इं. कॉं. कमिटींत हजारों प्रेक्षकांसमोर व सगळ्या जगाचे कान टवकारून ऐकत असतां मंजूर झाला. लगेच कांहीं तासांनींच मुंबईस गांधीजी व कॉंग्रेस वर्किंग कमिटी आणि सर्व देशभर इतर हजारों कॉंग्रेसभक्त यांना सरकारनें अटक केली.

एवढ्यानें सर्व दबेल असें सरकारला वाटलें होतें. पण फटाकडी विझवायला म्हणून हातांत घ्यावी आणि तिनें भडका करून सर्वांग पेटवावें तसा प्रकार नंतरचा सर्वकाळ सरकारच्या अनुभवास येत आहे.

## 'बंड' विचार ::: ::: ::: [७]

८ **ऑगस्टनंतर** गेल्या ९।१० महिन्यांत जें कांहीं झालें तें ' बंड ' झालें असें सरकार जाहीरपणें सांगत आहे. हा सगळा इतिहास येथें देण्याची गरज नाहीं. तें बंड आतां बरेंच विझलें असून तूर्त त्याची पुन्हा मोठी उठावणी होईल असें वाटत नाहीं. पण बंड दडपण्यानें सरकारचे कोणतेच प्रश्न मिटले नाहींत. काँग्रेसचेही मिटले नाहींत. दोघांच्याही पुढें दुर्लंघ्य अडचणी आहेत, त्या अधिकच बिकट झालेल्या आहेत. यांतून बाहेर कसें पडावें हा प्रश्न निकडीचा आहे, म्हणून सरकारच्या व काँग्रेसच्या धोरणाचें सत्यदर्शन व गुणदोषविवेचन करून पुढील मार्ग कांहीं सापडतो कां याचा यापुढें विचार करावयाचा आहे.

### गांधींचें सरकारला उत्तर

" ८ ऑगस्टचा ऑ. इं. काँ. कमिटीचा ठराव व सत्याग्रहाचा निर्धार यामुळें युद्धप्रयत्नांत अडथळा येईल अशी भीति सरकारला वाटली आणि काँग्रेसनें युद्ध-प्रयत्नांत घातपात करण्याची तयारी बरीच केली असल्याचें दिसून येत होतें म्हणून काँग्रेस–पुढाऱ्यांना अटक करून काँग्रेसविरुद्ध दडपशाही करणें सरकारला भाग पडलें " अशा आशयाचा गव्हर्नर जनरलचा ठराव सरकारनें दडपशाही सुरू करतांना ता. ९ रोजीं प्रसिद्ध केला. सरकारची ही सबब किती खोटी होती हें गांधींनीं आपल्या अटकेनंतर एक आठवड्यानें म्हणजे १४ ऑगस्ट रोजीं व्हाइसरॉयला जें पत्र पाठविलें त्यांत उत्तम

प्रकारें दाखविलें आहे. सरकारी युक्तिवादाच्या गांधींनीं खरोखर ठिकऱ्या ठिकऱ्या उडविल्या आहेत. कॉंग्रेसच्या ठरावांत गांधीजींना सत्याग्रहाचें नेतृत्व देण्यांत आलें होतें. पण ते तावडतोब सत्याग्रह सुरू करणार नव्हते तर व्हाइसरॉयची भेट घेऊन कॉंग्रेसच्या मागणीची निःपक्षपाती बुद्धीनें तपासणी करा असें त्यांना ते सांगणार होते. गांधी म्हणतात, "ब्रिटननें हिंदुस्तान सोडावें या मागणींत जे कांहीं दोष होते ते लक्षांत आले तसतसे दूर करण्यांत आले आहेत. तुम्हीही तींतले दोष दाखवून ती मागणी सुधारण्याची संधि मला द्यायला हवी होती." उदाहरणार्थ ब्रिटिश व अमेरिकन सैन्यें येथून काढून घ्या हें गांधींचें म्हणणें चुकीचें आहे असें नेहरूंनीं गांधींना पटविलें तेव्हां त्यांनीं हीं सैन्यें येथें राहूं देण्यास संमति दिली. व्हाइसरॉयनीं अशाच कांहीं दुरुस्त्या सुचविल्या असत्या तर गांधींनीं त्या पत्करल्या असत्या. "पण कॉंग्रेस अतीशय जपून व हळूहळू पुढें पाऊल टाकीत होती. यामुळें जगांतील लोकमत कॉंग्रेसला अनुकूल होत होतें. कॉंग्रेसची मागणी नाकारण्याच्या सरकारच्या सबबी सर्व पोकळ आहेत हें जगाला कळून येवूं लागलें होतें. याची सरकारला भीति वाटून सरकारनें धरपकडीची तांतडी केली" असा आरोप सरकारवर गांधी करतात. बेकायदेशीर व अत्याचारी कृत्यांची पूर्वतयारी पुष्कळ दिवसांपासून चालू आहे असें सरकारी ठराव म्हणतो. "पण मग ही तयारी उजेडांत आणून सरकारनें त्या लोकांवर खटले कां भरले नाहींत?" असें गांधी विचारतात. "कॉंग्रेसनें जो सत्याग्रह करायचा ठरविला होता त्याचा हेतु कॉंग्रेसच्या मागणीस लोकांचा पाठिंबा किती आहे तें जगाला दाखवून जगाचें लक्ष या प्रश्नाकडे वेधण्याइतका आत्मयज्ञ लोकांना करायला लावणें एवढाच होता" असें गांधीजींनीं म्हटलें आहे. "कॉंग्रेसला स्वतांसाठीं सत्ता बळकावायची होती हा आरोप खोटा असून मुस्लिमलीगला मंत्रिमंडळ बनवायला सांगा असें कॉंग्रेसनें सांगितलें होते" याची गांधींनीं व्हॉइसरॉयना आठवण दिली आहे. शेवटीं "संयुक्त राष्ट्रांच्या हितासाठीं नव्हेतर आपला हिंदुस्तानवरील ताबा टिकविण्यासाठीं तुम्हीं ही दडपशाही सुरू केली" असा आरोप गांधींनीं सरकारवर केला आहे. १४ ऑगस्टच्या या पत्रांत "सरकारनेंच ही दडपशाही सुरू केली आणि परस्परांची चालूं असलेली हल्लींची कत्तल माझा जीव गुदमरून टाकीत आहे" असें गांधी शेवटीं म्हणतात. बाहेर माजलेल्या घातपाती चळवळीचा हा निषेधच असून हें पत्र जर त्याचवेळीं प्रसिद्ध झालें असतें तर घातपाती चळवळीस तेव्हां आळा

पडला असता असें राजगोपालचारींचें म्हणणें आहे. पण हें पत्र फेब्रुवारींत गांधींच्या उपोषणापूर्वी झालेल्या पत्रव्यवहाराबरोबर प्रसिद्ध झालें. "घातपाती चळवळी दडपशाहीनें थांबवाव्या, गांधींच्या निषेधात्मक शब्दाला त्यांचें श्रेय देऊं नये" असें ठरवून सरकारनें हें पत्र प्रसिद्ध होऊं दिलें नाहीं असें राजाजींनीं म्हटलें आहे.

गांधींचें उपोषण चालू असतां सरकारनें "१९४२-४३च्या दंगलीसंबंधानें काँग्रेसची जबावदारी" नांवानें एक ८६ पानी चोपडें प्रसिद्ध केलें. त्यामुळें हें आरोपप्रत्याआरोपाचें प्रकरण फारच चिडीस गेलें. त्यांत गांधींचेवर केवळ गहजब केलेला आहे. काँग्रेसची मागणी मान्य न झाल्यास अत्याचार होतील असे इषारे गांधींनीं अनेकवार दिले होते. पण त्या धमक्या होत्या असें सरकारचें आतां म्हणणें आहे. आणि हिंदुस्तान स्वतंत्र होईल तर जपानशीं तह करील असें गांधींनीं म्हटलें होतें, त्यावर गांधी हे जपानला प्रच्छन्नतेनें अनुकूल असून ब्रिटिशांचा पराभव व्हावा अशी त्यांची इच्छा व खटपट होती असे सरकारी पत्रकांत ध्वनित केलें आहे. हा आरोप अतीशय भयंकर असून तो गांधींचेवर इतकेंच नव्हे तर काँग्रेसवरही करण्यांत आलेला आहे. असा आरोप केला नाहीं असें नंतर भारतमंत्र्यांनीं म्हटलें. पण ८६ पानी पत्रकांत तो बराच स्पष्ट आहे. सरकारच्या आरोपपत्रकांत "भयंकर अत्याचार हिंदुस्थानांत होऊन हिंदुस्थानचें नांव कलंकित झाले" असेंही मत व्यक्त करण्यात आलें आहे.

## 'बंडा'चें स्वरूप

८ ऑगस्टनंतर जी घातपाती चळवळ झाली ती ५७ च्या बंडानंतर कधींही न झाली एवढी प्रचंड झाली. जे घातपात करण्यांत आले त्यांत काँग्रेसवाले पुष्कळ होते, आणि त्यांतील कांहीं नामवंत पुढारीही असावेत. तथापि गांधीजी अथवा काँग्रेस वर्किंग कमिटी यांनीं, झाली ही चळवळ अशीच व्हावी असें, अपेक्षिलें होतें किंवा अशीच चळवळ करा अशी अनुज्ञा दिली होती असें मानण्याला फारसा आधार नाहीं. कांहीं काँग्रेस कमिट्यांतून पत्रकें निघाल्याचें वृत्त सरकारनें प्रसिद्ध केलें आहें. पण त्या त्या काँग्रेस कमिट्यांच्या अधिकाऱ्यांनीं आपल्या जबाबदारीवर त्या गोष्टी केल्या होत्या. स्वतः गांधीजी बाहेर असते तर त्यानीं घातपाती चळवळ झाली त्या प्रकारची होऊं दिली नसती हें त्यांच्या पूर्वीच्या मतांचा विचार केला असतां व उपोषणावेळीं प्रसिद्ध झालेल्या पत्रकावरून स्पष्ट

होतें. गांधींच्या अर्थानें अहिंसेच्या चौकटींत बसणारी ती चळवळ मुळींच नव्हती हें अगदीं स्पष्ट आहे. या दृष्टीनें कॉंग्रेस वर्किंग कमिटीवर या चळवळीच्या नेतृत्वाची अथवा मार्गदर्शनाची जबाबदारी टाकतां येत नाहीं. पण कॉंग्रेससंघटनेनेंही चळवळ केली नाहीं हें म्हणणें मात्र खरें नव्हे. अहिंसा पाळली गेली नाहीं हें खरें. ज्यांनीं गेली वीस वर्षें आपलें धोरण अहिंसा हें असल्याचें सांगितलें व तसें तें प्रामाणिकपणें पाळलेंही असें लोक घातपाताच्या चळवळींतही कॉंग्रेसच्या नांवानेंच कार्य करीत होते. फार काय, मनुष्यहत्या अगदीं नाइलाज होईपर्यंत करूं नये, धान्य व इतर अन्यद्रव्यें इत्यादि साहित्य युद्धकार्यास उपयोगी पडणारें असेल तरीही लुटूं नये अशी पथ्येंही ते अहिंसेसाठीं पाळीत. कारण आपण अजूनही अहिंसावादी आहोंत असें ते म्हणत असें समजतें. अहिंसेच्या मर्यादा नेमक्या कोणत्या आहेत तें गेल्या वीस वर्षांत गांधींच्या नेतृत्वाखालीं शास्त्रीय पद्धतीनें कधींच ठरलें नव्हतें. एखाद्या बालकाच्या अंगावर हत्यार घेऊन धावणाऱ्या गुंडाचा वधही त्या बालकांस वांचविण्यासाठीं अवश्य तर करावा असें गांधींनीं मागें एका संभाषणांत म्हटलें होतें. परचक्र आल्यास त्याचा सशस्त्र प्रतिकार करणें हीं गोष्ट कॉंग्रेसच्या अहिंसेंत बसविण्यांत आली होती. पोलंडनें केलेला प्रतिकार अहिंसात्मकच आहे असें इतिहास म्हणेल असेंहि गांधींनीं लिहिलें. कॉंग्रेसमंत्र्यांनीं प्रसंगविशेषीं गोळीबार करूनही "मी गांधींचा अनुयायी आहें" असें सांगणारे ग्रंथ लिहिलें. ८ ऑगस्टचा प्रसंग हा इतिहासांत अद्वितीय असून आजवर कधींही न झाली अशी चळवळ आतां होणार, या वेळीं नुसती तुरुंगभरती होणार नाहीं असे उद्‌गार पुढाऱ्यांनीं ८ ऑगस्टच्या पूर्वीं काढले होते. दादाभाईंच्या वेळेपासून स्वातंत्र्याची तिडीक हिंदी जनतेनें घेतली. गेल्या दहा वर्षांत स्वातंत्र्याची तीव्र आकांक्षा अगदीं कळसास पोंचली. गांधीजी धार्मिक अर्थानें अहिंसावादी होते. पण कॉंग्रेसवाल्यांनीं व्यावहारिक दृष्टीनें अहिंसावाद स्वीकारला होता. स्वातंत्र्य हें मुख्य साध्य व साधनापेक्षां हें साध्यच श्रेष्ठ ही त्यांची मुख्य दृष्टि होती. गेली तीन वर्षें हिंदुस्थान युद्धांत गोंवले गेलें होतें. मलाया, सिंगापूर आणि ब्रह्मदेश हे, खरें पाहिलें तर, हिंदुस्थानचेच भाग; आपल्या डोळ्यादेखत जपानच्या हातीं गेलेले हिंदी लोकांनीं पाहिले. आणि आपण नामर्दासारखे बसून हे किती काळ पाहात राहाणार याची हिंदी लोकांना तेव्हां

पडला असता असें राजगोपालचारींचें म्हणणें आहे. पण हें पत्र फेब्रुवारींत गांधींच्या उपोषणापूर्वी झालेल्या पत्रव्यवहाराबरोबर प्रसिद्ध झालें. " घातपाती चळवळी दडपशाहीनें थांबवाव्या, गांधींच्या निषेधात्मक शब्दाला त्यांचें श्रेय देऊं नये " असें ठरवून सरकारनें हें पत्र प्रसिद्ध होऊं दिलें नाहीं असें राजाजींनीं म्हटलें आहे.

गांधींचें उपोषण चालू असतां सरकारनें "१९४२–४३च्या दंगलीसंबंधानें काँग्रेसची जबाबदारी" नांवानें एक ८६ पानी चोपडें प्रसिद्ध केलें. त्यामुळें हें आरोपप्रत्याआरोपाचें प्रकरण फारच चिडीस गेलें. त्यांत गांधींचेवर केवळ गहजब केलेला आहे. काँग्रेसची मागणी मान्य न झाल्यास अत्याचार होतील असे इषारे गांधींनीं अनेकवार दिले होते. पण त्या धमक्या होत्या असें सरकारचें आतां म्हणणें आहे. आणि हिंदुस्तान स्वतंत्र होईल तर जपानशीं तह करील असें गांधींनीं म्हटलें होतें, त्यावर गांधी हे जपानला प्रच्छन्नतेनें अनुकूल असून ब्रिटिशांचा पराभव व्हावा अशी त्यांची इच्छा व खटपट होती असे सरकारी पत्रकांत ध्वनित केलें आहे. हा आरोप अतीशय भयंकर असून तो गांधींचेवर इतकेंच नव्हे तर काँग्रेसवरही करण्यांत आलेला आहे. असा आरोप केला नाहीं असें नंतर भारतमंत्र्यांनीं म्हटलें. पण ८६ पानी पत्रकांत तो बराच स्पष्ट आहे. सरकारच्या आरोपपत्रकांत " भयंकर अत्याचार हिंदुस्थानांत होऊन हिंदुस्थानचे नांव कलंकित झाले " असेंही मत व्यक्त करण्यात आलें आहे.

## 'बंडा'चें स्वरूप

८ ऑगस्टनंतर जी घातपाती चळवळ झाली ती ५७ च्या बंडानंतर कधींही न झाली एवढी प्रचंड झाली. जे घातपात करण्यांत आले त्यांत काँग्रेसवाले पुष्कळ होते, आणि त्यांतील कांहीं नामवंत पुढारीही असावेत. तथापि गांधीजी अथवा काँग्रेस वर्किंग कमिटी यांनीं, झाली ही चळवळ अशीच व्हावी असें, अपेक्षिलें होतें किंवा अशीच चळवळ करा अशी अनुज्ञा दिली होती असें मानण्याला फारसा आधार नाहीं. कांहीं काँग्रेस कमिट्यांतून पत्रकें निघाल्याचें वृत्त सरकारनें प्रसिद्ध केलें आहे. पण त्या त्या काँग्रेस कमिट्यांच्या अधिकाऱ्यांनीं आपल्या जबाबदारीवर त्या गोष्टी केल्या होत्या. स्वतः गांधीजी बाहेर असते तर त्यानीं घातपाती चळवळ झाली त्या प्रकारची होऊं दिली नसती हें त्यांच्या पूर्वींच्या मतांचा विचार केला असतां व उपोषणावेळीं प्रसिद्ध झालेल्या पत्रकावरून स्पष्ट

होतें. गांधींच्या अर्थानें अहिंसेच्या चौकटींत बसणारी ती चळवळ मुळींच नव्हती हें अगदीं स्पष्ट आहे. या दृष्टीनें कॉंग्रेस वर्किंग कमिटीवर या चळवळीच्या नेतृत्वाची अथवा मार्गदर्शनाची जबाबदारी टाकतां येत नाहीं. पण कॉंग्रेससंघटनेनेंही चळवळ केली नाहीं हें म्हणणें मात्र खरें नव्हे. अहिंसा पाळली गेली नाहीं हें खरें. ज्यांनीं गेली वीस वर्षें आपलें धोरण अहिंसा हें असल्याचें सांगितलें व तसें तें प्रामाणिकपणें पाळलेंही असें लोक घातपाताच्या चळवळींतही कॉंग्रेसच्या नांवानेंच कार्य करीत होते. फार काय, मनुष्यहत्या अगदीं नाइलाज होईपर्यंत करूं नये, धान्य व इतर अन्यद्रव्यें इत्यादि साहित्य युद्ध-कार्यास उपयोगी पडणारें असेल तरीही लुटूं नये अशी पथ्येंही ते अहिंसेसाठीं पाळीत. कारण आपण अजूनही अहिंसावादी आहोंत असें ते म्हणत असें समजतें. अहिंसेच्या मर्यादा नेमक्या कोणत्या आहेत तें गेल्या वीस वर्षांत गांधींच्या नेतृत्वाखालीं शास्त्रीय पद्धतीनें कधींच ठरलें नव्हतें. एखाद्या बालकाच्या अंगावर हत्यार घेऊन धावणाऱ्या गुंडाचा वधही त्या बालकास वांच-विण्यासाठीं अवश्य तर करावा असें गांधींनीं मागें एका संभाषणांत म्हटलें होतें. परचक्र आल्यास त्याचा सशस्त्र प्रतिकार करणें हीं गोष्ट कॉंग्रेसच्या अहिंसेंत बसविण्यांत आली होती. पोलंडनें केलेला प्रतिकार अहिंसात्मकच आहे असें इतिहास म्हणेल असेंहि गांधींनीं लिहिलें. कॉंग्रेसमंत्र्यांनीं प्रसंगविशेषीं गोळीबार करूनही " मी गांधींचा अनुयायी आहें " असें सांगणारे ग्रंथ लिहिले. ८ ऑगस्टचा प्रसंग हा इतिहासांत अद्वितीय असून आजवर कधींही न झाली अशी चळवळ आतां होणार, या वेळीं नुसती तुरुंगभरती होणार नाहीं असे उद्गार पुढाऱ्यांनीं ८ ऑगस्टच्या पूर्वीं काढले होते. दादाभाईंच्या वेळेपासून स्वातंत्र्याची तिडीक हिंदी जनतेनें घेतली. गेल्या दहा वर्षांत स्वातंत्र्याची तीव्र आकांक्षा अगदीं कळसास पोंचली. गांधींजी धार्मिक अर्थानें अहिंसावादी होते. पण कॉंग्रेसवाल्यांनीं व्यावहारिक दृष्टीनें अहिंसावाद स्वीकारला होता. स्वातंत्र्य हें मुख्य साध्य व साधनापेक्षां हें साध्यच श्रेष्ठ ही त्यांची मुख्य दृष्टि होती. गेली तीन वर्षें हिंदुस्थान युद्धांत गोंवले गेलें होतें. मलाया, सिंगापूर आणि ब्रह्मदेश हे, खरें पाहिलें तर, हिंदुस्थानचेच भाग; आपल्या डोळ्यादेखत जपानच्या हातीं गेलेले हिंदी लोकांनीं पाहिले. आणि आपण नामर्दासारखे बसून हे किती काळ पाहात राहाणार याची हिंदी लोकांना तेव्हां

खंत वाटली. ब्रह्मीलोक जपानला सामील झाले याची नेहरूंना चीड आली आणि " हिंदुस्थानची जनता ब्रह्मी लोकांपेक्षां अधिक जागृत असल्यानें जपानला सामील होण्याची लाचारी आम्ही दाखविणार नाहीं " असे उद्गार नेहरूंनीं जळजळून काढले. मलाया, सिंगापूर व ब्रह्मदेश यांचा पाडाव होत असतां कांहीं लोकांना ब्रिटिशद्वेषामुळें कुत्सित आनंद होत होता. पण जनतेच्या या कुत्सित आनंदाबद्दल काँग्रेसकार्यकर्त्यांना चीड येई. हें नपुंसकत्वाचें लक्षण असून या वृत्तीचा पाडाव करण्यासाठीं स्वातंत्र्य प्राप्त करून घ्यावें, फॅसिझम्‌विरोधी लढ्यांत स्वतंत्र राष्ट्र या नात्यानें सामील व्हावें अशी नेहरू व त्यांच्या विचारसरणीच्या हजारों काँग्रेसवाल्यांची इच्छा होती. ८ ऑगस्टनंतर जें 'बंड' झालें तें करण्यांत या काँग्रेसवाद्यांचा भाग होता हें कबूल करावें लागतें. त्यांचें वर्तन बेकायदा झालें हें खरेंच, पण त्यांत राष्ट्राच्या तोंडास काळीमा लागला असें कां म्हणावें हें समजत नाहीं. तें 'बंड' आतां विझलें असून त्याकडे ऐतिहासिक दृष्टीनें पाहण्याची वेळ आली आहे. वॉशिंग्टन व डी व्हॅलेरा यांनीं स्वातंत्र्यासाठीं बंडें केली होतीं तीच गोष्ट या काँग्रेसवाद्यांनीं केली. जपानला साहाय्य करावें अशी त्यांची इच्छा कधींच नव्हती. जपानचा हात अथवा संबंध चळवळींत असल्याचें सरकार कोठेंही दाखवूं शकलें नाहीं ही एकच गोष्ट हें विधान सिद्ध करण्यास पुरेशी आहे. वॉशिंग्टन विजयी झाला म्हणून तो थोर आणि येथील बंडवाले पराभूतझाले म्हणून ते कलंकित व हीन असें ब्रिटिशांनीं म्हणूं नये.

## बंडवाल्यांचें मनोगत

ब्रिटिश सरकार जपानशीं लढण्यांत गुंतलें असतां, त्याचा बराच पराभव झाला असतां, याच वेळीं युद्धयंत्र मोडून टाकण्याचा प्रयत्न करणें म्हणजे शत्रूस मदत करण्यासारखेंच नव्हे काय, अशी एक आरोपवजा शंका अनेकांनीं व्यक्त केली आहे. वरवर पाहातां या शंकेंतील आरोप खरा वाटतो. पण येथेंही जरा खोल पाहिलें पाहिजे. ब्रिटिशांना मलाया, सिंगापूर व ब्रह्मदेश येथें पराभव खावा लागला याचें कारण, तेथें लोकमताचा पाठिंबा सरकारला नव्हता, राज्ययंत्र म्हणजेच युद्धयंत्र अत्यंत प्रतिगामी होतें, हें होय, असें येथें ठामपणें सर्वांस वाटत होतें. काँग्रेसच्या ठरावांतही ही गोष्ट नमूद करण्यांत आली होती. यामुळें युद्ध चालू असतांच स्वातंत्र्य प्राप्त करून घेऊन युद्धयंत्र हातीं घ्यावें व

पराभवाचा संभव टाळावा म्हणून बंडवाल्यांनीं बंड केलें असें म्हणण्यास पुष्कळ आधार आहे. हें बंड भूतकालांत गेलेंच आहे. तेव्हां आतां जाहीरपणें असें म्हणता येतें कीं, शत्रूचा त्या बंडानें कोणत्याही प्रकारें फायदा झाला नाहीं. तसा तो व्हावा अशी बंडवाल्यांची इच्छाही नव्हती. या बंडाचें स्वरूप जपानला अनुकूल आहे असें जपानला कधींही वाटलें असेल हें शक्य नाहीं. नेहरू तुरुंगांत होते तरी त्यांची ध्येयनिष्ठा बाहेर वातावरणांत वावरत होती. हिंदी लोक जे चेवले आहेत ते स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं ब्रिटिश सरकारवर चेवले आहेत. पण त्यांना जपानची सत्ता नको असून जपानशीं लढायचें आहे. जपानी सैन्याची चढाई हिंदुस्थानवर झाल्यास हेच लोक अतिशय निकरानें जपानी सैन्याशीं लढतील असेंच जपानला वाटलें असणें स्वाभाविक आहे. ब्रह्मदेश, मलाया, सिंगापूर यांवर जपानची चढाई होण्यापूर्वी तेथें स्वातंत्र्याची चळवळ मुळींच झाली नाहीं. जे थोडेसे स्वातंत्र्यवादी होते ते सरळ जपानला सामील झाले व त्यांच्या साहाय्यानें जपाननें ब्रिटिश सरकारचा पाडांव केला. हिंदी लोकांना व पुढाऱ्यांना खरोखरच जपानला मदत करायची असती तर त्यांनीं एवढी दंगल माजवण्याची जरूरीच नव्हती. स्वस्थ राहून युद्धसहकार्यांत मिळणाऱ्या नोकऱ्या कराव्या, लठ्ठ पगार, लाचलुचपत, व्यक्तिस्वार्थ, गैदीपणा आणि दप्तरदिरंगाई यामुळें काँग्रेसवाद्यांच्यामतें, अगदींच नालायक असलेले व होत चाललेलें युद्धयंत्र तसेंच चालू द्यावें. ब्रिटिशांचा खोटा आत्मविश्वास व आत्मसंतोष दुखवूं नये आणि अशा परिस्थितींत जपानची स्वारी झाली म्हणजे जपानचें स्वागत करावें एवढेंच हिंदी लोकांनीं करणें बस होतें. पण ही नादानपणाची भूमिका न स्वीकारतां जपानची स्वारी झाल्यास स्वतंत्र राष्ट्र या नात्यानें जपानशीं लढायचें या निर्धारानें स्वातंत्र्यप्राप्तासाठीं देशभक्तांनीं भयंकर दिव्य केलें; बंड ऐनभरांत असतांना वास्त-विक जपानची स्वारी झाली असती ती झाली नाहीं. याचें कारण जपानला बंडाचा हा अर्थ माहीत होता हें होय. बंडवाले जपानला अनुकूल होते अथवा त्यांच्या उपद्व्यापांनीं जपानचा फायदा झाला हे सरकारचे दोन्हीही आरोप याप्रमाणें खोटे आहेत असें सहज सिद्ध होतें. घडलें तें सगळें चांगलेंच घडलें असें कोणीच म्हणत नाहीं. पण शत्रूस घरांत घेण्यासाठीं बंड झालें हें म्हणणें खोटें आहे. उलट या बंडांत काँग्रेसचे कांहीं प्रमुख कार्यकर्ते सामील असल्यानें या बंडाची जबाबदारी काँग्रेसवर येते असें ब्रिटिशांनी म्हटल्यास त्यांतही कांहीं चूक नाहीं. असो.

## गांधीजींवरील आरोप

गांधीजी जपानला अनुकूल आहेत असा जो आरोप सरकारनें केला ( हा आरोप आपण केला नाहीं असें सरकार आतां म्हणतें, पण सरकारी पत्रकांत हा आरोप बराच स्पष्ट आहे. ) त्याला गांधींनींच थोडासा वाव दिला होता हें खरें आहे. हिंदुस्थाननें या युद्धांत प्रत्यक्ष भाग न घेता ब्रिटिशांना केवळ नैतिक साहाय्य करावें असें मत युद्धारंभीं त्यांनीं व्यक्त केलें होतें. पुढें फ्रान्सचा पाडाव झाल्यानंतर फ्रान्सनें शस्त्रें खालीं ठेविलीं म्हणून गांधींनीं फ्रेंच सरकारचें अभिनंदनही केलें आणि ब्रिटिशांनींही अशींच शस्त्रें खालीं ठेवावीं असा उपदेश केला यांत त्यांची विचारसरणी कोणती होती त्याची चिकित्सा करण्याचें येथें कारण नाहीं. त्यांच्या अहिंसा तत्त्वास तीं मतें धरूनच होतीं इतकें म्हटलें म्हणजे पुरे. पण सामान्य लोकांच्या दृष्टीनें हीं मतें विचित्र होतीं व शत्रूस उपयोगी पडणारीं होतीं हें अगदीं खरें आहे. हिंदुस्थानांत राष्ट्रीय सरकार स्थापन झाल्यास त्यानें जपानशीं तह करावा असेंही गांधी बोलले होते. हिंदुस्थानांत ब्रिटिश सत्ता आहे म्हणून हिंदुस्थान जिंकावा असें इतर साम्राज्यवाद्यांना वाटतें असें मत गांधींनीं प्रतिपादलें होतें. या आधारावर गांधी हे जपानला अनुकूल आहेत असा ध्वनि सरकारनें आपल्या आरोपपत्रकांत काढला असून गांधी हे कॉँग्रेसचे नेते म्हणून जाहीर झाले असल्यानें कॉँग्रेसलाही त्या आरोपांत सरकारनें खेचलें आहे.

## कॉँग्रेस व गांधीजी

या आरोपास दोन उत्तरें देण्यासारखीं आहेत. पहिलें उत्तर असें कीं गांधी हे अतिशय थोर सत्पुरुष असून देशाच्या शत्रूस सामील होण्यासारखें विश्वासघाताचें कृत्य ते करतील हें कधींच शक्य नव्हतें. जनरल स्मट्स् यांनीं कांहीं महिन्यांपूर्वी इंग्लंडास भेट दिली असतां गांधींच्या संबंधानें हेंच मत स्पष्टपणें व्यक्त केलें होतें. दुसरा मुद्दा असा आहे कीं गांधींचें हें मत कॉँग्रेसनें कधींही स्वीकारलेलें नाहीं. युद्धाचे आरंभीं सरकारला युद्धांत निव्वळ नैतिक सहकार्य करावें असें मत गांधींनीं मांडलें असतां आझाद, नेहरू व वर्किंग कमिटींतील इतर अनेक सभासद यांनीं गांधींना विरोध करून १४ सप्टेंबर १९३९चा सुप्रसिद्ध जाहिरनामा प्रसिद्ध केला. पुढें १९४०च्या जुलैंत दिल्लीस कॉँग्रेस वर्किंग कमिटीनें राष्ट्रीय मंत्रिमंडळाच्या मागणीचा

ठराव गांधींच्या विरोधास न जुमानतां केला. तो पुण्यास ऑ. इं. कॉं. कमिटीनें मंजूर केला. वैयक्तिक सत्याग्रहाच्या काळांत 'कॉंग्रेस यापुढें युद्धाची जबाबदारी कधींही घेणार नाहीं,' अशा आशयाचा लेख गांधींनीं 'टाईम्स ऑफ इंडियां'त लिहिला होता. पण बार्डोलीस १९४२च्या जानेवारींत जो वर्किंग कमिटीचा ठराव झाला त्यांत गांधींना कॉंग्रेसच्या नेतृत्वापासून बाजूस काढून परचक्राविरुद्ध सशस्त्र युद्ध करण्याचें कॉंग्रेसनें मान्य केलें. क्रिप्सवाटाघाटींच्या वेळीं गांधींचा सल्ला झुगारून देऊन मध्यसत्ता पुरेशी मिळाल्यास ब्रिटिश नियंत्रणाखालीं युद्धसहकार्य करण्याचें कॉंग्रेसनें पत्करलें होतें. हिंदुस्थानांत इंग्लंडची व अमेरिकेची सैन्यें राहूं नयेत हें गांधींचें मत नेहरूंनीं त्यांना मागें घ्यावयास लावलें. शेवटीं १४ जुलैला वर्ध्यास कॉंग्रेस वर्किंग कमिटींत व नंतर मुंबईस ऑ. इं. कॉं. कमिटींत जो ठराव पास झाला त्यांमध्यें स्वातंत्र्याची घोषणा झाल्यास तात्पुरतें सरकार स्थापन होईल आणि स्वतंत्र हिंदुस्तान हें संयुक्त राष्ट्रांच्या बाजूनें युद्धांत सामील होईल असें स्पष्ट सांगण्यात आलें होतें. ऑस्ट्रेलियन पंतप्रधान मि. कर्टिन हा जनरल मॅकआर्थर-या अमेरिकन सेनापतीकडे युद्धयंत्र सोपवून आपण युद्धमंत्री या नात्यानें कारभार करतो. इतपत सत्ता येथील लोकप्रतिनिधींना मिळाली म्हणजे झालें असा खुलासा पूर्वी अनेकदां करण्यांत आला होता. 'मुस्लिम लीगला मंत्रिमंडळ बनवूं या, मंत्रिमंडळ कायदे मंडळास जबाबदार असलें म्हणजे झालें, असें मंत्रिमंडळ युद्धसहकार्याची जबाबदारी पत्करील' असें परोपरीनें ब्रिटनला कॉंग्रेसपुढाऱ्यांनीं सांगितलें होतें. हा सर्व ताजा ऐतिहासिक पुरावा आहे. गांधी कॉंग्रेसचे नेते होते, पण सत्याग्रहाचे तज्ज्ञ म्हणून ते नेते होते, आणि सरकारशीं वाटाघाटी करण्याचा अधिकार त्यांना दिला होता तो त्यांच्या विशिष्ट अहिंसावादी धोरणास अनुसरून वाटाघाटी करण्याचा दिलेला नसून कॉंग्रेसच्या ठरावांतील धोरणास अनुसरूनच वाटाघाटी करण्याचा दिला होता. गांधींचें विशिष्ट मत हें कॉंग्रेसचें धोरण कधींच नव्हतें. कॉंग्रेसचें धोरण हें मुख्यतः आझाद-नेहरूंचें धोरण होतें. त्याची बजावणी नेहरूप्रभृतींच्या साहाय्यानें करण्याची जबाबदारी गांधींचेवर टाकण्यांत आली होती.

## नेहरूंची काळजी कोणती

१४ जुलै १९४२ रोजीं वर्ध्यास कॉंग्रेस वर्किंग कमिटीनें जो ठराव मंजूर केला

व जो थोड्या फरकानें ८ ऑगस्ट रोजीं मुंबईस मंजूर झाला त्यावर पं. नेहरूंनीं जुलैमध्येंच दिल्लीस वार्ताहार परिषदेंत महत्त्वाचें भाष्य केलें होतें. तें संक्षेपानें येथें देतों. सरकारी आरोपास तें बिनतोड उत्तर आहे. नेहरू म्हणतात, "ब्रिटिश सत्ता येथून काढून घ्या असें आम्हीं म्हणतों याचें मुख्य कारण असें आहे कीं त्यामुळें परचक्रास प्रतिकार करण्याचा उत्साह आम्हांला जनतेच्या अंगीं उत्पन्न करता येईल. हल्लींच्या राज्यसत्तेचा सांगाडा अकस्मात येथून काढून नेण्यांत आला तर त्यांत धोका आहे खरा. हें कृत्य सरकारनें सौजन्यानें न करतां दुष्टाव्यानें केलें तर हा धोका फारच मोठा ठरेल. पण आजच्या परिस्थितींत जे धोके आहेत त्यापेक्षा इतर कोणतेही धोके पुरवले. हिंदुस्थानवर परचक्र आल्यास लोकांनीं निष्क्रिय राहूं नये यासाठीं, जपानला अनुकूल अशी जी भावना देशांत पसरली आहे तिच्याविरुद्ध गेले चार महिने आम्ही झगडत आहों. लोकांतील ही भावना जपानला अनुकूल आहे असेंही नव्हे. ब्रिटिशविरोधी भावना तीव्र असल्यानें तिला जपानानुकूल असें स्वरूप येतेसें भासतें. युद्धानंतर स्वातंत्र्य देण्याचें आश्वासन संयुक्त राष्ट्रांनीं दिलें तरी तें व्यर्थ आहे. त्यामुळें आमचें समाधान होणार नाहीं. आम्ही कांहीं सरकारला युद्धाच्या अडचणींत गाठून त्यांच्याकडून स्वातंत्र्याचें आश्वासन उकळून घेऊं पहात नाहीं. आम्हांला काळजी वाटते ती सध्यांची. आम्ही, ब्रिटिश सरकार आणि इतर सर्वजण हल्लींच्याच स्थितींत राहिलों तर खरोखर अनर्थ होण्याची भीति आहे. आशिया आणि आफ्रिका यांसंबंधानें संयुक्त राष्ट्रें कायमचें कांहीं धोरण जाहीर करतील तर तें हवेंच आहे. पण युद्धानंतर काय होणार यासंबंधानें आश्वासनें नकोत, आज काय करणार तें बोला, हें युद्धाच्या आरंभापासून आमचें मागणें आहे. सध्या चालून आलेल्या परचक्राचा प्रतिकार कसा करावा हाच महत्त्वाचा मुद्दा आहे. ब्रिटिश सत्ता काढून घेण्यामुळें धोका होऊं नये अशी जास्तींत जास्त तजवीज आम्हीं केली आहे. कारण ब्रिटिश राष्ट्र व मित्रराष्ट्रें यांचीं सैन्यें येथें राहूं देण्यास आमची संमति आहे. यामुळें युद्धयंत्रास धक्का लागणार नाहीं. राज्यसत्ता स्वदेशी आहे असें लोकांना वाटलें व ती कांहींशी स्थिर स्वरूपाची झाली म्हणजे युद्धसाहित्याची वाढ अफाट होईल. उत्पादन करणाऱ्यांना आपण स्वदेशासाठीं उत्पादन करतों आहों असें वाटले म्हणजे अकस्मात त्यांचा उत्साह वाढूं शकतो. राष्ट्रीय सरकार झालें म्हणजे अंतर्गत रखवालीसाठीं प्रचंड सैन्य निर्माण करतां

येऊन नागरिकदलही प्रचंड उभारता येईल. राखीव सैन्य म्हणूनच नव्हेतर देशांतील सर्वच कामाचा उठाव करणारें दल म्हणूनही त्याचा उपयोग होईल."

## ब्रिटिश सत्ता गेली तर

"ब्रिटिशांचें येथील सरकार गेल्यास त्याची जागा तावडतोब भरून काढील असें सरकार येथें निर्माण करण्याची तुम्हांजवळ काय योजना आहे?" असा प्रश्न एका वार्ताहरानें विचारला असतां पं. नेहरू म्हणाले, "ब्रिटिश सरकारला कॉंग्रेसची मागणी स्वीकारणें न्याय्य वाटलें तर त्यानें तसें जाहीर करावें. त्यामुळें नवीन देशी सरकार स्थापन करणें शक्य व्हावें अशी परिस्थिति निर्माण होईल. सरकार आमची मागणी सौजन्यानें मान्य करणार कीं दुष्टाव्याने मान्य करणार यावर सर्व गोष्टी अवलंबून आहेत. सौजन्यानें मान्य करील तर एक राजवट जाऊन दुसरी येण्याच्या दरम्यान मुळींच खंड पडणार नाहीं. जें नवें सरकार निर्माण होईल तें कॉंग्रेस, मुस्लिम लीग आणि इतर गट यांचें मिश्र सरकार असेल. कारण जो कोणी सरकार बनवील त्याला इतर पक्षांचें व गटांचें समाधान करावेंच लागेल. परिस्थितीचें दडपण इतकें मोठें आहे कीं त्याला यश आल्यावांचून राहणार नाहीं. जपानचा प्रतिकार करण्याची भावना देशांत तीव्र करणें हें माझें साध्य आहे. लागोपाठ दोन तीन मोठे लष्करी पराभव झाले तरी ही जयिष्णु भावना टिकून राहावी इतकी जोमदार ती मला बनवायची आहे. अहिंसात्मक प्रतिकार हा सामान्य नागरिकांसाठीं आहे. सैनिकांनीं सशस्त्र प्रतिकारच केला पाहिजे."

## लोक कां चिडतात

"कॉंग्रेस जपानशीं तह करूं इच्छिते असें क्रिप्स यांना वाटल्यामुळें वाटाघाटी फसल्या असा एक प्रवाद आहे तो खरा आहे काय?" असें वार्ताहरांनीं विचारले असतां नेहरू म्हणाले, "ही कल्पनाच अगदीं भरमसाट आहे. सर स्टॅफर्ड यांनींही वाटाघाटी फसण्याचें हें कारण होतें असें म्हटलें नसून अहिंसा हें कारण होतें असें म्हटलें आहे. खरोखर तेंही खोटें आहे. त्यांच्या आमच्या बोलण्यांत अहिंसेचा जो उल्लेख आला होता तो अकरणात्मक होता. राज्यसत्ता मिळाल्यास आम्ही अहिंसेनें नव्हे तर शस्त्रानें लढणार आहों असें आम्ही क्रिप्स यांना कळविलें होतें. कित्येक कोटि नागरिक सैन्य आम्हांस उभारावें लागेल असें आम्हीं म्हटलें. सर्व चर्चा संयुक्त राष्ट्रांशीं सहकार्य करावयाचें याच भूमिकेवर झाली. अमेरिकन

सैन्य येथें आलें आहे याबद्दल कोणासही राग नाहीं. लोकांना संताप जो येतो तो येथें विदेशी सैन्य आणलें जातें पण आम्ही येथें जे कोट्यवधि लोक आहों त्यांना मात्र युद्धकार्यांत महत्त्वाचें स्थान देण्यांत येत नाहीं यामुळें येतो."

## आम्ही कसे लढूं

जपानशीं तुम्ही कसें लढाल या प्रश्नास उत्तर देतांना पं. नेहरूम्हणाले, "शक्य त्या सर्व मार्गांनीं आम्ही लढूं. अहिंसेनें लढूं, शस्त्रानें लढूं, या युद्धाला लोकयुद्धाचें स्वरूप देऊन व लोकसैन्य निर्माण करून लढूं. धनोत्पादन वाढवूं, उद्योगधंदे वाढवूं, अंतःकरणांत भावनेची ज्योत पेटवूं, रशियन वीराप्रमाणें आणि चिनी वीराप्रमाणें लढूं. परचक्राला टक्कर देऊन यश मिळविण्यासाठीं केवढीही किंमत द्यावी लागली तरी ती आम्ही फार आहे असें मानणार नाहीं."

वर्धाठरावाच्या स्पष्टीकरणार्थ मौ. आझाद यांनींही महत्त्वाची मुलाखत दिली. "वाटाघाटीचा दरवाजा काँग्रेसनें बंद केला काय?" असा प्रश्न वृत्त-प्रतिनिधींनीं विचारला असता मौ.आझाद म्हणाले, 'स्वातंत्र्य मान्य करण्याच्या बाबतींत वाटाघाटीस मुळींच वाव नाहीं. तें मूलतत्त्व आहे तें संयुक्त राष्ट्रांनीं मान्य केलेंच पाहिजे. पण स्वातंत्र्य मान्य केल्यानंतर मात्र पुढील व्यवस्थेसाठीं वाटाघाटीस आमची तयारी आहे."

काँग्रेस वर्किंग कमिटींत काँग्रेसच्या युद्धविषयक धोरणावर मतभेद नव्हते असें नाहीं. नेहरू–आझाद गट एका बाजूस व गांधी गट दुसऱ्या बाजूस असे हे मतभेद होते. कांहींही झालें तरी काँग्रेसनें युद्धाची जबाबदारी आपल्या अंगावर घेऊं नये असें गांधीगटाचें मत होतें. पण नेहरूंनीं अखेर आपलें मत गांधी-गटास पटविलें, निदान त्याचेवर लादलें हें कांहीं खोटें नाहीं. १९४०च्या जुलैंत सरदार पटेल गांधींचा त्याग करून राष्ट्रीय सरकारच्या मागणीस अनुकूल झाले. ही भूमिका पुढें त्यांनीं सोडली होती. पण क्रिप्सयोजनेची काँग्रेसच्या मागणी-प्रमाणें सुधारणा झाली असती तर सरदार पटेलही सहकार्यास तयार झाले असते. पुढें त्यांची युद्धसहकार्याबाबत निराशा झाली. सरकार कांहींही न देता फक्त फसवून हिंदी लोकांना हमालासारखे राबवूं पाहते असें पाहून ते युद्धसहकार्याबाबत उदासीन झाले. पण १४ जुलैचा वर्किंग कमिटीचा जो ठराव ( आणि ८ ऑगस्टचा

ऑ. इं. कॉं. कमिटीनें सुधारून वाढविलेला तोच ठराव ) त्यांत हिंदुस्थानचें स्वातंत्र्य मान्य झाल्यास राष्ट्रसंरक्षणासाठीं लढण्याची जी तयारी कॉंग्रेसनें दाखविली तिला पटेल यांचा पाठिंबा होता आणि गांधींचाही होता. पटेल, नेहरू व गांधी यांची भूमिका अखेरीस एकरूप झाली होती. १४ जुलैनंतर तिघांनींही केलेल्या भाषणांतील एकेक उतारा येथें देतों म्हणजे ही गोष्ट स्पष्ट होईल.

## वल्लभभाई पटेल यांचें मत

३ ऑगस्ट १९४२ रोजीं सरदार वल्लभभाई पटेल यांनीं पुढील आशयाचें भाषण केलें. " हिंदुस्थानच्या संमतीवांचून हिंदुस्थानला युद्धांत खेचण्यांत आलें. याचा निषेध करण्यासाठीं सात प्रांतातील मंत्र्यांनीं राजीनामे दिले.* त्या निषेधाची उपेक्षा करण्यांत आली. नंतर युद्धहेतूंचा खुलासा करा अशी मागणी करण्यांत आली. त्याचेंही उत्तर दिलें गेलें नाहीं.

पुढें राष्ट्रीय सरकार हिंदुस्थानांत स्थापन करण्यांत आल्यास युद्धांत सहकार्य करण्याचें कॉंग्रेसनें पुण्याच्या ऑ. इ. कॉं. कमिटींत मान्य केलें होतें. त्याही मागणीची अवज्ञा करण्यात आली. तेव्हां गांधींना चळवळ सुरू करण्याचा अधिकार देण्यांत आला. त्यांनीं वैयक्तिक सत्याग्रहाची जी चळवळ सुरु केली ती मर्यादित ठेवण्यांत आली होती. सरकारच्या युद्धप्रयत्नांत अडचणी आणूं नयेत हा गांधींचा

---

* पटेल यांचें हें भाषण येथें सदोष आहे. भाषण उतरून घेतांना वार्ताहरानें कांहीं घोटाळा केला असावा. वस्तुस्थिती अशी आहे, कीं देशाच्या संमतीवाचून देशाला युद्धांत खेचण्यांत आलें हें गैर झालें असें १४ सप्टेंबरच्या कॉंग्रेस जाहिरनाम्यात म्हटलें आहे. पण प्रांतिक कॉंग्रेसमंत्र्यांनीं त्याच्या निषेधार्थ राजीनामे दिले असें नव्हे. सरकारनें आपले युद्धहेतु जाहीर करावेत, लोकशाही आणि स्वातंत्र्य यासाठीं आपण लढतों असें जें सरकारचें म्हणणें तें सत्य आहे याची खातरजमा हिंदुस्थानला करून देण्यासाठीं सरकार कोणतें पाऊल टाकणार आहे हें त्यांनीं कळवावें अशी मागणी त्या जाहिरनाम्यांत करण्यांत आली. पुढें अशी कोणतीही खातरजमा करण्याचा प्रयत्न सरकारनें केला नाहीं. युद्धाचे साम्राज्यशाही स्वरूप कायमच राहिलें असल्याचें व्हाइसरॉयांच्या १८ ऑक्टोबर १९३९च्या घोषणेनंतर स्पष्टपणें दिसून आलें. तेव्हां साम्राज्यशाही युद्धांत सहकार्य करावयाचें नाहीं या कॉंग्रेसच्या धोरणास अनुसरून कॉंग्रेस मंत्र्यांनीं नोव्हेंबरमध्यें राजीनामे दिले.

सैन्य येथें आलें आहे याबद्दल कोणासही राग नाहीं. लोकांना संताप जो येतो तो येथें विदेशी सैन्य आणलें जातें पण आम्ही येथें जे कोट्यवधि लोक आहों त्यांना मात्र युद्धकार्यांत महत्त्वाचें स्थान देण्यांत येत नाहीं यामुळें येतो."

## आम्ही कसे लढूं

जपानशीं तुम्ही कसें लढाल या प्रश्नास उत्तर देतांना पं. नेहरूम्हणाले, " शक्य त्या सर्व मार्गांनीं आम्ही लढूं. अहिंसेनें लढूं, शस्त्रानें लढूं, या युद्धाला लोकयुद्धाचें स्वरूप देऊन व लोकसैन्य निर्माण करून लढूं. धनोत्पादन वाढवूं, उद्योगधंदे वाढवूं, अंतःकरणांत भावनेची ज्योत पेटवूं, रशियन वीराप्रमाणें आणि चिनी वीराप्रमाणें लढूं. परचक्राला टक्कर देऊन यश मिळविण्यासाठीं केवढीही किंमत द्यावी लागली तरी ती आम्ही फार आहे असें मानणार नाहीं. "

वर्धाठरावाच्या स्पष्टीकरणार्थ मौ. आझाद यांनींही महत्त्वाची मुलाखत दिली. " वाटाघाटीचा दरवाजा काँग्रेसनें बंद केला काय ? " असा प्रश्न वृत्त-प्रतिनिधींनीं विचारला असता मौ.आझाद म्हणाले,'स्वातंत्र्य मान्य करण्याच्या बाबतींत वाटाघाटीस मुळींच वाव नाहीं. तें मूलतत्त्व आहे तें संयुक्त राष्ट्रांनीं मान्य केलेंच पाहिजे. पण स्वातंत्र्य मान्य केल्यानंतर मात्र पुढील व्यवस्थेसाठीं वाटाघाटीस आमची तयारी आहे. "

काँग्रेस वर्किंग कमिटींत काँग्रेसच्या युद्धविषयक धोरणावर मतभेद नव्हते असें नाहीं. नेहरू–आझाद गट एका बाजूस व गांधी गट दुसऱ्या बाजूस असे हे मतभेद होते. कांहींही झालें तरी काँग्रेसनें युद्धाची जबाबदारी आपल्या अंगावर घेऊं नये असें गांधीगटाचें मत होतें. पण नेहरूंनीं अखेर आपलें मत गांधी-गटास पटविलें, निदान त्याचेवर लादलें हें कांहीं खोटें नाहीं. १९४०च्या जुलैंत सरदार पटेल गांधींचा त्याग करून राष्ट्रीय सरकारच्या मागणीस अनुकूल झाले. ही भूमिका पुढें त्यांनीं सोडली होती. पण क्रिप्सयोजनेची काँग्रेसच्या मागणी-प्रमाणें सुधारणा झाली असती तर सरदार पटेलही सहकार्यास तयार झाले असते. पुढें त्यांची युद्धसहकार्याबाबत निराशा झाली. सरकार कांहींही न देता फक्त फसवून हिंदी लोकांना हमालासारखे राबवूं पाहते असें पाहून ते युद्धसहकार्याबाबत उदासीन झाले. पण १४ जुलैचा वर्किंग कमिटीचा जो ठराव ( आणि ८ ऑगस्टचा

ऑ. इं. काँ. कमिटीनें सुधारून वाढविलेला तोच ठराव ) त्यांत हिंदुस्थानचें स्वातंत्र्य मान्य झाल्यास राष्ट्रसंरक्षणासाठीं लढण्याची जी तयारी काँग्रेसनें दाखविली तिला पटेल यांचा पाठिंबा होता आणि गांधींचाही होता. पटेल, नेहरू व गांधी यांची भूमिका अखेरीस एकरूप झाली होती. १४ जुलैनंतर तिघांनीं ही केलेल्या भाषणांतील एकेक उतारा येथें देतों म्हणजे ही गोष्ट स्पष्ट होईल.

## वल्लभभाई पटेल यांचें मत

३ ऑगस्ट १९४२ रोजीं सरदार वल्लभभाई पटेल यांनीं पुढील आशयाचें भाषण केलें. " हिंदुस्थानच्या संमतीवांचून हिंदुस्थानला युद्धांत खेचण्यांत आलें. याचा निषेध करण्यासाठीं सात प्रांतातील मंत्र्यांनीं राजीनामे दिले.* त्या निषेधाची उपेक्षा करण्यांत आली. नंतर युद्धहेतूंचा खुलासा करा अशी मागणी करण्यांत आली. त्याचेंही उत्तर दिलें गेलें नाहीं.

पुढें राष्ट्रीय सरकार हिंदुस्थानांत स्थापन करण्यांत आल्यास युद्धांत सहकार्य करण्याचें काँग्रेसनें पुण्याच्या ऑ. इ. काँ. कमिटींत मान्य केलें होतें. त्याही मागणीची अवज्ञा करण्यांत आली. तेव्हां गांधींना चळवळ सुरू करण्याचा अधिकार देण्यांत आला. त्यांनीं वैयक्तिक सत्याग्रहाची जी चळवळ सुरू केली ती मर्यादित ठेवण्यांत आली होती. सरकारच्या युद्धप्रयत्नांत अडचणी आणूं नयेत हा गांधींचा

---

* पटेल यांचें हें भाषण येथें सदोष आहे. भाषण उतरून घेतांना वार्ताहरानें कांहीं घोटाळा केला असावा. वस्तुस्थिती अशी आहे, कीं देशाच्या संमतीवाचून देशाला युद्धांत खेचण्यांत आलें हें गैर झालें असें १४ सप्टेंबरच्या काँग्रेस जाहिरनाम्यात म्हटलें आहे. पण प्रांतिक काँग्रेसमंत्र्यांनीं त्याच्या निषेधार्थ राजीनामे दिले असें नव्हे. सरकारनें आपले युद्धहेतु जाहीर करावेत, लोकशाही आणि स्वातंत्र्य यासाठीं आपण लढतों असें जें सरकारचें म्हणणें तें सत्य आहे याची खातरजमा हिंदुस्थानला करून देण्यासाठीं सरकार कोणतें पाऊल टाकणार आहे हें त्यांनीं कळवावें अशी मागणी त्या जाहिरनाम्यांत करण्यांत आली. पुढें अशी कोणतीही खातरजमा करण्याचा प्रयत्न सरकारनें केला नाहीं. युद्धाचे साम्राज्यशाही स्वरूप कायमच राहिलें असल्याचें व्हाइसरॉयांच्या १८ ऑक्टोबर १९३९च्या घोषणेनंतर स्पष्टपणें दिसून आलें. तेव्हां साम्राज्यशाही युद्धांत सहकार्य करावयाचें नाहीं या काँग्रेसच्या धोरणास अनुसरून काँग्रेस मंत्र्यांनीं नोव्हेंबरमध्यें राजीनामे दिले.

सैन्य येथें आलें आहे याबद्दल कोणासही राग नाहीं. लोकांना संताप जो येतो तो येथें विदेशी सैन्य आणलें जातें पण आम्ही येथें जे कोट्यवधि लोक आहों त्यांना मात्र युद्धकार्यांत महत्त्वाचें स्थान देण्यांत येत नाहीं यामुळें येतो."

## आम्ही कसे लढूं

जपानशीं तुम्ही कसें लढाल या प्रश्नास उत्तर देतांना पं. नेहरूम्हणाले, " शक्य त्या सर्व मार्गांनीं आम्ही लढूं. अहिंसेनें लढूं, शस्त्रानें लढूं, या युद्धाला लोकयुद्धाचें स्वरूप देऊन व लोकसैन्य निर्माण करून लढूं. धनोत्पादन वाढवूं, उद्योगधंदे वाढवूं, अंतःकरणांत भावनेची ज्योत पेटवूं, रशियन वीराप्रमाणें आणि चिनी वीराप्रमाणें लढूं. परचक्राला टक्कर देऊन यश मिळविण्यासाठीं केवढीही किंमत द्यावी लागली तरी ती आम्ही फार आहे असें मानणार नाहीं."

वर्धाठरावाच्या स्पष्टीकरणार्थ मौ. आझाद यांनींही महत्त्वाची मुलाखत दिली. " वाटाघाटीचा दरवाजा काँग्रेसनें बंद केला काय ?" असा प्रश्न वृत्त-प्रतिनिधींनीं विचारला असता मौ.आझाद म्हणाले,'स्वातंत्र्य मान्य करण्याच्या बाबतींत वाटाघाटीस मुळींच वाव नाहीं. तें मूलतत्त्व आहे तें संयुक्त राष्ट्रांनीं मान्य केलेंच पाहिजे. पण स्वातंत्र्य मान्य केल्यानंतर मात्र पुढील व्यवस्थेसाठीं वाटाघाटीस आमची तयारी आहे."

काँग्रेस वर्किंग कमिटींत काँग्रेसच्या युद्धविषयक धोरणावर मतभेद नव्हते असें नाहीं. नेहरू-आझाद गट एका बाजूस व गांधी गट दुसऱ्या बाजूस असे हे मतभेद होते. कांहींही झालें तरी काँग्रेसनें युद्धाची जबाबदारी आपल्या अंगावर घेऊं नये असें गांधीगटाचें मत होतें. पण नेहरूंनीं अखेर आपलें मत गांधी-गटास पटविलें, निदान त्याचेवर लादलें हें कांहीं खोटें नाहीं. १९४०च्या जुलैंत सरदार पटेल गांधींचा त्याग करून राष्ट्रीय सरकारच्या मागणीस अनुकूल झाले. ही भूमिका पुढें त्यांनीं सोडली होती. पण क्रिप्सयोजनेची काँग्रेसच्या मागणी-प्रमाणें सुधारणा झाली असती तर सरदार पटेलही सहकार्यास तयार झाले असते. पुढें त्यांची युद्धसहकार्याबाबत निराशा झाली. सरकार कांहींही न देता फक्त फसवून हिंदी लोकांना हमालासारखे राबवूं पाहते असें पाहून ते युद्धसहकार्याबाबत उदासीन झाले. पण १४ जुलैचा वर्किंग कमिटीचा जो ठराव ( आणि ८ ऑगस्टचा

ऑ. इं. कॉं. कमिटीनें सुधारून वाढविलेला तोच ठराव ) त्यांत हिंदुस्थानचें स्वातंत्र्य मान्य झाल्यास राष्ट्रसंरक्षणासाठीं लढण्याची जी तयारी कॉंग्रेसनें दाखविली तिला पटेल यांचा पाठिंबा होता आणि गांधींचाही होता. पटेल, नेहरू व गांधी यांची भूमिका अखेरीस एकरूप झाली होती. १४ जुलैनंतर तिघांनीं ही केलेल्या भाषणांतील एकेक उतारा येथें देतों म्हणजे ही गोष्ट स्पष्ट होईल.

## वल्लभभाई पटेल यांचें मत

३ ऑगस्ट १९४२ रोजीं सरदार वल्लभभाई पटेल यांनीं पुढील आशयाचें भाषण केलें. " हिंदुस्थानच्या संमतीवांचून हिंदुस्थानला युद्धांत खेचण्यांत आलें. याचा निषेध करण्यासाठीं सात प्रांतातील मंत्र्यांनीं राजीनामे दिले.* त्या निषेधाची उपेक्षा करण्यांत आली. नंतर युद्धहेतूंचा खुलासा करा अशी मागणी करण्यांत आली. त्याचेंही उत्तर दिलें गेलें नाहीं.

पुढें राष्ट्रीय सरकार हिंदुस्थानांत स्थापन करण्यांत आल्यास युद्धांत सहकार्य करण्याचें कॉंग्रेसनें पुण्याच्या ऑ. इ. कॉं. कमिटींत मान्य केलें होतें. त्याही मागणीची अवज्ञा करण्यात आली. तेव्हां गांधींना चळवळ सुरू करण्याचा अधिकार देण्यांत आला. त्यांनीं वैयक्तिक सत्याग्रहाची जी चळवळ सुरू केली ती मर्यादित ठेवण्यांत आली होती. सरकारच्या युद्धप्रयत्नांत अडचणी आणूं नयेत हा गांधींचा

---

* पटेल यांचें हें भाषण येथें सदोष आहे. भाषण उतरून घेतांना वार्ताहरानें कांहीं घोटाळा केला असावा. वस्तुस्थिती अशी आहे, कीं देशाच्या संमतीवाचून देशाला युद्धांत खेचण्यांत आलें हें गैर झालें असें १४ सप्टेंबरच्या कॉंग्रेस जाहिरनाम्यात म्हटलें आहे. पण प्रांतिक कॉंग्रेसमंत्र्यांनीं त्याच्या निषेधार्थ राजीनामे दिले असें नव्हे. सरकारनें आपले युद्धहेतु जाहीर करावेत, लोकशाही आणि स्वातंत्र्य यासाठीं आपण लढतों असें जें सरकारचें म्हणणें तें सत्य आहे याची खातरजमा हिंदुस्थानला करून देण्यासाठीं सरकार कोणतें पाऊल टाकणार आहे हें त्यांनीं कळवावें अशी मागणी त्या जाहिरनाम्यांत करण्यांत आली. पुढें अशी कोणतीही खातरजमा करण्याचा प्रयत्न सरकारनें केला नाहीं. युद्धाचे साम्राज्यशाही स्वरूप कायमच राहिलें असल्याचें व्हाइसरॉयांच्या १८ ऑक्टोबर १९३९च्या घोषणेनंतर स्पष्टपणें दिसून आलें. तेव्हां साम्राज्यशाही युद्धांत सहकार्य करावयाचें नाहीं या कॉंग्रेसच्या धोरणास अनुसरून कॉंग्रेस मंत्र्यांनीं नोव्हेंबरमध्यें राजीनामे दिले.

यांत हेतु होता. तरीही सरकारनें कांहीं केलें नाहीं. जवळ जवळ एक वर्ष असेंच ढकललें गेलें. इकडे युद्धपरिस्थिति पालटली, बिघडत गेली. काँग्रेसला अंतर्गत अस्वस्थता नाहींशी करण्यासाठीं स्वयंसेवकसंघटना निर्माण करून आपल्या शक्तीची जमवाजमव करावयाची होती. ( पण या संघटनेस सरकारनें आगाऊच कायदेशीर अडचणी अनंत निर्माण केल्या होत्या. ) लोकांचा असंतोष कमी होईना. दोस्तराष्ट्रांच्या दडपणामुळें स्टॅफर्ड क्रिप्स यांना हिंदुस्थानांत पाठविण्यांत आलें. क्रिप्स यांना हिंदुस्थानाबद्दल सहानुभूति वाटते तेव्हां त्यांच्या मार्फत हिंदुस्थानशीं वाटाघाटी केल्यास कांहींतरी समेट होईल अशी पुष्कळांची अपेक्षा होती. हिंदुस्थान आणि ब्रिटन यांच्यामधील तेढ क्रिप्स नाहींशी करतील असा विश्वास वाटत होता. म्हणून गांधीजींचा विरुद्ध सल्ला झुगारून देऊन काँग्रेस वर्किंग कमिटीनें क्रिप्स यांच्या योजनेचा विचार करण्याचें ठरविलें. पंधरा दिवस वाटाघाटी झाल्या. शेवटीं गांधीजी म्हणाले तेंच खरें असें आढळून आलें. हिंदुस्थानांतले सर्व पक्ष क्रिप्स यांच्या योजनेमुळें असंतुष्ट झाले. ती योजना फेटाळून लावण्यांत सर्व हिंदुस्थानची एकजूट होती. युद्ध हिंदुस्थानच्या जवळजवळ येत होतें. मलाया, सिंगापूर ब्रह्मदेश यांवर जें दुर्दैव कोसळलें तें आपणांवर कोसळूं नये यासाठीं शक्य त्या सर्व उपायांचा हिंदी लोकांनीं विचार केला. ब्रिटिशांनीं येथील सत्ता सोडली तरच हा अनर्थ टाळतां येईल असें गांधीजी व काँग्रेस यांना वाटलें. शत्रूला या देशापासून दूर राखण्यासाठीं जनतेची सहानुभूति व सहकार्य अवश्य होतें. ब्रिटिशांनीं येथली सत्ता सोडली तर लोकांना जागृत करून रशियन आणि चिनी लोकांप्रमाणें लढायला लावतां येईल."

"रशियन आणि चिनी जनतेप्रमाणें हिंदी लोकांना लढायला लावतां येईल" असे पटेल म्हणतात, यावरून ते नुसते अहिंसेची भूमिका मानीत होते अथवा जपानला अनुकूल होते असें म्हणता येणार नाहीं.

## मी तटस्थ राहणार नाहीं.

ता. १ ऑगस्ट १९४२ या दिवशीं टिळक पुण्यतिथिनिमित्त भाषण करतांना पं. नेहरू म्हणाले "वर्ध्यास आम्हीं घेतलेल्या निर्णयासंबंधानें माझें मन अगदीं स्वच्छ आहे. वर्किंग कमिटीच्या सभासदाचा दर्जा व अधिकार हा लक्षांत घेऊन मी बोलतों आहें. माझें मन अगदीं शांत आहे. माझ्या समोरील रस्ता मला

अगदीं स्पष्ट दिसतो आहे. शौर्यानें आणि निर्भयपणें हा रस्ता आम्हीं चालून जाऊं. ऐनसमुद्रांत असतां वादळांत सांपडावें तसा हा प्रकार होणार आहे. पण त्यांतून आम्ही सुरक्षित बाहेर पडूं असा आत्मविश्वास मला वाटतो. जगच वादळांत सांपडलें आहे. आमच्याही भोंवती हें वादळ आलें आहे. त्यांतून पळून जाण्याचा प्रयत्न आम्हीं केला तर आमचा पाठलाग करून आम्हांला घेरल्याशिवाय तें रहाणार नाहीं. आमच्या धोरणांत आम्हांला यश आलें तर लोकशाही आणि स्वातंत्र्य यासाठीं लढण्याकरितां प्रचंड भावनाबल येथें निर्माण होईल. त्यामुळें जपान व जर्मनी यांच्याविरुद्ध चालू असलेला प्रतिकार खूप वाढेल. पण आमच्या प्रयत्नांत आम्हीं फसलों तर जपानशीं लढण्यास ब्रिटन मोकळें होईल. आणि त्या परिस्थितींत जसें लढता येईल तसें ब्रिटन लढेल. ब्रिटिशांनीं हिंदुस्थान सोडावें ही जी गांधींची मागणी ती आमचे विचार व भावना अचूकपणें व्यक्त करते. फॅसिस्ट राष्ट्रें व फॅसिस्टविरोधी राष्ट्रें यांचा झगडा चालू असतां या संकटकालीं आम्हीं तटस्थपणें नुसतें पहात राहणें हें मला आत्मघातांचें वाटतें. अन्यायाचा प्रतिकार करण्याची आमच्या ठिकाणची प्रवृत्तिच अशा तटस्थतेनें नष्ट होईल. केवळ स्वातंत्र्याच्या प्रेमानें हें पाऊल आम्हीं टाकतों असें नव्हे. फॅसिस्ट आक्रमणापासून आमचें रक्षण आम्हीं करावें, प्रतिकाराची आमची इच्छा अधिक प्रबळ करावी, युद्धाला एका नव्या हेतूचें वळण लावावें. चीन आणि रशिया यांना मदत करण्यासाठीं लढायला मिळावें म्हणून आम्ही हें पाऊल टाकतों आहों. ही आमची तांतडीची आणि निकडीची गरज आहे."

नेहरूंचा युद्धसहकार्याचा उत्साह किती दांडगा होता याचें गांधींनीं १४ ऑगस्टच्या व्हाइसरॉयांच्या पत्रकांत मार्मिक वर्णन केलें आहे. ते म्हणतात, 'ब्रिटिशांशीं असलेला आपला वैरभाव ते विसरले, चीन व रशिया यांचा पराभव होईल कीं काय ही त्यांनीं धास्त घेतली, त्यासाठीं कोणत्याही त्यागास त्यांनीं तयारी दाखविली. पण अखेर स्वातंत्र्यावांचून कांहींही करता येणार नाहीं हें त्यांच्या लक्षांत येऊन त्यांचा नाइलाज झाला.' स्वतां गांधींनीं नेहरूंच्या सांगण्यावरून इंग्लंड व अमेरिका यांचीं सैन्यें येथें राहावीं यास संमति दिली होती. पुढें व्हाइसरॉयांनीं कॉंग्रेसच्या भूमिकेंत कांहीं विसंगति दाखविली असती तरी ती त्यांनीं काढून टाकली असती असें त्यांनीं १४ ऑगस्टच्या पत्रांत सांगितलें.

आहेच. संयुक्त राष्ट्रांना हिंदुस्थानचें पूर्ण साहाय्य मिळावें याच हेतूनेंच ८ ऑगस्ट चा ठराव झाला असें त्यांनीं आपल्या अखेरच्या भाषणांत म्हटलें आहे.

## दोस्त राष्ट्रांस गांधींचा इषारा

ऑ. इं. काँ. कमिटींत ता. ८ रोजींनीं केलेल्या शेवटच्या भाषणांत गांधीजी म्हणतात. " आज येथें परराष्ट्रांतील वृत्तपत्रांचे प्रतिनिधी जमले आहेत त्यांच्या मार्फत मी जगाला असें सांगूं इच्छितों कीं संयुक्त राष्ट्रांना हिंदुस्थानची मदत हवी असेल तर त्यानीं हिंदुस्थानला स्वातंत्र्य देऊन आपला प्रामाणिकपणा सिद्ध करावा. ही संधि ते गमावतील तर ते आपल्या आयुष्यांत एकदांच येणारी संधि गमावतील. इतिहास असें नोंदून ठेवील कीं हिंदुस्थानसंबंधींचे आपलें कर्तव्य या लोकांनीं योग्य वेळीं बजावलें नाहीं आणि म्हणून पराभव ओढवून घेतला. संयुक्त राष्ट्रांच्या ज्या उघड उघड मर्यादा आहेत त्या त्यांनीं ओलांडाव्या असें मी म्हणत नाहीं. त्यांनीं अहिंसा पतकरावी किंवा शस्त्रें खालीं ठेवावीं असें मी सांगत नाहीं. फॅसिझम्, आणि आम्ही ज्याशीं लढत अ.हों ती साम्राज्यसत्ता यांमध्यें एक मूलभूत फरक आहे. ब्रिटिशांना हिंदुस्थानपासून जें जें हवें तें सर्व मिळते आहे काय ? आज हिंदुस्थानापासून त्यांना जें कांहीं मिळतें आहे ते गुलाम हिंदी जनतेकडून मिळतें आहे, त्याऐवजीं स्वतंत्र राष्ट्र या नात्यानें संयुक्त राष्ट्रांचा दोस्त म्हणून हिंदुस्थान युद्धांत पडेल तर ही मदत किती वाढेल याचा विचार करा. हिंदुस्थानला जर स्वातंत्र्य मिळावयाचें असेल तर तें आज मिळालें पाहिजे. आज तुमच्या हातीं हें स्वातंत्र्य देण्याचें सामर्थ्य आहे. तें सामर्थ्य तुम्ही जर आज वापरलें नाहीं तर उद्यां तुमच्या स्वातंत्र्यदानाची आम्हांला चव रहाणार नाहीं. जर आज तुम्ही स्वातंत्र्य द्याल तर आज अशक्य वाटणाऱ्या गोष्टी स्वातंत्र्याच्या तेजामुळें उद्यां शक्य होतील. हिंदुस्थानला आपण स्वतंत्र आहों अशी भावना एकदां झाली म्हणजे चीनला तें स्वातंत्र्य मिळवून देण्याचा हिंदुस्थान प्रयत्न करील. रशियाच्या मदतीस धाऊन जाण्याचा रस्ता मोकळा होईल. इंग्रज लोक मलायांत अथवा बर्मांत मेले नाहींत, माघारे आले. पण आम्ही चाळीस कोट लोक रणांत न मरता पळून जायचें म्हटलें तर या हिंदुस्थानांतून कोठें माघारी जाणार ? स्वातंत्र्य हातांत येऊन त्याची जाणीव झाल्याशिवाय या प्रचंड मानवसमाजाला जागतिक स्वातंत्र्यासाठीं झगडण्यास उद्युक्त करायचें कसें ? आज त्यांच्या ठिकाणीं

जिवंतपणाची जाणीवच नाहीं, ती ठार झाली आहे. त्यांच्या डोळ्यांत जर जिवंत-पणाचें तेज आणावयाचें असेल तर स्वातंत्र्य उद्यां नव्हे आज मिळालें पाहिजे ! "

गांधींच्या भाषणाचा वरील भाग त्यांनीं मुख्यतः तेथें हजर असलेल्या पर-राष्ट्रीय वातमीदारांना उद्देशून सांगितला होता. सरकारनें ८ ऑगस्टनंतर जी प्रचंड दडपशाही केली तिजसाठीं अमेरिकेंतील व इंग्लंडांतील लोकमत ब्रिटननें अनुकूल करून घेतलें होतें. या मतप्रचारासाठीं सरकारनें पाण्यासारखा पैसा खर्च केला. कॉंग्रेसला त्याच्या अल्पांशानें ही प्रचारखर्च करणें शक्य नव्हतें. तरीही परराष्ट्रांत, मुख्यतः अमेरिकेंत व इंग्लंडांत ब्रिटनच्या धोरणावर सडेतोड व मूल-ग्राही टीका खूप झाली आणि कॉंग्रेसच्या धोरणाचें परभारें उत्तम समर्थन झालें.

## कम्युनिस्टांचा कॉंग्रेसविरोध

कॉंग्रेसच्या एकंदर धोरणाला हिंदुस्तानांत जास्तींत जास्त विरोध हिंदी कम्यु-निस्टांनीं केला. आणि मृदंगाला जसा दोन्ही बाजूंनीं मार खावा लागतो तसा कम्युनिस्टांचा मार कॉंग्रेसला दोहों बाजूंनीं खावा लागला. रामगड कॉंग्रेसच्या वेळीं सोव्हिअट यूनिअन व जर्मनी यांचा तह असल्यामुळें ब्रिटनच्या युद्धयंत्रास कॉंग्रेसनें अडचणींत गाठून तें मोडून पाडावें असें त्यांचें म्हणणें होतें. पण ब्रिटनचा पराभव होईल असा धोका पत्करण्याचें गांधींनीं नाकारलें. त्यामुळें अहिंसा व लोक-शाही या दोहोंचाही नाश होईल अशी त्यांची खात्री होती. पुढें सरकारनें कम्यु-निस्टांना तुरुंगांत अडकविलें. कम्युनिस्टांनीं युद्धकाळांत एकंदर काय काय धोरणें अवलंबिलीं याचा इतिहास येथें द्यावयाचा नाहीं. कॉंग्रेसशीं त्यांच्या धोरणाचा संबंध जेवढ्यापुरता आला तेवढ्यापुरतेंच येथें बोलायचें आहे. १९४१च्या जून-मध्यें जर्मनीनें सोव्हिअट यूनिअनवर चढाई सुरू केली. त्यानंतर सुमारें तीन महिन्यांनीं कम्युनिस्टांचें धोरण अचानक बदललें दिसून आलें. " हें युद्ध आतां साम्राज्यशाही युद्ध नसून लोकयुद्ध आहे, रशियाला मदत करणें हे ब्रिटन–अमे-रिकेचें व हिंदुस्तानचें कर्तव्य आहे व म्हणून हिंदी राज्ययंत्रास बिनशर्त सहकार्य दिलें पाहिजे " असा प्रचार त्यांनीं चालविला. कॉ. रॉय यांची युद्ध सुरू झाल्या-पासून हीच भूमिका होती. पण रॉय यांनीं कॉंग्रेसला फॅसिस्ट ठरवून तिचें सहकार्य ब्रिटननें घेऊं नये असा प्रचार अलीकडे केला, इतकेंच नव्हे तर मध्यकार्यकारी मंडळाहून अधिक सत्ता देण्याची गरजही त्यांना कधीं वाटली नाहीं. तसेंच ज्यांनीं

ज्यांनीं फॅसिझमविरोधी घोषणा केली—मग ते संस्थानिक व जमिनदारही असोत—ते सर्वच देशभक्त व लोकशाहीप्रेमी आहेत असें सर्टिफिकेट सर्वांना देऊन कॉंग्रेसला ठेचून काढण्याच्या सरकारच्या धोरणास रॉयिस्टांनीं उघड उघड उचलून धरलें. कम्युनिस्टांची भूमिका थोडी वेगळी होती. कॉंग्रेस, मुस्लिम लीग व कम्युनिस्ट यांखेरीज बाकीचे सर्व पक्ष आणि येथील नोकरशाही हे सर्व प्रतिगामी असून कॉंग्रेस व मुस्लिम लीग यांची एकजूट करावी आणि त्यांनीं मध्यसत्तेंत राष्ट्रीय सरकार स्थापन करावें अशी त्यांची मागणी होती व आहे. पण लोकयुद्ध व कॉंग्रेस-लीग समेट या दोन मुद्यावर कम्युनिस्ट व कॉंग्रेस यांचा तीव्र मतभेद झाला. कम्युनिस्ट हे विश्वासघातकी, दहशतवादी व सोव्हिअट यूनिअनसाठीं जरूर तर हिंदुस्थानचे नुकसानही करणारे आहेत असा त्यांच्याविषयीं येथें सार्वत्रिक समज आहे. सोव्हिअट सरकारनें ब्रिटनशीं सख्य केलें, त्यांच्याशीं वीस वर्षांचा स्नेहनामा केला, अटलांटिक सनदेला मान्यता दिली, हिंदुस्तानच्या स्वातंत्र्याबद्दलची सर्व आस्था सोडून दिली आणि सोव्हिअट युनिअनच्या कल्याणासाठीं कम्युनिस्ट हे हिंदी स्वातंत्र्यलढ्याच्या पाठींत सुरा मारीत आहेत असा आरोप येथे कॉंग्रेसवाद्याकडून कम्युनिस्टांवर केला जातो. ऑगस्टनंतरच्या दंगलींत जपानचा हात कोठेंहि दिसून आला नाहीं. दंगल करणारे लोक स्वतंत्र राष्ट्र या नात्यानें जपानशीं लढण्याची संधि आपणांस मिळावी म्हणून बंड करण्यास प्रवृत्त झालें होते ही गोष्ट कम्युनिस्टांना माहीत नव्हती असें नाहीं. पण त्यांनीं या बंडवाल्यावर ते शत्रूस फितुर असल्याचा आरोप केला असून बंडवाल्यांपैकीं कांहींना पकडून देण्यास व्यक्तिशः कांहीं कम्युनिस्टांनीं हस्तें परहस्तें मदतही केली. ज्यांनीं पूर्वी कम्युनिस्टांना त्यांच्या अज्ञातवासांत आश्रय दिला अशा कित्येकांना यावेळीं कम्युनिस्टांनीं सरकारच्या हवालीं करून पूर्वींचें ऋण सव्याज फेडलें. तें असो. येथें तात्त्विक मुद्द्यापुरतेंच बोलूं.

## हें लोकयुद्ध नव्हे

चालू युद्ध हें लोकयुद्ध आहे कीं साम्राज्यशाही युद्ध आहे यासंबंधानें निरनिराळ्या राष्ट्रांचा निर्णय निरनिराळा असूं शकेल. रशिया इंग्लंडच्या बाजूनें युद्धांत सामील झाल्यामुळें युद्धाचें स्वरूप थोडेसें बदललें ही गोष्ट नेहरूंना पटली व पूर्वींहून

अधिक प्रमाणांत त्यांनीं युद्धसहकार्याची भूमिका घेतली हें मागें सांगितलेंच आहे. पण एवढ्यानें भागलें नव्हतें. ब्रिटनच्या बाजूस रशिया आल्यानंतर ब्रिटनच्या साम्राज्यवादी धोरणास रशियानें उघड व मूक संमति देण्याचा जो क्रम अवलंबिला त्यामुळें रशियाच अधिक प्रतिगामी होवूं लागला असा आरोप करणें वाजवी ठरूं लागलें. ब्रिटनच्याच नव्हे तर रशियाच्याही युद्धहेतूची कसोटी हिंदुस्थान हीच होती. हिंदुस्थानचें स्वातंत्र्य ब्रिटननें मान्य केलें तर हल्लींच्या दसपट युद्धसहकार्य इंग्लंडला मिळणार होतें व त्यामुळें रशियाचाही फायदा होणारच होता. पण त्यामुळें ब्रिटनची येथील साम्राज्य-सत्ता जाणार होती, म्हणून ब्रिटननें सत्तादान करण्याचें नाकारलें. रशियानें त्यालाच मूक संमति दिली, तेव्हां हिंदुस्थान स्वतंत्र होणार नसलें तर सोव्हिएट रशियाला विजय मिळाल्याचा आनंद हिंदुस्तानला कसा होणार ?

युद्धकाळांत ब्रिटननें जर हिंदी लोकांना सत्ता दिली नाहीं आणि अमेरिका व रशिया यांच्या मदतीनें इंग्लंडनें विजय मिळविला तर ब्रिटनची येथील सत्ता अधिकच दृढ होईल, ब्रिटन फॅसिस्ट होईल व मग स्टालिनही फॅसिस्ट होईल अथवा रशिया आणि इंग्लंड–अमेरिका यांचें पुन्हा युद्ध माजेल. हिंदुस्तानच्या दृष्टीनें हा प्रकार सर्व धोक्याचाच असल्यानें, केवळ रशिया युद्धांत पडल्यानें हें युद्ध 'लोकयुद्ध' झालें असें मानण्याचें काँग्रेसनें व हिंदी जनतेनें नाकारलें. मजूरांनींही कम्युनिस्टांच्या लोकयुद्ध धोरणास मुळींच संमति दिलेली नाहीं.

## काँग्रेस-लीग एकजूट

'लोकयुद्धा' प्रमाणें कम्युनिस्टांची दुसरी घोषणा 'काँग्रेसलीगएकजुटी' ची. रशिया आणि जर्मनी यांचें जोंवर सख्य होतें तोंवर ही काँग्रेस–लीग एकजूट कम्युनिस्टांना आठवली नव्हती. जिना व त्यांची मुस्लिम लीग हे प्रतिगामी व सरंजामी वर्गाचे पाठीराखे असेंच वर्णन कम्युनिस्टांनीं सर्व आयुष्यभर जिना व लीग यांचें केलें आहे. पण रशिया इंग्लंडच्या बाजूनें युद्धांत पडताच साम्राज्य युद्धाचें जसें, कम्युनिस्टांच्या मतें, लोकयुद्ध झालें तसेंच जिना व मुस्लिम लीग यांचें स्वरूपही प्रतिगामी होतें तें पुरोगामी झालें. आतां काँग्रेसनें मुस्लिम लीगची मागणी मान्य केली कीं काँग्रेस–लीग एकजूट होते आणि मग जर जिना राष्ट्रीय स्वातंत्र्यलढ्यांत आले नाहींत अथवा राष्ट्रीय मंत्रिमंडळांत सामील झाले नाहींत तर मुसलमान जनतेच्या दृष्टीनें ते प्रतिगामी ठरतील आणि

त्यांचा नेतृपदापासून पाडावही करता येईल असें आश्वासन कम्युनिस्ट देतात. पण मुस्लिम लीगची मागणी मान्य करायची म्हणजे काय करायचें ? तर मुसलमानांच्या स्वयंनिर्णयाला संमति द्यायची आणि ही इतकी 'साधी गोष्ट' काँग्रेस मान्य करीत नाहीं म्हणून कम्युनिस्टांना तिचा राग आला आहे. पण जिनांना पाकिस्तान हवें आहे तें कोणतें तें त्यांनीं सांगितलेलें नाहीं आणि ब्रिटिशांच्याच नेतृत्वाखालीं त्यांना तें निर्माण करायचें असल्यानें तें स्वातंत्र्यवादीही नाहींत. काँग्रेस त्यांच्याशीं समेट काय करणार ?

## पुढील कार्याची दिशा ::: ::: ::: [८]

'बंड' आलें व गेलें तरी फॅसिझम् विरोधी युद्ध लढण्याचें काम बाकी राहिलेंच आहे. त्याचें काय करायचें याचा विचार आतां करूं. ८ ऑगस्टचा ऑ. इं. काँ. कमिटीनें मंजूर केलेला युद्धविषयक ठराव हा या दृष्टीनें खरोखर निर्दोष आहे. पण तें 'धोरण काँग्रेसनें अवलंबिलेलें आहेच. तेव्हां आतां जास्त आणखी काय करायचें ?' असे प्रश्न अनेक लोक विचारीत आहेत. ८ ऑगस्टनंतर गांधीजी व इतर पुढारी यांना सरकारनें अटक करून गांधीजींना कोणत्या पद्धतीनें चळवळ करावयाची होती अथवा असेल, तो मार्ग बंद केला. त्यानंतर घातपाताची जी चळवळ झाली तींत सापडलेले हजारों कार्यकर्ते सध्यां कांहीं दिवस तरी कोणत्याही नव्या चळवळीला मिळणार नसून घातपाताची चळवळहा थंडावली आहे. अशा परिस्थितींत पुढील मार्ग काय, असा प्रश्न अनेक लोक विचारीत आहेत. यांपैकीं कांहीं पृच्छकांनीं या प्रश्नाचें उत्तर आपल्यापरीं देऊनही टाकलें आहे. 'युद्ध संपेपर्यंत तुरुंगवास भोगणें' हें तें उत्तर होय. आणि खरोखर युद्ध संपेपर्यंत ब्रिटिश सरकारनें जर हिंदी पुढाऱ्यांना बंधमुक्त केलें नाहीं तर कोणतेंही धोरण आंखणार कसें व अमलांत तरी आणणार कसें ? त्यापेक्षां युद्ध संपेपर्यंत स्वस्थ राहावें आणि युद्धानंतर—त्यावेळीं जी कोणती सत्ता येथें

येईल अथवा असेल तिच्याशीं लोकशाहीस्थापनेचा सामना करावा अथवा तह करावा असा मनसुबा सहज कोणासही सुचण्यासारखा आहे. पण तो चूक आहे.

वरील विचारसरणींत दोन गोष्टी गृहीत धरलेल्या आहेत.

(१) ब्रिटिश सरकारनें आम्हांस जखडून टाकल्यामुळें परचक्रनिवारणाची जबाबदारी आम्हांवर पडत नसून ती परकी राज्यकर्त्यांच्याच शिरावर राहणार.

(२) आपण जें स्वातंत्र्य मिळवायचें तें येथें सत्ताधारी असलेल्या परकी राज्यसत्तेकडून आंतरराष्ट्रीय युद्ध नसलेल्या काळांतच मिळवावयाचें आहे.

पण या दोन्ही गोष्टी कालक्रमानें अशक्य ठरूं लागल्या आहेत.

## परचक्राचा धाक कायम राहणार

गेलें महायुद्ध जर्मनीनें हिंदुस्थान ब्रि. साम्राज्यांतून काढून घेण्यासाठीं केलें. जर्मन कैसरला ब्रिटिशाकडून हिंदुस्थान हिसकून घ्यावयाचें होतें म्हणूनच त्यानें इंग्लंडशीं युद्ध सुरूं केलें ही गोष्ट प्रसिद्ध आहे. यावेळीं जर्मनीचा हिंदुस्थान घेणें हा प्रथम हेतु होता असें म्हणतां येत नाहीं तरी पण ब्रिटनला आपलें साम्राज्य बुडण्याची म्हणजेच मुख्यतः हिंदुस्थान जाण्याची भीति वाटली म्हणून ब्रिटननें जर्मनीशीं युद्ध सुरूं केलें यांत संशय नाहीं. जपाननें ब्रिटनशीं युद्ध सुरूं केलें तें हिंदुस्थानसाठींच सुरूं केलें व चीन आपल्या अंमलाखालीं पूर्णपणें आणता यावा म्हणून सुरूं केलें हें सर्वमान्यच आहे. याचा अर्थ असा की हिंदुस्थान व चीन या नव्वद कोटी लोकसंख्येवर, ज्याला युद्धांत आव्हान देण्याची कोणाची छाती होणार नाहीं असें, कोणाचें तरी जबरदस्त राज्य स्थापन होईपर्यंत यापुढें आंतरराष्ट्रीय शांतता नांदण्याचा फारसा संभव नाहीं. ब्रिटननें हिंदुस्थान जिंकलें त्यावेळीं पोर्तुगीजांचा पूर्ण पाडाव झाला होता. ब्रिटननें फ्रेंचांना मागें हटवून वेगळया मुलखांत ढकललें होतें. अमेरिकेला त्यांच्या भोंवतालीं असलेला मुलुखच प्रचंड व पुरून उरणारा होता. म्हणून ब्रिटनला हिंदुस्थानवरील साम्राज्यसत्तेस बराच काळ कोणी प्रतिस्पर्धी आला नाहीं. पुढें जर्मनीची शक्ति गेल्या शतकाअखेर वाढतांच जर्मनीनें ब्रिटनशीं स्पर्धा सुरू केली. त्यामुळें १९१४–१८ चें महायुद्ध झालें. त्यानंतरच्या काळांत जर्मनी तर पुन्हा बलवान झालाच, पण जपानही बलवान होऊन ब्रिटिश साम्राज्यावरच

उठला आहे. अमेरिका आंतरराष्ट्रीय व्यापारांत ब्रिटनची प्रतिस्पर्धी असून आज अँग्लो–अमेरिकन सख्य जरी दृढ झालेलें दिसत असलें तरी चीन व हिंदुस्थान यांवर प्रभुत्व कोणाचें राहावें यासंबंधानें त्या दोन्ही राष्ट्रांचें नेहमींच एकमत राहील असें वाटत नाहीं. या सर्वांपेक्षा विचारांत घेण्यासारखें प्रचंड राष्ट्र म्हणजे रशिया. जोंपर्यंत ब्रिटनचें साम्राज्य हिंदुस्थानांत आहे तोंवर सोव्हियट रशियाला स्वस्थता मिळणें शक्य नाहीं ही सोव्हियट मुत्सद्यांनीं खूणगांठ बांधलेली आहे. सांगण्याचा मुद्दा असा कीं चालू युद्ध संपलें तरी ब्रिटिश साम्राज्यांत हिंदुस्थान आहे तोंवर हिंदुस्थान ब्रिटिशाकडून काढून घेण्यासाठीं आतां वीस वर्षांचा अवधि न लागतां—जवळ जवळ तावडतोब आणखी महायुद्ध झाल्याशिवाय रहाणार नाहीं, तसेंच ब्रिटनच्या हातून दुसऱ्या कोणी हिंदुस्थान काढून घेतलें तरी त्या सत्तेच्या हातीं तें सुखासमाधानानें इतर कोणी राहूं देणार नाहींत. येथें परकी सत्ता असेपर्यंत तिला जनतेचें पाठबळ मिळणार नसून जनता व ती सत्ता दुर्बळ राहाणारच व म्हणून तिला परचक्राचा धाक नेहमींच राहाणार. म्हणून येथें राज्य करीत असलेल्या परकी सत्तेकडून, आंतरराष्ट्रीय युद्ध अथवा आंतरराष्ट्रीय युद्धाचे वातावरण नाहींसें झाल्यावर, आपण स्वातंत्र्य प्राप्त करून घेऊं हा विचार आतां सोडून दिला पाहिजे.

## जबाबदारी आपली

अशी पूर्ण शांततेची परिस्थिति नजीकच्या काळांत तरी येण्याचा संभव मुळींच नाहीं. इतकेंच नव्हे तर नेहमींच दाराशीं असलेल्या अथवा येण्याचा धाक घालणाऱ्या परचक्राशीं हिंदी जनतेनें लढण्याचें नाकारलें अथवा राज्यकर्त्यांनीं जनतेला स्वाभिमानानें परचक्राशीं लढणें आजच्याप्रमाणें अशक्य केलें तर परचक्राशीं देशांतील राज्यकर्त्यांचा लढा दीर्घकाल चालेल, कुचंबणेनें चालेल, त्याचा निर्णायक शेवट लवकर होणारच नाहीं. हिंदी लोकांचा पाठिंबा आम्हांला न मिळाल्यास युद्ध लांबत जाईल असें एका अमेरिकन पत्रपंडितानें म्हटलें आहे तें अतिशय खरें आहे. एक युद्ध संपलें तरी नव्या युद्धाचा धाक कायम राहणार व नवें युद्ध तावडतोब येणारच. म्हणून आंतरराष्ट्रीय शांततेच्या काळांत राष्ट्रीय स्वातंत्र्याचा लढा स्वस्थपणें खेळत राहाण्याची संधि हिंदी लोकांना यापुढें कधींच मिळणार नाहीं. आणि तरीही परचक्रनिवारणाची जबाबदारी केव्हांही आपलीच आहे हें लक्षांत घ्यावें लागणार आहे. म्हणून दाराशीं चढाई करून आलेल्या अथवा येण्याचा धाक

घालणाऱ्या परचक्राशीं झुंजण्याच्या क्रमांतच आपलें स्वातंत्र्य प्राप्त करून घेणें व टिकविणें हें हिंदी लोकांना भाग पडणार आहे. ८ ऑगस्टच्या ठरावानें हीच भूमिका घेतली होती ती सरकारच्या हट्टी व प्रतिगामी धोरणामुळें अशक्य झालेली दिसते. यांत नैतिक गुन्हा सरकारचा आहे. तथापि त्यांना बोल लावण्याचा फारसा उपयोग नाहीं. कांहीं झालें तरी आपलें साम्राज्य सोडावयाचें नाहीं ही ब्रिटिशांची दृष्टि असल्यामुळें परचक्राशीं यशस्वितेनें झुंजण्याइतकें स्वातंत्र्य ते राजीखुषीनें जनतेला देणारच नाहींत हें आपण गृहीत धरून चाललें पाहिजे. त्यांच्या इच्छेविरुद्ध येथल्या जनतेच्या पाठिंब्यानें व आंतरराष्ट्रीय दडपणानें त्यांच्या हातून सत्ता काढून घेतली पाहिजे व त्या सत्तेचा उपयोग परचक्राशीं लढण्याच्या कामीं करण्याचा सिद्धांत लोकांना स्पष्टपणें कळवून ठेवलेला असला पाहिजे. ८ ऑगस्टपूर्वीं असें लोकशिक्षण, व सत्ता घेण्यासाठीं अवश्य तें सामर्थ्यसंघटन केलें होतें काय? याची तपासणी येथें करणें जरूर आहे हेतु हा कीं अशी तयारी पूर्वीं केली नसल्यास अथवा अपुरी झाली असल्यास पुन्हां ती तयारी करावी व लोकांना त्या सिद्धांताची जाणीव द्यावी. हल्लींच्या खचलेल्या परिस्थितींतूनही बाहेर पडून या परचक्रनिवारणाच्या राजकारणाची उभारणी करणें अवश्य व शक्य आहे. ती जबाबदारी कॉंग्रेसची—हिंदी लोकांचीं आहे.

## कॉंग्रेसच्या राजकारणाचा झोपाळा

युद्ध सुरू झाल्यानंतर १४ सप्टेंबरला जो जाहिरनामा कॉंग्रेसनें प्रसिद्ध केला त्या जाहिरनाम्यांत हिंदुस्थानचें स्वातंत्र्य सरकारनें मान्य केल्यास युद्धसहकार्य करण्याचें आश्वसन कॉंग्रेसनें दिलें होतें. युद्धकाळांत पुन्हा पुन्हां ही गोष्ट कॉंग्रेसनें सरकारला कळविली होती; तरी सरकारनें ती ऐकली नाहीं. सरकारच्या पदरांत गुन्हेगारीचें माप घालण्यास एवढें बोलणें पुरें आहे. पण कॉंग्रेसवरील जबाबदारी एवढ्यानें संपत नाहीं. दाराशीं चढाई करून येणाऱ्या परचक्राशीं हिंदी लोकांनीं लढलेंच पाहिजे व त्यासाठीं स्वातंत्र्य प्राप्त करून घेतलें पाहिजे ही भूमिका निरपवादपणें गेलीं तीन वर्षें कॉंग्रेसनें आपणापुढें व जनतेपुढें ठेवली नाहीं हा मुद्दा आत्मनिरीणाक्षचे दृष्टीनें कॉंग्रेसवाद्यांनीं लक्षांत घेणें जरूर आहे. याबाबतची गांधींच्यावर पडणारी जबाबदारी आणि गांधींच्या पुढें नेहरू-प्रभृतींनीं दाखविलेलें मनोदौर्बल्य याकडे विवेचकांनीं विशेष लक्ष पुरविलें पाहिजे. युद्धाच्या सर्व

काळांत हिंदुस्थानाला म्हणजे काँग्रेसला युद्धांत गोवूं देऊं नये, हा हेतु गांधींनीं पूर्णपणें कधींही सोडलेला नव्हता. युद्ध सुरूं होतांच त्यांनीं शस्त्रयुद्धापासून अलग राहून ब्रिटनला केवळ नैतिक साहाय्य करण्याची आपली भूमिका स्पष्ट केली होती. स्वातंत्र्याचें आश्वासन मिळाल्यास आपण युद्धांत सामील होणार या आझाद-नेहरूंच्या आग्रहापुढें गांधींनीं आपली मान त्यावेळीं तुकविली. तथापि आपला मुद्दा त्यांनीं सोडला नव्हता. आपली भूमिका ते पुनःपुन्हा लेखांतून मांडीत. पुण्यास १९४० सालीं राष्ट्रीय मंत्रिमंडळाच्या मागणीचा ठराव गांधींचा विरोध असतांही मंजूर झाला. पण सरकारनें तो धुडकावून लावला, तेव्हां गांधींनीं काँग्रेसचें नेतृत्व आपणाकडे घेऊन यापुढें युद्धसहकार्यवादी मंत्रिमंडळ काँग्रेस कधींही स्थापन करणार नाहीं असें जाहीरपणें लोकांपुढें मांडण्यास सुरवात केली. पुढें क्रिप्सयोजना फेटाळून लावल्यानंतर पुन्हा युद्धांतून अलग राहाण्याची भूमिका गांधी मांडूं लागले. इंग्लंड व अमेरिका यांनीं आपलीं सैन्यें काढून घ्यावीं या त्यांच्या मागणींत दुसरा कांहींही अर्थ नव्हता. नेहरूंच्या मतास त्यांनीं पुनः पुन्हा उचलून धरलें हें खरें. पण तो अखेर गुण ठरला कीं दोष ठरला हें विवाद्य मानावें लागेल. कारण एकदां गांधींचा नाद सोडून आपणांस स्वतंत्रपणें शस्त्र-युद्धाचें राजकारण करावें लागेल असें नेहरूंना पटलें असतें तर त्यांनीं गांधींचा नाद सोडला असता, तर अथवा दुसऱ्या कोणी शस्त्रयुद्धपद्धतीच्या राज-कारणाची आधिभौतिक उभारणी केली असती, सत्य, अहिंसा व खादी यांचा जो मंत्र गांधींच्या नेतृत्वाखालीं निरर्थक बडबडला जाई व आधिभौतिक तयारीस विरोध होई तें सर्व थांबलें असतें. पण गांधींनीं नेहरूंच्याशीं नेहमीं मिळतें घेऊन आपलें पुढारीपण टिकविलें. व पुनः पुनः आपला हट्ट संधि सांपडताच पुढें आणला. यामुळें काँग्रेसच्या राज्यकारणाचा नुसता झोपाळा झाला.

## हें ढोंग नव्हे काय ?

स्वातंत्र्याचें आश्वासन मिळाल्यावरच युद्धांत सामील व्हावयाचें आहे कीं युद्धसंपे-पर्यंत कांहीं तरी टोलवाटोलवी करून खुद्द आपल्या मुलखांतही युद्ध चालूं असतां आणि आपला देश हाच युद्धाचा विषय असतां तटस्थ राहायचें आहे, याचा काँग्रेसजनांना व जनतेला निश्चित उलगडा कधींच झाला नसावा असें मला नेहमींच वाटत आलें आहे. किंबहुना नेहरूंच्या भूमिकेपेक्षा

गांधींची भूमिका हीच खरी कॉंग्रेसची भूमिका असून नेहरूंची भूमिका हा आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाचा मुलामा होय असें मत हिंदुस्थानांतील भांडवलदारांचें व कॉंग्रेसमधील शेंकडों कार्यकर्त्यांचें असावें असा संशय नेहमीं मला आलेला आहे. एकीकडे सरकारला युद्धसाहित्य पुरवून नफा मिळवावा आणि दुसरीकडून गांधींच्या अहिंसात्मक भूमिकेला उचलून धरावें अथवा तिची गय करावी असें वर्तन धंदेवाल्यांनीं ठेवलें होतें. कारण नेहरूंच्यापेक्षा गांधींची भूमिका नफेबाजीच्या दृष्टीनें अधिक उपयुक्त व होती. गांधींनीं जाळपोळीच्या धोरोणास विरोध केला व भांडवलदारांनीं गांधींना पाठिंबा दिला यांत ह्याच अर्थ होता. सर्वसामान्य जनताही याच बेजबाबदार भूमिकेची होती. युद्धांत नोकरी मिळते, धंदा मिळतो, एवढ्या दृष्टीनें युद्धाकडे जो तो पाहात होता व पाहात आहे. ब्रिटिशांच्या पराभवाबद्दल त्यांची टिंगल करावी ही, दीडशें वर्षें ब्रिटिशद्वेष लोकांच्या हाडीं मुरल्यामुळें, लोकांची स्वाभाविक मनोवृत्ति झाली आहे. गांधींची मूळ भूमिका त्यांच्याच स्वरूपांत उदात्त आहे, हें खरें; पण जनतेच्या आणि भांडवलदारांच्या क्षुद्र, स्वार्थी व संकुचित मनोवृत्तीस तिच्या उदात्तपणाशीं कांहीं कर्तव्य नसतें. युद्धाची जबाबदारी न पत्करतां दुबळेपणानें अलग राहाणें हें जें त्या भूमिकेचें फल तेवढें सर्वांना गोड वाटतें. गांधीजींनीं गेल्या तीन वर्षांत स्वातंत्र्यलढ्याच्या तयारीचीं साधनें व लक्षणें वेळोवेळीं जीं सांगितलीं व त्यांना जनतेनें, कॉंग्रेसवाद्यांनीं व भांडवलदारांनींहीं सक्रिय अथवा मूक अशी जी संमति दिली तीवरून गांधींची भूमिका ही उदात्त म्हणून नव्हे तर सोइस्कर म्हणून सर्वांनीं मान्य केली होती असें दिसून येतें. खादी आणि अहिंसा हीं सत्याग्रहलढ्याचीं लक्षणें आणि साधनें होत हा घोष गांधींनीं गेल्या वीस वर्षें अनेकदां सांगितलाच. पण परचक्र दाराशीं आलें असतांही गेल्या तीन वर्षांत अनेकदां सांगितला—आणि लोकांनीं त्यास परिणामकारक विरोध केला नाहीं, याचें आश्चर्य वाटतें. नेहमींच्या व्यवहारांत अगदीं शास्त्रशुद्ध व स्वार्थशुद्ध अशा कार्यकारणभावानें वागून हजारों लाखों रुपये मिळविणारीं माणसें जेव्हां गांधींच्या सुरांत सूर मिळवून खादीनेंच स्वराज्य मिळेल आणि अहिंसेनेंच परचक्र-निवारण होईल असें म्हणत, त्यांचा आग्रह धरीत तेव्हां त्यांत ढोंग नव्हतें असें म्हणणें हें खरोखरच साहसाचें होईल.

## आंधळेपणें ८ ऑगस्टकडे धांव

यामुळें गेलीं तीनही वर्षें काँग्रेसच्या तोंडावर असत्याचा मुखवटा राहिला. नेहरूंची भूमिका हीच खरी असें जर खुद्द नेहरूंचें प्रामाणिक मत होतें तर त्यांनीं त्या मताचा अत्याग्रह धरून ब्रिटननें कितीही उपमर्द केले तरी आपली भूमिका हीच आहे याची जनतेला स्पष्ट जाणीव द्यावयास हवी होती. परचक्रनिवारणासाठीं ब्रिटनच्या हातून सत्ता काढून घेणें व त्यासाठीं परिणामकारक संघटना करणें हाच उपमर्द-प्रतिकाराचा उपाय होता. खादी व अहिंसा एवढ्यानें स्वातंत्र्य मिळणार नाहीं व परचक्र-निवारण होणार नाहीं हें नेहरूंना माहीत होतें. असें असतांही पुनः पुन्हा गांधींचेकडे काँग्रेसचें नेतृत्व येतें आणि ते पुनः पुन्हा युद्धापासून अलग राहण्याची भूमिका मांडतात हें नेहरूंनीं सर्वकाळ सहन केलें, यांत त्यांचा अप्रामाणिकपणा नव्हता, तरीपण दुबळेपणा दिसून आला हें निसंशय. गांधींचा विरोध मोडून काढण्याचा प्रयत्न त्यांनीं कायमचा कधींच केला नाहीं. इतकेंच नव्हे तर आपली भूमिका एकच एक निश्चितपणें ठर-वून केवळ तिलाच अनुरूप अशी सामर्थ्यसंघटना करण्याचा प्रयत्नही त्यांनीं केला नाहीं. ता. १७ ते २१ जून १९४० यावेळीं भरलेल्या काँग्रेस-वर्किंग कमिटीच्या ठरावांत गांधींच्या अहिंसेचा अव्हेर करण्यांत आला असून शत्रूस सशस्त्र प्रतिकार करण्याची भूमिका घ्यावी लागेल हें सूचित करण्यांत आलें होतें. तसेंच राष्ट्रवादी स्वयंसेवकदळें स्थापन करण्याचीही सूचना केली गेली होती. पण तें कार्य त्यावेळीं अथवा त्यानंतरही काँग्रेसमार्फत कधींच करण्यांत आलें नाहीं. १९४२च्या जानेवारींत वर्ध्यास ऑ. इं. काँ. कमिटींत झालेल्या ठरावास स्वयंसेवकसंघटना कर-ण्याची योजना पुन्हा आखण्यांत आली होती. पण तिचीही बजावणी कधीं झाली नाहीं. खादीअहिंसेचा व्यर्थ नामघोष आणि 'युद्धसहकार विरुध युद्धअसहकार' यांचे हेलकावे यांत काँग्रेसचें राजकारण निष्फळपणें गेलीं तीन वर्षें रखडत राहिलें. स्वातंत्र्यलढा कसा करावयाचा याची कोणासही कधींही कल्पना आली नाहीं. १४ जुलै १९४२ चा काँग्रेस वर्किंग कमिटीचा ठराव झाल्यानंतर 'मी लढा करणार म्हणजे काय करणार हें मलाच माहित नाहीं' असें गांधीजी स्पष्टपणें बोलत होते. 'सरकार मला फार काळ तुरुंगांत ठेवूं शक-णार नाहीं' या गांधींनीं एकदां लिहिलेल्या वचनावर भिस्त ठेवून जनताही आंधळेपणें ८ ऑगस्ट कडे चालली होती. 'या वेळेचा झगडा नुसता तुरुंगभरतीचा

होणार नाहीं' असें गांधींच्यापासून शंकरराव देवांचेपर्यंत सर्वजण बोलत होते. पण, म्हणजे काय होणार हें कोणासच माहित नव्हतें. नंतर जें सर्व घडलें तें अचानक, अनपेक्षित व सामुदायिक अशी पूर्वयोजना नसूनच घडलें.

## नेहरू–गटाचें कर्तव्य

लढ्याची योजना आंखण्यांत पूर्वतयारी, पूर्वयोजना, कार्यकारणभाव, कालनिरीक्षण, परिणामाचें आकलन–इत्यादि म्हणजेच शास्त्रशुद्धता असली पाहिजे असें म्हणणें हें चूक आहे काय ? जर चूक नसेल तर गांधींची लढ्याची सर्व कल्पना अशास्त्रीय होती हें म्हणणें गैर आहे काय ? माझी ही टीका म्हणजे गांधींच्या नेतृत्वाला त्यांच्या गैरहजेरीचा व काँग्रेसच्या पराभवाचा फायदा घेऊन टोला देण्याचा प्रयत्न आहे असें कृपा करून वाचकांनीं समजूं नये. स्वातंत्र्यलढा संपून गेला, आपण पराभूत झालों, आतां जें व्हायचें असेल तें होईल असें म्हणून स्वस्थ बसायचें असेल तर झाल्या गेल्या गोष्टीची ही चिकित्सा करण्याचें कारण नाहीं. पण या परिस्थितीतून डोकें वर काढून पुन्हां स्वातंत्र्यसंपादन आणि परचक्रनिवारण हीं कार्यें आपणाला अंगिकारायचीं आहेत. हें खरें असेल तर ' आम्ही कोणता लढा करणार व तो कसा करणार हें आम्हांला कांहींच माहित नाही ' असें म्हणण्याची पाळी पुनश्च येऊं देणें हें बरें नव्हे. गांधींचें नेतृत्व यासाठीं सर्वस्वीं झुगारून दिलेंच पाहिजे असें मुळींच नाहीं. गेल्या तीन वर्षांत ज्या ज्या वेळीं नेहरूंच्या मताची सरशी झाली त्या त्या वेळीं गांधींनीं थोडें बाजूस सरून पण काँग्रेसला आपल्या तत्त्वाशीं सुसंगत अशा प्रकारें सर्वथैव साहाय्य करण्याचें कबूल केलें होतें. गांधींची संघटनात्मक शक्ति फार मोठी आहे. त्यांचा प्रामाणिकपणा संशयातीत आहे. युद्ध म्हटलें तरीं त्यांत नऊ–दशांश कार्य अहिंसात्मक संघटनेचेंच असतें. या अहिंसात्मक जनतासंघटनेच्या आधारावर काम करण्यास व वेळोवेळीं सर्व प्रकारचा सल्ला देण्यास गांधीजी केव्हांही तयार राहातील इतके ते विनम्र व कार्यशील आहेत. म्हणून त्यांचें नेतृत्व झुगारून देण्याचा हव्यास धरण्याची जरूरी नाहीं किंवा असा हव्यास धरल्याचा आक्षेप कोणी कोणावर करण्याचेंही कारण नाहीं. नेहरू तुरुंगांत आहेत, पण त्यांच्या मताचीं जीं माणसें आज बाहेर आहेत त्यांच्यावर ही जबाबदारी आहे. परचक्र–निवारणाच्या झगड्यांत शस्त्र हातीं घेऊन स्वतंत्र राष्ट्र या नात्यानें हिंदी जनतेनें रणकार्यांत सामील व्हावें हा दृष्टिकोन निश्चितपणें

च निरपवादपणें जनतेच्या डोळ्यासमोर त्यांनीं मांडला पाहिजे. त्याचबरोबर स्वातंत्र्य प्राप्त करून घेतल्यानेंच परचक्रनिवारणाचें कार्य हिंदी जनतेस उत्कृष्ट-पणें करतां येईल ही गोष्ट ब्रिटनला व हिंदी जनतेला सांगितली पाहिजे. अर्थात त्यासाठीं ब्रिटनवर विसंबून न राहातां अथवा ' तुम्ही स्वातंत्र्य न दिल्यास परचक्रनिवारणाची जबाबदारी तुमची तुम्ही कशीही सांभाळा ' असें ब्रिटनला सांगण्याची हताशेची अथवा बेफिकीरीची भूमिका जनतेच्या मनांत केव्हांही उत्पन्न न करतां स्वातंत्र्यसंपादनार्थ व परचक्रनिवारणार्थ सामर्थ्यसंघटनेची, लोकजागृतीची चळवळ नेहरू गटानें मोठ्या प्रमाणावर चालू केली पाहिजे.

## कवाईतशिक्षण हें संस्कृतिवर्धक

ही चळवळ विविध प्रकारची असेल. तिचा एक प्रकार समजण्यास फार सोपा आहे. पण म्हणूनच त्याचें महत्त्व लवकर लक्षांत येत नाहीं. राष्ट्रवादी स्वयंसेवक संघटना हा तो प्रकार होय. काँग्रेसच्या इतिहासांत अनेक वेळां मागें ढकलली गेली असूनही ही चळवळ पुनःपुन्हा पुढें आली आहे. युद्धकाळांत काँग्रेस वर्किंग कमिटीनें दोनतीनदा यासंबंधानें ठराव मंजूर केले. गांधींचा या चळवळीस स्पष्ट विरोध होता असें दिसतें. अनेक गांधीवाद्यांना व स्वतः गांधींनाही कवाइत-शिक्षण आणि युद्धकलेचें शिक्षण हें हिंसात्मक प्रवृत्ति वाढविणारें आहे असें वाटे. म्हणून हिंदुस्थानसेवादल ही डॉ. हर्डीकरांची संघटना कांहीं अंशीं काँग्रेसपाठिंब्याचे अभावीं प्रायोपवेशनानें मरूं देण्यांत आली. अब्दुल गफार-खान यांच्या रेडशर्ट संघटनेलाही गांधींचा विरोध होता असें ऐकिवांत आहे. पण खरोखर कवाईतशिक्षणानें हिंसेची प्रवृत्ति वाढते हा समज अतिशय खोटा व घातकी आहे. माझ्या मतें कवाईत ही एक संस्कृतिविकासाची चळवळ आहे. कवाईत शिक्षणांत व युद्धकलाशिक्षणांत शरीर, मन व बुद्धि यांस एक प्रकारची शिस्त लावण्यांत येते, त्यांचे ठिकाणीं अधिक जागृति उत्पन्न करण्यांत येते; तत्परता व तांतडी, विनम्रता व आज्ञाधारकपणा, निर्धार व अचूकपणा, हे गुण माणसाच्या अंगीं बाणण्यांत येतात. अमुक ध्येय आणि अमुक मार्ग इतकें एकदां ठरल्यानंतर या मार्गाचा अवलंब करण्यासाठीं जी धडाडी, जो निर्धार, जो सावधपणा अवश्य असतो तो कवाईतशिक्षणानें अंगीं येतो. सामुदायिक भावना आणि सामुदायिक

कर्तृत्व या गोष्टी कवाईत–शिक्षणानेंच अंगीं बाणतात. नेभळट, थिल्लर व नाचरी वृत्ति कवाईत–शिक्षणानेंच नाहींशी होते. कोणतेंही जबाबदारीचें काम करण्यास, विशेषतः सामुदायिक जबाबदारीचें काम करण्यास उत्तम प्रकारची कवाईत शिकलेलीं माणसेंच अत्युपयोगी असतात–हजार माणसांची जेवणाची पंगत वाढावयाची असली, धडाडून पेटलेली एखादी आग विझवावयाची असलीं, लाखोंच्या शत्रु-सैन्यास रणांगणावर टक्कर द्यावयाची असली अथवा साधनसामुग्री थोडी असतांही बलाढ्य शत्रूस गनीमी लढ्यानें जेरीस आणावयाचें असलें तर अशा सर्व विविध प्रसंगीं कवाईत शिकलेला गणसमुदायच आधिक उपयोगी पडतो हें साधें सत्य आहे. चरखा फिरविण्यानें गरीबांच्या पोटाचा प्रश्न थोडासा मिटेल. पण कवाईत-शिक्षणाचे गुण कवाईत शिकूनच येतील. लढा हिंसात्मक असो कीं अहिंसात्मक असो त्याला शिस्तबद्ध अशा सामुदायिक कर्तृत्वाचीच गरज आहे. कवाईत न शिकलेले बाजारबुणगे हिंसात्मक लढ्याला निरुपयोगी आहेत, तसेच ते अहिंसात्मक लढ्यालाही निरुपयोगी आहेत

## अहिंसेलाही कवाईत हवी

गांधींचें अहिंसाप्रतिपादन हें चूक आहे असें मला म्हणावयाचें नाहीं. उलट राज्यकर्त्यांचीं शस्त्रास्त्रें आतां इतकीं प्रचंड झालीं आहेत कीं यापुढें केवळ शस्त्राला शस्त्र भिडवून जगांतील जनतेला व दुर्बल राष्ट्रांना आपल्या स्वातंत्र्याचें रक्षण करतां येणें अशक्यच आहे. अहिंसात्मक प्रतिकार हा येथें एकच मार्ग उरतो. पण त्याचा अर्थ भौतिक दृष्टीनें समजून घेतला पाहिजे. मशिनगन् चालविणारा शत्रु अन्नपाणी न मिळेल तर उपाशी मरतो म्हणून त्याचें अन्नपाणी तोडून त्यास शरण आणणें हा अहिंसात्मक लढाच होय. जनतेची शिस्त व निर्धार कणखर असल्यास हें केव्हांही शक्य आहे. म्हणून गांधींच्या अहिंसावादास फाटा देऊन केवळ सशस्त्र प्रतिकाराच्या तयारीसाठींच कवाईत शिक्षण द्यावें असें मला म्हणावयाचें नाहीं. हिंसात्मक व अहिंसात्मक असा उभयविध प्रतिकार परचक्रास करावा लागेल. त्या दोहोंसाठीं कवाईतशिक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे असें माझें म्हणणें आहे. आज स्वयंसेवकांना शस्त्रास्त्रें मिळणार नाहींत हें खरें. तथापि ज्या मनानें व मनगटानें शस्त्रास्त्रें धारण करावयाचीं व चालवावयाचीं तें मन व मनगट मजबूत करण्याचें काम या कवाईतशिक्षणानें होणार आहे. स्वयंसेवकसंघटना

अशा प्रकारें वाढत राहिली तर ती अखेर यशप्राप्तीस अवश्य इतकी म्हणजे एकूण किती वाढली पाहिजे हें लक्षांत येण्यासाठीं खुणेंचा शब्द म्हणून मी एवढेंच सुचवून ठेवतों कीं कायद्याच्या मर्यादेंत राहूनच तीस चाळीस लाख राष्ट्रवादी स्वयंसेवक आपण जर क्रिप्स येथें येण्यापूर्वी निर्माण केले असते तर क्रिप्स आमच्यापुढें नाक खाजवून परत गेले नसते आणि ८ ऑगस्टनंतर जें कांहीं घडलें त्याचें स्वरूप बरेंच वेगळें झालें असतें; तें जें कांहीं झालें असतें, त्यास यशही अधिक आलें असतें; आणि कर्तृत्वाचा धागा तुटला नसता. याहून अधिक स्पष्ट बोलण्याची जरूरी नाही व त्याचा उपयोगही नाहीं.

## नेहरूंच्या शिकवणीचा अभ्यास

कवाईतशिक्षणाला वर जे विशेष महत्त्व दिलें तें ती एक सांस्कृतिक उत्कर्षाची चळवळ या दृष्टीनें दिले आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. अर्थात केवळ कवाईतशिक्षण झालें म्हणजे स्वयंसेवकसंघटनेचें कार्य संपलें असें मात्र नव्हे. कवाईतशिक्षण हें स्वयंसेवकसंघटनेचें एक व पहिलें अंग आहे. त्या संघटनेचें दुसरें महत्त्वाचें अंग म्हणजे स्वयंसेवकांचें बौद्धिक शिक्षण हें होय. या स्वयंसेवकांनीं अखेर कोणतें कार्य करावयाचें आहे हें नीटपणें लक्षांत घेतलें असतां त्या संघटनेचा सर्वव्यापीपणा लक्षांत येईल. राजकीय चळवळी फसतात त्या पूर्वयोजना नसल्यामुळें जशा फसतात तशाच त्या एकंदर बहुसंख्य समाजास कार्याची दिशा स्पष्ट कळलेली नसेल, ती फक्त पुढाऱ्यांच्याच डोक्यांत असेल, तर चळवळी फसतात. क्रान्तिकालाचे एक लक्षणच असें आहे कीं त्यावेळीं ढळक राजकीय पुढारी हे सरकारकडून पटापट तुरुंगांत टाकले जातात. अशा वेळीं सामान्य जनता डोळस, निरनिराळ्या वेळीं लढ्याच्या अनुभवाच्या भट्टींतून गेलेली व निर्धाराची असेल तरच कर्तृत्वाचा धागा आणि धोरणाचें अनुसंधान न तुटतां चळवळ सर्व संकटांतून जनतेच्या बळावर यशाकडे धाव घेत राहते. यासाठीं शेकडों हजारों लहन लहान स्थानिक नेत्यांची शहरोशहरीं आणि खेडोपाडीं जरूरी आहे. राष्ट्राच्या राजकीय धोरणाचा जो सिद्धांत असेल त्याचें लोण एका मोठ्या पुढाऱ्याकडून एकदम जनतेकडे जाऊं शकत नाहीं. खेड्यांतील शाळांचे लाखों प्राथमिक शिक्षक ज्याप्रमाणें रोजच्यारोज कोट्यवधि विद्यार्थ्यांना जमवून त्यांना विद्येचे पाठ देतात व त्यामुळें मध्यवर्ती विद्यापीठांचें ज्ञानप्रसाराचें कार्य होतें, तद्वत् स्वयंसेवकसंघटनेंत

कवाईतशिक्षण घेतलेल्या स्वयंसेवकांनीं राष्ट्रीय राजकारणाचा सिद्धांत समजून घेऊन आणि खेडोपाडीं व शहरोशहरीं आपापल्या पुरती लहान लहान क्षेत्रें आंखून घेऊन तेथल्या तेथल्या जनतेस तो सिद्धांत पटविला पाहिजे. त्यासाठीं स्वतः स्वयंसेवकांनाच राष्ट्रीय राजकारण उत्तम प्रकारें शिकविलें गेलें पाहिजे. पं. नेहरू यांची सर्व शिकवण या दृष्टीनें खरोखर आदर्श आहे. राष्ट्रीय व आंतर-राष्ट्रीय राजकारण, ऐतिहासिक दृष्टिकोण, इतिहासाचा चालू ओघ, जगाचें भवितव्य व त्यांत हिंदुस्थानचें स्थान या सर्व बावतींत ज्याचा दृष्टिकोन अत्यंत अचूक आहे व ज्यांनीं तो परोपरीनें लिहून ठेवला आणि वाणीनें सर्व देशाला शिकविला असा थोर पुरुष हिंदुस्थानांत दुसरा नाहींच. नेहरूंचा हा आदर्श डोळ्यापुढें ठेवून स्वयंसेवकांनीं आपली बौद्धिक तयारी केली पाहिजे. पोलीस व लष्कर यांना जें कवाईतशिक्षण देतात तें स्वयंसेवकांना दिलें म्हणजे भागलें असें नव्हे. पोलीस व लष्कर जनतेचें नेतृत्व कधींही आपणाकडे घेवूं व ठेवूं शकत नाहींत. स्वयं-सेवकसंघटनांनीं जनतेचें बौद्धिक नेतृत्व आपणाकडे घ्यावयाचें आहे त्यासाठीं ही बौद्धिक तयारी केली पाहिजे.

## जनतासंघटनेचें कार्य

कवाईत शिक्षण व बौद्धिक शिक्षण ही जशी स्वयंसेवकसंघटनेची महत्त्वाचीं अंगें होत तसें या संघटनेचें तिसरें महत्त्वाचे अंग म्हणजे या स्वयंसेवकांनींच समाजसंघटनेचें, लढ्याच्या संघटनेचें कार्य अंगावर घेणें हें होय. स्वयंसेवकसंघटना मुख्यतः विद्यार्थ्यांतून तयार करणें हें कांहींसें सोपें आहे. पण हा केवळ त्याचा आरंभ होय. या विद्यार्थ्यांनीं आपापल्या खेड्यांत व शहरांत जाऊन वेळांत वेळ काढून शेतकरी, मजूर व इतर वर्ग यांतील तरुणांना एकत्र करून त्यांच्याही स्वयंसेवकसंघटना काढल्या पाहिजेत. कवाईतशिक्षणाबद्दल सामान्यतः तरुणांना एक प्रकारची हौस असते. यामुळें संघटना बनण्यास, शेतकरी–कामकरी तरुण एकत्र येण्यास, अनुकूल अशी भूमिका तेथें असते. शेतकरी–कामकरी तरुण अशा प्रकारें एकत्र आल्यानंतर कवाईतशिक्षणाबरोबरच त्यांना त्यांच्या आर्थिक परि-स्थितीची आणि देशाच्या राजकीय परिस्थितीची जाणीव देऊन हळुहळु स्वातंत्र्य–लढ्याच्या कार्यांतही त्यांना गोंवून घेतलें. पाहिजे. शेतकऱ्यांत व कामकऱ्यांत बुद्धिमान कार्यकर्ता शिरला कीं तो एकदम वर्गकलहाची

भाषा सुरू करतो यामुळें आजवर कार्याची हानि झाली आहे. कवाईतशिक्षणसाठीं, एकत्र आलेले तरुण एकमेकाशीं आपसांत बोलूं लागले, पुढाऱ्यांशीं चर्चा करूं लागले कीं आपली पिळणूक कोण करतो आपल्या दारिद्र्याचें नेमकें कारण कोणतें आपल्या दैनंदिन गाऱ्हाण्यांचें निवारण कसें करायचें, मजूरी वाढवून घेण्यासाठीं, खंड कमी करून घेण्यासाठीं व्याज कमी करून घेण्यासाठीं, संघटनेची कशी आवश्यकता आहे, स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं व परचक्रनिवारणासाठीं एकजूट व इतर सर्व तयारी कशी केली पाहिजे या गोष्टी कवाईतीसाठीं प्रथम एकत्र आलेल्या आणि मग वाढत्या आपुलकीनें एकमेकांचा जिव्हाळा लागलेल्या शेतकरी–कामकरी तरुणांना आपसांत बोलल्यानें, चर्चा केल्यानें, पुढाऱ्यापासून ऐकल्यानें, पुस्तकें आणि वर्तमानपत्रें वाचल्यानें कळूं लागतात. आणि प्रत्यक्ष कृतीमुळें त्यांचें संघटनाकार्य फलित होत जातें. राष्ट्रीय स्वातंत्र्यप्रयत्नाचें बळ यामुळेंच सर्व बाजूंनीं वाढत जातें.

हा सर्व कार्यक्रम कालावधीचा आहे हें म्हणणें तितकेसें खरें नाहीं. उत्साही व सुशिक्षित तरुणांनीं मनांत आणल्यास दोन तीन वर्षांचे अवधींत सर्व देशभर प्रचंड व प्रबळ संघटना निर्माण करणें मुळींच अशक्य नाहीं. जनतेच्या दैनंदिन गाऱ्हाण्यांच्या लढ्यांत जनतेला साहाय्य करून तिला स्वातंत्र्यप्राप्ती व परचक्रनिवारण या कार्यांत सामील करून घेणें हा निश्चित दृष्टि कोन सुशिक्षित तरुणांनीं आपल्य डोळ्यापुढें ठेवला, मनाचे हेलकावे बंद केले व निर्धारानें स्वयंसेवकसंघटनेचें कार्य हातीं घेतलें तर त्या कार्यांत यश येण्याला वेळ लागणार नाहीं.–अथवा कितीही अवधि लागणार असला तरी यापुढें हा कार्यक्रमच हातीं घेतला पाहिजे. वर म्हटल्याप्रमाणें स्वातंत्र्यप्राप्ती व परचक्रनिवारण हीं दोन्हीं कार्यें यापुढें एकरूपच राहणार असें दिसतें. त्यासाठीं दुसरा कोणताही कार्यक्रम व्यवहार्य व परिणामकारक ठरणार नाहीं.

## समाजक्रांतीचा दृष्टिकोण

स्वयंसेवकसंघटनेपुढें परचक्रनिवारणाच्या दृष्टीनें सामाजिक व राजकीय दृष्टिकोण कोणता ठेवावा यासंबंधीचें माझें मत स्पष्टपणें, पण आग्रह मुळींच न धरतां, मी येथें संक्षेपानें मांडूं इच्छितों. हिंदुस्थान देशांत आज जी समाजव्यवस्था आहे ती समाजव्यवस्था, स्वतंत्र राज्यसंस्था येथें स्थापन होण्यास, नुसती

निरुपयोगीच नव्हे तर पूर्ण अपायकारक आहे. उद्योगधंद्याचे दृष्टीनें देश अतिशय मागासलेला असून येथें सुप्त धन, कर्तबगार, श्रमजीवी व बुद्धिजीवी वर्ग आणि कच्चा माल या गोष्टी अफाट प्रमाणांत आहेत. अशा देशाला परकीय राज्यसत्ता हुसकून लावण्याइतकें सामर्थ्य असत नाहीं आणि परकीय राज्यकर्त्यांना या देशावर आपली राज्यसंस्था स्थापन करण्याइतकें आकर्षण मात्र येथें असतेंच असतें. याचा परिणाम कोणाची ना कोणाची तरी परकी सत्ता येथें कायम राहण्यांत होतो. हल्लींच्या समाजव्यवस्थेंतला हिंदुस्थान चालू युद्धानंतर स्वतंत्र होईल असें आश्वासन कोणी कितीही दिलें तरी आम्हांला स्वातंत्र्य मिळणें व तें टिकणें अशक्य आहे. याला चटकन् सुचणारा उपाय म्हणजे ‘ औद्योगिक उत्कर्ष हा होय ’ असें कोणीही म्हणेल. पण ही परकी सत्ताच येथें हा औद्योगिक उत्कर्ष होऊं देत नाहीं असा अनुभव सध्या आपणास येत असून संबंध ब्रिटिश राजवटीचा इतिहास हिंदी औद्योगिक उत्कर्षास विरोध करण्यांतच गेला जाहे. तेव्हां औद्योगिक उत्कर्षावांचून स्वातंत्र्य नाहीं व स्वातंत्र्यावांचून औद्योगिक उत्कर्ष नाहीं असा हा न तुटणारा चक्रव्यूह केवळ सामाजिक क्रान्तीनेंच तोडावा लागतो व तुटतोही. हिंदुस्थान स्वतंत्र कां नाहीं या प्रश्नाचें सामाजिक दृष्टीनें पृथक्करण केलें म्हणजे हा क्रान्तीचा मुद्दा लक्षांत येतो. बंगाल, संयुक्त प्रांत, वगैरे भागांत हजारों एकर जमीन जमिनदार वर्गाच्या मालकीची असून जमिनीचें बहुतेक उत्पन्न जमिनदार लुबाडतात व शेतकऱ्याला पोटभर अन्नही मिळत नाहीं. यामुळें शेतकऱ्याला शेतीचा उत्साह नसतो, शेती मागसलेली राहते व त्यामुळें पुन्हा जमीन नापीक होत जाते. शेतकऱ्याचें दारिद्र्य यामुळें आणखी आणखी वाढत जातें. इकडे जमिनदार लोक आपला शिलकी पैसा देशीं परदेशीं औद्योगिक धंद्यांत गुंतवून धनवान होत असतात. जमीन शेतकऱ्याच्या मालकींत येईल तर तिचें सगळें उत्पन्न त्याला मिळून तो सरकारच्या मदतीनें व नियंत्रणाखालीं तिचा मगदूर वाढवील व राष्ट्राची सुबत्ता त्यामुळें आपोआप वाढेल. पण मुळच्या शेतकऱ्यांच्या या जमिनी ब्रिटिश सरकारनें आपल्या अमदानीच्या आरंभीं शेतकऱ्यापासून लुबाडून घेऊन या जमिनदारांना दिल्या आहेत आणि जमिनदारांच्या या अन्याय्य मालकीहक्काचें रक्षण करण्यासाठीं ब्रिटिशांची सत्ता व त्यांचें सैन्य येथें आहे.

तीच गोष्ट संस्थानिकांची. ज्यांनीं मोंगलाशीं अथवा मराठ्यांशीं व स्वतःच्या

जनतेशीं बेइमानी करून परकी सत्ता पत्करली ते हे संस्थानिक ब्रिटिश सैन्याच्या संरक्षणामुळें जनतेवर आपलें जुलमी राज्य नांदवूं शकतात. सात कोटी प्रजा या जुलमाखालीं नांदत आहे. आणि हा संस्थानिकांचा रोग शरीरावरील मळवासारखा सर्व देशभर जागोजाग परसला आहे. जमिनदार व संस्थानिक यांच्या रक्षणाच्या निमित्तानें येथें ब्रिटिश सैन्यसत्ता राहाते. त्या सैन्याच्या जोरावर सर्व देशांत मुलकी कारभार चालवून परकी भांडवलवाले देशाची पिळणूक करतात. म्हणून परकी सत्ता येथून नाहींशी करण्याचा महत्त्वाचा उपाय म्हणजे जमिनदारी व संस्थानिक सत्ता येथून नाहींशी करणें हा आहे.

हिंदुस्थानांतील भांडवलदार वर्गही प्रतिगामी नाहीं असें नाहीं. तथापि स्वतंत्र हिंदुस्थानांत अजून उद्योगधंद्यास पुष्कळ वाव असल्यानें स्वातंत्र्याच्या चळवळीस या वर्गाचा पाठिंबा मिळण्याचाही संभव आहे. काँग्रेसचा कराचीचा सुप्रसिद्ध ठराव या दृष्टीनेंच करण्यांत आलेला आहे. संस्थानांत पूर्ण जवाबदार राज्यपद्धति सुरू करावी, शेतकऱ्यांना मालकीच्या जमिनी द्याव्या आणि आगगाड्या, खाणी, वीज यांसारखे सार्वजनिक उपयोगी असे धंदे तेवढेच सरकारी मालकीचे करावेत बाकीच्या क्षेत्रांत कामगारांच्या जीवनाला व राष्ट्राच्या अभिवृद्धीला आवश्यक इतकें नियंत्रण घालून खासगी भांडवलशाही नांदूं द्यावी असा कराची ठरावाचा दृष्टिकोण आहे. ही समाजक्रांति युद्ध संपल्यानंतर करावयाची नसून युद्ध जिंकण्यासाठींच ती करणें आवश्यक आहे हा मुद्दा प्रचारकांनीं नीट समजून घेतला पाहिजे. कारण तो लोकांना वेळींच स्पष्टपणें सांगणें अवश्य झालें आहे.

## जपानशीं तह ?

हिंदुस्थानांत राष्ट्रीय सरकार स्थापन झाल्यास आम्ही जपानशीं तह करूं अशी विचारसरणी कोणी मांडीत असेल तर ती साफ चूक आहे. राष्ट्रीय सरकार स्थापन होईल तें ब्रिटिशांना आपलें राज्य येथें चालविणें अशक्य झालें अथवा तशी भीति ब्रिटिशांना वाटूं लागली तरच होईल. अशा परिस्थितींत येथील जमिनदार व संस्थानिक यांना जनतेच्या उठावणीविरुद्ध ब्रिटिशांकडून संरक्षण मिळणें बंद होईल हें उघड आहे. हे लोक मग

आपलें जनतेपासून रक्षण व्हावें यासाठीं जपानसारख्या परकी सत्तेच्या तोंडाकडेच पाहातील. यांच्या पूर्वजांनीं यापूर्वी पेशव्यांना आणि मोंगलांना सोडून ब्रिटिशांचा आश्रय केला त्याप्रमाणें हे जमिनदार व संस्थानिक ब्रिटिशांना सोडून जपानच्या आश्रेयास जातील, जपानचें सैन्य आपल्या रक्षणासाठीं येथें बोलवितील. मलायांतील सुलतानांनीं हेंच वर्तन केलें असून येथेल संस्थानिक याला अपवाद ठरतील हें म्हणणें व्यर्थ आहे. जपानशीं तह करूं इच्छिणारे जे पुढारी असतील त्यांना या संस्थानिक व जमिनदार यांचा पाठिंबा मिळेल. मग हे पुढारी जनतेला जागृत न करता मूढ करतील आणि जपानशीं तह करून जपानची सैन्य-सत्ता डोक्यावर घेतील. राष्ट्रीय सरकार जें अधिकारावर येईल तें खऱ्याखुऱ्या जनतेच्या पाठिंब्यावर येणार असेल तर त्यानें संस्थानिक व जमिनदार यांना जपानचें सैन्य बोलवण्याची संधि न देतां जनतेच्या उठावणीनें त्यांच्या मुसक्या आवळल्या पाहिजेत. एकदां परचक्राशीं लढतच राहायचें ही भूमिका राष्ट्रीय सरकारनें मनापुढें ठेविली तर मग शेतकऱ्यांना रणोत्साहित करण्यासाठीं जमीनी देऊन त्यांच्यांत देशा-बद्दल ममत्व उत्पन्न करणें हें अवश्य ठरणारच आहे. आठ कोटी संस्थानी प्रजेला-प्रातिनिधिक लोकसत्ता देण्याचा जाहिरनामा राष्ट्रीय मध्यसरकारनें काढल्यास व त्याची तांतडीनें बजावणी केल्यास संस्थानाप्रमाणें खालसांतही—सगळ्या देशांत विजेचा संचार झाल्याप्रमाणें स्वातंत्र्याकांक्षा भरून जाईल. राष्ट्रास स्वातंत्र्य लढ्या-साठीं रणोत्साही करण्यास संस्थानांत स्वराज्य स्थापण्याइतकी उत्कृष्ट योजना दुसरी कोणतीही नाहीं. त्याबरोबरच कामगारांच्या राहाणीची सुधारणाही तांतडीनें करून औद्योगिक उत्पादन वाढविणेंही अवश्य होईल व शक्य होईल.

## नवें अफाट कार्यक्षेत्र

राष्ट्रीय मंत्रिमंडळ स्थापन झाल्यावर दृष्टिकोण कोणता ठेवायचा व कार्यक्रम कोणता अंगिकारायचा हें येथें संक्षेपानें सांगितलें. पण राष्ट्रीय मंत्रिमंडळ स्थापनच कसें करावयाचें हा बिकट प्रश्न आहे. तो कसा सुटेल हें आज नक्की व स्पष्ट सांगतां येत नाहीं. तथापि तो सुटण्याचा एक मुख्य उपाय म्हणजे युद्धासंबंधींची लोकांची भूमिका हेलकाव्याची असता कामा नये हा होय. स्वतंत्र राष्ट्र्या नात्यानें आम्ही शस्त्र घेऊन परचक्राशीं लढणार आहों आणि त्यासाठीं

राष्ट्रीय सरकार स्थापणार आहों याची जाणीव व आंच सर्व लोकांना लागलेली असली पाहिजे. म्हणजे त्यासंबंधानें उपाय योजण्यांत हयगय अथवा ढोंग होत नाहीं. स्वयंसेवकसंघटणा हाच सामर्थ्यवर्धनाचा उपाय आहे हें वर सांगितलेंच. ही संघटना वाढतां वाढतां सरकारला ती डोईजड वाटली तर सरकार ती दडपून टाकण्याचा प्रयत्न करील हें उघड आहे. पण फॅसिझम्-विरोधासाठीं उभारलेली ही संघटना ब्रिटिश सरकार दडपून टाकते असें जगाला जाहीर करून त्या संघटनेच्या मुद्यावरच सरकारशीं भांडायचें ठरविलें तर परकी राष्ट्रांची सहानुभूति व साहाय्य आपणास मिळूं शकेल. अमेरिका, चीन व रशिया या राष्ट्रांना, हिंदी जनतेला दडपून ठेवून हें युद्ध जिंकता येणार नाहीं, ही गोष्ट पटलेली आहे. परिस्थितीनें ती आणखीही पटत जाईल. पण ज्याला भौतिक दृष्टीनें फॅसिझम्‌विरोधी बलसंघटना असें म्हणता येईल असें यंत्र आपण येथें उभारलें पाहिजे. कॉंग्रेसनें विचारदिग्दर्शन अचूक केलें, पण युद्धविषयक धोरणांत शत्रूशीं सशस्त्र सामना द्यायचा व त्यासाठीं राष्ट्रीय सरकार स्थापायचें ही एकच एक भूमिका सतत व सुसंगतपणें लोकांना सांगितली नाहीं आणि बलसंघटना तर मुळींच केली नाहीं. भूमिकेचा निश्चय नसल्यानें बलसंघटनेचें काम कोणीं हातीं घेतलेंच नाहीं. यामुळें आपण दुर्बल राहिलों, लोकांच्या ठिकाणची जाणीव अस्पष्ट व अनिश्चित राहिली, लढ्याच्या कार्यक्रमाचा व साधनांचा पूर्वविचार झाला नाहीं, कार्याची आंखणी झाली नाहीं, फलाचा अंदाज झाला नाहीं, परकीयांचा गैरसमज झाला. परराष्ट्रीयांच्या गैरसमजाचा मुद्दा आपण बाजूस ठेवूं. अखेर स्वतःच्या सामर्थ्यानेंच स्वातंत्र्यसंपादन व परचक्रनिवारण होत असतें हें खरेंच आहे. पण जनतेला ध्येयासंबंधीं स्पष्ट जाणीव, साधनासंबंधीं निश्चय आणि संघटनेचें प्रत्यक्ष कार्य या गोष्टी चळवळीच्या प्रयोगाला व यशाला अवश्य आहेत. शेंकडों, हजारों, लाखों बुद्धिमंतांना कार्याची दिशा कळलेली असणें, आगाऊ योजना आंखून कार्य करण्याचा अनुभव असणें, पूर्वसूचित कार्याच्या अनुभवाच्या भट्टींतून जाण्याची संधि हजारों कार्यकर्त्यांना मिळणें अवश्य आहे. मागें म्हटल्याप्रमाणें क्रांतिकाळीं मोठे पुढारी उपलब्ध नसतात. लहान माणसांनीं जागोजाग मोठ्या जबाबदारीचीं कामें अंगावर घेऊन सावचितपणें, शास्त्रशुद्धपणें, धैर्यानें, लोकांना हाताशीं धरून लढा करावा लागतो. हें सर्व भौतिक दृष्टीचें आहे. अलौकिकाच्या, अंतःसंदेशाच्या,

चमत्काराच्या, अथवा लोकोत्तर विभूतीवरील अंधश्रद्धेच्या पद्धतीनें या गोष्टी करावयाच्या नसतात. सध्यां हिंदी लोक विशेषतः काँग्रेसजन महान आपत्तींत आहेत. या आपत्तीची जबाबदारी जागतिक परिस्थितीवर आहे खरी. तथापि आपले दोष निःस्पृहपणें व शांतपणें पाहून ते हा नवा दृष्टिकोन प्रत्यक्ष व्यवहारांत आणतील तर धोरणाचें अनुसंधान व कर्तृत्वाचा धागा न तुटताही पुढील कार्यांची उभारणी सुलभपणें होऊं शकेल. युद्ध यंदां संपो कीं आणखी कांहीं वर्षें चालो-- युद्धयमान राष्ट्रांचें अंतर्विरोध इतके तीव्र आहेत कीं पुढील दहा वर्षेंपर्यंत साम्राज्य--वाद्यांचीं संकटें संपणार नाहींत. हिंदुस्तान पूर्ण स्वतंत्र होईपर्यंत परचक्राची भीति नष्ट होणें अशक्यच आहे. स्वयंसेवकसंघटना राष्ट्रव्यापी करण्यांत दोन तीन वर्षें घालवावीं लागलीं तरी तीं कारणीं लागतील. इतर कामें करण्यासही माणसें कमी पडणार नाहींत. देशभर जागृतीची जी प्रचंड लाट उठली आहे त्या लाटेसरशीच स्वयंसेवकसंघटनेच्या सर्वांगीण कार्यांची उभारणी करण्याचा प्रयत्न केला गेल्यास लोकांच्या उत्साहास एक नवें व अफाट कार्यक्षेत्र मिळेल.

## खचलेल्या राष्ट्राला संजीवनी

पराभूत झालेल्या व खचून गेलेल्या राष्ट्रास नवजीवन देण्याचे कामीं या स्वयं--सेवकसंघटनेचा उपयोग संजीवनीसारखा झालेला आहे असें अलीकडील इतिहास सांगतो. १९१६ सालीं आयर्लंडमध्यें जें सिनफेन बंड झालें तें थोड्याच वेळांत मोडलें. तथापि त्यानंतर त्याच पराभवाच्या आंचेंतून जी स्वयंसेवकसंघटना उभारली गेली ती देशभर वाढली. मरून गेलेलें राष्ट्र जळजळीत तेजानें तळपूं लागलें. लोकमताचा पाठिंबा सिनफेन चळवळीला या स्वयंसेवक संघटनेनें दिला. लोकांना दृश्य असें सामर्थ्य-संघटन हवें असतें व तेंच पटतें. आपण समर्थ होत आहों अशी खात्री या स्वयंसेवकसंघटनेमुळें आयरिश लोकांना पटली. डी व्हॅलेरा व त्याचे सिनफेन सवंगडी सरकारच्या दृष्टीनें ‘ भुईखालीं ’ होते. पण ते उघडपणें लोकांत वावरत असत इतका लोकमताचा पाठिंबा व आश्रय त्यांना मिळाला होता. पांच वर्षेंपर्यंत भविष्यकाळीं अंधार दिसत असतांही ही संघटना निर्धारानें वाढत होती. त्यांच्या साधनांचा विचार येथें कर्तव्य नाहीं. सहा वर्षांनंतर त्यांना विजय मिळाला. १९१६च्या बंडांत दडपशाहीनें

मरून गेलेलें आयरिश राष्ट्र या संघटनेनें पुनरुज्जीवित केलें व यशस्वी केलें. हिट-लरची राजकीय तत्त्वें चुकीचीं आहेत. पण मरून गेलेल्या जर्मन राष्ट्रास त्याच्या स्टॉर्म–ट्रूप्स या स्वयंसेवक संघटनेनेंच पुनरुज्जीवित केलें ही गोष्टही लक्षांत ठेवण्यासारखी आहे. मुस्तफा केमाल पाशाची तरुण तुर्क चळवळ सामान्यतः याच जातीची असून पराभवानें मरून गेलेल्या तुर्की राष्ट्रांत या तरुण तुर्क चळवळीनेंच नवचैतन्य निर्माण केलें. हिंदी जनतेचा व काँग्रेसचा अखेरचा पराभव झालेला नाहीं. स्वातंत्र्ययत्नांत पराभव नसतोच. स्वातंत्र्यप्राप्तीनेंच तो प्रयत्न संपत असतो. येथील स्वातंत्र्ययत्नाचें पर्यवसान फॅसिझम्‌विरोधी आंतरराष्ट्रीय लढ्यामध्यें हिंदी जनतेनें लोकशाहीच्या बाजूनें सामील होण्यांत झालें पाहिजे.

× × × ×

या सर्व प्रश्नांचा निकडीनें विचार करण्याची वेळ आतां आली आहे. चोहोकडे अंतर्मुख होऊन पुढील मार्ग शोधण्याची खटपट सुरू आहे. अशा वेळीं विचारी महाराष्ट्रीयास विचार करण्याचें कामीं हा लहानसा समालोचनात्मक व विवेचनात्मक निबंध उपयोगी पडेल अशा आशेनें महाराष्ट्रांतील काँग्रेस-कार्यकर्त्यांपुढें मी तो ठेवीत आहें.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ६२२८ ६५०८
संदर्भ शाखा


या भयंकर महागाईंत पर्ल काढा
हाच आमचा खरा आधार ठरला !
RATIONAL
पर्ल काढा
सगळीं औषधें महाग झालेलीं मग बिचारे डॉक्टर तरी स्वस्तांत औषधें कुठून देणार ? आम्हांला मात्र पर्ल काढ्यानेंच खरा आधार दिला. अधूनमधून पर्ल काढा घेत राहिलें तर दुपारची रसरस, अंगाची आंतल्याआंतच आग, पोटांतली आग, उन्हाळ्यासारखा भास, अपचनाची संवय ( डिस्पेप-शिया ) पोट फुगणें, दुखणें, शौचाची नेहमींची तक्रार, थंडींतील सर्दी, पडसें वगैरे तब्येतीच्या नेहमींच्या तक्रारी मुळींच राहात नाहींत. सर्वांची प्रकृती कशी ठीक असते ! महाग औषधांसाठीं पैसे खर्च करण्याची आम्हांला पाळीच येत नाहीं. पर्ल काढा सर्व औषधी दुकानांत मिळतो. आपणही पर्ल काढ्याचा आधार घ्या.
पर्ल कंपनी, राणीबाग, मुंबई २७.

# वाद-विवेचन माला

संपादक—पां. वा. गाडगीळ

| | | कि. रु. आ. |
|---|---|---|
| १ सुलभ समाजवाद | ( लेखकः—पां. वा. गाडगीळ ) | १—० |
| २ फॅसिझम् | ( ,, ,, | १—० |
| ३ साम्राज्यशाही | ( लेखकः—ना. ग. गोरे ) | १—० |
| ४ अराज्यवाद | ( लेखकः—पां. वा. गाडगीळ ) | १—० |
| ५ लोकशाही | ( लेखकः—शं. द. जावडेकर ) | १—८ |
| ६ मार्क्सचा भौतिकवाद | ( लेखकः—पां. वा. गाडगीळ ) | १—० |
| ७ विश्वकुटुंबवाद | ( लेखकः—ना. ग. गोरे ) | १—८ |
| ८ गांधीवाद | ( लेखकः—शं. द. जावडेकर ) | १—८ |
| ९ ईश्वरवाद | ( लेखकः—सोनोपंत दांडेकर ) | १—८ |
| १० राष्ट्रवाद | ( लेखकः—श्री. य. कोल्हटकर ) | २—० |
| ११ जडवाद | ( लेखकः—लक्ष्मण शास्त्री जोशी ) | १—४ |
| १२ हिंदुत्ववाद | ( लेखकः—ज. स. करंदीकर ) | २—८ |
| १३ मार्क्सचे कॅपिटल [सारग्रंथ] | (लेखकः—पां. वा. गाडगीळ) | १०—० |

हीं एकूण २६॥। रुपये किंमतीची पुस्तकें फक्त २३॥ रुपये मनीऑर्डरीनें पाठविल्यास आपणांस घरपोंच मिळतील. **कॅपिटल** शिवाय राहिलेली १६॥। रुपये किंमतीची बारा पुस्तकें फक्त १५ रुपये मनीऑर्डरनें पाठविल्यास घरपोहोंच मिळतील. किरकोळ पुस्तकांस मूळ किंमत व शिवाय पोस्टेज पडेल.

**य. गो. जोशी—प्रकाशन, ६२३।१५ सदाशिव, पुणें, २**

REFBK-0006374